ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : गोविंदाची गुजगोष्ट

लेखक : गोविंद गोपाल देसाई

प्रकाशक : श्रीगोपाल गायन समाज, पुणे

प्रकाशन वर्ष : १९४४

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२१

गोपाल पालन करी रणीं युद्ध-रीति । गोपाल गायन करीं आणि धर्म-नीति ॥
गोपाल गायन समाज प्रभू-पदाब्जीं । तीं गात गीत विंदे हरिचीं समाजीं ॥

# गोविंदाची गुजगोष्ट

गोविंद गोपाल देसाई

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

923.2
Des
7986

कि. २ रुपये

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00942

# गोविंदाची गुजगोष्ट

923.2
Des

★

गोपाल पालन करी रणिं युद्धरीति ।
गोपाल गायन करी जनिं धर्म-नीति ॥
गोपाल–गायन–समाज प्रभू–पदाब्जीं ।
तीं गात गीत विरुदें हरिचीं समाजीं ॥

★

गोविंद गोपाल देसाई

किंमत २ रुपये

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

-: प्रकाशक :-

**अ. चिं. मराठे, द. मो. जोशी. चिटणीस,**

रजतमहोत्सव मंडळ, श्रीगोपाल गायन समाज, पुणें २

म६०२५

-: मुद्रक :-

**दामोदर नरहर शिखरे एम्. ए.**

अग्रणी मुद्रणालय, ६२३।२६ सदाशिव पुणें, २.

# प्रकाशकाचे चार शब्द

ज्या संस्थेंत आम्ही पूर्ण एक तप संगीताचें अध्ययन व अध्यापन केलें, त्या " श्री गोपाल–गायन–समाजाला " यंदा पंचवीस वर्षे पुरी होत आहेत, हें पाहून आम्हास–व त्याचप्रमाणें आमच्यासारख्या शेंकडों संगीत-प्रेमी लोकांस–आनंद व अभिमान वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

संस्थेच्या या रौप्यमहोत्सवानिमित्त जे कार्यक्रम आम्ही योजिले त्यामध्यें संस्थेचा इतिहास ग्रंथरूपानें शाश्वत स्वरूपांत रहावा अशी आम्हां विद्यार्थ्यांना स्वाभाविकच इच्छा उत्पन्न झाली. ती इच्छा आम्ही आमचे गुरुवर्यांचे कानीं घातली व संस्थेचा सर्व इतिहास इत्थंभूत लिहिण्याची त्यांना विनंति केली. " पूर्वीच्या अडचणी व संकटें यांच्या आठवणीनं मनाला पुनः त्रास कशाला देऊं ? " असें म्हणून गुरुवर्यांनीं ग्रंथलेखना-विषयीं अनुत्सुकता दर्शविली. परंतु आम्हांला व पुढील विद्यार्थ्यांना तो ग्रंथ मार्गदर्शक होईल अशा विश्वासानें आम्ही त्यांचे खनपटीसच बसलो व सांगितलें कीं, संस्थेची वाढ जसजशी झाली तशी आपण मोकळ्या मनानें लिहावी. यामुळें एकाद्याचें मन दुखविलें जातें किंवा काय हें पाहण्या-पेक्षां सत्य दुखविलें जाऊं नये याकडे त्यांनीं लक्ष द्यावें असें आम्हांस वाटलें. सौजन्य व सत्य यांमधून त्यांनीं कुशलतेनें मार्ग काढला आहे हें पुढील प्रकरणें वाचल्यावर आम्हांस दिसून आलें व संतोष वाटला. महाराष्ट्रांतील रसिकवर्गालाही हा ग्रंथ असाच संतोषदायक व मार्गदर्शक होईल असा आम्हाला भरंवसा वाटतो.

गुरुवर्यांनीं संगीताच्या प्रचारार्थ गेलीं पंचवीस वर्षे श्रम केले, संस्थेच्या मालकीची इमारत उभी केली, नऊ वर्षांचा अभ्यासक्रम आखून प्राथमिक-पासून तो संगीत–विद्या–विशारदापर्यंत विद्यार्थी तयार केले, पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्या पश्चात पदवीदान-समारंभाची प्रथा प्रथम

सुरू केली, मराठशाही काव्य संगीताच्या साच्यांत बसवून शाहिरी जगापुढें मांडलें व शाहिरी जग पुन्हा एकदा जागें केलें. सामाजिक व धार्मिक विषयांवर कीर्तन, भजन, प्रवचन, व्याख्यान इत्यादि कार्यक्रम करून साहित्य व संगीत यांची जोड सार्वजनिक कार्य करण्यास किती महत्त्वाची आहे हें दाखवून दिलें. शेंकडों विद्यार्थ्यांना संगीताचें मोफत शिक्षण देऊन त्याबरोबर नियमितपणा, व्यवस्थितपणा, निर्व्यसनीपणा, शिस्त व स्वच्छता इत्यादि गुण शिकविले आणि त्यांच्या ठिकाणीं स्वतःच्या पायावर उभे राहण्याची पात्रता निर्माण केली.

विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट अशी कीं, गुरुवर्य गोविंदराव हे जसे गायनचार्य म्हणून प्रसिद्ध आहेत तसेच राष्ट्रीय कार्यकर्ते म्हणूनहि त्यांचें नांव अखिल महाराष्ट्राला परिचित आहे. या राष्ट्रीयत्त्वाचें बीज त्यांच्या स्वाभिमानी वृत्तींत आढळते. सामान्यतः 'गायक म्हणजे याचक' अशी समजूत समाजांत पसरलेली आहे. तिला अपवाद शोभण्यासारखे जे थोडे गायक महाराष्ट्रांत आज दिसत आहेत त्यामध्यें गुरुवर्यांची गणना प्रामुख्यानें केली जाते.

गुरुवर्य गोविंदराव देसाई यांचें चरित्र प्रसिद्ध करण्याची सुवर्णसंधि आज आम्हास मिळाली यापेक्षां अधिक आनंदाची व समाधानाची गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. संस्थेच्या सुवर्ण-महोत्सवाचाहि ग्रंथ ह्यांचेच हातून निघो अशी आमची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

रजतमहोत्सव मंडळ,
श्रीगोपाल गायन समाज, पुणें २
ता. १ जानेवारी १९४४

**अ. चिं. मराठे,**
**द. मो. जोशी,**
चिटणीस,

# लेखकाचें निवेदन

सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ब्रूयात्सत्यमप्रियम् ॥
प्रियं च नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः ॥

श्रीगोपाल-गायन-समाजाला या वर्षी पंचवीस वर्षें पूर्ण झालीं. त्याच्या रौप्यमहोत्सवाचे निमित्तानें, विद्यार्थ्यांच्या आग्रहावरून, कांहींसा आत्मचरित्ररूप व कांहींसा संस्था—वृत्तांतरूप असा हा ग्रंथ महाराष्ट्रांतील रसिक वृत्तीच्या व राष्ट्रीय बुद्धीच्या वाचकांचे हातीं मला देतां येत आहे, याबद्दल परम संतोष वाटतो.

या ग्रंथ—लेखनानें मला माझ्यावरील नानाविध व्यक्तींच्या व संस्थांच्या ऋणांची कल्पना योग्य प्रकारें आली. लो. टिळक, म. गांधी, प्रो. विजापूरकर अशा राष्ट्रधुरीणांचा सहवास मला लाभल्यामुळें माझ्या अंगची राष्ट्रीय वृत्ति पुष्ट झाली व त्यामुळें राष्ट्राची अल्पस्वल्प सेवा हातून घडली. त्याचप्रमाणें गु. पं. विष्णु दिगंबर यांच्या कृपाछत्राखालीं गायन-विद्येची उपासना मला करतां आली हें मी माझें भाग्य समजतों. अशा थोर व्यक्तींच्या सहवासामुळेंच माझ्या जीवनांतील काटेकुटे बोथटून गेले व समाधानाचा सुवास मला सतत मिळत गेला. जीवनाच्या मार्गा-वर आलेल्या कंटकांचा निर्देश केवळ इतिहासाच्या स्वरूपांत अवश्य तेवढाच मी केला आहे. कलहाची खपली पुनः काढावी किंवा कोणाचें मन दुखवावें असा माझा हेतु सुतरां नाहीं व तशा वृत्तींत आज माझें मन नाहीं.

संस्थेच्या हितासाठीं कांहीं थोर व्यक्तींशीं मला पूर्वीं झगडावें लागलें, तरी त्या झगड्याचें एकांगी अथवा विपर्यस्त वर्णन मी कोठेंहि दिलें नाहीं—फार काय त्याच्या वर्णनाचा विस्तारहि टाळला आहे; आणि त्या व्यक्तींनीं पूर्वीं केलेल्या साहाय्याचा पूर्ण कृतज्ञतेनें गौरवच केला आहे. इतकी जपणूक करूनहि कोणाच्या मनाला लागेल असा उणाअधिक शब्द पुढील ‘ गुजगोष्टींत ’ गेला असल्यास त्यांनीं माझी इति-हास-कथ-नाची मूळ भूमिका लक्ष्यांत घेऊन मला उदार अंतःकरणानें क्षमा करावी.

केसरी-प्रबोध, महाराष्ट्र सांवत्सरिक, लो. टिळकांच्या आठवणीं व इतर मासिकें व वृत्तपत्रें यांतून आतांपर्यंत मी केलेल्या विविध कार्याची संक्षिप्त माहिती प्रसिद्ध झाली आहे. या सर्व हकीगतीचा निराळाच एक

ग्रंथ प्रसिद्ध झाल्यास पुढें कार्य करणाऱ्या आमच्या विद्यार्थ्यांस व इतरांसही तो मार्गदर्शक होईल अशी सूचना माझ्या मित्रांनी व हितचिंतकांनीं केली. त्यांस अनुसरून खुलासेवार लिहिलेली हकीगत या रौप्यमहोत्सव–प्रसंगीं ग्रंथरूपानें प्रसिद्ध होत आहे.

॥ आत्मस्तुति परनिंदा मिथ्या भाषण कधीं न यो वदना ॥

ही थोरांची शिकवण माझ्या लक्षांत सदैव असल्यामुळें या ग्रंथांत लिहिलेल्या सर्व गोष्टी सत्य आहेत हें निराळें सांगावयास नको, त्यांत आत्मस्तुति व परनिंदा ही दोन्हीं नाहींत. तथापि लिहिण्याच्या ओघांत एकाद्या वेळीं चुकून तसें होण्याचा संभव असतो. यासाठीं तसा भास झाल्यास वाचकांनीं त्याची क्षमा करावी.

रौप्यमहोत्सवाची तयारी होईपर्यंतची हकीगत या पुस्तकांत ग्रथित केली आहे. गोपाल गायन समाज, महाराष्ट्र शाहीर मंडळ, श्रीकृष्ण व्यायाम मंडळ, रेल्वे मंडळ व तान्हाजी स्मारक मंडळ यातील कार्य करीत असतां प्रारब्धयोग असा कीं, प्रत्येक बाबतींत संकटें व अडचणी अगदीं आरंभापासून जणूं काय आमंत्रण केल्याप्रमाणें येत. हीं संकटें टाळण्याचा प्रयत्न करीत असतां अनेक प्रमाद घडले, दुसऱ्याच्या चुकीचें प्रायश्चित्त भोगावें लागले, निंदा सहन करावी लागली. विश्वासघातामुळें द्रव्यहानी व कार्यनाश झाला. अस्तनींत विंचू, पण नांगी मारेपर्यंत त्याचा पत्ता लागूं नये अशी आजची स्थिति! मित्रांनीं शत्रु व्हावें व शत्रूंनीं मित्र बनावें हें अद्याप चालूच आहे. शारिरीक कष्ट, मानसिक त्रास व अपमान किती तरी झाला. परंतु समाधानाची गोष्ट अशी कीं, जीं कार्यें हातीं घेतलीं तीं सर्व या अडचणी–संकटामधूनच अखेर शेवटास जाऊन प्रत्येक कार्यांत यश आलें. भगवान गोपालकृष्णाची कृपा आणि वडील–मातुःश्री व गुरुमहाराज यांचा आशीर्वाद यांमुळेंच आज हे सुखाचे व आनंदाचे दिवस लाभले. यासाठीं कृतज्ञभावानें त्यांचें स्मरण करुन हा ग्रंथ वाचकांचे हातीं नम्रभावानें देतों.

**गोविंद गोपाल देसाई**

# श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य संस्थान मठ संकेश्वर–करवीर

मक्काम आचार्य मठ–नारायण पेठ, पुणें

श्रीगणपतिर्जयति ॥

सुप्रसिद्धगायनाचार्यैर्देसाईमहाशयैः कृतमद्यतनं श्रीहरिकीर्तनमाकर्ण्य यत्सत्यं प्रमोदतेऽस्मदीयमंतरंगम् । अधुनातनपरिस्थितेः पर्यालोचने आगामिनि काले भारतीयानामनादिकालसिद्धवैदिकसंस्कृतिः कीदृशीं दशां प्राप्नुयादिति संभावनाऽपि क्लेशमापादयति । इदृशे प्रसंगे गीर्वाणभाषाप्रचारणद्वारा वैदिकसंस्कृतिपरिरक्षणमेतादृशानेव महाभागान् सर्वात्मनाऽवलंबते । तत्तच्छास्त्रप्रतिपादितानां कर्मयोग-भक्तियोग–ज्ञानयोगप्रभृतीनां तत्वानां सर्वलोकसाधारण्येन बोधने हरिकीर्तनसदृशो नान्यः कश्चित्सुलभोपायोऽस्ति । केवलशास्त्रीयतत्त्वनिरूपणे क्लेशसंभावनयाऽनादरभजतां श्रोतृजनानां समुचितगायनसंमिश्रणेन तेषामेव तत्त्वानां निरूपणमादरातिशयकारी भवतीति अनुभवसिद्धम् । विशेषतश्च पुरातनानां महानुभावानामितिवृत्तस्याप्यंतर्भावे परमानंदलाभेन सुतरामादरः संजायते श्रोतृवर्गस्य । तदेतत्सर्वमपि विचिंत्य इमे महाशयाः पुरातनेतिवृत्तं कीर्तनरूपेण गीर्वाणभाषया निरूपयामासुरित्येतदत्यन्तसंतोषास्पदम् ।

आस्तां गीर्वाणभाषा, स्वदेशभाषयापि वा भवतु त्रिचतुराणां वाक्यानां रचना महाक्लेशदायिनी । एवं सति गीर्वाणभाषाविषये

किमु वक्तव्यम् ? संति हि जगति तत्तच्छास्त्रमर्मवेत्तारो गीर्वाणभाषया व्यवहर्तारश्च पंडितप्रवरा भूयांसः संति च स्वकीयया निरुपमया गायनकलया जगदखिलं संमोहयन्तो गायकश्रेष्ठा अपि प्रभूताः । एवं संदर्भोचितकथानकप्रतिपादनेन भगवति परमेश्वरे श्रोतृवृंदस्य शाश्वतिकीं भक्तिमुत्पादयन्तः कीर्तनकारा अपि बहवः समुपलभ्यन्ते । तथापि सर्वेषामेतेषां गुणानामेकत्रसमवायः सुतरां विरलः । सति गीर्वाणभाषापरिचये गानकलापरिचयाभावः, गानकलापरिचयसत्वे तु गीर्वाणभाषापरिचयाभावः, तदुभयसत्वेऽपि कीर्तनाभ्यासाभावः, इत्येवंप्रकारेण अन्यतमांगवैगुण्यमेव परिदृश्यते ।

अस्मिंस्तु कीर्तने सर्वेषामप्येतेषामंगानां समावेशो निरातिशयशोभामावहति । तत्रापि च विभिन्नव्यवसायिनामप्येतेषामयं कीर्तनप्रसंगः कीर्तनव्यवसायिनो हरिभक्तिप्रवणान् कीर्तनकारानप्यानंदयतीति ततोऽपि रमणीयता । एवंविधेन एतेषां कीर्तनेन सूचिता अनेके विषयाः सावहितमवधारयितव्याः वर्तन्ते । तत्र सुप्रसिद्धानां तेषां तेषां गायकशिरोमणीनां गायनकलया न केवलं धनार्जनमेव फलं किंतु हरिभक्तिरेव परमं फलमिति प्राथमिको विषयः । देशभाषया कीर्तने निपुणैः तत्तत्कीर्तनकारैरपि न देशभाषायामेव विरन्तव्यम् अपि तु गीर्वाणभाषया कीर्तनकरणे सर्वथा प्रयत्नो विधेय इति द्वितीयो विषयः । गीर्वाणभाषा न केवलं शास्त्रार्थोपयोगिनी किंतु कीर्तनप्रभृतिसार्वजनिककार्येष्वप्यस्या उपयोगो भवत्येवेति तृयीयो विषयः । एवमन्यदपि । सर्वथा एतेषां सर्वजनोपयोगिसत्कार्यप्रवृत्तानां महाभागानामुत्तरोत्तरं श्रेयो वर्धतामिति श्रीशारदाचंद्रमौलीश्वरचरणारविंदयोः संततं प्रार्थयामहे इति शम् ॥

# अर्पण–पत्रिका

श्रीगोपालकृष्ण

परमपूज्य वडीलमातुःश्री

व

गुरुवर्य गायनाचार्य पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर

**या त्रिदेवता-चरणीं**

हा लहानसा ग्रंथ अत्यंत आदरानें व भक्तीनें
अर्पण केला आहे.


—गोविंद

# अनुक्रमणिका


| प्रकरण | नांव | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय शिक्षणाचे संस्कार | .... | १-११ |
| २ | पंडितजींची भेट | .... | १२-२९ |
| ३ | समाजाची संगीत-सेवा | .... | ३०-४० |
| ४ | सांसारिक सुखदुःखें | .... | ४१-४५ |
| ५ | रेल्वे-मंडळाची कामगिरी | ... | ४६-५४ |
| ६ | संस्थेची इमारत | .... | ५५-७४ |
| ७ | व्यावहारिक अडचणी | ... | ७५-८४ |
| ८ | महात्माजींच्या सहवासांत | ... | ८५-९१ |
| ९ | गायनसमाजाचा उत्कर्ष | .... | ९२-११९ |
| १० | गायकाचा दर्जा | ... | १२०-१२५ |
| ११ | आनंदमूर्तीचें प्रकरण | .... | १२६-१३१ |
| १२ | नरवीराचें स्मारक | .... | १३२-१५८ |
| १३ | पुण्यांतील गोळीबार | ... | १५९-१६४ |
| | **लेख व भाषणें** | .... | १६५-१९८ |


**शोधः**—पृष्ठ १२४ वर ' मुधोळच्या राणीसरकार ' याऐवजीं ' बडोद्याच्या राजस्नुषा श्रीमंत कमलादेवी गायकवाड ' असें वाचावें.

संगीताचार्य श्री. गोविंदराव देसाई,



( संस्थापक )

श्रीगोपाळ गायनसमाज-पुणें.

वडील व मातुश्री.



श्री० गोपाळराव देसाई



सौ० राधाबाई देसाई.

# गोविंदाची गुजगोष्ट

## प्रकरण १ लें

## राष्ट्रीय शिक्षणाचे संस्कार

माझा जन्म कोंकण प्रांतांत नाधवडे गांवीं मार्गशीर्ष व॥ ३ शके १८११ मंगळवारीं सकाळीं झाला. एक वर्षाचा झाल्यावर माझ्या मातोश्रींनीं मला उगार मुक्कामीं आणलें. वडिलांचें नांव गोपाल व मातोश्रींचें नांव राधाबाई. माझे वडील ती. गोपाळ रघुनाथ देसाई हे प्रथम शाळा–मास्तर होते. त्यानंतर ते कोल्हापूरजवळ गडहिंग्लज तालुक्याला फौजदार झाले. शेवटीं कोल्हापुर मुक्कामीं खर्डेकर व भोपे यांच्या दौलतीकडे कारभारी म्हणून त्यांची नेमणूक झाली. नोकरींतून सुटल्यावर सांगली संस्थानांत, कृष्णा नदीचें कांठीं वसलेल्या, उगार नांवाच्या एका खेडगांवीं, जमिनी खरेदी करून त्यांनीं तेथें कायमची वस्ती केली. हल्लीं उगार गांव बराच प्रसिद्धीस आला असून आतां

तर त्या ठिकाणीं साखरेचा कारखानाच सुरू झाला आहे. पण पूर्वी उगार गांव अप्रसिद्ध होता. परंतु माझे वडील बंधु ती. रघुनाथराव देसाई, श्री. दिवेकर व इतर ग्रामस्थ यांच्या खटपटीनें या गांवीं गेल्या दहा-बारा वर्षांपासून सभा, सम्मेलनें, परिषदा, जत्रा व इतर अनेक उत्सव होऊं लागले. महाराष्ट्रांतील सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांचें तेथें जाणें-येणें सुरू झालें व उगार गांवास साहाजिकच प्रसिद्धी मिळाली. याच ठिकाणीं माझें सर्व बालपण गेलें.

मराठी सात यत्तेपर्यंत उगारच्या शाळेंत शिक्षण झाल्यानंतर माझ्या वडिलांनीं मला कोल्हापुरास इंग्रजी शिक्षणासाठीं पाठविलें. कोल्हापुरास चार वर्षे राहिल्यानंतर मी मिरजेस आलों. पुढें १९०८ सालीं मला सांगलीस जावें लागलें. माझी प्रकृती उगारास असतांना लहानपणीं अत्यंत क्षीण होती. मिरजेस आल्यावर ती थोडी सुधारली व सांगलीस आल्यानंतर मी पहिलवान झालों. कुस्ती हा माझा अत्यंत आवडता खेळ असल्यामुळें सणा-समारंभाच्या वेळीं जेथें कुस्त्या होत, तेथें मी हौसेनें जात असें. संधी मिळाल्यास फडावर कुस्ती करूनहि येत असें. मल्लखांब व पोहणें या दोन्ही कलांमध्यें मला चांगलाच लौकिक लाभला. सांगली हायस्कूलमध्यें शिकत असतांनाच या सर्व गोष्टी मला साध्य झाल्या. पट्टा, बोथाटी व बंदुकीचा नेम मारणें इत्यादि खेळांचा तर मला नाद फार असे. त्यामुळेंच माझी प्रकृती उत्तम सुधारली व पुढील आयुष्यांतील सर्व कामें केवळ प्रकृतीच्या जोरावरच मला करतां आलीं.

## सरकारी शाळेवर बहिष्कार

सांगलीस हायस्कूलमध्यें शिकत असतांना ता. २३ जुलै १९०८ रोजीं लो. टिळकांना सहा वर्षे जन्मठेप झाल्याचें वर्तमान कानीं पडलें. लोकमान्यांस ती अघोर शिक्षा झाल्याची वज्राघाती वार्ता तारेनें येऊन थडक-

केली. मी शाळेंतून बाहेर पडलों. माझे मित्र श्री. म. वा. दिवेकर यावेळीं सांगली हायस्कूलमध्यें शिकत होते. तेहि वर्ग सोडून बाहेर निघाले. सर्व विद्यार्थी हायस्कूलाच्या बाहेर येऊन राजवाड्याच्या मैदानांत उभे राहिले. सरकारच्या निषेधार्थ जाहीर सभा भरवावी असें सर्वानुमतें ठरलें. मारुतीच्या देवळासमोर मोठी सभा भरली. परंतु पोलीस-अधिकाऱ्यांनीं सभा बंद केली. म्हणून सांगलीच्या हद्दींत सभा न होतां हरिपूरच्या हद्दींतील गणपतीच्या देवालयांत ही सभा भरली. सभेंत श्री. दिवेकर, मी व इतर अनेक विद्यार्थी यांचीं भाषणें झालीं. सरकारी दडपशाहीचा निषेध करण्यांत आला. सरकारी शाळेवर बहिष्कार घालून राष्ट्रीय शिक्षणाकडे विद्यार्थ्यांनीं वळावें, परदेशी वस्तूवर बहिष्कार घालावा व खेडेगांवांमधून आपला देश व आपला धर्म यासंबंधीं आपुलकीच्या भावना उत्पन्न होतील असें शिक्षण देण्याची व्यवस्था करावी आणि या खटपटीस शक्य तों लवकर लागावें असें मी बोललों.

ही सभा भरविल्याबद्दल दिवेकर, मी व इतर पांच-सहा विद्यार्थी यांना हायस्कूलमधून बाहेर काढण्यांत आलें. कांहीं विद्यार्थ्यांनीं माफी मागितल्यामुळें त्यांना शाळेंत परत घेतलें. यावेळीं गु. हरिपंत करमरकर हे सांगली हायस्कूलचे हेडमास्तर होते. आम्हांस त्यांनीं माफी मागण्यास सांगितलें. परंतु ती गोष्ट आम्ही साफ नाकारली आणि सरकारी शाळेस कायमचा रामराम ठोकला. कॅ. बर्क हे यावेळीं सांगलीचे ॲडमिनिस्ट्रेटर होते. त्यांनीं आपल्या बंगल्यावर आम्हास बोलावून माफी मागून पुन्हां शाळेंत जाण्याचा बराच उपदेश केला. परंतु त्याचा आमच्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं. हे बर्कसाहेब १९१४ सालीं जर्मन इंग्रजांच्या लढाईंत ठार झाले. शाळा सोडली व पुढील विचार करण्यासाठीं उगारास गेलों. हें वडिलांना समजतांच त्यांना राग आला. निदान मॅट्रिकची परीक्षा

पास होऊन सरकारी नोकरींत मी कोठें तरी शिरावें अशी त्यांची फार इच्छा. मला त्यांनीं तसें सांगितलें. परंतु मला तें मान्य झालें नाहीं. तेव्हां त्यांनीं मला घरांतून जाण्यास सांगितलें.

" घरच्या उत्पन्नांपैकीं तुला कांहीं मिळणार नाहीं, घरचें व जमिनीचें उत्पन्न यांची विभागणी करतांना तुझा हिस्सा गाळून दोघांनाच सर्व मालमत्ता वाटून देईन. आजपासून तुझा येथील संबंध संपला. तुझ्या पुढील आयुष्याची जबाबदारी सर्वस्वीं तुझ्यावर आहे हें लक्षांत ठेवून वाटेल तिकडे जा. " असें त्यांनीं बजावलें. एक–दोन दिवसांतच एक कांबळें व लहानशी पितळेची तपेली मातोश्रींकडून घेऊन आमची स्वारी घराबाहेर पडली.

## समर्थ विद्यालयाची पांगापांग

प्रथम तळेगांव ( दाभाडे ) येथील " समर्थ विद्यालयांत " गेलों. श्री. दिवेकर माझ्यापूर्वींच या विद्यालयांत गेले होते, त्यामुळें मलाहि तेथें गेल्याबरोबर आश्रय मिळाला. हा आश्रय मिळण्यांत श्री. दिवेकर यांचें मला चांगलें साहाय्य झालें.

दोन वर्षे तळेगांवास राहून संस्थेची नोकरी केली. इंग्रजी व संस्कृत या भाषांचा अभ्यास व इतर ग्रंथावलोकन बरेंच झालें. १९१० सालीं " समर्थ विद्यालय " ही संस्था मुंबई सरकारनें बेकायदेशीर ठरवून बंद केली. काय करावें असा विचार सुरू झाला. श्री. द. वि. पटवर्धन ( हल्लींचे ह. भ. डॉ. दत्तोपंत पटवर्धन ) यांनीं कीर्तनाचा व्यासंग करण्याचें ठरविलें, श्री. दिवेकर धर्मशास्त्राचे अध्यापनाकडे वळले. श्री. ज. वि. ओक ( " लोकशिक्षण " मासिकाचे संस्थापक ) हे पुण्यास येऊन राहिले. श्री. रा. दा. देसाई हे उत्तर हिंदुस्थानांत नोकरीकरतां गेले. श्री. वि. म. भुस्कुटे केसरी वर्तमानपत्राकडे कांहीं दिवस राहिल्यावर पुढें प्रो. शिवरामपंत परांजपे यांच्या "स्वराज्य" पत्राचे एक संपादक म्हणून काम करूं लागले. श्री. ज. स. ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर ( ' केसरी '-चे संपादक ) यांनीं पुण्यास येऊन शनिवार पेठेंतील वाड्याच्या

वाड्यांत वास्तव्य केलें. समर्थ विद्यालय बंद झाल्यावर जे विद्यार्थी पुण्यास येऊन राहिले, त्या सर्वांना सदर ठिकाणीं श्री. तात्यासाहेब करंदीकर यांनीं समर्थ विद्यालयाचे धर्तीवर शिक्षण देण्यास सुरुवात केली. मी कांहीं दिवस त्यांचेबरोबर होतों. हें शिक्षणाचें काम फार दिवस चाललें नाहीं. पुढं श्री. करंदीकर हे केसरीचे सहसंपादक म्हणून काम करूं लागले.

## अर्वाचीन गुरुकुल



गुरुवर्य अण्णासाहेब विजापूरकर

समर्थ विद्यालयांत प्रथम गेल्याबरोबर प्राचीन काळच्या ऋषींच्या आश्रमांत प्रवेश केल्याचा भास झाला. आजूबाजूस डोंगर व त्यावरील स्वाभाविक दाट झाडी, ठिकठिकाणीं पाण्याचे लहानमोठे ओढे व झरे, चमत्कारिक व अनेक रंगांचे पंक्षी, विद्यार्थी व शिक्षक यांना राहण्यासाठीं तट्ट्याच्या झोपड्या, स्वयंपाकघर व भोजनगृह चोहोकडून तट्ट्यांनींच सुशोभित केलेलें, गाई-म्हशींची खिल्लारें, पहाटे चार वाजतां प्रातःस्मरण, त्यानंतर स्नान, संध्या, नमस्कारादि व्यायाम व शाळेचा अभ्यास, भोजनाच्या वेळीं त्रिसुपर्ण इत्यादि गुरुकुलीन वैभव पाहून माझें अंतःकरण आनंदानें फुलून जाई. मी विद्यालयांत जाण्यापूर्वीचें "विश्ववृत्त" मासिकावर खटला होऊन गुरुवर्य अण्णासाहेब यांना सश्रम कारावासाची शिक्षा झाली होती. साबरमतीच्या कारागृहांत अण्णासाहेबांना नेऊन ठेविलें होतें.

अर्थात् यावेळीं विद्यालयांत त्यांच्या सहवासाचा मला लाभ होणें शक्य नव्हतें. पण १९०१ सालीं मी कोल्हापुरास इंग्रजी शिक्षणासाठीं गेलों. मी रोज सकाळीं पंचगंगेवर स्नानास जात असें व अण्णाही त्याचवेळीं स्नानास येत. एक दिवस आंघोळीस साधेपणानें गंगेंत उतरण्याऐवजीं मीं दंड ठोकून पाण्यांत उलटी गोलांटी घेतली व थोडेसें पोहून पुन्हा घाटावर आलों. अण्णांनीं विचारिलें. "तुझे आडनांव काय, राहातोस कोठें, कोणत्या शाळेंत जातोस?" मी सर्व माहिती सांगितली. ती ऐकून ते म्हणाले. "अरे, मग तुझे वडील तर माझे गुरुजी!" हें अण्णांनीं मला सांगितल्या दिवसापासूनच अण्णांचा व माझा परिचय झाला.

अण्णांची संध्या होऊन ते परत निघाले. मीहि त्यांच्याबरोबर चालू लागलों. यावेळीं अण्णा कोल्हापुरास राजाराम कॉलेजमध्यें संस्कृतचे प्राध्यापक होते. पण राहणी खऱ्या देशभक्ताची! पावसांत छत्रीऐवजीं कांबळें वापरीत. त्यावेळीं खादी रूढ नव्हती. पण आपल्या देशांतील गिरणीचा मालच ते घेत. वृत्ति धर्मराजासारखी शांत, नेहमीं चेहऱ्यावर हास्य, भाषा अत्यंत सौम्य व प्रेमळ, कटु अगर कडक भाषण हें त्यांना ठाऊकच नव्हतें. अण्णांना राग आलेला मी कधींही पाहिला नाहीं, त्यांच्यासारखा सदाचारसंपन्न मनुष्य क्वचितच पहावयास मिळेल! पोशाख इतका साधा कीं, तो पाहून हे प्रो. विजापुरकर आहेत असें मुळींच वाटत नसे. विद्या व विनय यांची जोड मला प्रथम आण्णांच्या ठिकाणींच पहावयास मिळाली.

आपला देश, धर्म, संस्कृती, आपल्या चालिरीति याबद्दल अभिमान उत्पन्न होण्यासारखें शिक्षण आमच्या मुलांना बालपणापासूनच दिलें तरच राष्ट्राचा उद्धार होईल अशी त्यांची विचारसरणी या वेळेपासूनच मी ऐकत होतो. विद्यार्थ्यांशी बोलतांना ते देशाभिमान धर्माभिमान व स्वाभिमान यांच्या गोष्टीच बोलत. आणि यामुळेच त्या वेळचे राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपल डर्बी यांच्याशीं मतभेद होऊन अण्णांना कॉलेज सोडावें लागलें. पुढें लवकरच त्यांच्या मनांत घोळत असलेलें राष्ट्रीय शिक्षण जगापुढें ठेवण्यासाठीं त्यांनीं समर्थ विद्यालय नांवाची शाळा सुरू केली. यापूर्वी

राष्ट्रीय शिक्षण देणारी संस्था महाराष्ट्रांत नव्हती. अशा प्रकारची शिक्षण–संस्था निर्माण करण्याची कल्पना महाराष्ट्रांत अण्णांनींच प्रथम काढली. म्हणूनच त्यांना राष्ट्रीय शिक्षणाचे आद्य प्रवर्तक म्हणतात तें अगदीं सार्थ आहे.

## देशांतील प्रक्षोभाची झळ

देशांत शांतता रहावी म्हणून १९०८ सालच्या जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत सरकारनें लोकमान्य टिळकांना मंडालेस रवाना केलें. परंतु शांतता प्रस्थापित होण्याऐवजीं हिंदूस्थानांतील वातावरण अधिकच क्षुब्ध झालें. १९०८–९ व १० हीं तीन वर्षें अत्यंत घडामोडीचीं गेलीं. चळवळ व अशांतता फारच माजली व अराजकांचे अत्याचार सुरू झाले. पोलीस व युरोपियन अधिकाऱ्यांचे खून होऊं लागले. गुप्त कट उघडकीस आले. १९०९ च्या डिसेंबरमध्यें नाशिक येथें नाटकगृहांत नाटक चालू असतां नाशिकचे कलेक्टर मि. जॅक्सन यांचा खून करण्यांत आला. मी त्यावेळीं समर्थ विद्यालयांत होतों. विद्यालयांतील शिक्षक व विद्यार्थी लाठी, बोथाटी, फरिगदगा, दांडपट्टा, कुस्ती व कवाईत इत्यादि खेळ नेहमींचि खेळत असत. परंतु देशांत प्रतिकूल परिस्थिती उत्पन्न झाल्यानें असले खेळ हिंदू तरुण विद्यार्थ्यांनीं खेळणें हें सरकारला रुचेनासें झालें व कांहीं तरी निमित्त काढून सरकारनें समर्थ विद्यालय बेकायदेशीर ठरविलें. सरकारी हुकुमाप्रमाणें १९१० च्या जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत विद्यालयाचे सर्व शिक्षक व विद्यार्थी विद्यालयाच्या जागेंतून निघून गेले. इमारतींच्या व इतर मालमत्तेच्या संरक्षणासाठीं चालकांच्या सांगण्यावरून मी, नारायण गायकवाड नांवाचा एक गडी व एक स्वयंपाकी असे तिघे अदमासें एक महिनाभर विद्यालयाच्या मैदानावर रहात होतों. तेवढ्या अवधींत सरकारचे अधिकारी तेथें येऊन गेल्यावर सर्व इमारती बंद करून मी पुण्यास आलों.

श्री. विष्णु गणेश पिंगळे, मुकुंदराव मोघे व इतर अनेक सहाध्यायी समर्थ विद्यालयांतून आमच्यापूर्वीच घरगुती अडचणीमुळें निघून गेले होते. मीं जुलै १९१० अखेर विद्यालय सोडलें. त्यानंतर लगेच ५-६ महिन्यानीं पंडित विष्णु दिगंबर यांच्याकडे गेलों. पुन्हा १९१२ सालीं पुण्यास आलों. पुण्यास आल्यानंतर मी कोठें राहतों, माझ्याकडे कोण येतात, मी कोणाकडे जातों यावर गुप्त पोलिसांची नजर असल्याचें मला कळून आलें. माझ्याकडे येणाऱ्या इष्टमित्रांचें आदरातिथ्य करणें हा गुन्हा होऊं लागला. समर्थ विद्यालय बंद झाल्याबरोबर संगीतासारख्या निरुपद्रवी खात्यांत मी शिरल्यामुळें देशांत काय राजकारण चालू आहे, सरकारचे आरोपी कोण, दोषमुक्त कोण या गोष्टीचा मीं कधींही चौकशी केली नाहीं. तथापि " सरकारच्या आरोपींना—राजद्रोही लोकांना आपणाकडे नेहमीं थारा देण्यांत येतो व ही गोष्ट बरी नाहीं. " अशी समज पोलिसाकडून मला वेळोवेळीं देण्यांत येई. आतां या गोष्टी वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत जात होत्या का मधल्यामध्येंच होत होत्या हें समजणें अशक्य होतें.

१९१४ सालीं पंडितजींच्याबरोबर कलकत्त्यास सहा महिने मुक्काम होता. तेवढ्या अवधींत समर्थ विद्यालयांतील आमचे जुने मित्र विष्णुपंत पिंगळे हे अमेरिकेस गेले होते ते हिंदुस्थानांत परत आल्याचें मला समजलें. पुढें पिंगळे हे उत्तर हिंदुस्थानांत संचार करीत असतां मिरत स्टेशनवर काहीं हत्यारांसह त्यांना अटक झाल्याची वार्ता वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली. याचवेळीं लाहोर व बनारस कटाचे खटले पुढें आले. पिंगळे यांची चौकशी सुरु झाली. " अस्माकं बदरीचक्रं, युष्माकं बदरीतरुः" असा बादरायण संबंध लावून कित्येक माणसें त्यांत खेचलीं गेलीं. लाहोर कटाच्या खटल्याचा निकाल १९१५ च्या सप्टेंबरमध्यें होऊन १९१५ मध्यें नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत श्री. पिंगळे व इतर पाच किंवा सहा असामींना लाहोर येथील सेंट्रल जेलमध्यें फाशीं देण्यांत आलें. वर लिहिल्याप्रमाणें या खटल्याच्या चौकशींत बरीचशी निरपराधी माणसें सांपडलीं. त्यांत कित्येकांना थोडेबहुत प्रायश्चित्त

भोगावें लागलें व कांहीं दोषमुक्त होऊन सुटले. या खटल्याशी माझा निकट संबंध आहे हें सिद्ध करण्याची फारच खटपट करण्यांत आली, परंतु तसें कांहीं जमून आलें नाहीं.

## विद्यालयाचा पुनर्जन्म

समर्थ विद्यालय १९१० सालीं सरकारनें बंद केलें. विद्यालय बंद केलें गेलें त्यावेळीं गुरुवर्य अण्णासाहेब विजापूरकर साबरमतीच्या तुरुंगांत होते. १९१८ सालीं या कारागृहवासांतून त्यांची सुटका झाल्यानंतर समर्थ विद्यालय पुन्हा सुरू करण्याची त्यांनीं खटपट केली. नामदार चोबळ यांच्या मदतीनें "नवीन समर्थ विद्यालय" या नांवानें ही संस्था पुन्हा अस्तित्वांत आली. समर्थ विद्यालयाचें कार्य पुन्हा व्यवस्थितपणें सुरू होण्यास दोन वर्षे लागलीं. अण्णासाहेब तुरुंगांतून सुटल्यानंतर त्यांचा मुक्काम मुंबईस बरेच दिवस होता. मी त्यावेळीं रामनारायण यांच्याकडे होतों. आमची दोघांची वारंवार भेट होत असे. विद्यालय सुरू करण्याची नवीन योजना मला ते वरचेवर सांगत असत.

एक दिवस चौपाटीवर फिरावयास गेलों असतां अण्णासाहेबांची वाटेंत गांठ पडली. दोघेही समुद्रकांठीं जाऊन बराच वेळ बोलत बसलों. लवकरच तळेगांवास जाऊन विद्यालयाच्या कामास सुरवात करण्याचा आपला विचार मला त्यांनीं सांगितला. ते म्हणाले, "तुम्ही मुंबईस फार दिवस न राहतां तळेगांवास येऊन विद्यालयाच्या शिक्षण-कार्यांत पूर्वीप्रमाणें मला सहाय्य केलें पाहिजे. तुम्ही पूर्वीच्या जुन्या मंडळीपैकीं असून संस्थेची संपूर्ण माहिती तुम्हास आहे. यासाठीं आतांपासूनच विद्यालयाच्या कामीं पुन्हा सहकार्य करण्याचें आमंत्रण देऊन ठेवितों."

मी सांगितलें कीं, "मी लवकरच पुण्यास कायम राहण्यासाठीं जाणार आहें. आपण म्हणतां त्याप्रमाणें पुण्याहून तळेगांवास मला वाटेल त्यावेळीं येतां येईल. आपण सांगतां तसें सहकार्य करण्याची माझी

केव्हांही तयारी आहे." इतकें बोलणें झाल्यावर आम्ही घरीं जाण्यासाठीं समुद्रावरून परत फिरलों. पुढें मी पुण्यास गेल्यानंतर अण्णासाहेब एक दिवस सकाळीं सहा वाजतां घरीं आले व तळेगांवास येण्याची मला त्यांनीं पुन्हा आठवण दिली. दुसरे दिवशींच मी तळेगांवांस गेलों. रविवार व गुरुवार या दिवशीं विद्यालयांतील मुलांना संगीताचें शिक्षण देण्यासाठीं मी जाण्याचें निश्चित झालें. १९२१ सालापासून आठवड्यांतून दोन वेळां मी तळेगांवास जात असें. गु. अण्णासाहेब १९२६ च्या ऑगस्ट महिन्यांत टिळक–पुण्यतिथीस वारले. त्यानंतर महिना दोन महिने मी विद्यालयाकडे जात होतों. १९२७ सालीं गोपाळ गायन समाजाची स्वतःची इमारत बांधली गेली व कार्य–विस्तार झाला, त्यामुळें साहाजिकच तळेगांवास जाणें अशक्य झालें.

गुरुवर्य अण्णासाहेब वारल्यानंतर माझा समर्थ विद्यालयाशीं संबंध कमी झाला. पुढें पुढें तर तिकडे जाणें–येणें अगदींच बंद झालें. विद्यालय चांगल्या स्थितींत नाहीं एवढें वरचेवर कानीं येत असे व संस्थेची पुन्हां एकवार भरभराट पहावी असें विद्यालयाच्या सर्व जुन्या–नव्या शिक्षकांना व हितचिंतकांना वाटूं लागलें व अजूनही वाटतें. पहिल्यापासून समर्थ विद्यालयाशीं निकट संबंध असलेले श्री. रा. दा. देसाई यांचें व माझें विद्यालयासंबंधीं नेहमीं बोलणें होत असे. टिळक महाविद्यालयाचे माजी कार्यवाह श्री. रा. ग. हर्षे. हे कधीं कधीं या विद्यालयासंबंधीं वाटाघाट करीत. अशा रीतीनें आमची तिघांची वाटाघाट होतां होतां विद्यालय ताब्यांत घेऊन पुन्हा एकवार त्याची उर्जितावस्था झाल्यास पहावी असें आम्हांस वाटूं लागलें. जानेवारी १९३४ मधें आम्ही तिघांनीं संस्था ताब्यांत घेतली. विद्यालयाकरितां बाहेर हिंडून द्रव्यसाहाय्य मिळविण्याची बहुतेक सर्व जबाबदारी माझ्यावरच पडली, व त्याप्रमाणें मी वेळोवेळीं परगांवीं जाऊन पैसे मिळवून आणण्याच्या कामास सुरवातही केली.

श्री. हर्षे व देसाई हे संस्थेचीं इतर सर्व कामें पहात असत. माझा मुक्काम ज्या वेळीं विद्यालयांत असे त्यावेळीं इंग्रजी व संस्कृत हे दोन विषय मी शिकवीत असें. पहिलें एक वर्ष सर्व कामें सुरळीत व एकमतानें चाललीं-पुढें दुर्दैवानें मतभेद होऊं लागला. कलह सुरू झाले. संस्थेचीं कामें नीट चालेनाशीं झालीं. इतक्या थोड्या अवधींत असा प्रकार झालेला पाहून संस्था न चालण्याच्या बाबतींत हा महाराष्ट्राला जणूं काय शापच आहे असें वाटूं लागलें. आम्हा तिघामधें एकवाक्यता होण्याचें चिन्ह दिसेना. एकमेकाबद्दल हेवा वाटूं लागला. शक्य तों कलह चुकविण्याच्या हेतूनें मीं तळेगांवीं विद्यालयाकडे जाण्याचें हळूहळू कमी केलें, व शेवटीं १९३५ च्या मे महिन्यांत तर तहाहयात सभासदत्वाचा राजीनामा देऊन समर्थ विद्यालयाचा संबंध सोडला.

——:०:——

## प्रकरण दुसरें

# पंडितजींची भेट

समर्थ विद्यालयांतून निघालेलीं माणसें आपापल्या योग्यते-प्रमाणें कार्यक्षेत्र पाहून तेथें काम करूं लागलीं. डॉ. दत्तोपंत पटवर्धन यांच्याप्रमाणें हरिकीर्तनाचा व्यासंग करून तद्द्वारा कांहीं कार्य करावें असें मनांत येऊन गायन शिकण्यास व ग्रंथावलोकन करण्यास मीं सुरुवात केली. कंठाची अनुकूलता ईश्वरानें चांगली दिलेली असल्या-मुळें गायन–कलेंत प्रावीण्य संपादन करतां येईल असा विश्वास उत्पन्न झाला. ग्रंथावलोकन व भाषा–विषय हे अभ्यास चालूच होते. जेथें जेथें कलेचें ज्ञान संपादन करितां येईल तेथें तेथें जाऊन मिळेल तेवढें शिकण्याचा उद्योग चालू ठेवला. इतक्यांत हिंदुस्थानचे सुप्रसिद्ध गायनाचार्य पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर हे आपल्या शिष्यमंडळीसह पुण्यास जलशासाठीं आले. पंडितजी पुण्यास आल्याची बातमी समजतांच पूर्व–परिचय अस-ल्यामुळें डॉ. दत्तोपंत पटवर्धन व मी असे दोघे सहज त्यांच्या भेटीस गेलों. बोलतां बोलतां माझी गायन–कला शिकण्याची इच्छा मीं प्रदर्शित केली. डॉ. पटवर्धन यांनीं पंडितजीजवळ माझ्याबद्दल चांगली शिफारस केली. पंडित विष्णु दिगंबर यांनीं मला एक गाणें म्हणण्यास सांगितलें. केवळ कंठाचा धर्म कसा आहे हें पहाण्याची पंडितजींची इच्छा होती.

**“ बहुपुण्यप्रद ही भरतभूमि सुफला ”**

हें पद मीं म्हणून दाखविलें. लगेच पंडितजींनीं त्यांच्या नियमा-प्रमाणें माझ्याकडून नऊ वर्षांचा करार लिहून घेतला व मला आपल्या शिष्यगणांत सामील करून घेतलें व मुंबईस नेलें.

## संगीताचा उद्धारकर्ता

पंडितजींना पाहिल्याबरोबर मन प्रसन्न झालें. त्यांची शरीरसंपत्ति, तेज, विद्वत्ता, सदाचार, देशाभिमान इत्यादि गोष्टी पुन्हां एकवार प्रत्यक्ष पाहिल्यावर हाच आपला गुरु असें मनानें सांगितलें. त्यांचा गगनभेदी परंतु अत्यंत गोड आवाज व शुद्ध वाणी ऐकून श्रोते मुग्ध होऊन जात. स्वतःच्या पदरचें अन्नवस्त्र देऊन शेंकडों गरीब विद्यार्थ्यांना त्यांनीं विद्या शिकविली, हिंदुस्थानभर जिकडे तिकडे संगीत-विद्यालयें स्थापन करून अखिल भरतखंड नादब्रम्हानें दुमदुमून सोडलें. त्यांचा आत्मविश्वास, कार्य करण्याची धडाडी व हौस, मनोधैर्य व दिलदारपणा, संगीत-विद्येच्या प्रचारार्थ केलेले अविश्रांत परिश्रम या गोष्टी लक्षांत घेतां केवळ भारतीय संगीताच्या उद्धारासाठींच त्यांचा अवतार होता असें म्हणावें लागतें. संगीत विद्या व तिची सेवा करणारे लोक यांना आज समाजामध्यें जो मान मिळत आहे, त्याचें सर्व श्रेय हिंदुस्थानांत सर्व गायकांनीं पंडित विष्णु दिगंबर यांनाच दिलें पाहिजे. असले गुरु सुदैवानें लाभल्यामुळें मला झालेला आनंद शब्दानें सांगतां येणार नाहीं.



पं. विष्णु दिगंबर

गांधर्व महाविद्यालयांत सन १९११ सालीं माझा प्रवेश झाला. मुंबईस अदमासें आठ–नऊ महिने राहिल्यावर मध्यप्रांत व बंगालमध्यें फिरतीवर जाण्याचा विचार सुरू झाला. लगेच महिना दोन महिन्यांत पंडितजी आपल्या चाळीस शिष्यमंडळीसह निघाले. पहिला मुक्काम नाशिक येथें झाला. तेथून पुढें अकोला, वर्धा, उमरावती इत्यादि ठिकाणीं जाऊन नागपुरास आम्ही आलों. पुढें खडकपूर, कलकत्ता या ठिकाणीं मंडळी गेली. कलकत्त्यास दोन महिने मुक्काम होता. एवढ्या अवधींत विद्यालयाचीं प्रसिद्धि, संगीताचें प्रचारकार्य व द्रव्य–सहाय्य या गोष्टी फार चांगल्या झाल्या. कलकत्त्यास मुक्काम असतांना पुणे येथील गांधर्व महाविद्यालयाच्या शाखेवर काम करण्यास दुसरा शिक्षक कोण नेमावा याचा विचार सुरू झाला. बरीच वाटाघाट होऊन अखेर माझीच नेमणूक त्या कामीं झाली. पंडितजींचा निरोप घेऊन मीं कलकत्त्याहून निघालों. यावेळीं पुण्याच्या शाखेवर पंडितजींच्या अगदी पहिल्या शिष्यमंडळीपैकीं प्रो. नारायण कमलाकर खांडेकर हे शाखेचे मुख्य चालक म्हणून काम करीत होते. मी पुण्यास येऊन दाखल झालों. प्रो. खांडेकर हे शाखेचे मुख्य चालक म्हणून काम करीत होते.

प्रो. खांडेकर हे शाखेंतील वर्गांखेरीज फर्ग्युसन कॉलेज, अनाथ बालिकाश्रम ( हिंगणे ) व लष्कर या ठिकाणचे वर्गही एक–दोन विद्यार्थ्यांच्या मदतीनें चालवीत होते. मी पुण्यास आल्यावर प्रो. खांडेकर हे फक्त शाखेचेंच काम करूं लागले व बाकीचें बाहेरील सर्व काम मजकडे आलें. पुढें अदमासें सहा महिन्यानंतर प्रो. खांडेकर यांची प्रकृती एकाएकींच बिघडल्यामुळें त्यांना काम करण्याची शक्ति राहिली नाहीं व ते पुण्याहून मुंबईस राहण्यास गेले. अर्थात् पुण्याच्या शाखेचा सर्व कार्य–भार माझ्यावर येऊन पडला. गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर यांनीं माझ्या मदतीसाठीं मुंबईहून वामन ठकार व दत्तात्रेय काळे हे दोन विद्यार्थी पाठवून दिले. हे दोघे शाखेंतील काम पहात असत व मी हिंगणे, फर्ग्युसन कॉलेज व लष्कर इत्यादि ठिकाणचे वर्ग घेण्यास जात असे. नंतर कांहीं दिवसांनीं श्री. वामनराव पाध्ये ( हल्लीं प्रो. वामनराव पाध्ये कोल्हापूर ) हे माझ्या

मदतीसाठीं पंडितजींच्या आज्ञेवरून पुण्यास दोन वर्षें येऊन राहिले. प्रो. केशवराव दातार व प्रो. ना. मो. खरे मला मदत करून कार्यक्षेत्र वाढविण्याच्या उद्देशानें एक एक वर्षभर पुण्यास येऊन राहिले. पट्टण कडिकर या नांवाचा एक विद्यार्थी बरेच दिवस माझ्या मदतीस पुण्यास राहिला होता. याखेरीज आणखी बरेच शिक्षक व विद्यार्थी पुण्याच्या शाखेंत वेळोवेळीं आले. त्या सर्वांच्या मदतीनें शाखेचीं सर्व कामें मला चांगल्या तऱ्हेनें करितां आलीं.

१९१२ पासून १९१५ पर्यंत चार वर्षे पुण्याच्या शाखेंत मीं काम केलें. पुण्यास गांधर्व महाविद्यालयाचा लौकिक चांगला वाढून कार्याचा जम उत्तम प्रकारें बसला. पुढे पंडितजींच्या आज्ञेवरुन मी पुन्हां मुंबईस गेलों. पुण्याच्या शाखेवर रा. माधवराव जोशी या नांवाचे एक शिक्षक होते. मी पंडितजींच्या आज्ञेवरुन १९१६ सालीं मुंबईस गेलों तों पुन्हा पुण्याच्या शाखेवर आलों नाहीं. मला पंडितजींनीं मुंबईसच ठेवून घेतलें. इंग्रजी मराठी पत्रव्यवहार ,वर्ग घेणें, वसतिगृहाची व्यवस्था, तिजोरी, पगार देणें; देणग्या वसूल करणें इत्यादि कामें मुंबई गांधर्व महाविद्यालयांत मला करावीं लागत. श्री. भाऊराव रघुनाथ जालीहाळकर हे हिशेबाचें काम पहात असत व आम्ही दोघे विद्यालयाची अंतर्व्यवस्था पहात होतों.

## राष्ट्रभक्तांच्या सहवासांत

मुंबईस असतांना मध्यंतरीं गोध्रा येथील परिषदेंत राष्ट्रगीत म्हणण्यास जाण्याची सुवर्ण-संधी मला मिळाली. गोध्र्यास स्वतः गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर हेच जाणार होते. परंतु त्यांची प्रकृती असावी तशी बरी नसल्यामुळें पंडितजींनीं त्या कामीं माझी नेमणूक केली. रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाचें जातां-येतांचें भाडें मिळाल्यामुळें गोध्र्याचा प्रवास सुखकर झाला. गोध्र्यास दे. भ. वामनराव मुकादम यांचे घरीं माझी राहण्याची सोय केली होती. के. ना. दादासाहेब खापर्डे हेही त्या परिषदेस आले

कै. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

होते. त्यांचाही मुक्काम वामनरावांच्याच घरीं असल्यामुळें परिषदेचें कार्य संपून गोध्र्याहून परत येईपर्यंत १०।१२ दिवस ना. खापर्डे यांच्या सहवासाचा लाभ मला मिळाला. १९१२ सालीं आम्हीं उमरावतीस गेल्या वेळीं ना. दादासाहेब यांची ओळख झालेलीच होती. तथापि परप्रांतांत ( गुजराथ ) एके ठिकाणीं राहणें, जेवणें व अनेक विषयांची चर्चा करणें, फिरावयास जाणे असा दादासाहेबांच्या सहवासाचा अनपेक्षित योग आल्यामुळें वामनराव मुकादम यांच्या घरीं दहा-बारा दिवस अत्यंत आनंदांत व ज्ञानार्जनांत गेले. त्या दिवसांचें मला नेहमीं सानंद स्मरण होतें.

१९१२ सालीं पंडितजींच्याबरोबर मी मध्यप्रांत व वऱ्हाडच्या दौऱ्यावर गेलों असतां उमरावतीस पाऊण महिना मुक्काम होता. ना. दादासाहेब खापर्डे यांच्याकडे वेळोवेळीं जावें लागत असे. त्यामुळें त्यांचा परिचय चांगला झाला. स्वभाव फारच दिलदार व विनोदी ! उमरावतीचा मुक्काम संपवून अकोल्यास जाण्यास निघालों. जेवण झाल्यावर पंडितजी व इतर सर्व मंडळी स्टेशनवर जाण्यास निघाली. मी दादासाहेबांचा निरोप घेण्यासाठीं गेलों. त्याच दिवशीं त्यांच्या घरीं बरीच पाहुणेमंडळी आली होती. मी गेलों त्यावेळीं पाहुणे जेवावयास बसले होते. पाहुण्यांची पंगत बरीच मोठी होती. पंक्तींत बसलेल्या प्रत्येक मनुष्यास रंगीत पाट, चांदीचें ताट, पाण्याचा तांब्या व भांडें हेंदेखील चांदीचे ! तें पाहून खऱ्या श्रीमंतीची व दादासाहेबांच्या ऐश्वर्याची कल्पना आली. मी गेलों त्यावेळीं पहिला भात संपून पक्वान्नास आरंभ झाला होता. दादासाहेब म्हणाले, "गोविंदराव, दोन ताटें अधिक ठेविलीं आहेत, जेवावयास बसा." मी,— "माझें जेवण झालें आहे." दादासाहेब:—"पानावर बसून बघा. तुम्ही जितके जेवला तितके पुनः जेवाल अशी माझी खात्री आहे. कारण सर्वच पदार्थ तसे झाले आहेत." मी:—"अकोल्यास जाण्याच्या गडबडींत आहों. पंडितजी व इतर मंडळी स्टेशनवर गेली. मी फक्त आपला निरोप घेण्यासाठीं आलों आहे." दादासाहेब — 'मी तुमची खोटी करीत नाहीं.' दादासाहेबांचा निरोप घेऊन निघालों तों राजवाड्यातून बाहेर पडत आहे असें वाटलें.

त्यानंतर वर लिहिल्याप्रमाणें १९१६ सालीं गोध्रा येथील पहिल्या राजकीय परिषदेच्या वेळीं गोध्रयास ते व मी एका ठिकाणीं राहण्याचा योग आला. परिषदेच्या दुसऱ्या दिवशीं परिषदेच्या मंडपाकडे जाण्यास निघालों. दादासाहेबांनीं रुमाल बांधण्यास आरंभ केला.

लांबलचक रुमाल आणि तो बांधण्याची पद्धत ओबडधोबड. वरचेवर मी रुमालाकडे पाहतों आहें हें त्यांनीं ओळखिलें व ते म्हणाले, "गोविंद-राव, आमचें हें वऱ्हाडी पद्धतीचें शिरस्त्राण पाहून तुम्हास जरा चमत्कारिक वाटेल. पण हें पहा, सभा-परिषदांमधें केव्हां केव्हां मारामारीचे प्रसंग येतात. तसा प्रसंग आलाच तर लाठीचा तडाखा रुमालावरच बसेल आंतील डोक्यास इजा होणार नाहीं. इतकें हें रुमालरुपी शिरस्त्राण मोठें व जाड आहे. या रुमाल बांधण्याच्या पद्धतीस कोणी वऱ्हाडी म्हणतात, कोणी हिंगाडी म्हणतात. पण आमचें हें शिरस्त्राण आहे. आतां हाच रुमाल आरशांत पाहून जरा व्यवस्थित बांधला तर बरें दिसेल असें म्हणतात. पण मी म्हणतों आरशांत पाहून रुमाल साफसूफ बांधला तरी माझ्या चेहऱ्यांत कांहीं फरक होणार आहे कां ? शरीर ओबडधोबड ! चेहरा बेडौल ! रुमालही तसाच ! म्हणजे पायापासून डोक्यापर्यंत सर्वच निराकार !"

मीः—रुपापेक्षां विद्या हेंच खरें भूषण व त्या भूषणानें आपण भूषित आहां. शिवाय लोकोत्तर देशसेवा हें दुसरें.

दादासाहेब—तुम्हांस वाटतें तसें नाहीं. माझ्यासारखे विद्वान व राष्ट्रसेवक पुष्कळ आहेत. त्यांत अर्थ नाहीं. लक्ष्मीची कृपा आहे व बळवंत-रावांबरोबर नेहमीं असतों. म्हणून "गाड्याबरोबर नळ्याची यात्रा" या न्यायानें मलाही सध्यां मान आहे. मी त्यांच्यापेक्षां वयानें अधिक आहे म्हणून मला ते दादा म्हणतात इतकेंच. बळवंतराव अलौकिक देशसेवक व खरे कर्मवीर ! त्यांच्याशीं इतरांची तुलनाच करुं नये. थोर पुरुषाची संगति लाभल्यामुळें मीही देशभक्त गणला जातों. म्हणजे "पुष्पसंगें मातीस वास लागे." असाच त्याचा अर्थ घ्यावा.

असें बोलत घराबाहेर पडतों तों दादासाहेबांना नेण्याकरितां दोन घोड्यांची गाडी आली. मीही त्याच गाडींतून गेलों. याच दिवशीं "आवो सकल भारतकुमार" हें राष्ट्रगीत म्हणावयाचें होतें. त्यासाठीं लगेच व्यासपीठावर जाऊन उभा राहिलों व गीतास सुरुवात केली.

## राष्ट्रगीताचें खरें स्वरूप.

महात्मा गांधी गोध्रा परिषदेचे अध्यक्ष होते. लो. टिळक, बॅ. महमदअल्ली जिना, सौ. सरोजिनी नायडू, श्री. जमनादास द्वारकादास आणि बंगाल, पंजाब, गुजरात व महाराष्ट्र यांतील अनेक मोठमोठे पुढारी या परिषदेस हजर होते. प्रतिनिधी व प्रेक्षक यांची संख्या पंधरा-ते सोळा हजारपर्यंत होती. गोध्रा नदीचे कांठीं भव्य व विस्तीर्ण मंडपामध्यें या परिषदेस सुरुवात झाली. मी गोध्र्यास गेल्यावर गांधींची भेट घेतली. गुजराती मुलींना " भारत हमारा देश है " व " वंदे मातरम् " हीं राष्ट्रगीतें शिकवून त्यांना परिषदेच्या मंडपांत सदर गीतें प्रारंभीं म्हण-ण्यासाठीं उभ्या कराव्या अशी गांधींची इच्छा. त्याप्रमाणें पहिल्या दिवशीं गुजराती मुलींना मंडपांत उभ्या केल्या. अदमासें १५ मुलींनीं मिळून राष्ट्रगीत म्हटलें. मुलींचें ( गुजराती मुलींचें ) तें रडगाणें इतर कोणासही आवडलें नाहींच, परंतु खुद्द गांधींनादेखील तें बरें वाटलें नाहीं. लो. टिळक म्हणाले,

" राष्ट्रगीत म्हणजे कांहीं दळण नव्हे, मनुष्याचें अंतःकरण थोडें तरी हाललें पाहिजे तर तें राष्ट्रगीत. "

दुसऱ्या दिवशीं गांधींनीं आपण होऊनच मुलींचा कार्यक्रम रहित करून मी राष्ट्रगीत म्हणावें अशी इच्छा प्रदर्शित केली. ती स्वागत-समितिकडून मला कळली. दुसऱ्या दिवशीं परिषदेच्या कार्यास सुरुवात होण्यापूर्वी दहा मिनिटें मी परिषदेच्या व्यासपीठावर हजर झालों. महात्मा गांधी स्थानापन्न होतांच त्यांनीं मजकडे पाहिलें. मीं राष्ट्रगीत म्हणण्यास आरंभ केला.

### त्यावेळीं ध्वनिक्षेपक यंत्रें नव्हतीं.

तथापि माझें गाणें मंडपांतील १५।१६ हजार लोकांच्या प्रचंड सभेस उत्तम रीतीनें ऐकूं जात होतें. " भारत हमारा देश है " हें राष्ट्रगीत पूर्ण म्हणण्यास सहा मिनिटें लागलीं. तोंपावेतों सर्व सभा अगदीं शांत व आनंदित झालेली पाहून ना. दादासाहेब खापर्डे म्हणाले, " याला म्हणावें राष्ट्रगीत!"



म. गांधी.



लो. टिळक.



नामदार खापर्डे.

साहित्य व संगीताचे मार्गदर्शक.

विष्णुद्वय



प्रा. विष्णु गोविंद विजापूरकर.



गायनाचार्य

पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर.

लोकमान्य म्हणाले, "शाबास, गोविंदराव! पंडित विष्णु दिगंबर यांचे शिष्य आहांत खरे." परिषदेच्या कार्याला सुरुवात झाली. शेवट-पर्यंत निरनिराळ्या पुढाऱ्यांचीं भाषणें होऊन त्या दिवशींचें काम संपे-पर्यंत मी मंडपांतच होतों. नंतर दादासाहेब खापर्डे यांचेबरोबरच मी श्री. मुकादम यांचे घरीं गेलों. परिषदेचें काम तीन दिवस चाललें होतें. तिसऱ्या दिवशीं "वन्दे मातरम्" हें राष्ट्रगीत मी संपूर्ण म्हटलें. सात मिनिटें लागलीं. काफी रागांत म्हटलेलें हें गीत ऐकून श्रोतसमाज खूष होऊन गेला. परिषदेस आलेले पाहुणे परत जाण्यापूर्वी श्री. वामनराव मुकादम यांनीं आपल्या घरीं सत्यनारायणाची पूजा करून सर्वांस तीर्थ-प्रसादास बोलाविलें.

## लोकमान्यांचा सुवर्ण-प्रसाद.

मी व दादासाहेब खापर्डे श्री. मुकादम यांचे घरींच रहात होतों हें वर सांगितलेंच आहे. लोकमान्य प्रसादास आलेच होते. प्रसादानंतर भोजनाचा कार्यक्रम होता. पंगत अदमासें चाळीस माणसांची होती. या पंक्तींत अनसूया बेन नांवाच्या एक गुजराती बाई होत्या. इकडल्या तिकडल्या गप्पागोष्टी चालू असतां या बाईनें राष्ट्रगीताची गोष्ट काढली. बाई म्हणाल्या, राष्ट्रगीतें शिकण्यासाठीं श्री. देसाई यांना आम्ही सुरतेच्या आश्रमांत एक महिना ठेवून घेणार आहों. लोकमान्य म्हणाले, "महिनाभर ठेवून घ्या अगर वर्षभर ठेवून घ्या, परंतु 'तुका म्हणे तेथें पाहिजे जातीचें.' तसें नसतें तर गोविंदरावांच्या म्हणण्याचा लोकांवर कांहीं परिणाम झाला नसता." लगेच माझ्याकडे वळून ते म्हणाले,

**"गोविंदराव, तुमच्या आवाजांत अंगचें कांहीं माधुर्य व गोडी आहे कीं, तुम्ही नुसते रामदासाचे श्लोक म्हणत रस्त्यानें चाललांत तरी लोक तुम्हांस सोन्याची भिक्षा घालतील, राष्ट्रगीताच्या शब्दांनीं गुजराथ-प्रांत हालविलात खरा. बहुजनसमाजास अल्लया संगीताचें शिक्षण देण्याची एखादी शाळा काढाल तर मोठें कार्य होईल."**

इतकें बोलणें होतें न होतें तों मागील भात वाढण्यास आला. भोजन संपलें. मला लोकमान्यांनीं आपल्या अमोल आशीर्वादाचें भोजन आकंठ घातलें! मंडळी आपआपल्या ठिकाणीं गेली. दादासाहेब खापर्डे यांच्या सांगण्यावरून मी पुढें चार-पांच ठिकाणीं टिळकांच्याबरोबर होतों. जेथें त्यांचें व्याख्यान होई तेथें प्रथम राष्ट्रगीत किंवा ईश्वरप्रार्थना मी करीत असें व नंतर टिळकांच्या व्याख्यानास सुरवात होई. १९१७ सालीं टिळकांचा स्वराज्याचा दौरा निघाला. कित्येक ठिकाणीं मला त्यांच्याबरोबर राहण्याचा योग आला. याच वर्षी ते सुरतेस पुन्हां एकवार गेले, त्यावेळीं सुरतेस फारच मोठी सभा झाली. एके ठिकाणीं उभें राहून सर्व सभेला बोलणें ऐकूं जाणें अगदीं अशक्य होतें. प्रत्येक पांच किंवा सहा हजार लोकांच्या समुदायाकरितां व्याख्यानास उभे राहण्याची स्वतंत्र जागा ( स्टेज ) केली होती. अशा पांच किंवा सहा जागा होत्या असें मला वाटतें. नक्की ध्यानांत नाहीं. ही जागा माळ्यासारखी उंच होती. टिळकांची प्रकृति या वेळीं अत्यंत खालावलेली असल्यामुळें ठिकाण बदललें कीं, काखेंत हात घालून त्यांना व्याख्यानाचे जागीं नेऊन ठेवावें लागे. 'भौज'कर्ते अनंत हरी गद्रे हे त्यावेळीं लोकमान्यांचेबरोबर होते. आम्ही दोघांनीं टिळकांना पायीं चढूं न देतां व्याख्यानाच्या माळ्यावर उचलून ठेविल्याचें मला बरोबर स्मरतें. टिळकांची सुरत स्टेशनपासून गांवापर्यंत मिरवणूक निघाली. तेव्हां घोड्याच्या गाडीवर एका बाजूस मी उभा होतों. तो मिरवणकीचा थाट केव्हां केव्हां लक्षांत आला म्हणजे कांहीं तरी पूर्वसुकृत होतें म्हणूनच हे योग आले असें वाटल्यावाचून रहात नाहीं.

याच वर्षी टिळक कलकत्त्याच्या काँग्रेसला गेले. काँग्रेसमध्यें राष्ट्रगीत म्हणण्यासाठीं स्वागतसमितीच्या आमंत्रणावरून मी कलकत्त्यास गेलों होतों. काँग्रेसचें अध्यक्षपद डॉ. ॲनि बेझंट यांनीं भूषित केलें होतें. यावेळीं टिळकांची मिरवणूक काढावी किंवा नाहीं असा कलकत्त्याच्या लोकांमध्यें वाद उत्पन्न झाला. कांहींचें म्हणणें असें कीं, फक्त काँग्रेसच्या अध्यक्षांचीच मिरवणूक काढावी. व कांहींचें म्हणणें अध्यक्ष व टिळक या दोघांची मिरवणूक काढली पाहिजे. अखेरीं टिळकांची मिरवणूक काढण्यांत आलीच. त्यावेळीं पुन्हा टिळकांच्या गाडीवर मी होतोंच. टिळक व दादासाहेब

खापडें हे दोघे गाडींत होते. हॅरिसन रोडवरून मिरवणूक जात असतां दोन्ही बाजूंस सोन्याचांदीच्या ताम्हनांतून व तबकांतन पंचारत्या घेत-लेल्या स्त्री–पुरुषांची अलोट गर्दी उभी होती. फुलें उधळणें, नाणीं उधळणें इत्यादी गोष्टींची आठवण झाली म्हणजे आपण फार नाहीं पण थोडें तरी भाग्यवान आहों असें वाटतें.

देशभक्ति हाच ज्याचा धर्म, ज्याचें आचरण गंगाजलासारखें निर्मळ, ज्यानें आपलें सर्व आयुष्य लोककल्याणाकरितां खर्ची घातलें अशा या लोकोत्तर पुरुषाला पाहण्यासाठीं लाखो लोक यात्रेप्रमाणें गोळा होऊं लागले तर त्यांत आश्चर्य तें कोणतें ? अनेक जन्मानंतर सिद्धि मिळवून हा कर्मयोगी अखेर या उत्तम गतीला पोंचला आहे असें मला वाटे. दीडशें वर्षे झोपी गेलेला भारतीय सिंह लोकमान्यांची ती अमोघ व वीर्यवती वाणी ऐकून खडबडून जागा झाला व त्यानें आपलें अंत:सामर्थ्य प्रकट करण्यास सुरुवात केली. असल्या अवतारी पुरुषाचा सहवास प्रत्यक्ष घडल्यामुळें मला केवढी धन्यता वाटे ! ‘ हृष्यामि च मुहुर्मुहुः ’ अशी अवस्था आजहि माझी केवळ स्मरणानें होत आहे.

कलकत्त्याहून मुंबईस परत आल्यावर फार दिवस तेथें राहणें झालें नाहीं. १९१६ सालीं मी पुण्याहून मुंबईस गेल्यावर पुणे येथील गांधर्व महाविद्यालय शाखेचें काम नीट चालेना. सबब पंडितजींनीं शाखा बंद केली. तथापि पंडितजींना ती गोष्ट बरी वाटली नाहीं. पुण्यास आपला कोणी तरी मनुष्य कायम राहिला पाहिजे असें ते वरचेवर बोलून दाखवीत. याच सुमारास म्हैसूरच्या महाराजांनीं पंडितजींना, म्हैसूर येथील दसऱ्याच्या महोत्सवास आपल्या शिष्यमंडळासह यावें अशा अर्थाचें आमंत्रण पाठविलें. श्री. रामचंद्र विनायक पटवर्धन हे यावेळीं विद्यालयाचे व्यवस्थापक होते. त्यांनीं म्हैसूर दरबारशीं पत्रव्यवहार करून १९१८ च्या दसऱ्यास म्हैसूरला जाण्याचें नक्की केलें. गुरुवर्यांच्या आग्रहावरून मी म्हैसुरास गेलों. तीन चार महिने म्हैसुरास मुक्काम होता. मधून मधून बंगलोर, तंजावर इत्यादि ठिकाणीं आम्ही फिरून येत होतों. म्हैसूर प्रांतांतील फिरतीचें काम संपतांच पंडितजींच्या सांगण्यावरूनच पुण्यास आलों. पंडितजींची इच्छा अशी कीं, गांधर्व महाविद्यालय, नाहीं

तर दुसऱ्या कोणत्या तरी नांवानें पुण्यास संगीत कार्यालय स्थापन होऊन आपल्या पद्धतीनें तेथें शिक्षण चालावें. याच बाबतींत त्यांचें व माझें म्हैसूर मुक्कामी बोलणें झालें.

## दोन प्रलोभनें

१९१३ सालापासून पुणें येथील गांधर्व महाविद्यालयाच्या शाखेवर प्रमुख म्हणून माझी नेमणूक झाली. १९१४ साली किर्लोस्कर नाटक मंडळी पुण्यास आली. किर्लोस्कर नाटक मंडळींत बेबनाव होऊन १९१४ सालींच श्री. बालगंधर्व व श्री. गोविंदराव टेंबे हे त्यांतून बाहेर पडले व 'गंधर्व नाटक मंडळी' या नांवानें त्यांनीं खेळ सुरू केले. किर्लोस्कर नाटक मंडळीचे व्यवस्थापक श्री. शंकरराव मुजुमदार हे नाटकांत काम करण्यासाठीं नवीन माणसें शोधीत होते, व विशेषकरून धैर्यधर व कच यांची भूमिका करणारा मनुष्य मिळविण्याच्या खटपटींत ते होते. मानापमान व विद्याहरण या दोन्ही नाटकांतील पदें गाण्याच्या बैठकींत मी गात असें. गायनाचार्य भास्करबुवा बखले यांचे लहानपणचे एक मित्र श्री. धोंडोपंत साठे हे तुळशीबागेच्या शेजारीं रहात असत. त्यांनीं हीं पदें गातांना मला पुष्कळ वेळ ऐकलें होतें. शंकरराव मुजुमदार व धोंडोपंत साठे यांचा स्नेहसंबंध चांगला असल्यामुळें धोंडोपंत यांनीं मुजुमदार यांना माझें नांव सुचविलें व "एक दोन वर्षांत ते उत्तम तयार होतील सबब समक्ष जाऊन विचारा" असें सांगितलें. त्याप्रमाणें श्री. शंकररावांनीं मला नाटक मंडळींत येण्याबद्दल अनेक वेळ विचारिलें. तथापि मी संगीताचा अभ्यास कोणत्या हेतूनें करितो आहें हें त्यांना समजावून दिल्यानंतर त्यांनीं माझा नाद सोडून दिला.

मी संस्था काढण्याच्या विचारांत असतांना आमच्या एका व्यवसायबंधूंनीं एक हिताची गोष्ट सांगितली कीं, " संस्था काढून नसती दगदग करण्यापेक्षां एक किंवा दोन शिकवण्या पतकरून मजेंत दिवस काढावे हें अधिक बरें. त्यांतल्या त्यांत नायकिणींच्या शिकवण्या स्वीकाराल तर फारच चांगलें. नायकिणी या हीन कुळांतील असल्या तरी त्यांच्या ठिकाणीं गुरुबद्दल आदर व भक्ति असते. शिवाय मिळकतीच्या

दृष्टीनें संस्थेपेक्षां खासगी शिकवण्याचा धंदा केव्हांही फायदेशीर व कमी त्रासाचा असतो. यासाठीं संस्था काढण्याच्या नादास न लागतां मी सांगतों हा मार्ग तुम्ही पत्करा." हें सुखासमाधानाचें चित्र डोळ्यांपुढें उभे राहतांच त्याचा अनुभव घ्यावा असें वाटलें. मी मित्रांना होकार दिला. एकदोन दिवसांनंतर श्री. त्र्यंबकराव आपटे यांना घेऊन माझे स्नेही मजकडे आले व त्यांनीं मला एका बंगल्यांत नेलें. तो नायकिणीचाच बंगला होता. तेथील थाट पाहून खूष झालों. पण ती शिकवणी पत्करावी असें मन सांगेना. बंगल्यांत पोंचल्यावर त्र्यंबकरावजींनीं माझी व बाईंची ओळख करून दिली व आपण निघून गेले. पहिलाच दिवस असल्यामुळें फार वेळ न बसतां अर्धातास शिकविलें व परत येण्यास निघालों. "शिकवणीचें प्रदेय (फी) आगाऊ घेण्याची वहिवाट असल्यास आतांच देऊन टाकतें." असें बाईनीं सांगितलें. पण ठरलेले पन्नास रुपये आगाऊ घेतले तर एक महिनाभर तरी या तुरुंगांत बसावें लागणार ही गोष्ट लक्षांत आल्यामुळें मीं पैसे घेतले नाहींत. "रुपये उद्यां दिले तरी चालतील." एवढें सांगून निघालों. खालीं आलों तों घोड्याची गाडी तयार! घोडा साधा नव्हता. कमींत कमी आठशें नऊशें रुपये किंमतीचा अरबी घोडा. व गाडीही त्याच थाटाची. बसून निघालों. आयुष्य मजेंतच घालवावयाचें तर हाच मार्ग श्रेयस्कर असें वाटूं लागलें. मन द्विधा झालें. पण अखेर "मनःपूतं समाचरेत्" या सुभाषितास अनुसरून वागणें चांगलें असें ठरून पोंचविण्यास आलेल्या बाईच्या शिपायाबरोबर नकारार्थी पत्र पाठविलें व संस्थेच्या कार्यास सुरुवात केली.

ता. १ जुलै १९१८ या दिवशीं

## " श्रीगोपाळ गायन समाज "

हें नांव देऊन पंडितजींच्या आज्ञेप्रमाणें मीं कार्यास प्रारंभ केला. चार महिने होतात न होतात तोंच मुंबईच्या मलबार हिलवर राहणारे एक अत्यंत थोर व श्रीमान् गृहस्थ रामनारायण हरनंदराय यांचेकडून मला बोलावणें आलें. मुंबईचे "रामनारायण रुइया कॉलेज" ज्यांच्या नांवानें सुरू

आज तेच हे गृहस्थ. [illegible] रुइया यांना रामनिवास, मदनमोहन व राधाकृष्ण असे तीन मुलगे. हे तिघेही पांच-सहा वर्षे चांगल्या व कडक शिस्तींत असावे अशी त्यांची इच्छा. या गृहस्थांनी मी मुंबईस असतांना कोठें तरी समारंभांत माझें गाणें ऐकिलें होतें. शिवाय मुलांना बौद्धिक शिक्षण देण्याकरितां चांगला शिक्षक कोठें मिळेल या चौकशींत ते होते. माझी शिफारस पुण्यास व मुंबईस बऱ्याच ठिकाणीं झालेली त्यांनीं ऐकेल्यावर ते पुण्यास आलेवेळीं मला त्यांनीं बोलावणें पाठविलें.

डेंगार्डन रोडवर त्यांचा मुक्काम होता. एक महिनाभर राहून मुंबईस जाते वेळीं मला त्यांनीं आपला विचार सांगितला. ते म्हणाले, "ईश्वर-कृपेनें मला कांहीं कमी नाहीं. सरस्वतीची सेवा मीं केली नाहीं, मी फक्त लक्ष्मीपुत्र आहें; परंतु माझ्या मुलांनीं सरस्वतीची सेवा करून विद्वान् व्हावें अशी माझी इच्छा. बौद्धिक शिक्षणाबरोबर संगीत-कलेचें शिक्षण मुलांना मिळावें असा घरांतील सर्व मंडळींचा हेतु. हा आमचा हेतू सफल होण्याकरितां आपण मुंबईस मलबार हिलवर आमच्याकडे कायमचे राहण्यास यावें अशी आमची सर्वांची इच्छा आहे. आम्ही एकदोन दिवसांत मुंबईस जाण्यासाठीं निघणार व जाते वेळीं आपणास बरोबर घेऊन जाण्याचें आम्ही ठरविलें आहे. या बाबतींत आपण आमच्या विनंतीस मान दिला पाहिजे. मी नोकर म्हणून आपणास बोलावीत नाहीं. जसा मी तसेच आपण, व त्या दृष्टीनेंच आपली सर्व व्यवस्था राहील. शिवाय मी आपणास सांगितलेंच आहे कीं, मी पगार म्हणून आपणास देणार नाहीं. मी कोट्यधीश आहें तेव्हां आपण लक्षाधीश होऊन जावें असें मी इच्छितों." इतकें रामनारायणांनीं सांगितल्यानंतर मला नाहीं म्हणणें फार कठिण वाटलें. गोपाल गायन समाजाचें काम करण्यास लगेच एका मनुष्याची योजना केली व रामनारायणांच्याबरोबर मुंबईस गेलों. तेथें दोन वर्षे राहिलों.

स्वयंपाकास स्वतंत्र आचारी, बसण्या-उठण्यास दोन लाखांची इमारत, स्नान, धोतरें धुणें इत्यादि कामास एक स्वतंत्र मनुष्य, फिरा-वयास जाणें झाल्यास मोटार अगर दोन घोड्यांची गाडी रोज तयार असे.

तास दोन तासापेक्षां मला अधिक काम केव्हांही करावें लागत नव्हतें. मी करीन तो हुकूम प्रमाण. अशी राजासारखी माझी व्यवस्था रामनारायणांनीं ठेविली होती. तथापि त्या स्थितींत कायम रहावें असें मनाला वाटेना. स्वतंत्र संस्था काढावी व गरीब होतकरू मुलांना या कलेचें शिक्षण देऊन संगीताचें कार्यक्षेत्र वाढवून तद्द्वारा सार्वजनिक कार्य करितां येईल तितकें करावें ही जी आपली मूळ इच्छा, तिकडेच पुन्हा लवकर वळावें असें एक दिवस मनांत येऊन गोपाल गायन समाजाचें कार्य झपाट्यानें पुढें ढकलण्यासाठीं पुण्यास परत येण्याचें ठरविलें.

रामनारायण एक दिवस एकटेच बसलेले पाहून त्यांच्याकडे गेलों व त्यांना हें सर्व सांगितलें. इतक्या लवकर मी परत जाण्याचा विचार करीन हें त्यांच्या स्वप्नांतही नव्हतें. कमींत कमी दहा वर्षें तरी त्यांच्याजवळ राहीन अशी त्यांची पूर्ण खात्री होती. परंतु एकाएकींच माझा बेत ऐकून त्यांना नवल वाटलें. रामनारायणांनीं पुनः पुनः माझी समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला व निदान आणखी एक वर्षभर तरी रहावें अशी इच्छा प्रगट केली. तथापि माझा निश्चय मी ढळूं दिला नाहीं व सर्वांचा निरोप घेऊन मी पुण्यास परत येण्यासाठीं निघालों. १९२० सालीं पुन्हा पुण्यास येऊन गायन-समाजाच्या कार्यास आरंभ केला.

यावेळीं गायन समाज चित्रशाळेसमोर श्री. कोकाटे यांच्या इमारतींत तिसऱ्या मजल्यावर होता. पुढें श्री. कृष्णाजी रावजी साठे कॉन्ट्रॅक्टर यांच्या वाड्यांत जागा अधिक सोयीची मिळाल्यामुळें वर्गाचीं सर्व कामें या ठिकाणीं चालू होतीं. याच ठिकाणीं गायन समाजाच्या कार्याची प्रगती होऊन संस्थेचें नांव अखिल महाराष्ट्रांत प्रसिद्ध झालें. गायन कलेचें प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण देऊन संगीत-विद्या-विशारद तयार करणें हें संस्थेचें मुख्य ध्येय. परंतु उपांगें म्हणून कीर्तन, भजन व ऐतिहासिक पोवाडे इत्यादि गोष्टींची उत्तम माहिती मी विद्यार्थ्यांस देऊं लागलों. या निरानिराळ्या शाखेंत व विशेषेंकरुन गायन-कलेंत विद्यार्थी दिवसेंदिवस तयार होऊं लागल्यामुळें साहजिकच विद्यार्थ्यांची संख्या वाढूं लागली. वाड्याचे मालक श्री. कृ. रा. उर्फ अण्णासाहेब साठे यांनीं

जागेची फार मोठी सवलत दिल्यामुळें आमचें काम करण्यास आम्हांस फार सोपें गेलें. आम्ही त्यांना फक्त चार रुपये भाडें देत होतों. परंतु गायन–समाजाची एकंदर शिस्त पाहून अण्णासाहेबांनीं तीस रुपये भाड्याची जागा आम्हांस वापरण्यास दिली होती. सकाळपासून संध्या-काळपर्यंत आमच्याकडे शेकडों माणसांची येण्याजाण्याची वर्दळ होत असे. परंतु स्वतः अण्णासाहेबांनीं अगर त्यांच्या घरच्या मंडळींनीं त्याबद्दल कधींही तक्रार केली नाहीं. मला स्वतःला ते घरच्याप्रमाणें समजत पण गायन–समाजाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनाहीं ते आपलेपणानें वागवीत. त्यांची एकुलती एक कन्या गोदावरी ही गायन–समाजांत तयार झाली होती. गोदावरीनें एका वर्षांत गायन–कलेंत चांगली प्रगती केली. कामानिमित्त मी एकादे वेळीं बाहेर अगर परगांवीं गेलों तर हीच मुलगी वेळेवर वर्गाचें काम सुरु करीत असे.

## सत्याग्रहांत सामील

१९२१ सालीं माझे स्नेही श्री. विनायकराव भुस्कुटे यांनीं मुळशी येथें सत्याग्रहाची मोहीम सुरू केली. या सत्याग्रहाची समग्र हकीगत सेनापति बापट यांच्या चरित्रांत पहावयास सांपडेल. या सत्याग्रहांत मी भाग घेतलाच पाहिजे अशी श्री. भुस्कुटे यांची अत्यंत आग्रहाची विनंती. समर्थ विद्यालयांत आम्ही एकत्र काम करीत होतों–तेव्हांपासून कोणत्याही सार्व-जनिक कार्यांत आम्ही एकत्र भाग घेत आल्यामुळें या प्रसंगीं त्यांनीं सुरू केलेल्या सत्याग्रहाच्या चळवळींत त्यांच्या इच्छेप्रमाणें मला त्यांच्याशीं सहकार्य करणें भाग पडलें. अदमासें ३५ विद्यार्थी व १५ मोठी मंडळी मिळून ५० माणसें घेऊन मुळशीस मी दाखल झालों. सत्याग्रहाची झटापट बरेच दिवस चालू होती. सेनापती बापट, कै. शिवरामपंत परांजपे, श्री. तात्यासाहेब करंदीकर, श्री. हरिभाऊ फाटक आदिकरून बरेच देशभक्त हा सत्याग्रह यशस्वी करण्यासाठीं मुळशीस तळ देऊन राहिले होते. श्री. तात्यासाहेब केळकर हेहि एक दिवस मुळशीस येऊन गेल्याचें मला स्मरतें. सत्याग्रह सुरू होऊन महिना दीड महिना झाल्यावर तडजोडीची भाषा सुरू झाली, त्यामुळें सत्याग्रहास

गेलेल्या लोकांनीं आपआपल्या ठिकाणीं सध्यां परत जावें असें ठरलें. आम्ही पुण्यास परत आलों. पुण्यास परत येईपर्यंत अण्णासाहेब साठे यांची मुलगी कुमारी गोदावरी हींच गायन–समाजाची सर्व व्यवस्था पहात असे.

१९२२ सालीं पुण्यामध्यें दारूच्या निरोधनाची चळवळ सुरू झाली. निरोधकांच्या यादींत माझेंही नांव होतें. सभा होऊन कोणत्या गुत्त्यावर कोणी जावें हे ठरल्यानंतर आम्ही चार असामी शुक्रवार पेठेंतील एका गुत्त्यावर गेलों. पोलीसांनीं कैद केलें. फरासखान्यांत माझी रवानगी झाली. पुढें खटले होऊन सर्वांना दंड झाले.

## पंडितजींचें प्रचार–कार्य

हिंदुस्थानांतील सर्वसामान्य माणसालाही संगीत म्हणजे काय असतें हें समजलें पाहिजे, आपला हिंदी समाज एकस्वरानें बोलला पाहिजे, समाजांत एकतानता उत्पन्न झाली पाहिजे, आपआपसांतील मतभेद बाजूस ठेवून स्वराज्य मिळविण्यापूर्वी स्वरराज्य ( एकवाक्यता ) झालें पाहिजे, अशा उदात्त महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन पंडितजींनीं संगीत-प्रचाराचें काम अंगावर घेतलें होतें. समाजाला एकरूप करण्याचें सामर्थ्य संगीत–विद्येंत आहे. “ धन्य ते गायनी कला ” ही समर्थोक्ति हेंच दर्शवीत आहे. कांहीं थोड्या गवयांपाशीं डांबून पडलेली संगीत–विद्या पंडितजींनीं बाहेर काढली व अगदीं नवीन धर्तीवर लाहोर, बनारस, नागपूर, मुंबई, पुणें, नाशीक, कोल्हापूर वगैरे ठिकाणीं गांधर्व महाविद्यालयें स्थापून ती विद्या सर्वसामान्य मनुष्यासा घेतां येईल असें करून ठेविलें आहे. संगीताचीं स्वतंत्र विद्यालयें स्थापणें, अगदीं आरंभापासून संगीतप्रवीण होईपर्यंत स्वतःच्या अनुभवानें संगीताचा अभ्यासक्रम आंखणें, स्वतंत्र नोटेशनपद्धति तयार करणें, आर्य संगीतावर स्वतंत्र मासिक सुरू करणें, अशा प्रकारें व्यापक व धडाडीचें प्रयत्न त्यांनीं केले. त्यांनीं संगीताचें अध्ययन उत्तर हिंदुस्थानांतून

अध्ययन करून आलेल्या गुरुजवळ केलें खरें. परंतु पंडितजींच्या शुद्ध महाराष्ट्र बुद्धीला त्यांतील दोष तसेंच ठेवणें योग्य वाटलें नाहीं. म्हणून त्यांनीं ते दोष काढून टाकले व शुद्ध संगीताचा सर्व हिंदुस्थानांत प्रचार करण्याचा निश्चय केला. त्यास अनुसरून संगीत-परिषद् भरविण्याचा उपक्रम त्यांनीं १९१८ सालापासून केला.

१९२२ सालीं मुंबईस गांधर्व महाविद्यालयातर्फे संगीत परिषद् भरली. त्या परिषदेंत गायनाच्या चढाओढी व अनेक संगीताचार्यांचे गायनाचे कार्यक्रम होते. या परिषदेस शिष्यमंडळीसह येणें जरूर आहे असें गुरुवर्यांचें आज्ञापत्रक आलें. त्याप्रमाणें कांहीं विद्यार्थी व विद्यार्थिनी घेऊन मी मुंबईस गेलों. आमच्या विद्यार्थ्यांनीं गायनाच्या चढाओढींत भाग घेतला. त्यांत विद्यार्थी वामन नारायण पात्रळकर व नारायण वासुदेव कोगेकर हे दोघे यशस्वी होऊन त्यांना गायनाचार्य पंडित बाळकृष्णबुवा यांच्या हस्तें बक्षिसें मिळालीं. इतर सर्व गुरुबंधुबरोबर माझा गायनाचा कार्यक्रम परिषदेंत ठेवला होता. पंडित बाळकृष्णबुवा आदिकरून मंडळी या कार्यक्रमास बसली होती. जलशाची वेळ सकाळची असल्यामुळें मी असावरी गाण्यास सुरुवात केली. दीड तास गाणें झालें. शेवटीं भैरवी गाऊन मी व्यासपीठावरून खालीं उतरलों. तानपुरे घेऊन बसलेले गुरुबंधु पुरोहित व इनामदार म्हणाले कीं, मेहनत असल्याशिवाय कार्यक्रम इतका सरस होणारच नाहीं. बाळकृष्णबुवा म्हणाले, "गोविंदराव, आवाजामध्यें सहजपणा असल्यामुळें वेळ मारून नेली जाते. पण तुम्ही स्वतः करावी तशी मेहनत करीत नाहीं. मेहनत कराल तर नांव घेण्यासारखे तयार व्हाल." माझ्यानंतर एक दोन गाणीं होऊन जलशाचा कार्यक्रम संपला. परिषदेंतील हा शेवटचाच दिवस असल्यामुळें याच दिवशीं रात्रीं पं. बाळकृष्णबुवांच्या गाण्याचा स्वतंत्र कार्यक्रम ठेवला होता. तो ऐकून दुसऱ्या दिवशीं पुण्यास परत आलों.

## इंद्राचा ऐरावत आणि शामभटाचें तट्टू

"वन्दे मातरम्" हें राष्ट्रगीत गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर यांनीं काफी रागांत बसवून तें राष्ट्रीय सभेंत म्हणण्याचा परिपाठ १९१२

सालापासून सुरू केला. ते स्वतःच दरवर्षी कॉंग्रेसमध्यें हें राष्ट्रगीत म्हणण्यास स्वागत-मंडळाच्या आमंत्रणावरून जात असत. त्यांनीं बसविलेली चाल सतत पंचवीस वर्षे चालू असल्यामुळें हिंदुस्थानच्या सर्व भागांत ती लोकप्रिय व रूढ होऊन गेली. १९३१ सालीं पंडितजी वारले. मग १९३७ सालीं यापेक्षां निराळी चाल असावी असें कांहीं लोकांच्या मनांत येऊन त्यांनीं तसा प्रयत्न सुरु केला. मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांनीं या संधीचा फायदा घेऊन आपली चाल पुढें ढकलली. कांहीं लोकांना ती बरी वाटली व त्या चालीचा प्रचार सुरु झाला. तें पाहून पुण्यांतील व पुण्याबाहेरील कांहीं गायकांनीं आपआपल्या कल्पनेप्रमाणें त्या गीतास चाल लावून प्रत्येकानें स्वतःच्या चालीची शिफारस करण्यास सुरुवात केली. राष्ट्रगीताची चाल जी एकदां ठरली तीच कायम ठेवावयाची असते, त्यांत केव्हांही बदल करावयाचा नसतो. पण हें तत्त्व लक्षांत कोण घेतो ? बरें; नवीन चाली काढून तत्वाचें उल्लंघन केलें तें केलें. पण इतकेंही करुन हे लोक स्वस्थ बसले नाहींत. पंडितजींच्या चालीशीं आपल्या चालीची तुलना करुन काफी रागांतील चालीपेक्षां आमची चाल अधिक चांगली आहे अशी बडबड ते करूं लागले. राष्ट्रगीताच्या बाबतींत कोकोनाडा येथें भर कॉंग्रेस-मंडपामध्यें महासभेचे अध्यक्ष महमदअल्ली यांचा नक्षा उतरविणारे पंडित विष्णु दिगंबर कोणीकडे व कोणीकडे नवीन चाली उत्पन्न करणारे आजचे गायक ! इंद्राचा ऐरावत आणि शामभटाचें तट्टू इतका जेथें फरक तेथें तुलनेचा मूर्खपणा कोणी करूं नये असें ता. १० डिसेंबर १९३७ च्या ज्ञानप्रकाशमध्यें मीं लिहिलें. चाल कोणती सरस आहे हें पहावयाचें असल्यास सर्व गायकांनीं एका रंगभूमीवर यावें असें जाहीर आव्हान ता. १६-१२-३७च्या ज्ञानप्रकाशमध्यें दिलें तें कोणी स्वीकारिलें नाहीं. याचा अर्थ असा कीं हें शामभटाचें तट्टू केव्हां तरी मागें पडणार म्हणजे आजच्या नवीन चालींचाही लोप होऊन पंडितजींचीच चाल पुन्हां आपोआप पुढें येईल. "भारत हमारा देश है न आवो सकल भारत कुमार" हीं राष्ट्रगीतें पंडितजींनींच पुढें आणलीं.

## प्रकरण ३ रें

# समाजाची संगीत–सेवा

१९२३ सालीं गोपाल गायन समाजांतील विद्यार्थ्यांची संख्या चाळीसपर्यंत गेली. वर्गाच्या कामास जागा अपुरी पडूं लागली. गायन–समाजाचें कार्य दिवसेंदिवस वाढल्या प्रमाणांत असल्यामुळें जागेची अडचण वरचेवर भासूं लागली. स्वतःची जागा असल्याशिवाय अधिक काम करण्यास वाव मिळणार नाहीं असें वाटूं लागलें. परंतु नुसतें वाटून काय उपयोग! “उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः” अशी आमची स्थिति. दोन–तीन हजार रुपये भिक्षा मागून जमवा व गायन–समाजाकरितां एक लहानशी कां होईना, परंतु स्वतंत्र व संस्थेच्या मालकीची झोपडी उभी करावी असें आम्ही बोलूं लागलों. कांहीं विद्यार्थ्यांनीं या गोष्टीस साहाय्य करण्याचें ठरविलें व “थेंबें थेंबें तळें साचें” या न्यायानें पै–पैशापासून द्रव्यनिधी जमविण्यास सुरुवात झाली.

यावेळीं स्वदेशीची चळवळ अत्यंत जोरांत होती. पुण्यास स्थानिक व बाहेरील पुढाऱ्यांच्या सभा भरूं लागल्या. पंडित मोतीलाल नेहरु, महात्मा गांधी, सौ. सरोजिनी नायडू, लाला लजपतराय, पंडित मदन-मोहन मालवीय तसेंच बंगाल, मद्रास, कर्नाटक इत्यादि प्रांतांचे पुढारी त्यावेळीं वारंवार पुण्यास येत असत. रोज एक किंवा दोन जाहीर सभा असायच्याच. सभेच्या आरंभीं ईश्वरप्रार्थनेचें काम गोपाल गायन समाजाकडेच असे. आमचे येथील विद्यार्थी श्रीकृष्ण हरि मेहेंदळे व ना. वा. कोगेकर हे प्रार्थनेचा कार्यक्रम फार चांगल्या रीतीनें करीत. दररोज

जाहीर सभेमध्यें मुलांच्या गायनाचे कार्यक्रम होऊं लागल्यामुळें गायन-समाजाची प्रसिद्धि होऊं लागली. विद्यार्थी सभेमध्यें ईश्वर-प्रार्थना अगर गायन यांच्या कार्यक्रमास गेलें म्हणजे तेथील लोकांकडून संस्थेस मदत म्हणून दोन रुपये, पांच रुपये, दहा रुपये अशा लहान लहान देणग्या मिळूं लागल्या. या सर्व देणग्या संस्थेच्या नवीन होणाऱ्या इमारतीकरितां द्रव्यनिधि म्हणून जमा होऊं लागल्या.

## गणेशोत्सवांतील मेळा

याच वेळीं आदर्श मेळा कसा असावा हें तुमच्यांसारख्यांनीं मेळा काढून इतरांना शिकविलें पाहिजे अशी सूचना स्नेह्यांनीं केली. ती लक्षांत घेऊन १९२३ सालीं गणेशोत्सवांत अगदीं नांव आम्ही गायन–समाजांतील विद्यार्थ्यांचा मेळा तयार केला. मेळ्याचा खादीमय पोषाख, वेळेचा नियमितपणा, पदें म्हणण्याची गायकी पद्धत, मधुर पद्यरचना इत्यादि बाबतींत "गोपाल गायन समाज मेळ्याची" प्रशंसा सर्वत्र होऊं लागली. वर्तमानपत्रांचे संपादक स्वयंस्फूर्तीनें या मेळ्याच्या कार्यक्रमासंबंधानें आपआपल्या वर्तमानपत्रांतून गौरवपर मजकूर लिहूं लागले. फर्ग्युसन कॉलेज, डेक्कन कॉलेज, मायकवाड वाडा, शिवाजी–मंदीर, रेमार्केट, नेने–वाट, हसबनिसांची बखळ इत्यादि ठिकाणीं आमच्या मेळ्याचा कार्यक्रम कमींत कमी दोन तास तर होतच असे, पण वेळेच्या अभावीं निदान एक तास तरी कार्यक्रम केल्याखेरीज आमची सुटका होत नसे. दूर ठिकाणीं गेल्यास जातां-येतां मोटारचा खर्च, मेळ्यांतील मुलांची उत्तम प्रकारची फराळाची व्यवस्था व देणगीदाखल तीस, चाळीस, एकावन्न व कधींकधीं एकशेंएक रुपये अशी रक्कम आम्हांस देऊन आमच्या मेळ्याचा गौरव पुणेकर करीत असत. हें सर्व द्रव्य इमारतीच्या निधीकडे जमा होई. पुढें १९२४ व १९२६ या दोन वर्षी मेळा काढला व त्यानंतर मेळ्याचा कार्यक्रम बंद झाला. आम्ही दरसाल मेळा काढावा अशी पुण्यांतील रसिकांची इच्छा, परंतु गायन–समाजाच्या कामांत त्यामुळें बराच व्यत्यय येऊं लागल्यामुळें

साहजिकच ती गोष्ट आम्हांस अशक्य होऊन बसली. आदर्श मेळा कसा असावा हें तीन वर्षे मेळा काढून लोकांना उत्तम तऱ्हेनें आम्हीं दाखवून दिलें व ही गोष्ट लोकांनाही पूर्णपणें मान्य झाली. "मेळा असावा तर असा असावा" असें म्हणून लोक आमच्याकडे बोट दाखवीत व अजूनही पुणेकरांना आमच्या मेळ्याचें स्मरण आहे व तें सतत राहील अशी आमची खात्री आहे.

## ऐतिहासिक पोवाडे

याप्रमाणें गायन-समाज १९२३ सालापासून मेळ्याच्या योगानें गाजूं लागला. यानंतर त्याच वर्षी भारत स्वयंसेवक मंडळातर्फे विनंतीवजा एक सूचना आमच्याकडे आली. भारत स्वयंसेवक मंडळाचे चिटणीस डॉ. गोपाळराव पळसुले यांनीं शिवजयंती-उत्सवामध्यें शिवाजीमंदिरांत पोवाड्याचा कार्यक्रम आमच्या संस्थेतर्फे जमत असल्यास करावा अशी इच्छा प्रदर्शित केली. या उत्सवाकरितां दरसाल कोल्हापूरचे प्रसिद्ध शाहीर रा. गणपतराव भोसले व नारायणसिंग रजपूत हे आपल्या ताफ्यासह येऊन पुण्याची शिवजयंती चांगल्या रीतीनें साजरी करीत असत. पांच-सहा वर्षे एकाच पद्धतीचे पोवाडे गाइले गेल्यामुळें थोडासा बदल झाल्यास बरें होईल असें लोकांना वाटूं लागलें. पण हा बदल कसा व कोणी करावयाचा, याची माहिती येथें कोणासही नव्हती. परठिकाणाहून कोणी नवीन शाहीर अगर गोंधळी आणला तरी त्याचेंही म्हणणें लोकांना फारसें रुचेनासें झालें. मी शिवजयंतीच्या इतर कार्यक्रमाप्रमाणें शेवटच्या दिवशीं पोवाड्याच्या कार्यक्रमास अवश्य हजर रहात असे. मी मूळचा खेडेगांवचा राहणारा असल्यामुळें भजन, पोवाडे, लावण्या इत्यादींच्या चाली मला अवगत होत्या. गणेशोत्सवांत गायन-समाज गाण्याच्या बैठकी व मेळे यांच्या योगानें गाजला त्याचप्रमाणें शिवजयंतीची संधि घेऊन यांतही क्रांती घडवून आणावी असें मनांत येऊन "आक्वर्थ आणि शाळिग्राम" यांनीं प्रसिद्ध केलेल्या जुन्या पोवाड्यांचें पुस्तक एका मित्रांकडून मागून

आणले. १९२३ सालच्या शिवजयंतीपूर्वी ११ दिवस कोणता पोवाडा बसवावा याचा विचार सुरू झाला. सर्व पुस्तक चाळून पाहिलें. त्यांतून नारायणराव पेशवे यांचा वध व खड्यांची लढाई हे दोन पोवाडे मीं पसंत केलें. 'महाराष्ट्र शाहीर मंडळ' स्थापन करून कार्यास प्रारंभ केला.

प्रथम नारायणरावांच्या वधाचा पोवाडा मीं अगदीं नवीन धर्तीवर बसवून ठेविला. साथीची तयारी माझ्या कल्पनेप्रमाणें शक्य तितकी उत्तम करून ठेविली होती. पोवाड्याची ही केलेली तयारी गायन-समाजाच्या विद्यार्थ्यांखेरीज इतर बाहेरच्या लोकांना माहीत नव्हती. पोवाड्याच्या कार्यक्रमांत मी स्वत: भाग घेणार आहें ही गोष्ट भारत स्वयंसेवक मंडळास शिवजयंतीपूर्वीं आठ दिवस कळविली. ही बातमी सदर मंडळामार्फत सर्व शहरभर पसरली. प्रत्येकास ही गोष्ट अगदीं अशक्य वाटली. देसाई फार तर बैठकीस बसून एक तासाएवजीं तीन तास उत्तम गातील परंतु पोवाड्याचा कार्यक्रम त्यांना कसा साधेल अशी शंका जो तो व्यक्त करूं लागला. कोणी म्हणाले, पोवाड्याच्या रंगभूमीवर येऊन देसाई आपली फजिती करुन घेणार. दुसऱ्यानें म्हणावें, जी गोष्ट आजवर ब्राह्मणांना कधीं साधली नाहीं ती गोविंदराव देसाई करुन दाखविण्याच्या फंदांत पडत आहेत! मराठे लोकांनीं म्हणावें "कंचा बामन शिवाजी-मंदिरांत येऊन पवाडे म्हनतोय बगुया तर खरं, अस बामन पवाडे म्हनूं लागले तर रोज म्हनत्याल" असे नाना प्रकारांनीं आमच्या होणाऱ्या कार्यक्रमासंबंधीं लोक आधींच बोलूं लागले.

असे होतां होतां शिवजयंतीचे कार्यक्रम सुरु होऊन पोवाडे म्हणण्याचा दिवस व वेळ जाहीर झाली. आम्ही आमच्या साथीदारासह शिवाजी-मंदिरांत रात्रीं १० वाजतां हजर झालों. परगांवचा कोणी शाहीर पोवाडा म्हणत होता. त्याचा कार्यक्रम झाल्यावर कोल्हापूरच्या शाहीरांचा कार्यक्रम सुरु झाला व त्यानंतर ११ वाजतां आम्ही रंगभूमीवर चढलों. सर्व शिवाजीमंदीर स्त्रीपुरुषांनीं गच्च भरुन गेलें होतें. विद्यार्थ्यांची संख्या फारच मोठी होती.

लहान मुलें-कॉलेजचे विद्यार्थी, मुली-बायका, पेन्शनर-वृद्ध माणसें-रावसाहेब-रावबहादूर, देशभक्त-पुढारी मंडळी, शाहीर-गोंधळी, पुण्यांतील संगीत विद्यालयें व गायन-समाजांचे चालक, नाटक कंपनींतील मंडळी, मजूरलोक इत्यादि मिळून अजमासें दहा-बारा हजार लोकांचा समाज शिवाजी-मंदिरांत त्यावेळीं जमला होता. आमचा कार्यक्रम कसा होतो हे पाहण्याकरितांच इतके लोक जमले होते. तुणतुणें, डफ, मंजिरी व घुंगरु या वाद्यांच्या साथीसह मी रंगभूमीवर उभा राहतांच पुण्यांतील नेहमींच्या रिवाजाप्रमाणें टिंगल व चेष्टा करण्यास सुरवात झाली. परंतु मला या गोष्टी नेहमीं पाहून सवय असल्यामुळें व भीति किंवा गडबडून जाणें हें मला मुळांतच माहीत नसल्यामुळें लोकांच्या या थट्टामस्करीकडे लक्ष न देतां पोवाड्याचें ध्रुवपद म्हणण्यास मीं एकदम सुरुवात केली. पोवाडे गाण्याचा स्वर कोमल निषाद ( पेटीची काळी पांच पट्टी ) होता. ध्रुवपदाची उठावणी तार सप्तकाच्या षडजापासून असल्यामुळें लोकांचें लक्ष एकदम वेधलें गेलें. चालही चांगली बसविली होती.

“ दख्खनचा दिवा मालवला, हिरा हरपला काय गुपीत घाला केला नारायणरावाला ”

कशि करुणा नव्हती आली राघोबाला हो, अपघात करुन मारिले सख्या पुतण्याला ”

हे ध्रुपद दहाबारा वेळ निरनिराळ्या प्रकारांनीं म्हटलें, सुरेलपणा, लय, शब्दोच्चार स्पष्ट, करुणरस पहाडी व गोड आवाज इत्यादि गोष्टींचा मेळ उत्कृष्ट बसल्यामुळें हजारो लोकांचा समाज एकदम इतका शांत झाला कीं, शिवाजीमंदिरांत मनुष्यच नाहीं असें वाटूं लागलें. पुढें कथानकास सुरुवात झाल्याबरोबर श्रोते एकाग्र झाले. आनंदीबाई व सुमेरसिंग यांचे भाषण व सुमेरसिंगाची प्रतिज्ञा ऐकून श्रोत्यांच्या अंगावर शहारे उभे राहिले. पोवाडा म्हणत असतां मी चारी बाजूस मधून मधून वळत असे. यावेळीं श्रोत्यांचें चेहेरे खिन्न झालेले दिसत सुमेरसिंग शनिवारवाड्यांत शिरून नारायणरावास धरतो त्यावेळची श्रीमंतांची करुणवाणी ऐकून श्रोत्यांच्या नेत्रांतून अश्रू वाहूं लागले.

पुढें शाहीर काय म्हणतो तें ऐकण्याकडे श्रोत्यांची एकाग्रता किती झाली होती हें मला शब्दानें सांगतां येणार नाहीं. वेळेची मर्यादा होऊन गेली तरी त्या रात्रीं हा पोवाडा माझ्याकडून तीन वेळ म्हणून घेतला.

दुसरे दिवशीं तो पोवाडा म्हटला जावा असा लोकांचा अतिशय आग्रह झाल्यामुळें पुन्हां दुसरा कार्यक्रम केला. दुसरें दिवशीं श्रोत्यांची संख्या हजार दोनहजारांनीं जास्तच होती. शिवजयंती संपली. परंतु आबालवृद्ध, स्त्रीपुरुष, लहानथोर विद्यार्थी व सर्व जमलेले शाहीर यांच्या तोंडीं सदोदित हाच पोवाडा ऐकूं येऊं लागला. महाराष्ट्रांत शेंकडों ठिकाणीं या पोवाड्याचे कार्यक्रम झाले.

## नवें शाहिरी जग

याप्रमाणें जुन्नर, कोल्हापूर, बेळगांव, निपाणी, गगनबावडा, इचल-करंजी, सातारा, ग्वालेर इत्यादि ठिकाणीं शेकडों कार्यक्रम झाल्यामुळें ऐतिहासिक पोवाड्यांचा अखिल महाराष्ट्रांत अतिशय बोलबाला होऊन ठिकठिकाणचे जुने शाहीर खडबडून जागे झाले व नवीन शाहीर उत्पन्न होऊं लागले. ग्वालेरास १९२७ सालीं छत्रपति शिवाजीमहाराजांचा त्रिशतसांवत्सारिक उत्सव झाला. उत्सवमंडळाच्या आमंत्रणावरून कृष्णराव मेहेंदळे आदिकरून शिष्यमंडळींसह ग्वालेरीस गेलों. राणी-सरकारांनीं एक महिनाभर ठेवून घेतलें होते. गायनांचे व पोवाड्यांचे कार्यक्रम पुष्कळ झाले. ग्वालेरच्या थोरल्या राणीसरकारांना पोवाडे म्हणण्याची स्फूर्ती होऊन त्यांनीं शिकण्यासहि आरंभ केला. गायन-पोवाड्यांच्या कार्यक्रमांनीं सर्व ग्वालेर हालून गेलें. श्रीमंत सरदार चंद्रोजीराव आंग्रे, शितोळे, फाळके, घोरपडे आदिकरून सरदार अत्यंत खूष होऊन म्हणाले कीं, " गोविंदराव देसाई व गोपाल गायन समाज हे दोन्ही ग्वालेरकरांच्या स्मरणांतून कधींही जाणार नाहींत. " ऐतिहासिक पोवाड्यांचा प्रचार होऊन शाहिरी जग जागें व्हावें या हेतूनें या मराठ-शाही काव्याचा प्रचार करण्याचें कार्य मीं हातीं घेतलें. तें पाहून महाराष्ट्रांत नवे नवे शाहीर निर्माण झाले. अर्थात् माझा हेतु सफल

झाला हें निराळें सांगावयास नको. अशा रीतीनें शाहीर व शाहिरी काव्य करणारीं माणसें गेल्या १६ वर्षांत पुष्कळच उत्पन्न झाली व त्यांनीं कार्यही चांगलें केलें.

१९२९सालीं शिवजयंतीनिमित्त पुण्यास दरसालप्रमाणें शिवाजी मंदिरांत पोवाड्याचा कार्यक्रम जाहीर करण्यांत आला. कर्नाटकांतून शाहीर बंडो महिपत कुलकर्णी व नाशिकच्या बाजूनें आमचे शिष्य शाहीर अनंतराव मुळे आले होते. याखेरीज इतर ठिकाणाहून आलेले शाहीर बरेच होते. पुण्याचेही एक दोन शाहीर आपआपल्या साथीसह हजर होते. "झाशीची महाराणी लक्ष्मीबाई" हें काव्य म्हणावें अशी सर्व पुणेकरांची इच्छा, व त्याप्रमाणें मला उत्सवमंडळामार्फत आगाऊ दोन महिने विनंती करण्यांत आली. मी फारच अशक्त झालेला. परंतु विचार केला कीं, दिवसेंदिवस प्रकृति थकत गेली तर आज म्हणूं शकेन एवढेंसुद्धां पुढें होणार नाहीं सबब एक तासभर कार्यक्रम करावा म्हणजे लोकांच्या विनंतीला मान दिल्यासारखें होऊन एक उत्कृष्ट व अत्यंत स्फूर्तिदायक काव्य लोकांपुढें येईल. असा विचार करून तयारीस लागलों. "पहिल्या क्रमांकांचें बक्षीस दरसाल गोविंदराव देसायांनाच मिळतें तें आपणांस मिळावें" या हेतूनें यंदा महाराष्ट्रांतील शाहीरांची शिवाजीमंदिरांत फारच गर्दी झाली होती.

उत्सवाचे अध्यक्ष श्री. ल. ब. उर्फ अण्णासाहेब भोपटकर हे होते. पोवाड्याचा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी अण्णासाहेबांनीं भाषण करण्यास सुरवात केली. हें भाषण लांबल्यामुळें जमलेल्या अफाट श्रोतृसमाजांस ती गोष्ट रुचली नाहीं. केवळ पोवाड्याच्या कार्यक्रमांसाठींच स्त्रीपुरुषांची अतोनात गर्दी झाली होती. कमींत कमी तेरा किंवा चौदा हजार लोक (पुरुष, स्त्रिया, मुलें, विद्यार्थी) शिवाजीमंदिरांत हजर होते. श्रोत्यांनीं गोंगाट करण्यास सुरवात केली.एका बाजूनें "पुंडलिक वरदे हरि विठ्ठल" अशी आरोळी उठली. तों लगेच दुसऱ्या बाजूनें "हर हर महादेव" असा जयघोष सुरू झाला. अण्णासाहेबांनीं आपलें भाषण संपविलें.त्यानंतर लगेच पोवाड्याच्या कार्यक्रमास सुरुवात झाली.

प्रथम संकेश्वरचे रहिवासी शाहीर बंडोपंत कुलकर्णी हे पोवाडा म्हणण्यास उभे राहिले, पण त्यांना मंडळींनीं ताबडतोब खालीं बसविलें. पण त्याचा दोष सर्वस्वीं श्रोत्यांवरही नव्हता. पुण्याचा रिवाज आधीं समजून न घेतां श्री. बंडोपंत पोवाडा गाण्यास उभे राहिले व त्यामुळेंच त्यांच्यावर बसण्याचा प्रसंग ओढवला. श्री. बंडोपंत जे उभे राहिले ते हातांत डफ घेऊन उभे राहिले. त्यानेंही फारसें बिघडलें नाहीं. पण ते प्रत्येक कडवें संपल्यावर उजव्या हातांत डफ घेऊन नाचूं लागले त्यामुळें एकच हंशा पिकला व साहजिकच त्यांना बसावें लागलें. त्या दिवशींचा कार्यक्रम संपल्यानंतर त्यांनीं माझी मुद्दाम भेट घेतली. त्यावेळीं डफ दुसऱ्याजवळ देऊन कडवें संपल्यानंतर नाचूं नये असें त्यांना मीं स्पष्ट सांगितलें. त्या सूचनेप्रमाणें दुसऱ्या दिवशीं ते वागले व त्यांचा पोवाडा श्रोत्यांनीं शांतपणें ऐकिला. शाहीर मुळे यांनीं मजा उडवून दिली. आमचा कार्यक्रम तर कमालीचा सुंदर झाला. "दुसरा कोणी वरचढ शाहीर उत्पन्न होईपर्यंत तुमचा हात धरणारा शाहीर आजमितीस तरी महाराष्ट्रांत नाहीं." असे श्रोत्यांनीं मला भेटून सांगितलें. आम्ही गायिलेला राणीसाहेबांचा पोवाडा ऐकतांना प्रत्येकाचें अंतःकरण पिळवटून गेलें. कांहींच्या अंतःकरणांतील उमाळा अश्रूंच्या रूपानें बाहेर वाहूं लागला.

पुणे येथील "टिळक लोकशिक्षण संघाचे" चालक श्री. बाळुकाका कानिटकर यांनीं शिमग्याच्या सणानिमित्त लकडी पुलाजवळील विठ्ठल मंदिरांत आमच्या पोवाड्याचा कार्यक्रम करविला. शिमग्याचे दिवशी नाना प्रकारचे अश्लील व बीभत्स प्रकार होतात, त्यास आळा घालण्यासाठींच केवळ या कार्यक्रमाची योजना केली होती. कार्यक्रम यशस्वी होऊन तो करण्याचा हेतू पूर्णपणें सफल झाला.

या कार्यक्रमास अतोनात गर्दी झाली. "आजचा कार्यक्रम करवून श्री. बाळुकाका कानिटकर यांनीं आम्हास चांगल्या मार्गावर आणलें" असें सांगून जमलेल्या सर्व मराठेमंडळींनीं बाळुकाकांना धन्यवाद दिले.

## स्वराज्याच्या राजधानींत

एप्रिल १९२६मध्यें रायगड येथील शिवाजीमहाराजांचा चौथा महोत्सव थाटानें साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं केसरीचे संपादक श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं गायन-समाजास अगत्याचें बोलावणें केल्यामुळें सर्व बालगोपालासह मी रायगडीं गेलों. रायगड येथील कार्यक्रम उत्कृष्ट झाला. रायगडावर या प्रसंगीं समाज किती व कशा प्रकारचा जमला होता याचें वर्णन अगदीं थोडक्यांत करावयाचें म्हणजे हिंदुस्थानच्या सर्व भागांतील नांवाजलेले विद्वान व श्रीमान्, देशभक्त व इतिहासज्ञ, रावसाहेब व रावबहादूर, साहित्याचार्य व संपादक, कॉलेजचे प्रिन्सिपल व प्रोफेसर यांपासून गडाखालच्या मावळ्या पर्यंत निरनिराळ्या पंथांचे व मतांचे अदमासें आठ हजार लोक जमले होते. सकाळपासून रात्रीं बारा वाजेपावेतों समाधीची पूजा, कोनशिला-समारंभ, शिवाजीमहाराजांच्या प्रतिमेची पालखींतून मिरवणूक, व्याख्यानें, कीर्तन-भजनादि सर्व कार्यक्रम उत्तम रीतीनें पार पडले. शेवटीं गोपालगायन समाजाचा कार्यक्रम झाल्यावर मंडळींनीं गड उतरण्यास लागावयाचें असें पूर्वीच ठरलें होतें.

दिवसभर इकडे तिकडे फिरून व कामें करून आम्ही सर्व दमून गेल्यामुळें रामदासांचे मठांत झोपलों होतों. रात्रीं बारा वाजता इतर सर्व कार्यक्रम आटोपल्यावर श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याकडून बोलावणें आल्याबरोबर मी निघालों. आम्ही सभेंत जातों तों सभा खूप रंगलेली होती. नागपूरचे श्रीमंत राजे लक्ष्मणराव भोसले यांच्या अध्यक्षतेखालींच हा महोत्सव झाला. आम्ही गेलों त्यावेळीं राजे भोसले सभेच्या मध्यभागीं बसले असून इतर सर्व थोर थोर मंडळी आपआपल्या मानाप्रमाणें त्यांच्या आजूबाजूस आधिष्ठित झालेली दिसत होती. ह. भ. प. मुरुडकरबुवांचें कीर्तन गडावर दिवसा झालें. संगीत-रत्न नरहरबुवा पाटणकर हे त्यांच्याबरोबर रायगडीं आलेच होते. या सभेंत नरहरबुवा आमच्या आधींच जाऊन बसले होते. आमचा कार्यक्रम सुरू होण्यास अर्धा तास अवकाश आहे असें समजतांच श्री. तात्यासाहेबांनीं नरहर-

बुवांचा गायनाचा कार्यक्रम सुरू केला. नरहरबुवांचें गंधर्वांच्या पद्धतीचें गायन ऐकून सर्व सभा खूष झाली होती. शेवटचें पद संपतें न संपतें इतक्यांत आम्ही सभेच्या ठिकाणी जाऊन पोंचलों.

"आमचा तो शाहिरी संच पाहून सर्व लोक बोलूं लागले कीं, या गायनाच्या गोड कार्यक्रमानंतर पोवाड्यांचें काय तेज पडणार? पोवाड्याचा कार्यक्रम रहित करावा व गायनाचा कार्यक्रमच पुढें चालू ठेवावा. आणखी एक तास भर गायन झालें की मंडळींनीं गड उतरण्यास लागावे. अशी सभेमध्यें ठिकाठिकाणीं भाषा ऐकूं येऊं लागली. महोत्सवाचे अध्यक्ष राजे लक्ष्मणराव भोसले व डॉ. मुंजे म्हणाले कीं, आता या गाण्यापुढें पोवाडे गोड लागणें कठीण ! पण श्री. केळकर म्हणाले. " मला पाटणकर व देसाई दोघेही माहीत आहेत. मीं भाडेखर्च देऊन गोविंदरावांना एवढ्या मोठ्या शिष्य गणासह गडावर घेऊन आलों तो गोविंदरावांची पूर्ण माहिती असल्यामुळेंच. मी या सर्व कार्यक्रमाची रचना बरोबर केली आहे. काळजी करूं नका, गोविंदराव आतां कार्यक्रमास उभे राहतील जर कार्यक्रम रंगत नाहीं असें वाटलें तर पांच मिनिटांत कार्यक्रम रहित करून गड उतरण्यास लागू म्हणजे झालें. तात्यासाहेबांचें हें बोलणें संपतें न संपतें तोंच मी डफावर थाप देण्यास सांगितलें, व

" गणपती गौरी–नंदना । तूं सकल कलांचा निधी मति धावी कवना "

हें नमन म्हणण्यास प्रारंभ केला. एक दोन मिनिटांतच पहिले सर्व कार्यक्रम लोक विसरले व सर्व सभा एकदम तटस्थ झाली. राजे भोसले उद्गारले कीं, " शाबास रे शाहीर! वाहरे वीर!" नमनानंतर खेडचे शाहीर रामभाऊ बळवी यांनीं केलेला " शिवाजी महाराज अवतारी कसे या पोवाड्यास आरंभ केला. मूळ काव्यच उत्कृष्ट, त्यांतून आमचा संचही तयार आणि रायगडचें स्थान–माहात्म्य, त्यामुळें पोवाड्यांतील प्रत्येक शब्दास श्रोते मान डोलवीत. हे काव्य ऐकत असता राजे लक्ष्मणराव भोसले यांचा कंठ वारंवार दाटून येई व नेत्र पाण्यानें भरून येत. सभेमधून एकसारखे " वाहवा ! वाहवा !" असे उद्गार ऐकूं येत.

१९२४ सालीं बेळगांव येथील काँग्रेसमध्यें राष्ट्रगीत गाण्याचें आमंत्रण स्वागत मंडळाचे अध्यक्ष दे. भ. गंगाधरराव देशपांडे यांच्याकडून आलें. रा. अवधूतराव पुजारी आदिकरून बावीस शिष्यमंडळीं बरोबर घेऊन मी बेळगांवास गेलों. परंतु कानडी–मराठी–वादामुळें राष्ट्रगीत गाण्याचें रहित झालें. याचवेळीं पंडितजींनीं बेळगांवास महाराष्ट्र संगीत परिषदेचें आधिवेशन भरविलें. त्यांत गायनाचे जलसे व विद्यार्थ्यांच्या चढाओढी ठेविल्या होत्या. गायनाच्या चढाओढींत श्री. ह. मेहंदळे, नारायण कोगेकर व कु. शांता गद्रे या आमच्या विद्यार्थी–विद्यार्थीनींनाच पहिलीं तिन्ही बाक्षिसें मिळालीं. मी परिषदेंत गाण्याचे दोन कार्यक्रम करून शिष्यमंडळीसह पुण्यास परत आलों.

१९२९ नंतर कोल्हापूर, निपाणी, चिकोडी, संकेश्वर इत्यादि ठिकाणीं गायनाच्या कार्यक्रमाकरितां मी गेलों असतां चिकोडीस एक जाहीर असा पोवाड्याचा कार्यक्रम केवळ लोकाग्रहास्तव केला. पुढें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें या कार्यक्रमाच्या बाबतींत कायमची रजा घेतली. तथापि ग्वाल्हेर, इंदूर, मुंबई, फलटणचे राजे श्रीमंत नानासाहेब निंबाळकर, मिरज संस्थानचे अधिपति श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन इत्यादि ठिकाणाहून अगत्याची आमंत्रणें येत असत. परंतु ती मी स्वीकारली नाहींत. बडोदा–नरेश श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड यांचा पुण्यामध्यें १९३३ सालीं पुण्यांतील सर्व संस्थातर्फे फार मोठा सन्मान करण्यांत आला. त्यावेळीं सयाजीराव महाराजांनींहि पोवाड्याचा कार्यक्रम ऐकण्याची इच्छा असल्याचें आम्हांस कळविलें व अगत्याचें बोलावणें केलें. परंतु त्यांनाही नकारच द्यावा लागला. एकंदरींत १९२९ सालानंतर पोवाड्याचे कार्यक्रम मला बंदच करावे लागले. गायनाचे कार्यक्रम नेहमींच चालू होते व आहेतही. विशेषंकरून सार्वजनिक गणेशोत्सव व गोकुळाष्टमी इत्यादि प्रसंगीं विद्यार्थी तयार होईपावेतों मी स्वतः गाण्याच्या बैठकीस जात असें. पुढें विद्यार्थी तयार झाल्यावर शक्य तों कार्यक्रमास विद्यार्थ्यांनाच पाठविण्याचें करूं लागलों.

M/6024

## प्रकरण ४ थ

# सांसारिक सुखदुःखें

सन १९०८ सालीं सरकारी शाळेस रामराम ठोकल्यावर वडील व मातुःश्रींची परवानगी घेऊन निघालों. त्यावेळीं मी विवाहित होतों.

माझें पहिलें लग्न १९०७ सालीं झालें. कुरुंदवाडनजीक हेरवाड म्हणून एक गांव आहे. त्या गांवचे इनामदार व कोल्हापूर दरबारचे एक मांडलीक श्रीमंत बापूसाहेब हेरवाडकर यांनीं आपली भाची मला देऊं केली व त्याप्रमाणें तो विवाहसमारंभ हेरवाड मुक्कामीं साजरा झाला. हेरवाडकर इनामदार यांना पालखींत बसण्याचा अधिकार असल्यामुळें अशा मंगलप्रसंगीं ते पालखीचा उपयोग करीत. लग्नाच्या शेवटच्या दिवशीं पालखींतूनच वरात निघाली. पालखीपुंढें सजविलेले उत्तम घोडे तर होतेच परंतु एक हत्तीदेखील मिरवणुकीबरोबर होता. दोन्ही बाजूच्या पाहुणेमंडळींची संख्या फारच मोठी होती. नगारे, चौघडे, ताशे, सनईवाले, इत्यादि लोकांचा जमाव वाखाणण्यासारखा होता. लग्नसोहळा पांच दिवस चालू होता. दररोज ब्राह्मणभोजन होत असे व त्याचप्रमाणें गोरगरिबांना यथास्थित अन्न दिलें जाई. लग्नसमारंभ आटोपल्यावर आम्ही सर्व उगारास परत आलों.

लग्नानंतर एक वर्षानेंच पहिलें कुटंब वारलें. दुसरें लग्न करावें असा विचार नव्हता. निदान चारपांच वर्षें गेल्यानंतर पुन्हा विवाह करावा

असें मनाशीं ठरविलें; परंतु वडिलांनीं आपल्या इच्छेप्रमाणें दुसऱ्या लग्नाचा योग जुळवून आणला.

१९०८ सालीं जमखंडीचे वकील श्री. गोविंदराव पुसाळकर यांच्या कन्येशीं माझा दुसरा विवाह झाला. या विवाहानंतरच सांगली हायस्कूल मधून बाहेर पडलों.

घर सोडून निघालों तों पुढें समर्थ विद्यालय, मुंबईचे गांधर्व महाविद्यालय, गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर यांच्याबरोबर उत्तर हिंदुस्थान, दक्षिण हिंदुस्थान, बंगाल, बिहार, नेपाळ, ब्रह्मदेश इत्यादि देशपर्यटण करून पुण्याच्या शाखेवर प्रमुख या नात्यानें नेमणुक होईपर्यंत घरच्या मंडळींपैकीं कोणाचीच गांठभेट झाली नाहीं. १९११ ते १२ सालच्या दरम्यान माझे वडील मला परत घरीं नेण्यासाठीं आले. तथापि मी “गुरुजींना नऊ वर्षांचा करार लिहून दिला आहे, तो संपल्यावर गुरुजींची आज्ञा होईल तर येईन” असें वाडिलांना सांगितलें. माझा न येण्याचा निर्धार पाहून वडील परत गेले.

१९१३ सालीं पुण्यास बिऱ्हाड केलें; तें चार वर्षेपर्यंत होतें. १९१५सालीं मातुःश्री वारल्या व १९२० सालीं वडील इहलोक सोडून गेले. मध्यंतरीं १९१७ सालीं वडील बंधूंचें कुटुंब एकाएकींच वारल्याची हकीगत समजतांच साहाजिकच पुण्याचें बिऱ्हाड मोडून आमच्या सर्व मंडळीस उगारास जावें लागलें. माझ्या पत्नीखेरीज घरांत मुलांचा सांभाळ करण्यास दुसरें कोणीच नाहीं अशी स्थिति झाली. माझे दोन मुलगे व वडील बंधूंचीं चार मुलें या सर्वांचा सांभाळ करण्याची जबाबदारी तिच्यावर पडली व शेवटपर्यंत तिनेंही ती अंगावर घेऊन आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें पार पाडलें. पुढें सर्व मुलें मोठीं झालीं. मुलांचें मराठी शिक्षण या वेळीं चालू होतें. इंग्रजी शिक्षणासाठीं बाहेरगांवीं मुलांना पाठवावें असा विचार चालू होता. सांगली अगर मिरज हीं ठिकाणें आमच्या गांवापासून अगदीं जवळ असल्यामुळें मुलांच्या इंग्रजी शिक्षणाची सोय तेथें करावी अशी वाटाघाट उगार मुक्कामीं सुरू होते न होते तोंच सर्व मंडळींनीं पुण्यास यावें अशा अर्थाचें पत्र मीं वडील बंधूंना लिहिलें. त्याप्रमाणें

पुनः १९२२ सालीं सर्व मुलें पुण्यास आल्यावर चिमण्या गणपतीजवळ नातूंचे वाड्यांत मीं बिऱ्हाड केलें. माझे कनिष्ठ बंधु चि. गणपतराव हे माझ्या-जवळच त्यावेळीं रहात होते. बिऱ्हाडासंबंधींचीं कोणतींही कामें मला करावीं लागलीं नाहींत. संसारास लागणाऱ्या सर्व गोष्टींची तजवीज आमचे धाकटे बंधु व गायन-समाजातील विद्यार्थी आपआपल्या सवडीप्रमाणें करीत असत.

## जिवाला धोका

गायन-समाजाच्या व इतर सार्वजनिक कामाखेरीज बाकीच्या घरगुती गोष्टींत लक्ष घालण्याचें मला कधीं कारण पडलें नाहीं. संस्था व संसार हीं दोन्ही सुरळीत चालू होतीं. परंतु पुढें लवकरच म्हणजे १९२३ सालीं गृहकलह सुरू झाले. या घरगुती भांडणाचे परिणाम मला इतके भोगावे लागले कीं, त्याचें समग्र वर्णन करूं लागलों तर तें एक निराळेंच पुस्तक होईल. अगदीं थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या कलहापायीं माझा जीव रात्रंदिवस धोक्यांत होता. आमच्याच भाऊबंदांनीं पुण्यांतील व्यायाम-शाळांमधील कांहीं हलक्या लोकांना सामील करून घेऊन माझा खून करण्याचा प्रयत्न केला. रात्रींच्या वेळी रस्त्यांत माझ्यावर अचानक हल्ला करण्याचे प्रयत्न झाले. पर्वतीच्या बाजूस मी केव्हां केव्हां सायंकाळीं फिरावयास जात असे. यावेळीं पर्वतीच्या वाटेवर झाडी अत्यंत दाट असून रस्ता फक्त एक हातभर रुंद होता. सूर्यास्तानंतर या रस्त्यानें जाण्या-येण्याची भीति वाटत असे. या ठिकाणीं गांठून दगडांनीं चेचून मारण्याचा प्रयत्न एकदोन वेळ करण्यांत आला. मला या सर्व गोष्टींची माहिती आगाऊच मिळत असे. तथापि माझ्या मनाला कधींही भीति अगर दह-शत वाटली नाहीं. उलट ज्या ठिकाणीं दंगा अगर अपघात होण्याचा संभव वाटे त्या ठिकाणीं मी आपण होऊन मुद्दाम हजर होत असे. माझें हें धाडस पाहून प्रतिपक्षांतील सर्व लोकांना वारंवार नेहमीं आश्चर्य वाटे. माझा अजिबात निकाल करण्याकरितां ज्या लोकांची नेमणूक केली होती, त्या लोकांना माझ्यावर हल्ला करण्याची हिंमत होत नाहीं; असें पाहून आमचे भाऊबंद निराश झाले.

## दुष्टांना शासन

इतकें झालें तरीसुद्धां दुर्योधनाप्रमाणें त्यांच्या पोटांत असलेला द्वेषभाव नाहींसा झाला नाहीं. विष घालून मारावा व मेला नाहीं तर निदान आवाजावर कांहीं अनिष्ट परिणाम होऊन आवाज तरी निकामी व्हावा असे उपाय योजले गेले. परंतु त्यांतूनही मी परमेश्वर—कृपेनें शीरसलामत बाहेर पडलों.

या प्रसंगीं चि. अवधूतराव पुजारी व नारायण कोगेकर यांची मला फार मदत झाली. एक दिवस मीं एका ठिकाणीं भोजनास जाण्याचें ठरविलें परंतु पुजाऱ्यांनीं त्यावेळीं मला जाऊं दिलें नाहीं म्हणून बरें झालें. गेलों असतों तर जिवास अपाय होण्याचा संभव होता. पुजाऱ्यांनीं सावध केलें त्यामुळें गोष्ट निभावली.

कदाचित हा गुप्त कट उघडकीस आला तर त्या क्षणीं आपलाच नाश होईल असें वाटूं लागतांच आमच्या भाऊबंदांनीं पुणें सोडून सुमारें तीन वर्षें कोकणप्रांताचा आश्रय केला. तिकडेही असेच गुण उधळल्यामुळें इष्टमित्राशीं बेबनाव होऊन कोकण सोडून पुन्हा हे गृहस्थ देशावर आले.

"अतीत्य हि गुणान् सर्वान् स्वभावो मूर्ध्नि वर्तते"

या सुभाषिताप्रमाणें हे गृहस्थ नेहमींच सर्वांशीं वागूं लागले व अजूनही तसेंच वागतात. घरीं कागदपत्र व द्रव्याची चोरी केली. घराण्याचा लौकिक नष्ट होण्याचा प्रसंग आल्यामुळें कसें तरी करून फौजदार कोर्टांत गेलेली फिर्याद काढून घेऊन हें सर्व प्रकरण आपसांत मिटवावें लागलें. हें सर्व मिटविण्याच्या कामीं या दुष्ट लोकांना माझेंच सहाय्य घ्यावें लागलें.

गायनाचा अगर पोवाड्याचा जाहीर कार्यक्रम असला म्हणजे या लोकांनीं २५।३० माणसें गोळा करून आणावीं व दंगा करून कार्यक्रमांत व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करावा. "पुण्यांतून लवकर निघून जा नाहीं तर तुमचा खून करूं." असें पत्रांतून मला धमकाविलें जात असे, गायन-समाजांतील बरेचसे विद्यार्थी, पैसे देऊन व वेळोवेळीं भत्ता चारून त्यांनीं



श्री. अ० चिं० मराठे,
संगीतविद्याविशारद, चिटणीस र. म. मंडळ.



श्री. ल० त्र्यं० तुणतांबेकर, वैद्य.



श्री. द० मो० जोशी,
चालक नं. श्री. सं. विद्यालय,
चिटणीस र. म. मंडळ.



श्री. नारायणराव देसाई.



श्री. हरीभाऊ देसाई.



श्री. कृष्णराव देसाई.

आपलेंसे करून घेतले व त्यांच्याकडून गायनसमाजांतील वाद्यांची चोरी करविली. या चोरींत मुख्य चोर

सदाशिव सखाराम गोरे

यास सहा महिने सक्तमजुरी व २०० रुपये दंड झाला. हा मनुष्य हल्लीं सोलापुरास अगदीं गुप्त रीतिनें राहतो असें समजतें. गायनसमाजाचें कार्य अजीबात बंद व्हावें अशी या लोकांनीं फार खटपट केली. "गोविंदराव देसाई यांचें आचरण चांगलें नाहीं सबब यापुढें मुली गायनसमाजांत पाठवूं नयेत" असें घरोघरीं हिंडून या लोकांनीं सांगण्यास सुरवात केली. परंतु या चहाडखोर लोकांवर कोणीही विश्वास ठेविला नाहीं. उलट 'कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें' या न्यायानें गायनसमाजाची दिवसेंदिवस भरभराटच होत गेली. १९२७ साली संस्थेची स्वतंत्र इमारत उभी झाली हें पाहून तर या लोकांचीं तोंडें अगदीं काळीं झालीं.

१९२९ च्या जुलै महिन्यांत माझे कुटुंब वारलें. त्यावेळीं माझें तीन मुलगे लहान होते. त्यांना पुढें सांगलीस आमच्या वडील बंधूनीं आपल्या देखरेखीखालीं ठेवून त्यांचा विद्याभ्यास चांगला करून घेतला. चि. हरिभाऊ व नारायण हे दोघे मॅट्रिकच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यानंतर हरिभाऊ सांगलीस विलिंग्डन कॉलेजमध्यें दाखल झाला व नारायणानें सांगली सिटी हायस्कुलध्यें नोकरी धरली. हरिभाऊ कॉलेजच्या पहिल्या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावर सरकारच्या लष्करी खात्यांत गेले. नारायणरावांनीं सांगली येथील नोकरीचा राजीनामा दिला व हल्लीं खडकी येथील सरकारच्या लष्करी खात्यांत नोकरी स्वीकारली. तिसरा मुलगा श्रीकृष्ण हा सांगलीस असून तेथें सिटी हायस्कूलमध्यें मॅट्रिकचा अभ्यास करीत आहे. तीनही मुलगे सालस व आज्ञाधारक असल्यामुळें मागील सर्व सांसारिक अडचणींचा विसर पडला. तिघेही शरीरसंपत्तीनें फारच चांगले, परंतु हरिभाऊ हा वयाच्या सोळा वर्षापासून कुस्तीच्या आखाड्यांत उतरल्यामुळें त्याची प्रकृति नेहमींच वाखाणण्यासारखी असते. मुलांकडे पाहिलें म्हणजे सध्यांच्या परिस्थितींत आपण भाग्यवान आहों असें मला तर वाटतेंच, परंतु इतरांनाही त्याबद्दल संतोष वाटतो.

## प्रकरण ५ वें

# रेल्वे-मंडळाची कामगिरी

---

पूर्वीं लिहिल्याप्रमाणें मी तळेगांवास शिकविण्यास जात असतां पुण्याच्या रेल्वे स्टेशनवर तिसऱ्या वर्गाचे उतारू व तिकिटकलेक्टर यांच्यामधें प्लॅटफॉर्मवर जाण्याबाबत एक दिवस तक्रार उत्पन्न झाली. यावेळीं पुण्याचें नवें स्टेशन बांधण्याचें काम चालू झालें होतें. दरवाज्यावर उतारूंची अत्यंत खेचाखेच होऊन लोक दरवाज्यावरून चढून जाण्याचा विचार करूं लागले. गाडी प्लॅटफार्मवर येऊन बराच वेळ झाला तरी तिकिट कलेक्टर दरवाजा बंद करून उभा होता. तो दरवाजा खुला करीना हें पाहून उतारू थोडे बेदिल झाले व दरवाज्यावर चढले. मी त्या उतारूंमध्यें होतोंच.

उतारूंची ही गडबड व दंगा पाहून तिकिटकलेक्टर दुसऱ्या दरवाजानें बाहेर येऊन उतारूंना मारूं लागले. एका युरोपियन तिकिटकलेक्टरनें तर एका अगदीं वृद्ध मराठा मनुष्यास बुटाची लाथ मारली!!

लाथ जोरानें बसल्याबरोबर त्या म्हाताऱ्याच्या खांद्यावरील पडशी व हातांतील तांब्या इत्यादि सामान जमिनीवर पडलें. म्हातारा रडूं लागला. हिंदुसमाजांतील निरनिराळया जातींचे अदमासें २०० उतारू तेथें उभे होते. परंतु त्या म्हाताऱ्याला तिकिटकलेक्टरच्या तडाख्यांतून सोडविण्यास कोणी पुढें होईना. मला रहावेना. म्हातारा जमिनीवर पडला तरी तिकिटकलेक्टर त्यास लाथा-बुक्यांनीं एकसारखा मारतोच आहे हें

पाहिल्यावर मागचा-पुढचा विचार न करतां मी हातांतील काठीनें तिकिट-कलेक्टरच्या पाठीवर जोराचे दोन तडाखे दिले!!

तिकिट कलेक्टर मागें वळून माझ्या अंगावर धावून आले. मला आधींच क्रोध आलेला होता. काठीनें मारून माझें समाधान होईना. तिकिट-कलेक्टर अंगावर धावून आल्याबरोबर मी माझ्या हातांतील काठी दुसऱ्याच्या स्वाधीन केली व कलेक्टरसाहेबांना चारपांच थपडा दिल्या! साहेबबहादुरांची हॅट जमिनीवर पडली, हातांतील कात्री एकीकडे उडाली व साहेब आपल्या मदतीसाठीं पोलिसांना मोठमोठ्यानें हाका मारूं लागले.

पोलिस येईपर्यंत माझ्या पायांतील स्लीपरच्या दोन लाथा व एक दोन बुक्या साहेबांना मिळाल्या. पोलिसांनीं येऊन मारामारी सोडविली. माझें नांव व पत्ता पोलिसांनीं लिहून घेतला, परंतु त्यावेळीं कांहींच झालें नाहीं. गाडीची वेळ झाल्याबरोबर दरवाजा खुला होऊन सर्व उतारूंना आंत सोडलें, त्यांत मीही घुसलों व तळेगांवास गेलों.

तळेगांवांहून परत आल्यावर श्री. विनायकराव भुस्कुटे, श्री. शंकरराव देव, श्री. न. वि. गाडगीळ, रा. द. गो. फडके वकील इत्यादि स्नेही-मंडळींना ही सर्व हकीगत कळवून त्यांच्या सहाय्यानें एक रेल्वे मंडळ स्थापन केलें. श्री. न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या घरीं सभा होऊन रेल्वेमंडळाचे अध्यक्ष श्री. न. वि. गाडगीळ व कार्यवाह श्री. द. गो. फडके वकील व गोविंदराव देसाई अशी योजना झाली. रेल्वेच्या उतारूमध्यें आपले हक्क बजावण्यासंबंधीं कशा रीतीनें जागृति करावी याची योजना निश्चित झाल्यावर इतर सर्व कामें बाजूस ठेवून, पुणें ते मुंबई, पुणें ते सोलापूर व सदर्न मराठा रेल्वे या बाजूंस वेळोवेळीं रेल्वेंतून फिरून तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे हक्क काय आहेत व त्याचा आपण कायदेशीर रीतीनें फायदा करून घेतला पाहिजे याबद्दल निरनिराळ्या स्टेशनवर व प्रवास करींत असतां गाडीच्या प्रत्येक डब्यांत जाऊन मी उतारू लोकांसमोर व्याख्यानें देण्यास सुरुवात केली.

डब्यांत गर्दी झाली असतां सांखळी ओढणें हा गुन्हा नाहीं ही गोष्ट समजावून दिली.

## " हा गुन्हा नाहीं "

असें शीर्षक देऊन मराठी भाषेंत अदमासें १५ हजार हस्तपत्रकें काढून तद्द्वारां तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या हक्कांची जाणीव लोकांना करून दिली. हें कार्य करीत असतां पुण्याच्या स्टेशनवर पोलिस व तिकिटकलेक्टर यांच्याशीं अनेक वेळां मारामाऱ्याहि झाल्या. पुणें स्टेशनच्या पोलिस-अधिकाऱ्यांनीं दोन वेळ मला अटकही केली, परंतु अखेर दोषमुक्त म्हणून मला सोडून द्यावें लागलें.

रेल्वेमंडळाचें कार्य तीन वर्षेपर्यंत चालू होतें.

या अवधींत वर्तमानपत्रद्वारां व समक्ष ठिकठिकाणीं हिंडून आणि रेल्वे-अधिकाऱ्याबरोबर पत्रव्यवहार करून तिसऱ्या वर्गाच्या गरीब उतारूंची दाद लागण्यासाठीं आमचे प्रयत्न एकसारखे चालूच होते.

पुण्याच्या नवीन स्टेशनचें काम चालू आहे या सबबीवर तिसऱ्या वर्गाच्या उतारूंचे होत असलेले हाल पाहून मला ती गोष्ट अत्यंत अपमानास्पद वाटे. रेलवेचे कायदे व नियम या लोकांना वारंवार समजावून देत होतों. तथापि स्वतःचे हक्क बजावण्याची पात्रता या लोकामधें येईल कीं नाहीं अशी शंका येई. वास्तविक पुण्याच्या नवीन स्टेशनची रचना पाहिली तर केवळ गोरे लोक व श्रीमंत लोक यांच्याच सुखसोयीकडे सर्वस्वीं लक्ष दिलेले दिसतें. परंतु रेलवेचें खरें उत्पन्न गोरे व श्रीमंत लोकांकडून होत नसून तें तिसऱ्या वर्गाच्या उतारूंकडूनच भरून निघतें. इतकेंच नाहीं तर तिसऱ्या वर्गाचे उतारू हेच रेलवेचे खरे मायबाप असून त्यांची सर्व प्रकारें सोय प्रथम केली पाहिजे ही गोष्ट रेल्वे कंपनी व त्यांतील अधिकारी यांच्या ध्यानांत येत असूनसुद्धां त्याचा विचारच होत नाहीं.

याचा अर्थ असा कीं, तिसऱ्या वर्गाचे उतारू केवळ पशू समजले जातात. पशूदेखील इतका त्रास सहन करणार नाहींत! अर्थात

आम्ही पशूपेक्षांही कमी दर्जाचे झालों आहोंत. याचें कारण आम्ही आमचा स्वभाव विसरलों. तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत एकादा दांडगा मुसलमान अगर पठाण खुशाल बाकावर आडवा झालेला असतो. तें पाहून आम्ही डब्याच्या एका कोपऱ्यांत बायकामुलें व ओझीं घेऊन दीनमुद्रेनें उभे राहतों. परंतु त्या पठाणास उठवून शक्य तेवढी तरी जागेची सोय करून घेण्याची आम्हांस छाती होत नाहीं. दोन तासांचा तर रस्ता, काय येथें जन्म काढायचा आहे? कशाला भांडत बसावें, असला खोटा वेदांत आम्ही यावेळीं सांगतों. कां तर पठाणास उठविण्याची आमच्या ठिकाणीं ताकद व हिंमत नाहीं म्हणून!

"३६ उतारूंनीं बसावें" असें ज्या डब्यांत लिहिलेलें असतें तेथें दुप्पटच काय पण तिप्पट उतारू जनावराप्रमाणें भरले जातात. अशा रीतीनें तिसऱ्या वर्गाचे डबे भरल्यानंतर राहिलेले तिसऱ्या वर्गाचे उतारू जनावरांच्या डब्यांत अगर इमारतीचीं लांकडें भरण्याच्या वॅगनमधें भरले जातात ही गोष्ट पंढरपूरच्या यात्रेच्या वेळीं प्रत्यक्ष पहावयास मिळते. अशा प्रकारें हीं जनावरें (तिसऱ्या वर्गाचे उतारू) रेल्वेंतून प्रवास करतांना पाहिलें म्हणजे असें वाटते कीं, दीड शतकापेक्षां अधिक काळ पारतंत्र्यांत गेल्यामुळें आमचा स्वाभिमान, क्षात्रतेज, ब्रम्हतेज, पराक्रम, शारिरिक शक्ति, मानसिक धैर्य या सर्वांचा लोप होऊन कमकुवतपणा, दौर्बल्य, भ्याड वृत्ति हीं आमच्यामधें आलीं व हे दुर्गुण लपविण्यासाठीं खोटा वेदांत सांगण्याची आम्हांस सवय लागली. आम्हांस माहीत आहे कीं, इतर लोकसत्ताक राष्ट्रांतून तिसऱ्या वर्गाच्या उतारूंची फारच काळजी घेण्यात येते. हिंदुस्थानांतील सर्वच परिस्थिती विचित्र! ठिकठिकाणच्या धर्मशाळा (waiting room), पाण्याची अव्यवस्था, उतारूंची गर्दी, डब्यांची कमतरता, खिडकीवर तिकीट मिळण्याची मारामार, तिकीट कसें तरी मिळाल्यानतर गाडी गांठण्याची घाई, डब्यांत शिरतांना होत असलेली तारांबळ व हाल, डब्यांत गेल्यावर जागेच्या अभावीं सहकुटुंब सहपरिवार हातांत ट्रंका व ओझीं घेऊन उभे रहावें

लागल्यामुळें मनास वाटत असलेला अपमान व दुःख इत्यादि सोहळा पाहून मला अत्यंत संताप येई, खेद वाटे; परंतु

" काय करूं पंढरिनाथा, काळ साह्य नाहीं आतां "

ह्या जनाबाईच्या अभंगाची आठवण होऊन शांत व्हावें लागत असे. प्लॅटफॉर्मवर गाडी आली तरी दोन दोन तास हे उतारू व बायका-माणसें पावसांत व सूर्याच्या तापांत लहान मुलें व ओझीं कडेवर व खांद्यावर घेऊन उभे रहात. तिकिट कलेक्टर दरवाजा बंद करून निर्दय-पणें ही गंमत पहात असे. एक दिवस हा उपमर्द सहन न झाल्यामुळें मी स्वतः दरवाजावरून चढून आंत प्लॅटफॉर्मवर गेलों. कैक लोकांनीं ही गोष्ट पाहिली. परंतु माझ्यामागें येण्याचें धाडस कोणीही करीना. दरवाजांवरून चढून गेल्याबद्दल पोलिसाकडून मला थांबविण्यांत आलें, तक्रार झाली, पण अखेर कांहीं झालें नाहीं.

## उतारूंचे हक्क व कर्तव्य

याचा फायदा घेऊन मी या उतारूपुढें दररोज स्टेशनवर, वेटिंगरूम-मधें, डब्यामधें, जाहीर रीतीनें पुन्हा बोलण्यास सुरवात केली.

" तिकिटाची खिडकी वेळेवर उघडली नाहीं तर खिडकीवर ठोठावावें, गाडी प्लॅटफॉर्मवर आल्यावरसुद्धां तिकिट कलेक्टरनें दरवाजा उघडला नाहीं तर दरवाजावरून चढून जावें अगर दुसऱ्या वर्गाच्या दरवाजानें जाण्यास सुरुवात करावी; भिऊं नये. तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत जागा मिळाली नाहीं तर मध्यम व दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत उतारूंनीं बेलाशक शिरावें. डब्यांत प्रमाणाबाहेर गर्दी असेल तर साखळी ओढून गाडी उभी करावी. डब्यांत जागेसाठीं आपआपसांत भांडण व मारामाऱ्या न करितां उतारूंनीं याबद्दल स्टेशन मास्तरकडे तक्रार केली पाहिजे. ज्याला तिकिट मिळालें त्याला उभा राहण्यास नव्हे तर सुखानें बसण्यास जागा मिळालीच पाहिजे असा रेल्वे कंपनीचा नियम आहे. त्या नियमानुसार तुम्ही आपला हक्क बजाविण्यास कचरूं नका. कायदे-शीर हक्कांची मागणी करीत असतां रेल्वेचे अधिकारी तुमची हेटाळणी

करतील, उपमर्द करतील, जुलूम-जबरदस्ती होईल. परंतु अधिकाऱ्यांच्या उद्दामपणास व अरेरावीस न जुमानतां त्यांच्याशीं झगडून तुम्ही आपली दाद लावून घेतली पाहिजे. असें न होईल तर तुमच्या अडचणी व हाल केव्हांहि दूर होणार नाहींत. या सर्व गोष्टी करण्यास रेल्वेचे कायदे व नियम यांची तुम्हांस पूर्ण मोकळीक आहे. फक्त एकजुटीनें या सर्व गोष्टी केल्या पाहिजेत. एकादोघांचें हें काम नव्हे. शेंकडो लोकांची एकदम एकवाक्यता झाली नाहीं तरी निदान पांचशेंपैकीं पंचवीस उतारू जरी प्रसंगीं अन्यायाचा प्रतिकार करण्यास उभे राहिले तरी कार्य होईल."

याप्रमाणें माझ्या तोंडाची टकळी सतत तीन वर्षे चालू होती, यश येईल कीं नाहीं अशी वारंवार शंका येऊन मन उदास होई. परंतु थांबलों नाहीं. या बाबतींत केसरी, ज्ञानप्रकाश, नवा काळ, संग्राम, क्रॉनिकल, इंडियन डेली मेल इत्यादि वर्तमानपत्रांनीं रेल्वे कंपनी व रेल्वे अधिकारी यांची कानउघडणी चांगलीच केली.

रेल्वे मंडळाचा चिटणीस या नात्यानें मी व श्री. दत्तोपंत फडके वकील यांनीं ता. १८-५-२६ रोजीं जी. आय. पी. रेल्वेचे डिव्हिजनल ट्रॅफिक-मॅनेजर यांची मुलाखत घेतली. गरीब उतारूंचे होत असलेले हाल, अडचणी व गैरसोयी त्यांना समजावून दिल्या; तथापि या बाबतींत लक्ष घालून सामोपचारानें हें सर्व प्रकरण मिटण्याचा रंग दिसेना. साहेबांनीं व्यवस्था होईल एवढेंच आश्वासन दिलें पण तें आश्वासन भरीव नव्हतें. गोड बोलून त्यांनीं आम्हांस वाटेस लाविलें हें आमच्या लक्षांत आलें व फिरून मी पुणें व आजूबाजूंच्या स्टेशनवर जाऊन उतारूंना उठावणी देण्यास सुरुवात केली.

## प्रत्यक्ष प्रतिकार

अशा तऱ्हेनें सर्व वर्तमानपत्रांतून ओरड सुरू होऊन पुन्हां पुणें, दौंड, सोलापूर, कर्जत, खडकी, तळेगांव व त्याचप्रमाणें सदर्न मराठा रेल्वेच्या अनेक स्टेशनवर प्रत्यक्ष चळवळ व खळबळ उडाल्यामुळें रेल्वे अधिकारी थोडे जागे झाले. सांखळी ओढून गाड्या थांबविण्याचा सपाटा सुरू झाला. वेळेवर दरवाजा उघडला नाहीं तर उतारू दरवाजावरून चढून

जाण्याचा प्रयत्न करूं लागले, उतारूंना रेल्वे–अधिकारी व पोलीस यांची भीति वाटेनाशी झाली व सर्वसाधारण माणसेंदेखील रेल्वेंतील आपला हक्क बजाविण्यास धिटाइनें पुढें येऊं लागली. साहजिकच ट्रॅफिक मॅनेजर शुद्धीवर आले. ता. ३ जून १९२६ रोजीं त्यांनीं उत्तरादाखल दोन ओळी लिहून पाठविल्या. आणि त्याप्रमाणें उतारूंना दरवाजांतून सोडण्याच्या बाबतींत योग्य ती तजवीज करण्यांत आली. गर्दी झाली तर जास्त डबे लगेच जोडून उतारूंची बसण्याची व्यवस्था होत असे, इतर लहानसहान गोष्टीकडेदेखील रेल्वे–अधिकारी व पोलीस काळजीपूर्वक पाहूं लागले.

विनंती–अर्जांचीं अगर पत्रांचीं उत्तरें वरीलप्रमाणें देऊन लोकांचें तात्पुरतें समाधान करणें हें सरकारी अधिकाऱ्यांचें नेहमींचें धोरण असतें. परंतु ट्रॅफिक-मॅनेजरसाहेबांनीं या प्रसंगीं तसें केलें नाहीं. लोकांचे निष्कारण हाल होत आहेत या गोष्टीची खात्री करून घेऊन जरूर ती व्यवस्था करण्याचे हुकूम त्यांनीं स्टेशनच्या अधिकाऱ्याकडे रवाना केले. स्टेशनच्या अधिकाऱ्यांनींहि फारशी ओढाताण न करितां उतारूंशीं शिस्तीनें वागण्यास सुरुवात केल्यामुळें रेल्वेंतील तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या सव तक्रारी आपोआप दूर होऊन अखेर आमच्या प्रयत्नास यश आलें.

ता. १८।५।२६ रोजीं डिस्ट्रिक्ट ट्रॅफिक मॅनेजर यांच्या मुलाखतीनंतर पुन्हा ता. २०।५।२६ रोजी रेल्वे मंडळाची सभा होऊन वरील रेल्वे अधिकाऱ्यांस दुसरें पत्र लिहिलें. त्यांत पुढील मागण्या केल्या होत्या.

( १ ) गाडी सुटण्यापूर्वीं निदान तीस मिनिटें आधीं तिसऱ्या वर्गाच्या उतारूंना प्लॅटफार्मवर सोडण्यांत यावें.

( २ ) तिसऱ्या वर्गाच्या मुशाफरखान्यांत गाडी मागील स्टेशनावरून सुटली कीं सूचना ( वॉर्निंग ) देण्यांत यावी.

( ३ ) गाडींतील गर्दी मोडण्यासाठीं तिकिटविक्री योग्य वेळीं नियंत्रित करावी. या आपल्या कर्तव्याकडे रेल्वेचे अधिकारी फारसें लक्ष देत नाहींत.

( ४ ) गाडींतील गर्दी, शौचकूप, स्टेशनावरील पाणी वगैरे बाबतींतील

रेल्वेचे नियम तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत व मुशाफरखान्यांत देशी भाषेमध्यें लावून ठेवावे.

## क्रॉनिकलमधील लेख

यांपैकीं बहुतेक सर्व तक्रारी हळुहळु दूर होत चालल्या परंतु गाडी प्लॅटफॉर्मवर येण्यापूर्वीं अर्धा तास उतारूंना प्लॅटफॉर्मवर सोडावें असें वरील पत्रांतील पहिलेंच कलम आहे. त्याचा साहेबांनीं मुळींच विचार केला नाहीं. सर्वांत मोठी व मुख्य तक्रार उतारूंना गेटमधून सोडण्याची. त्याचें उत्तर देण्याचें साहेब वरचेवर टाळूं लागले. म्हणून ती गोष्ट लोकांच्या ध्यानीं येण्यासाठीं मीं मराठी वर्तमानपत्रांतून पुन्हा लिहिण्यास सुरवात केली. त्याचप्रमाणें साहेबांच्या पोकळ आश्वासनावर विश्वास ठेवून आम्ही स्वस्थ बसलों नाहीं हें साहेबांच्या कानीं लवकर जावें म्हणून "बॉबेक्रॉनिकल" कडेहि तो मजकूर पाठविला. त्यांचा सारांश खालीलप्रमाणें:—

The public fails to understand the danger that is involved in allowing third class passengers to come on the platform, say twenty or thirty minutes before the train leaves the station. The new platform is under construction and it may take even two years to complete it. Do the Railway Authorities imagine that up to that time the poor third class passengers should bake in the scorching, swelting summer season; and have a shower bath and be drenched and soaked in the rainy season?

Just imagine poor third class passengers with trunks on their heads, bags in their arms waiting until the door-keeper deems it just let them in. Just visualise the picture of Indian women–your own mothers and

sisters, with bags on their heads, babies in their arms, children clinging to their saries, making a way in the huge crowd. Is it human ? Is it self-respecting ? Is it just ? Do the Railway Authorities think that they confer a boon on the passengers by opening the door a few minutes before the train steams off from the station ? Is it proper to leave poor, illiterate, docile creatures at the mercy of the arrogant, bullying ticket collectors ? The third class passengers are the back-bone of the Railway company's existence and it is shameful and disgracing on the company's part to treat them as mere beasts of burden. The passengers should become bold and should assert their rights and vindicate their honour. If the Railway Authorities persist in humiliating, irresponsible and autocratic attitude, the only course left for self-respecting citizens to bring them to their senses is SATYAGRAHA. The Poona public is requested to communicate any grievance concerning the Poona Railway station to the secretaries, Railway Mandal 79 Shukrawar Peth Poona City.


G. G. DESAI.

ता. ३ जून १९२६ रोजीं ट्रॅफिक मॅनेजरचें उत्तर आलें कीं, आम्ही आपल्या पत्राचा योग्य तो विचार करीत आहों. इतकें झाल्यावर रेल्वेचे उतारू या बाबतींत जागरूक राहतील अशी आशा करून आम्ही या कार्यांतून निवृत्त झालों.

—:o:—



कालियामर्दन.



श्री गोपाळ गायनसमाज, पुणें संस्थेची इमारत

प्रकरण ६ वें

# संस्थेची इमारत

वडिलांच्या स्मरणार्थ मीं स्थापिलेला गोपालगायन समाज दिवसेंदिवस उत्कर्ष पावत होता.

१९२० सालीं नारायण वासुदेव कोगेकर हा एकच विद्यार्थी गायनसमाजांत प्रथम दाखल झाला. पुढें विद्यार्थी हळुहळू वाढत गेले. १९२२ सालीं विद्यार्थ्यांची संख्या तीस झाली. एका खोलींत तीस विद्यार्थी बसणें अशक्य म्हणून दोन वर्ग करून सकाळीं एक व सायंकाळीं एक असे वर्ग घेण्यास सुरुवात झाली.

पुणें येथील कॉंट्रॅक्टर श्री. नारायण विष्णु आठवले यांचे चिरंजीव यशवंत उर्फ भाऊराव हे गायन-समाजांत शिकण्याकरितां येत असत. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या वाढत्या प्रमाणांत आहे हें पाहून त्या वेळचे विद्यार्थी दुसरी विस्तीर्ण जागा असावी, अशी केव्हां केव्हां वाटाघाट करीत. कांहीं विद्यार्थी म्हणत कीं, लहानशी कां होईना स्वतंत्र इमारत बांधावी. या वाटाघाटींत श्री. भाऊराव आठवले हेही कधीं कधीं असत. द्रव्य जमण्याचा रंग दिसतांच भाऊराव यांचे वडील श्री. नारायणराव आठवले कंत्राटदार यांनीं जागेची खटपट करावी असा सल्ला

दिला, व जागा मिळाल्यास : " एक पैदेखील फायदा न घेतां इमारतीचें काम मी करून देईन " असें आश्वासन दिलें.

मी लगेच जागा मिळविण्याच्या खटपटीस लागलों. श्री. तात्यासाहेब केळकर यावेळीं दिल्लीस होते. त्यांना ही सर्व हकीगत कळविली. जरूर तेवढी जागा मिळवून देऊं असें श्री. तात्यासाहेब यांचेकडून उत्तर येतांच द्रव्याची कोण, किती मदत करितो याचा विचार सुरू झाला. जागा व द्रव्य याबद्दल प्रयत्न सुरू झाले. एक दिवस श्री. आठवले व मी श्रीमंत सरदार जगन्नाथमहाराज यांच्याकडे गेलों. संस्थेची सर्व हकीगत समजावून देतांच त्यांनीं जागा देण्याचें ठरविलें. मुसलमान व श्रीमंत जगन्नाथमहाराज यांच्यामध्यें ज्या जागेबद्दल तंटा चालू होता ती जागा आम्हास दिली जाणार हें मला समजतांच मी त्या गोष्टीस प्रथम तयार नव्हतों. परंतु ही जागा ताब्यांत घेऊन गोपाल गायन समाजाची इमारत येथें बांधली गल्यास आजूबाजूच्या लोकांना मुसलमानापासून होणारा त्रास कमी होईल आणि मुसलमान व पठाण यांचा अड्डा येथून हालवल्यास लोकावर फार उपकार होतील असें पुण्यांतील पुढाऱ्यांनीं मला सांगितलें.

केवळ मुसलमानांच्या गुंडगिरीस आळा बसावा याच हेतूनें आम्ही ही जागा पत्करिली. नाहीं तर यापेक्षां विस्तीर्ण व जास्त सोयीची जागा घेण्याचा आमचा विचार होता व तें आम्ही करूं शकलों असतों. या जागेंत आम्ही आल्यानें शेकडो लोकांचा त्रास कमी होतो आहे हें लक्षांत घेऊन आम्ही आमच्या सोयी गैरसोयीकडे फार लक्ष दिलें नाहीं. ही जागा सालिना दोन रुपये भाड्यानें आम्हांस देऊन या वसाहतींतील लोक व गोपाल गायन समाज या दोघावरही जगन्नाथमहाराज यांनीं फार मोठे उपकार केले यांत शंका नाहीं.

सप्टेंबर १९२६ मध्यें जागा आमच्या ताब्यांत आली. निरंतर भाडेपट्ट्यानें जागा घेतली. भाडे–चिठी रजिस्टर झाली. होणारी इमारत व त्यावेळीं असलेली सर्व मालमत्ता यांचें विश्वस्तपत्र केलें. श्री. न. चिं. केळकर, गोविंदराव देसाई व मा. वि. उर्फ बापूसाहेब दीक्षित असे तिघे

ट्रस्टी ( विश्वस्त ) झाले. ता. १६ आक्टोबर १९२६ या दिवशीं दसरा असल्यामुळें याच सुमुहूर्तावर इमारतीच्या कार्यास आरंभ झाला.

साडे सहा महिन्यांत इमारतीचें काम पूर्ण झालें. यावेळीं श्री. तात्यासाहेब केळकर दिल्लीस होते. इमारत झाल्याचें त्यांना कळविलें. इतक्या लवकर इमारत बांधून तयार झाल्याचें वाचून त्यांना आश्चर्य वाटलें व आनंदही झाला. गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर हे या सुमारास कलकत्त्यास होते. इमारत उघडण्याचा समारंभ गुरुवर्यांच्या अध्यक्षतेखालीं करण्याचें ठरवून तसें जाहीर केलें, व समारंभाची तयारी सुरू झाली.

समारंभाची तारीख ३ एप्रिल १९२७ ही ठरवून त्याप्रमाणें आमंत्रणपत्रिका छापून पुण्यांत व पुण्याबाहेर ठिकठिकाणीं पाठविल्या. ता. १ एप्रिल १९२७ रोजीं गुरूवर्य कलकत्त्याहून पुण्यास आले. पेरू गेटाजवळ ब्राम्हण--कार्यालयाच्या जागेंत त्यांची राहण्याची सर्व सोय केली होती. ता. ३ एप्रिल १९२७ रोजीं सायंकाळी पांच वाजतां समारंभास सुरुवात झाली. आरंभीं संस्थेचे विद्यार्थी ना. वा कोंगेकर व श्री. ह. मेहेंदळे यांनीं गोड स्वरांत ईशस्तवनपर व स्वागतपर पद्य म्हटल्यावर

## गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर अध्यक्षस्थानीं

विराजमान झाले. त्यानंतर संस्था स्थापन झाल्यापासूनचा अहवाल वाचून संस्थेच्या कार्याचा वृत्तांत मी माझ्या भाषणांत सांगितला. गुरुवर्यांच्या हस्तें इमारत खुली करण्यांत आल्यावर गायनाचार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्यातैल चित्राचें अनावरण गुरुवर्यांच्या हस्तेंच केलें. हें तैलचित्र महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सदाशिवराव पिंपळखरे यांनीं तयार केलें. या तैलचित्राची सर्वांनीं फारच प्रशंसा केली.

इमारतीचें अनावरण झाल्यावर गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर यांचें भाषण झाले. त्यांत त्यांनीं स्वर श्रूतिचें विवेचन करून गायनाचा राष्ट्र-

कार्याकडे कसा उपयोग करावा हें सांगितलें. श्री. न. चिं. केळकर यांनीं पंडितजींचे आभार मानले. प्रो. दत्तोपंत पोतदार यांनीं जमलेल्यां मंडळींचे आभार मानल्यावर राष्ट्रगीत होऊन समारंभ संपला. रात्रीं ९॥ वाजतां गुरुवर्यांचें अडीच तास गायन झालें. या कार्यक्रमास श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज, सरदार आबासाहेब मुजुमदार व इतर संगीत–विद्यालयें व गायन–समाज यांचे चालक व विद्यार्थी, त्याचप्रमाणें शहरांतील सर्व प्रसिद्ध गायक हजर होते. कार्यक्रम अत्यंत बहारीचा झाला. पंडितजींचें गायन सुरू झाल्यापासून तो संपेपर्यंत सर्व मंडळी नादब्रम्हांत तल्लीन होऊन गेली होती. ता. ४ एप्रिल १९२७ रोजीं पंडितजी परत कलकत्त्यास गेले. नवीन इमारतींत गायन–वर्गाचें काम सुरू झालें.

श्रीगोपालकृष्णाच्या कृपेनें आम्हांवर आलेलीं सर्व गंडांतरें नाहींशीं होऊन संस्थेची इमारत उभी राहिल्यामुळें संस्थेस कायमचें मूर्त स्वरूप प्राप्त झालें. म्हणून या इमारतींत मुरलीधराऐवजीं कालिया-मर्दन करीत असलेले श्रीकृष्ण चार वर्षांच्या बालस्वरूपांत तयार करून घेतले. कालियाचें स्वरूप पाहून भय वाटतें परंतु कालियाच्या डोकीवर नाचत असलेली भगवंतांची हसतमुख बालमूर्ती अवलोकन करितांच मन व अंतःकरण प्रसन्न होतें. हें भगवंताचें अधिष्ठान असल्या-मुळेंच आम्ही सदोदित निर्भय आहों. पुणें–वेताळ पेठेंतील कारागीर कै. उद्धव नारायण नवगिरे यांनीं ही मूर्ति तयार करून दिल्यामुळें त्यांची आठवण आम्हास कायमची राहिली आहे.

गायन–समाजाची इमारत बांधली त्यावेळीं तेथें वस्ती मुळींच नव्हती. म्हणूनच श्री. तात्यासाहेब केळकर नेहमीं म्हणत कीं, "तुम्ही मारुती-सारखे गांवाबाहेर येऊन राहिला. शहरांत गायन–समाज व संगीत–विद्यालयें आहेत. तीं सोडून तुमच्याकडे इतक्या लांब या ओसाड ठिकाणीं कोण येणार ? " मीं सांगितलें कीं, " हें सर्व चालकावर अवलंबून असतें. चालक मनापासून आपलें कर्तव्य करीत राहील तर कसब्यांतूनदेखील

विद्यार्थी आमचेकडे येतील. मग मध्यवस्तींतून येतील किंवा नाहीं या शंकेस जागाच रहात नाहीं." पुढें थोडयाच दिवसांनीं तात्यासाहेब गायन–समाजाकडे येऊन पाहतात तों आम्हास बोलावयास फुरसत नाहीं इतकी विद्यार्थी–विद्यार्थिनींची गर्दी! कसब्यांतून विद्यार्थी शिकावयास येत असत हें तात्यासाहेबांनीं प्रत्यक्ष पाहिलें! नवीन इमातींत पण ओसाड मैदानांतसुद्धां संस्थेची भरभराट पाहून तात्यासाहेबांना साहाजिकच संतोष झाला. पुढें चार वर्षांत आजुबाजूस चांगलीं वसाहत झाली व नगर–पालिकेनें १९३१ सालीं आमच्या रस्त्यास "गोपाल गायन समाज रस्ता" असें नांव दिलें.

नवीन इमारत बांधीपर्यंत १९२३ सालापासून १९२७ पर्यंत माझ्यावर अनेक संकटें आलीं. या सर्व संकटांना तोंड देऊन प्रतिपक्ष्याशीं झगडत असतां गायन समाजाचे विद्यार्थी अवधूत विश्वनाथ पुजारी, श्रीकृष्ण हरी मेहेंदळे व नारायण वासुदेव कोंगेकर या विद्यार्थ्यांचें मला अत्यंत सहाय्य झालें. विशेषेंकरून श्री. ह. मेहेंदळे व अवधूतराव पुजारी यांनीं गायन-समाजाच्या कार्याचा प्रचार फारच उत्कृष्ट रीतीनें केला. निजामशाही व कर्नाटक प्रांतांत गायन–समाजाची प्रसिद्धि पुजाऱ्यांनींच केली. १९३५ सालापर्यंत श्री. कृष्णराव मेहेंदळे यांनीं गायन-समाजाच्या वर्गाचें काम उत्तम प्रकारें केलें. इतकेंच नाहीं तर गायन-समाजाचे. लोटण्याझाडण्यापासून, पडेल तें काम करण्यास कधींही माघार घेतली नाहीं व कमीपणा मानला नाहीं. श्री. अवधूतराव हे पोष्टखात्यांत नोकर असल्यामुळें त्यांना गायन-समाजाच्या सर्व कार्यक्रमांत भाग घेतां येत नसे. तथापि, नोकरी व संसार संभाळून ते बाकीच्या वेळींहि गायन-समाजांत नेहमीं हजर असत. विशेष प्रसंगीं पोष्टाची रजा घेऊन ते आमच्याबरोबर परगांवींदेखील येत. कृष्णराव मेहेंदळे हे नेहमींच माझ्याबरोबर असत. त्यामुळें मला माझ्या कार्यक्रमांत बरीच विश्रांति मिळे.

१९२४–२५–२६ या वर्षी पुण्यामधें ब्राम्हण–ब्राम्हणेतर प्रकरण बरेंच माजलें. कोल्हापुराहून मराठे लोकांनी पुण्यास यावें व पुण्यांतील

मराठेमंडळींनीं त्यांना सहाय्य करून ब्राम्हणांच्या उखाळ्यापाखाळ्या काढाव्या, हवी तशी निंदा करावी, ब्राम्हणांच्या तरुण मुलींची व बायकांची भर रस्त्यांत टिंगल व टवाळी करावी असे प्रकार सतत दोन तीन वर्षे चालू होते. वेळोवेळीं रस्त्यांत रात्रीं व दिवसा मारामारीचे प्रसंग येत. १९२४ सालीं टिळकस्मारक मंदिराच्या मैदानांत स्वदेशी वस्तूंचें प्रदर्शन भरलें होतें. तें पाहण्यासाठीं प्रदर्शनाचे व्यवस्थापक श्री.घारपुरे यांचें बोलावणें आल्यावरून मी प्रदर्शन पाहण्यासाठीं एक दिवस दुपारीं ४ वाजतां निघालों. बरोबर आमचे विद्यार्थी अवधूतराव पुजारी आले होते. प्रदर्शन पाहून परत गायन—समाजाकडे येण्यास निघालों. यावेळीं गायन—समाज श्री. कृ. रा. साठे कॉंट्रक्टर यांच्या घरी होता हें पूर्वी लिहिलेंच आहे. गणेशोत्सवाचे दिवस. गायन समाजतर्फे मेळा काढलाच होता. प्रदर्शन पाहून आल्याबरोबर जेवण करुन लगेच पुढे मेळा घेऊन बाहेर खासगी व सार्वजनिक कार्यक्रमासाठीं जावयाचे असल्यामुळे मी व पुजारी दोघेही विशेष घाईनें प्रदर्शनाकडून परत येत होतों. वाटेंत दोन मराठे गडी भेटले. आम्हाला पाहून ब्राम्हण जातीची टवाळी करण्यास त्यांनीं सुरुवात केली.

पुण्यातील मोठ्या लोकांचीं व पुढाऱ्यांचीं नांवें घेऊन त्यांना शिव्या देण्यास या गुंडांनीं आरंभ केला.मधून मधून आम्हास उद्देशून ते वेडेवांकडें बोलू लागले. हें लोक आमच्या मागोमाग नव्या विष्णुपर्यंत आले, या ठिकाणी त्यांची आमचीं समक्ष बोलाचाली सुरू झाली. तथापि आम्ही विचार करून गप्प बसलों. पुढें घर जवळच होतें. घरच्या दरवाज्या—जवळ आम्ही सर्व आलों. आम्ही दरवाज्यांत प्रवेश करितांच आमच्या-बरोबर तेही दरवजाजवळ आले व माझा हात धरून "कांरे भटा, आतां कां भ्यालास, घरांत पळतोस होय?" असली भाषा बोलू लागले. त्याचे हे शब्द ऐकतांच मी-कोट टोपी दरवाजांतच काढून टाकली व त्यांचे अंगावर धावून गेलों. एकास उचलून जमिनीवर जोरानें आपटला. यांचें डोकें फुटून कंबरेचीं हाडें सैल झालीं. तो जमिनीवर बेशुद्ध पडला तथापि राग अनावर झाल्यामुळें मी त्याच्या छातीवर बसून बुक्यानें मारूं लागलों.

त्याचा दुसरा साथीदार माझ्यावर धावून आला व लाठीचे एक दोन तडाखे मला देतों न देतो तोंच पुजाऱ्यांनीं त्यास अचानक उचलून एका बाजूस नेलें व त्याला नखशिखांत ठेचून टाकला.

या प्रसंगीं पुजारी माझ्याबरोबर होते म्हणूनच मला माझा बचाव करतां आला, नाहीं तर वेळ मोठी कठीण होती.ही मारामारी चालू असतां रस्त्यानें जाणारीं येणारीं शेकडों माणसे आमच्या भोवती गोळा झाली. मी ज्याला जमिनीवर आपटला त्याचें डोके फुटलें तें रक्त माझ्या अंगावर उडल्यामुळें माझे सर्व कपडे व शरीर रक्तानें लाल झालें होते. दोघेही मराठेगडी जमिनीवर बेशुद्ध होऊन पडले. पोलिसकडे वर्दी गेली पोलिसांनीं सर्व चौकशी करून आमचे पत्ते लिहून घेतले व जखमी झालेल्या त्या दोन इसमांना ससून हॉस्पिटलमध्यें नेलें. पोलिस गेल्यानंतर रक्तानें भरलेले कपडे काढून टाकले, स्नान करून मेळा बाहेर काढण्याच्या तयारीस लागलों. नेहमींप्रमाणें त्या दिवशीं ७॥ वाजतां मेळा बाहेर निघाला व ठरलेले सर्व कार्यक्रम उत्तम रितीनें पार पडले. पुढें चार दिवसांनीं सदर मारामारीसंबंधानें फरासखान्याचें बोलावणें आलें. रावसाहेब बापट हे यावेळीं डि. एस. पी. होते. त्यांनीं मला बरेच प्रश्न विचारले, परंतु मी खरी हकीगत सांगतांच मला जाण्याची मोकळीक मिळाली. त्याबातींत अधिक कांहीं झालें नाहीं.

## ब्राह्मणेतरांचा वाद

याच सुमारास धनवडे नांवाच्या एका मराठ्यानें बावडेकर नांवाच्या एका ब्राम्हणाच्या मुलीवर भर दिवसा रस्त्यांत हात टाकिला. या बाबतींत अधिक प्रसंग घडून येण्यापूर्वी आजूबाजूच्या लोकांनीं तावडतोब जमून सदर मुलीचा बचाव केला. धनवडे हा लोकांच्या हातून सुटून आपल्या राहत्या घरांत दडून राहिला. परंतु पुण्यांतील एक धाडसी व प्रसिद्ध ब्राम्हण मल्ल श्री. सदाशिवराव गोडबोले हे त्याच्या घरांत शिरले व त्यास यथास्थित मारून कुत्र्यासारखा ओढीत घरांतून बाहेर आणला व फरासखान्यांत नेला. पुढें या बाबतींत खटला होऊन आरोपीस शिक्षा झाली. इतकें झालें तरी हें ब्राम्हण–ब्राम्हणेतर प्रकरण मिटण्याचा रंग

दिसेना. कोल्हापूर व पुणें येथील मराठे लोकांनीं गणेशोत्सवांत “ शाहू छत्रपती ” या नांवाचा मेळा काढून पुणें शहरांत ठिकठिकाणीं मारामाऱ्या कराव्या असा प्रकार सतत दोन तीन वर्षे चालू होता. पुणेंकरांना या गोष्टीचा विचार करणें भाग पडलें व या “ शाहू छत्रपती मेळ्याशीं ” टक्कर देण्याची पुणेंकरांनीं तयारी केली. १९२६ सालीं “ शिवछत्रपती ” या नांवाचा मेळा काढला. मेळ्याचा पोषाख, मेळ्यांतील तरुण मंडळीं पदें गाण्याची पद्धती, मेळ्याची शिस्त इत्यादि गोष्टीमुळें हजारों लोक या मेळ्याच्या कार्यक्रमावर खूष होऊन मेळ्याबरोबर भ्रमण करीत. मधून मधून या दोन्हीं मेळ्यांची जेथें जेथें भेट होई तेथें तेथें दोघांचे एकमेकांवर हल्ले होऊन उभय पक्षांतलि लोक जखमी होऊन पडत. एक दिवस मी लष्करी घोड्यावर बसून मेळ्याच्या अग्रभागीं चाललों होतों व सर्व मेळा मागाहून येत होता. हा थाट पाहून तर पुणें·कर फारच खूष झाले. आमची ही तयारी पाहून प्रतिपक्षानें आपल्या मेळ्याबरोबर हत्ती ठेविला. ही सर्व हकीकत कलेक्टरच्या कानीं गेल्यावर त्यानें या दोन्हीं मेळ्यांच्या बंदोबस्तासाठीं लष्करांतील युरोपियन लोक पाठविले. हे लोक गणेशोत्सव संपेपर्यंत रोज रात्रीं या दोन्हीं मेळ्यां-भोंवती घोड्यावर बसून सशस्त्र पहारा करीत.

हा नवीन नमुनेदार मेळा पाहून आदर्शभूत मेळा असा असावा असें लोकांनीं म्हणावें. या नवीन मेळ्यास कोणत्याही बाबतींत दोष ठेवण्यास जागा नव्हती. एकजात विशी उलटलेले ब्राम्हण व मराठे जवान गड्डी, त्यांचा एकजात मर्दानी पोशाख व सर्वांच्या हातांत एकजात दणदणीत भाले—इकडे नजर गेली म्हणजे प्रेक्षकांच्या मनांत अशी कल्पना उत्पन्न होत असे कीं, हे शिवकालीन मराठे वीर पुन्हां स्वर्गांतून खालीं साक्षांत उतरले आहेत ! या मेळ्यांतील मुख्य वैशिष्ट्य हें होतें कीं, त्यांत ब्राम्हण-मराठ्यांचें मधुर मीलन दृग्गोचर होत होतें. मेळ्याचा पुढारी जर क्षत्रिय श्री. नारायणराव झांजले तर मेळ्याचे मुख्य गायक गोपालगायन समाजाचे प्रमुख श्री. गोविंदराव देसाई ( ब्राम्हण ). सदर मेळ्याचीं पदें हृदयस्पर्शी व भावनोद्दीपक असल्यामुळें तीं खड्या सुरांत गात असतांना श्रोत्यांच्या अंतःकरणाचे पडदे फोडून तीराप्रमाणें तीं आंत घुसत होतीं. हा मेळा

ऐकण्यास लोकांची अलोट गर्दी होई. त्यामुळें पोलीसांना बंदोबस्त ठेवण अशक्य होत असें. मेळे काढणारांनीं हा मेळा आपल्या दृष्टीपुढें कित्तेवजा ठेवावा, अशीच या मेळ्याची रचना केली होती.

सदर मेळयामध्यें मी मुख्य गायकाचें काम करून बहुजनसमाजांचीं अंतःकरणें हालवून सोडलीं. जेथें या मेळ्याचा कार्यक्रम असे तेथें कमींत कमी आठ दहा हजार लोकांचा समाज हजर असावयाचाच. या मेळयां· तील

" आधार जगाला नार अनादर तिचा होत अनिवार " व

" ही पाखंडी अवलाद देशाला बुडवूं पाहे "

हीं दोन पदें म्हणण्यास प्रथम बंदी करण्यांत आली होती. तथापि हीं पदें मेळा सुरू झाल्यावर दोन तीन दिवसांतच अनेक वेळीं म्हटलीं गेल्यामुळें त्यांची सर्वत्र फारच प्रशंसा झालेलीं होती. त्यावेळचे डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडंट ऑफ पोलिस रावसाहेब बापट हे स्वतः या मेळयाच्या कार्यक्रमास शेवटचे दोन दिवस येत असत. त्याना सदर पदें एकण्याचीं इच्छा झाल्यामुळें गणेशोत्सवाच्या शेवटच्या दोन्हीं दिवशीं हीं पदें म्हणण्यास परवानगी मिळाली. हिंदु जातीमध्यें उत्पन्न झालेला आपसांतील बेबनाव कमी होऊन पुन्हां ब्राम्हण क्षत्रिय यांचें ऐक्य व्हावे या हेतूनेंच केवळ हा मेळा काढला होता.

पुन्हा हा मेळा लोकाग्रहास्तव १९२९ सालीं काढण्यांत आला. त्यावेळीं माझी प्रकृती बरी नसून मी बाहेरगांवीं गेल्यामुळें या वर्षी माझ्या ठिकाणीं पुजारी यांनीं मुख्य गायकाचें काम केलें. पूर्वीचा अनुभव असल्यामुळें हें कार्य त्यांना उत्तम रीतीनें करतां आलें व हे काम केल्याबद्दल या मेळयातर्फे त्यांचा गौरव झाला. याप्रमाणें जीं जीं लोकहिताचीं सामाजिक कार्यें ( अर्थात आमच्या योग्यतेप्रमाणें जीं आमच्या वाट्यास येत असत तीं ) आम्ही मनापासून करीतच होतों. गायनसमाजाचें असलेलें थोडेसें कर्ज देऊन मोकळे होण्यासाठीं इकडून तिकडून द्रव्य मिळविण्याची खटपट चालूच होती. मी कोठें तरी बाहेरगांवीं दौरा काढण्याच्या विचारांत होतों. वास्तविक प्रकृति अगदीं क्षीण झाली

असल्यामुळें फिरतीवर जाणें अशक्य होतें, पण कर्जमुक्त होण्यासाठीं बाहेरगांवीं जाण्याचा विचार सुरू झाला.

इतक्यांत गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर यांचेकडून पत्र आलें. पुण्यास द्वितीय महाराष्ट्र संगीत परिषद् भरविण्याचा विचार असल्याचें त्यांनीं मला कळविलें. श्री. न. चिं. केळकर यांच्याकडून ही गोष्ट मला समजली होती. पंडितजींच्या पत्राप्रमाणें सदर परिषद् कशा रितीनें भरावयाची याचा विचार करण्यासाठीं पुण्यास आम्ही सभा भरविली. सर्व पक्षांच्या व पंथाच्या गायकांनीं व वादनाचार्यांनीं येऊन ही परिषद् साजरी करावी असें ठरलें. परिषदेचे अध्यक्ष श्री. तात्यासाहेब केळकर, स्वागताध्यक्ष गीतावाचस्पती सदाशिवशास्त्री भिडे, मुख्य चिटणीस श्री. गोविंदराव देसाई व दुय्यम चिटणीस श्री. विनायकराव पटवर्धन व धोंडोपंत पलुस्कर अशी घटना होऊन ती जाहीर करण्यांत आली. ही परिषद् पुणें येथील विजयानंद नाटक–गृहांत भरली होती. पुणे येथें १९२८ च्या ५ जुलैपासून तो. ८ पर्यंत परिषदेचे कार्यक्रम चालू होते. महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब व बंगाल या प्रांतांतून प्रसिद्ध गायनाचार्य व वादनाचार्य आले होते. चारी दिवस दिवसा व्याख्यानाचें व रात्रीं गायन–वादनाचे जलसे होत असत. स्वर लेखन–पद्धती, श्रुतीविचार, रागविचार व परिभाषा इत्यादीं विषयावर विद्वानांची उत्तम प्रकारें चर्चा झाली. गायनाच्या चिजांची भाषा महाराष्ट्रांत कोणती असावी यासंबंधीं भाषण करून परिषदेच्या दुसऱ्या दिवशीं परिषदेपुढें मीं खालील ठराव मांडला.

“ महाराष्ट्रामध्यें शास्त्रीय गायनांत धृपद, धमार, ख्याल व टप्पा या सारख्या ज्या चिजा प्रतिष्ठित म्हणून मानल्या जातात, त्या चिजांची भाषा हल्ली हिंदी किंवा पंजाबी असते. ती बदलून चिजांचे स्वर, त्यांतील जागा व त्यांतील सौंदर्यस्थानें आणि इतर गुण कायम ठेवून मराठी भाषेंत तसेंच छंद निर्माण करावे. सर्व सांप्रदायिक गवयांनीं मराठी कवींचें साहाय्य घेऊन आपल्या घराण्यांतील प्रतिष्ठित चिजांप्रमाणेंच मराठींत कवित्व तयार करवून घ्यावें व मराठी भाषेंत निर्माण होणाऱ्या या चिजा बैठकींत गाण्याची परंपरा सुरू करण्याची काळजी घ्यावी. ”

या ठरावास गीतावाचस्पती भिडेशास्त्री, व पलुस्कर यांनीं अनुमोदन दिलें. मास्तर कृष्णराव, श्री. गोविंदराव टेंबे, श्री. तांबेशास्त्री. श्री. कृष्णराव मुळे इत्यादी गृहस्थांनीं अनुकूल भाषणें केलीं. त्यातलि एक दोन जणांनीं इतकेंच सुचविले कीं, हिंदी चिजा आजच्या आज काढून टाकतां यावयाच्या नाहीत, परंतु कालांतरानें सर्व गोष्टी होतील व व्हाव्यात.

या परिषदेची घटना, उद्देश व इतर सर्व कार्यक्रमें यासंबंधीं प्रत्यक्ष खुलासा गायन समाजाच्या दप्तरांत वर्तमान–पत्रांची कात्रणें आहेत, तीं पाहिलीं असतां होईल. या परिषदेचें जलसे व इतर कार्यक्रमांचें उत्पन्न १०५३–४–० रु. झालें. ते सर्व नाशिक येथील “ श्रीराम नाम आधार आश्रमास दिलें. ”

या परिषदेमार्फत होणाऱ्या जलशावरील करमणुकीचा कर माफ करण्याबद्दल मी कलेक्टरकडे अर्ज केला होता त्याप्रमाणें कलेक्टरनें माझ्या नांवावर तशी परवानगी पाठविली होती. परंतु परिषदेंचे दुसरे सेक्रेटरी श्री. धुंडिराज गोपाळ पलुस्कर यांच्याकडे जमाखर्चाचें काम होतें. तो जमाखर्च सदर पलुस्कर यांच्याकडून न आल्यामुळें जलशावरील कर माफ होण्याची कलेक्टरनें दिलेली परवानगी रद्द केली व तिकिटांचा हिशेब करून त्यांजवर बसणारा कर २८१ रु. २ आ. चार दिवसांच्या आंत आणून दिला नाहीं तर कायदेशीर इलाज करून सदर कराची रक्कम तुमच्याकडून वसूल करूं अशी कलेक्टरनें मला नोटीस दिली. या बाबतींत कलेक्टरशीं बराच पत्रव्यवहार होऊन अखेर कलेक्टरनें खरी परिस्थिती समजून घेऊन आमच्याकडून कर वसूल करण्याचें राहित केलें.

श्री. तात्यासाहेब केळकर परिषदेचे अध्यक्ष व मी मुख्य सेक्रेटरी असें असल्यामुळें माझीं पत्रें कलेक्टरकडे गेल्यावर कलेक्टरसाहेबांनीं श्री. केळकर यांजकडे या सर्व गोष्टींची पुन्हां एकवार चौकशी केली असें समजले. मीं कलेक्टला लिहिले तेंच श्री. केळकरांनींही लिहिले. या कामीं तात्यासाहेबांची मदत झाल्यामुळें हा वाद लवकरच मिटला.

अशा रीतीनें निष्कारण द्रव्याच्या अडचणीं आणणारा हा मोठा प्रसंग टळला. त्यामुळें मन स्वस्थ होऊन नेहमींचें संस्थेचें काम व इतर उद्योग करण्यांस हुशारी वाटूं लागली. एकाद्या माठ्या जिवावरच्या दुखण्यांतून मनुष्य बरा होऊन पुन्हां पूर्ववत तो हिंडू–फिरूं लागला म्हणजे जसें त्याला समाधान वाटतें, त्याचप्रमाणें या वेळीं माझी स्थिति झाली. कोठें तरी बाहेरगांवीं महिना दोन महिने विश्रांतीकरितां जावें असा विचार वेळोवेळीं मनांत येई. परंतु गायन, समाजाच्या वर्गाचें काम एकटे कृष्णराव मेहेंदळेच करीत होते. दुसरा कोणी जबाबदार मनुष्य या ठिकाणीं नसल्यामुळें बाहेरगांवीं जाणें अशक्य झालें. यावेळीं मी व मेहेंदळे या दोघावरच कामाचा सर्व भार होता. श्री. कृष्णराव हें संस्थेचीं कामें वेळेवर करीत त्यामुळें संस्थेच्या कामाची विशेष काळजी वाटत नसे. अशा प्रकारें काम चालू असतां गायन-समाजावर एक नवीनच आपत्ति येऊन ठेपली.

## मुसलमानांचा हल्ला

गुरुवार ता. १४ फेब्रुवारी १९२९ रोजीं रात्रीं साडेअकराच्या सुमारास गायन-समाजावर एकाएकीं दगडांचा मारा सुरू झाला. आजूबाजूच्या घरावर दगड फेंकले. जात होते. आळींतील सर्व मंडळीं जागी होऊन आपआपल्या ठिकाणीं जो तो घाबरून गेला. कोणी कोणास हाक मारीना, कोणी घराबाहेर येईना. घरोघरीं लोक स्तब्ध होऊन विचार करूं लागले. कोणासही या गोष्टीचा उलगडा होईना. संपत्ती लुटण्याकरितां दरोडा आला असावा अशी सर्वांची कल्पना झाली. मी गायन-समाजाच्या कचेरींत झोपलों होतों. केवळ जागेच्या (इमारत,गायन समाजाचें सामान, गोपालकृष्णाची मूर्ति इत्यादी ) संरक्षणासाठीं मला रात्री या ठिकाणीं वस्ती ठेवावी लागे. गायन–समाजाच्या इमारतींत नित्य दोन तीन माणसांची वस्तीं रात्रंदिवस असली पाहिजे, त्याखेरीज भागणार नाहीं हें जाणूनच आम्हीं फक्त जरूर तो पहारा याठिकाणी ठेवीत होतो. पूर्वी या जागेंत मुसलमानांचा अड्डा होता हें पूर्वीं लिहिलेंच

आहे. हा मुसलमानांचा अड्डा मोडण्यासाठीं श्री. जगन्नाथमहाराज यांचे प्रयत्न एकसारखे चालू होते.

या ठिकाणीं एक फकीर कित्येक वर्षे रहात होता व तो वहिवाटीचा हक्कही सांगे. परंतु जगन्नाथमहाराजांनी हरप्रयत्न करून त्या फकीरास या जागेतून कढून टाकिला.तथापि मुसलमानांची वस्ती या ठिकाणाहून कायमची हालेल असें दिसेना पुढें लवकरच ही जागा आमच्या ताब्यांत आली. ता. १६ आक्टोंबर १९२६ विजया दशमीच्या दिवशीं इमारत बांधण्यांस सुरवात केली. इमारतीचे काम चालू असतां इमारतीचा चौथरा भिंती, रात्रीं तेथें वस्ती नाहीं हें पाहून मुसलमानांनीं एक दोन वेळां पाडण्याचा प्रयत्न केला, परंतु तो फारसा साधला नाहीं.

पुढें इमारत तयार होऊन आमचें काम तेथें सुरू झाल्यावर वेळीं-अवेळीं, रात्रीं-मध्यरात्रीं पठाण व मुसलमान लोक गायन-समाजाच्या हद्दींत जबरदस्तीनें घुसून मला मारण्याची धमकी देऊं लागले. पूर्वेच्या बाजूस असलेली विहीर व पश्चिमेस पीर हीं ठिकाणें मुसलमानांचीं असल्यामुळें गायन-समाज ह्याकात्रींत सांपडल्यासारखा झाला. " हें ठिकाण सोडून तुम्ही लवकर येथून निघून जा, नाहीं तर एक दिवस तुमचा खून होईल. " अशी निनांवी पत्रें मुसलमानांकडून येऊं लागलीं.

धमकी देऊन अगर दंडेली करून मी ऐकत नाहीं असें पाहिल्यावर केवळ कांहीं तरी तंटा उपस्थित करून मारामारीचा प्रसंग आणण्याची खटपट मुसलमान करूं लागले. भर दिवसा—दुपारीं बारा एक वाजतां जवळच्या पिरासमोर कोंबडी, बोकड, बकरीं इत्यादी प्राण्यांचा वध मुसलमानाकडून होऊं लागला. एक दिवस तर पिरापुढें खोंड ( गोऱ्हा ) आणून उभा केला व १५—२० मिनिटांत त्याचा वध होणार इतक्यांत मी गायन-समाजांत आलों. शेजारीं पिराजवळ काय गडबड आहे हें पाहण्यासाठीं गेलों तों त्या

## गोऱ्ह्याच्या मानेवर सुरी

ठेवण्याच्या तयारींत मुसलमान होते. माझा व मुसलमानांचा वाद सुरू झाला. मी म्हणे कीं, तुम्हांस ही गोष्ट येथें मी करूं देणार नाहीं.

मुसलमान म्हणूं लागले कीं, गो-हा तर मारूंच मारूं पण त्याबरोबर तुमचाही बळी पिरापुढे देऊं ! असा जोराचा वादविवाद चाललेला ऐकून शेजारीं रा. लिमये यांच्या घरांतून श्री. सदाशिवराव गोडबोले लगेच पिराजवळ येऊन दाखल झाले. एकास दोन जवान मिळालेले पाहून मुसलमानभाईनीं माघार घेतली व आपल्या सर्व साहित्यानिशीं मुकाट्यानें निघून गेले.

पूर्वीं एक फकीर या ठिकाणीं रहात होता त्याचा उल्लेख वर केलेलाच आहे. हाच फकीर पुन्हा वर्षानंतर एक दिवस दुपारीं एक वाजण्याचा सुमारास—गायन समाजाच्या तारेच्या कुंपणावरून उडी मारून आंत आला व शेजारच्या विहिरींत उतरला. विहिरींत कोणी तरी परकी मनुष्य उतरल्याची चाहूल मला लागतांच मी विहिरी-कडे गेलों. पाहतों तों पूर्वींचा फकीर ! विहिरींत उतरून त्याचा कान धरून त्यास वर आणले. गायन—समाजाच्या पत्र्याच्या मंडपांतील एका खांबास त्याला दोरीनें बांधून खूप मार दिला. पेरू गेटावरून टेलिफोन करून फरासखान्याकडे वर्दी दिली, श्री. रगटे नांवाचे जमादार आले व त्या फकीरास अटक करून घेऊन गेले. केलेल्या अपराधाची फकीरानें क्षमा मागतांच कांहीं अटीवर फरासखान्यांतून त्याची मुक्तता झाली. या फकिरास यथास्थित मारून शिवाय फरासखान्यांत नेऊन अडकविल्यामुळें पुण्यांतील मुसलमानांचा आमच्यावर अत्यंत रोष झाला. बाबू नालबंद नांवाच्या मुसलमानानें या बाबतींत कांहीं दिवस मन घालून आम्हांस धाक दाखविण्यास सुरवात केली. त्याचें व माझे अनेक वेळ खटके उडाल्यामुळें चुरस पडली. मला स्वतःला शारिरिक इजा करण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु मी त्या गोष्टी केव्हां ही सहन करण्यास तयार आहे हें पाहून हा नालबंद आपोआप शांत झाला. तथापि शेवटचा उपाय म्हणून वर लिहिल्याप्रमाणें मुसलमान व पठाण यांनीं मिळून गायन समाजावर हल्ला केला. आजूबाजूच्या घरांतील लोक कंदील व लाठ्या घेऊन रस्त्यावर ताबडतोब जमा झाल्यामुळें मुस-लमानांना पळ काढावा लागला.

## कार्य-निवृत्तीचा मानस

अशा रीतिनें घरगुती व सार्वजनिक अडचणी, अवास्तव निंदा, नसते जनापवाद इत्यादि गोष्टींमुळें मन अतिशय नाराज झालें. संस्थेचें काम कोणाकडे तरी देऊन अन्य ठिकाणीं निघून जावें असें वाटून त्यावेळीं असलेल्या विद्यार्थ्यांना एक दिवस एकत्र जवमन गायन-समाजाचें काम चालविण्यास कोणी तयार असल्यास त्यानें तें चालवावें व मला कायमची रजा द्यावी असें सांगितलें. श्री. अ. वि. पुजारी, ना. वा. कोगेकर, वा. ना. पावळकर व श्री. ह. मेहेंदळे या चौघांनीं काम करण्याचें ठरविलें. परंतु ती गोष्ट प्रत्यक्ष अमलांत येणें विशेष कठीण आहे असें त्यांचें त्यांनाच वाटूं लागल्यामुळें जो तो आपआपल्या सवडीप्रमाणें येऊन संस्थेच्या कार्यक्रमांत भाग घेत असे इतकेंच. फक्त चि. मेहेंदळे यांनींच संस्थेच्या कार्याचा भार१९३४साल अखेरपर्यंत अंगावर घेऊन तो चांगल्या रीतीनें पार पाडून दाखविला. संस्थेचें काम सोडून कायम निघून जाणें अशक्य आहे असें पाहून मी मुकाट्यानें पूर्ववत् उद्योगास सुरवात केली.


१९३० सालीं गाण्याचें कार्यक्रम स्वीकारून कोल्हापूर, निपाणी, चिकोडी, सौंदलगे इत्यादि ठिकाणीं फिरतीवर गेलों. या फिरतींतील गाण्याचे सर्व कार्यक्रम यशस्वी होऊन संस्थेस चांगली मदत मिळाली. या फिरतीवर असतांना मी मधून मधून पुण्यास येत असें. कांहीं दिवस फिरती व कांहीं दिवस पुण्यास मुक्काम अशा स्थितींत १९३० साल संपलें. फिरती संपून १९३० साल अखेर पुण्यास येऊन दोन तीन महिने विश्रांति घेतली. १९३१ च्या आगष्टमध्यें गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर हे मिरज मुक्कामीं वारल्याचें श्री धोंडोपंत पलुस्कर यांनीं कळविलें. लगेच ता. २६।८।३१ रोजीं टिळकस्मारक मंदिरांत पंडितजींच्या निधनाबद्दल श्री. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं गोपालगायनसमाजातर्फे जाहीर सभा भरविली. पुण्यांतील सर्व गायनसमाज व संगीतविद्यालयांचे प्रतिनिधी या सभेस हजर होते. त्यानंतर पुन्हा कोठें तरी बाहेर जावे असा विचार करीत होतो. इतक्यांत ता. २०।४।३२

रोजीं कोल्हापुराहून आमचे गुरुबंधु श्री. वामनराव पाध्ये—संगीतप्रवीण यांचें पत्र आले. गांधर्व महाविद्यालयातर्फे महाराष्ट्र तृतीय संगित परिषद कोल्हापूर येथें ता. २४ व २५ मे १९३२ रोजीं भरविण्याचे ठरले आहे, सबब सर्व अडचणी बाजूस ठेवून परिषदेंस हजर झालेच पाहिजें असें त्यांनी कळविलें. पत्र अत्यंत जरूरीचें व अगत्याचे त्याचप्रमाणें कोल्हापूरांस वामनरावांना उलट पक्षाचा जोराचा विरोध या सर्व गोष्टी ध्यानांतघेऊन व वामनरावांच्या लिहिण्यांचा रोख लक्षांत आणून कोल्हापुरांस गेलों. पॅलेस थिएटरमध्यें परिषदेचें कार्य चालू होतें. कोल्हा-पूरचे क्षात्र जगद्गुरु परिषदेंस अध्यक्ष होते. दिवसा भाषणें व रात्रीं गायन वादनाचे जलसे यांची नुसती झोड उडाली. माझा गाण्याचा कार्यक्रम होताच मी पुण्यास परत येण्यास निघालो परंतु इतर गुरु—बंधुच्या आग्रहास्तव दोन दिवस अधिक रहावे लागले व गाण्याचा दुसरा कार्यक्रम मला करावा लागला. विनायकराव पटवर्धन, नारायणराव व्यास वामनरावं पाध्यें,मी व इतर सर्व गुरुबंधू एकत्र जमल्यामुळें परिषद् सर्व प्रकारे यशस्वी झाली. परिषदेंचे कार्य संपतांच मीं पुण्यास परत आलों.

पंडितजी वारल्यांनंतर अहमदाबाद येथें सर्व शिष्यांचे प्रथम सम्मेलन भरले.प्रा.शंकरराव व नारायणराव व्यास यांच्या विशेष आग्रहामुळें या संमेलनास मी गेलों होतों. अहमदाबाद येथें आमच्या गाण्याचे चार जलसे झाले. संमेलनाचे कार्यक्रम संपवून पुण्यास आल्यावर थोड्याच दिवसांनीं एक अनेपाक्षित गोष्ट घडून आली.

## दीक्षा—प्रकरण

आमचे गुरुबंधु श्री. विनायकराव पटवर्धन संगीत—प्रवीण, यांनीं गायनाचार्य रामकृष्णबुवा वझे यांचें शिष्यत्व मान्य केल्याचें वर्तमान सकाळ, ज्ञानप्रकाश इत्यादीं वर्तमानपत्रांतून जाहीर झालें. तथापि मी तें पाहिलें नव्हतें. ता. २५-१०-३२ रोजीं श्री. धोंडोपंत पलुस्कर यांचें लाहोरहून जोड-कार्ड आलें. एकंदर मजकूर वाचून चकित झालो. कारण मी पुण्यांत असून मला या गोष्टीचा पत्ता नाहीं आणि लाहोरहून श्री.



पंडितजींच्या शिष्यांचें अहमदाबाद येथील संमेलन. ( १९३१ )



गायन समाजांतील गानकुशल विद्यार्थी-विद्यार्थिनी.

पलुस्कर यांनीं पत्रद्वारें ही हकीकत आम्हास कळविल्यावर मला या गोष्टींची खुलासेवर माहिती मिळाली.तथापि मी या बाबतींत कांहीं नबोलतां अगदीं स्वस्थ बसलो होतों.परंतु आमचे गुरु बंधु प्रो.नारायणराव खरे,शंकरराव व्यास वामनराव पाध्ये व इतर अनेक थोर लोक यांकडून या गोष्टीसंबंधानें माझ्याकडे एकसारखी चौकशी सुरू झाली. पलुस्करांचे पत्र आल्यावर या प्रकरणाची मुकाट्यानें चौकशी केली व खरी हकीकत समजतांच पलुस्कर, व्यास, पाध्यें व खरे या सर्वांना घडलेली हकीगत् कळविली. त्यानंतर गीता धर्ममंडळाचे चालक श्रीं.सदाशिवशास्त्री मिडे एक दिवस सायं-काळीं आमच्या गायन–समाजात आले व या दॉक्षा–प्रकरणाबद्दल अति-शय रागानें व खेदानें बोलले. या बाबतींत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेला मजकूरही त्यानी मजपुढें टाकला. सकाळ ता. १०-१०-३२ व ज्ञानप्रकाश ता. १०-१२-३२ चीं कात्रणे पाहून व मजकूर वाचून मलाहि वाईट वाटलें. मी स्वतः बरेवाईट असें कांहींच बोललों नाहीं. तथापि या बाबतींत मी लोकाशीं कांहीं तरी कमी अधिक बोलत असे-ल्याची शंका लोकामध्यें फैलावली असल्याचे दिसूं लागलें. हीं शंका अगदीं निष्कारण आली हें जरी खरें तरी विनायकरावांच्यापूर्वी बारा वर्षे पुण्यांत माझे राहणें असून पुण्यातील सर्व संगीत–विद्यालयें व गायन-समाज यांच्याशीं तात्विक विरोध असला तरी एरव्ही मी सर्वांशीं मिळूनच वागत आलों. अर्थात वझेबुवांचे शिष्यत्व पटवर्धन यांनी मान्य केल्याची चर्चा करणारी माणसें मजकडे इतर कामासाठीं कां होईना पण वारंवार येत असत, आणि या बाबतींत आमच्या इतर सर्व गुरु-बंधूंचा पत्रव्यवहार एकसारखा चालू होता ही गोष्ट विनायकराव यांना कळलेली होती. या प्रकरणामुळें मी त्यांच्याविरुद्ध लोकांना चिथावून देत आहे अशी शंका त्यांना सुद्धां येणें साहजिक होते. श्री. धोंडोपंत पलुस्कर व इतर गुरुबंधु आणि स्नेही यांचीं आलेलीं पत्रें आमच्याकडे आहेत तीं पाहिलीं म्हणजे माझ्याबद्दल झालेला गैरसमज आपोआप दूर होईल यापेक्षा अधिक लिहिण्याचें कारण नाहीं.

## महाराष्ट्र–संगीताचा प्रचार

गायक कसा असावा, संगीतांतील नवमतवाद, धन्य ते गायनी कळा, संगीताची महती, आधुनिक शाहिरास सूचना, गायन व आरोग्य, राष्ट्रगीताची नवी चाल, कीर्तन–पाठशाळेची आवश्यकता, पोवाड्याचे शिक्षण, महाराष्ट्र संगीत इत्यादि विषयांवर मीं लेख लिहिले. गायन, भजन, प्रवचन, कीर्तन, व्याख्यान इत्यादि कार्यक्रम बहारीचे व उठावदार होत असत. लेखन, प्रवचन अगर व्याख्यानामधें संस्कृत, हिंदी व इंग्रजी भाषेतील उतारे व म्हणी पुष्कळच वापरण्यांत आल्यामुळें, माझी संगीत कला व बौद्धिक शिक्षण यांचा अभ्यास फार मोठा असावा असा लोकांचा समज झाला आहे. कलेक्टर व गव्हर्नर यांचेशीं झालेला पत्रव्यवहार व विशेष प्रसंगी कोर्टांत गेल्यावेळीं न्यायाधिशाशीं इंग्रजी भाषेंत केलेलें संभाषण या गोष्टी ज्यांनीं प्रत्यक्ष पाहिल्या आहेत त्यापैकीं कित्येकानीं मला विनोदानें एम्. ए. ची पदवी दिली. पण मॅट्रिकच्या मंडपांत जाण्यापूर्वीच मला शाळेस रामराम ठोकावा लागला हे पूर्वीं लिहिलेंच आहे. सरकारच्या विश्वविद्यालयीन पदवीची मला केव्हांही जरूरी वाटली नाहीं. केवळ ज्ञानार्जन म्हणून भाषा कला व विद्या यांचा अभ्यास अवश्य केला पाहिजे असें मला नेहमींच वाटतें व त्यास अनुसरून वर लिहिलेल्या सर्व विषयांचा मीं जरूर तेवढा अभ्यास केला ही गोष्ट खरी; पण एकादी पदवी देऊन गौरव करण्या इतका कोणत्याच विषयाचा अभ्यास मीं केला नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे. अर्थात् विद्वत्ता नाहीं, तथापि थोडी बुद्धिमत्ता, समयसूचकता व सभाधीटपणा या गुणत्रयीमुळे माझे आजपर्यंतचे सर्व कार्यक्रम यशस्वी होत गेले.

'महाराष्ट्र संगीत' या विषयावर मुंबईचे श्री. कृष्णराव मुळे यांनीं १९२६ सालीं एक दोन लेख लिहिलें. त्यांत ज्यांचा या विषयाशीं खरा व निकट संबंध आला नाहीं त्यांचा उल्लेख श्री. मुळें यांनी केला. परंतु महाराष्ट्र संगीताचा खरा प्रचार ज्यांनीं केला त्या पंडित विष्णु दिगंबरांचा नाम-

निर्देशही केला नाहीं. रा. मुळे यांचे लेख केसरींत येते होते. त्यावेळीं केसरीचे संपादक श्री. तात्यासाहेब केळकर होते. एक दिवस रस्त्यांत सहज श्री. तात्यासाहेब केळकर यांची गांठ पडली असतां "मुळ्यांचे केसरींतील लेख पाहिलेत कां ?" असा मला त्यांनीं प्रश्न केला. मीं हो म्हणून सांगितलें. "मग तुम्ही कांहीं लिहिणार आहात कीं नाहीं ?" असा दुसरा प्रश्न केल्यावर माझा लेख तयार आहे असे मी सांगितलें. "द्या तर तुमचा लेख पाठवून लगेच प्रसिद्ध करितो" असे केळकर यांनीं सांगताच लगेच मी माझा लेख त्यांच्याकडे पाठविला तो त्यांनीं ता. २ मार्च १९२६ च्या केसरीत प्रसिद्ध केला.

दुसऱ्या लेखांत भगवद्गीता, तुकाराम, रामदास, नामदेव, एकनाथ इत्यादि महाराष्ट्रीय संतांच्या अभंगांचे जलसे करून अखिल महाराष्ट्रांत पंडित विष्णु दिगंबर यांनीं महाराष्ट्र संगीताचा प्रचार सर्वांपेक्षां अधिक कसा केला हे मीं सिद्धकेलें. परंतु माझा दुसरा लेख केसरीच्या संपादकांनी प्रसिद्ध केला नाहीं.पंडित विष्णु दिगंबर यांचा उल्लेख करण्याचा राहिला त्याबद्दल रा. मुळें यांनीं पुढील एका लेखांत दिलगिरी प्रदर्शित केल्यामुळें मीहि त्या बाबतीत पुन्हां लिहिण्याचें रहित केलें. पुढे हें प्रकरण पुन्हा १९२८ सालच्या संगीत परिषदेंत पुणें मुक्कामी उपस्थित झाले. या परिषदेची हकीगत यापूर्वी दिली आहे.

महाराष्ट्रांत मराठी पदे म्हणण्याचा परिपाठ महाराष्ट्रीय गायकांनीं पाडला पाहिजे असा ठराव मी मांडला तो पुण्यांतील व परगांवाहून आलेल्या सर्व गायकानी मान्य केला. असें असतां महाराष्ट्र संगीताचे प्रचारक पुन्हा पुढें येऊं लागले. रेडा दूध देत नाहीं हे जरी ठाऊक; तरी मोठी माणसें रेडा दूध देतो असें म्हणतात म्हणून केवळ मोठ्या माणसांच्या शब्दाकरितां तरी रेड्याचे दूध काढण्याचा आविर्भाव आणावां लागतो तसाच प्रकार महाराष्ट्र संगीताच्या प्रचाराच्या बाबतीत झाला असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें.यासंबंधीं श्री.तळाशीकर यांचा आक्टोबर १९३१च्या

परशुरामभाऊ कॉलेज त्रैमासिकांतील लेख, एकलव्य यांचा ता. १८ जून चा १९३२ वसुंधरामधील लेख, श्री. गोविंदराव टेंबे, एकलव्य व तळाशीकर यांचे रत्नाकर १९३२–३३ मधील लेख व वैयक्तिक खुलासा हे लिखाण वाचलें म्हणजे महाराष्ट्र संगीत हा एक थट्टेचा विषय होऊन बसला होता असेंच दिसून येईल. अशी या विषयाची चर्चा चालूं असतां १९३५ साल उगवलें. महाराष्ट्र संगीताचा प्रचार पूर्वीपासून चालत आला व तो चालूच होता. त्यांत व्याख्यानांनी किंवा लेखांनीं अधिक कांहींच भर पडली नाहीं.

उलट विद्यमान गायकांचीं मनें एकमेकाबद्दल जास्त बिघडत चालली आणि त्याचे पर्यवसान परस्परांची निंदा व थट्टा यांत होऊं लागले. अशा स्थितींत या गोष्टीस आळा बसणे कठीण दिसत होते. तथापि प्रयत्न करून पहावा असे वाटल्यावरून ता. १९ जानेवारी १९३५ च्या ज्ञानप्रकाशांत महाराष्ट्र संगीत अथवा संगीताचें मराठी करण, या सदराखालीं मी पुन्हा एक लेख प्रसिद्ध केला. त्यानंतर हा वाद बराचसा कमी झाला. तथापि या विषयाची चर्चा चालू असून मधून मधून केव्हां तरी त्याला थोडी चालना मिळते पण त्याला फारसें महत्व दिलें जात नाहीं. आतां तर हिंदी भाषा ही राष्ट्रभाषा झाली असल्यामुळें महाराष्ट्र संगीताच्या प्रचारकांना स्वस्थ बसणे भाग आहे.



## प्रकरण ७ वें

# व्यावहारिक अडचणी

——:०:——

शाहिरी जग जागे करण्याकरितां ऐतिहासिक पोवाड्यास नवीन वळण लाविल्यामुळें पोवाड्याचे कार्यक्रम आकर्षक होऊन अखिल महाराष्ट्र कसा जागृत झाला याची साद्यंत हकीगत यापूर्वी दिलीच आहे. माझी पोवाडे म्हणण्याची पद्धती सर्व मान्य झाल्यामुळें महाराष्ट्रांतील अनेक शाहीर आपलीं कवित्वें मजकडे पाठवूं लागले. जें कवित्व मला पसंत पडेल तें रंगभूमिवर लोकापुढें मी म्हणून दाखवीत असे. सातारा जिल्ह्यांत खेड म्हणून कृष्णानदीच्या काठीं एक लहानसा गांव आहे. तेथील रहिवासी रा. रामचंद्र शंकर दळवी या नांवांचे एक कवी एक दिवस मजकडे आले. त्यांनीं आपलें सर्व कवित्व मला दाखवून शिवजयंतीस पुण्यांतील शिवाजी–मंदिरांत स्वतः कार्यक्रम करण्याची इच्छा प्रगट केली. मी त्यांना शिवजयंती उत्सवाच्या चिटणीसाकडे घेऊन गेलों. त्यांचा कार्यक्रम ठरला. १९२५ सालीं ते आपली सर्व साथ घेऊन शिवजयंतीस शिवाजी–मंदिरांत आले. त्यांनीं नमन म्हणण्यास सुरुवात केली तोंच लोकांनीं गडबड करण्यास सुरवात केली. पोवाड्याचा कार्यक्रम ऐकूनच घेतला नाहीं. दगड फेकून व दंगा करून लोकांनीं त्यांना रंगभूमीवरून खाली उतरण्यास लाविले व तो कार्यक्रम दहापंधरा मिनिटांतच बंद करावा लागला. आपले पोवाडे म्हणणें लोकांना आवडत नाहीं व आवडणारही नाहीं अशी या गृहस्थांची खात्री झाल्यामुळें

आपलीं सगळीं काव्यें घेऊन तें मजकडे आले व तीं काव्यें लोकापुढें म्हणून चोहोकडे त्याचा प्रसार करण्याबद्दल मला त्यांनीं विनंती केली.

मी त्यांच्या इच्छेप्रमाणें ते कार्य करण्याचे ठरवून त्यांच्या काव्यापैकीं मला पसंत पडतील तीं काव्यें तालस्वरांत बसवून तयार केलीं. "शिवाजी महाराज अवतारी कसे" हें काव्य मी प्रथम शिवाजी–मंदिरांत म्हटलें व तेथून पुढें ग्वालेर, मुंबई, रायगड, कोल्हापूर कर्नाटक प्रांत इत्यादि ठिकाणीं त्यांचीं सर्व काव्यें मी म्हणत असें. सर्व महाराष्ट्रभर तीं काव्यें लोकांस पसंत पडलेली पाहून तीं पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध करावीं असें माझ्या मनांत आलें व त्याप्रमाणें मी रा. दळवी याना विचारिलें. प्रथम जितक्या प्रती छापाल त्याच्या निम्याप्रती आम्हास द्याव्या असे त्यांनीं सांगितलें व छापण्याचा हक्क ता. ८।११।२७ रोजीं श्लोकरूपानें पोष्टकार्डावर लिहून पाठविला, तो असाः—

**गोविंदराया तव मैत्रि खाशी ॥**
**बारा पोवाडे शिवगुण–राशी ।**
**छापूनि जाहीर करावयासी ।**
**स्वहक्क मी आज दिला तुम्हासी ॥**

**रामफंदी उर्फ रामचंद्र शंकर दळवी, खेड**

अशा रीतीनें हक्क मिळाल्यावर दोन हजार प्रती छापून घेतल्या व कराराप्रमाणें दळवी यांस निम्या प्रती दिल्या. मी पोवाड्याचे कार्यक्रम करींत होतों तोंपर्यंत ही पुस्तकें खपत असत. परंतु पुढें कार्यक्रम करण्याचें बंद झाल्यामुळें प्रथम छापलेल्या प्रतींपैकींच बऱ्याच प्रती शिल्लक राहिल्या अर्थात नवीन प्रती छापण्याचें कारण पडलें नाहीं. तथापि दरसाल-पोवाड्याचीं पुस्तकें छापलीं जात असून खपही चांगला होत असला पाहिजे अशी दळवी यांची कल्पना होऊन त्यांनीं मला यासंबंधानें एक दिवस समक्ष व एक वेळ पत्रानें विचारिलें. मी प्रती छापण्याचें रहित केले आहे असें अनेक वेळ त्यांना कळविलें. त्यांना खरे वाटेना. पोवाड्याच्या पुस्तकांची विक्री होत असून आम्हास त्याचा फायदा

चांगला होत आहे, आणि कराराप्रमाणें त्याना आम्हीं प्रती पाठवीत नाहीं असा त्यांचा समज होऊन आम्हांस दिलेला हक्क रद्द करण्यासाठीं १९२८ स्या एप्रिल महिन्यांत वकीलामार्फत त्यांनीं मला नोटीस दिली. त्यांतील मुख्य मजकूर असा कीं, आजपर्यंत आपण पोवाड्याच्या प्रती किती काढल्या याबद्दल आमची खात्री करून त्यांतील निम्या प्रती अगर त्या प्रतींची किंमत आणून द्यावी. नोटीस पोहोचल्यापासून आठ दिवसांत तसें न केल्यास आपणावर कायदेशीर इलाज करूं. त्याचप्रमाणें करारांतील शर्ती आपण मोडल्यामुळें आपणास दिलेला पोवाडे छापण्याचा हक्क या नोटीशीनें रद्द केला आहे.

नोटीशींतील सर्व मजकूर चुकीचा असल्यामुळे आम्ही त्याला उत्तर दिलें नाहीं. अदमासें दोन वर्षे या गोष्टींची खासगी रीतीनें वाटाघाट चालूं होतीं. या सर्व शंका–कुशंकांचें उत्तर तुम्हास कोर्टातच मिळेल इतकाच निरोप आम्ही दळवी यांस पाठविला. पुढें तें प्रकरण तितकेंच राहिले. रा. दळवी आपोआपच शांत झाले. तात्पर्य इतकेंच कीं हा गृहस्थ कित्येक वर्षे शेजाऱ्यास देखील माहीत नव्हता. याचें सर्व काव्य घरीं धूळ खात पडलें होतें. गोपाल गायन समाजाच्या कृपेनें त्यांना व त्यांच्या काव्यास अखिल महाराष्ट्रांत प्रसिद्धी मिळाल्या बरोबर या गृहस्थाला एकाएकीं भलताच गर्व व अहंकार उत्पन्न होऊन, केवळ द्रव्य लोभानें तो माझ्यावर कायदेशीर इलाज करण्यास सयार झाला. “ माझी काव्यें कसेही करून आपण ताब्यांत घ्या व ती जगाच्या पुढें आणा ” असे १९२४ सालीं जो दळवी हात जोडून विनंती करितो, तोच दळवी प्रसिद्धी मिळाल्याबरोबर पूर्वीचें सर्व विसरून एकदम कोर्टात जाण्याची धमकी मला देतो हें पाहून

“ उपकारोऽपि नीचाणामपकाराय जायते ”

या सुभाषिताची साहजिकच आठवण झाली. सर्व प्रकारें प्रोत्साहन देऊन मीच दळवी यांना पुढें आणिलें याचा चोख पुरावा “ शिवाजी महाराजाचे आग्र्यास गमन, अटक आणि सुटका ” या पोवाड्यांत मिळतो.

**" गोविंद शाहीर तरि भले, त्यांनीं चांगले, प्रोत्साहन दिलें**
**म्हणूनी स्फूर्ति कवीला फार**
**वीर रस येथुन पुढें अपार, सिंहगड तान्हाजी घेणार "**

असा या पोवाड्याचा शेवट या कवीनें केलेला आहे.

## संस्थेवर खोटी फिर्याद

पुण्यांतील कॉंट्रॅक्टर श्री. नारायण विष्णु आठवले यांनीं गायन समाजाची इमारत बांधली त्याची हकीगत पूर्वी आलीच आहे. इमारतीचा खर्च ३७०० रुपयापेक्षां अधिक एक पैदेखील व्हावयाचा नाहीं. असें सदर आठवले व आमचे तोंडी ठरून त्याप्रमाणें विश्वासानें सर्व जबाबदारी त्यांच्यावर टाकून मी वेळोवेळीं संस्थेस द्रव्य–साहाय्य मिळविण्याकरितां फिरतीवर जात असें. मी ज्या मुक्कामांत असेन त्या मुक्कामांत मिळालेली सर्व रक्कम कॉंट्रॅक्टरच्या नांवानें लगेच पाठवित असे. अशा रीतीनें चार हजार रुपये रोख त्यांना दिले. वास्तविक करारापेंक्षां ३०० रुपये अधिक दिले गेले. अशा स्थितींत त्यानी होऊन कर्जमुक्त झाल्याची पावती आम्हास द्यावयास पाहिजे होती. परंतु तसें झालें नाहीं. आम्हास पूर्व कराराचे स्मरण न राहिल्यामुळें तें मागतील तसे पैसे आम्ही देतच होतों. त्यांचें मागणे संपत नाहीं असें पाहून एक दिवस मी त्यांच्याकडे खुलासेवार हिशेब मागितला. हिशेब व खर्च झालेल्या रकमेचा नक्की आंकडा आठवले यांजकडून मिळेना. लेखी हिशेब देण्याची ते टाळाटाळ करूं लागले.

हिशेब देण्याची फारच तसदी आम्ही लाविली. अखेर १३९६–४ इतकें येणें आहे असें त्यांनीं सांगितलें. मला ती गोष्ट मान्य होईना. सार्वजनिक संस्था, व त्यांतून संस्थेच्या कार्याबद्दल आठवले यांना अतिशय सहानुभूति असल्यामुळें याकामीं एक पैदेखील फायदा न घेतां हें काम करून द्यावयाचें असा त्यांचा संकल्प. ३७०० रुपयांपेक्षां अधिक खर्च होणेच शक्य नाहीं असें प्रथमच त्यांनीं सांगितलें होतें. या सर्व गोष्टींचें स्मरण होऊन १९२८ सालपर्यंत त्यांना आमच्याकडून किती

रक्कम पोचली याचा हिशेब पाहतां रोख रुपये चार हजार त्यांना पोचल्याचें नक्की ठरलें. माझ्या विस्मरणानें व हिशेबाच्या हयगयीमुळें चुकून करारा-पेक्षां ३०० रुपये या गृहस्थाना अधिक पोचले असूनही केवळ द्रव्य लोभामुळें हा मनुष्य माझ्याशीं अप्रामाणिकपणानें वागतो असें समजतांच आतिशय वाईट वाटलें.

रा. फडके वकील यांच्यामार्फत श्री. आठवले यांनी एक पत्र पाठ-विलें. त्यांचा जबाब मीं दिला तो असा—

पंच ( arbitrator ) नेमून ते देतील तो निकाल मान्य करून आपले रुपये देण्यास आम्ही केव्हां ही तयार आहो. परंतु आपल्याकडून प्रगम रीतसर, खलासेवार, कॉंट्रक्टर लोकांची जशी हिशेब देण्याची पद्धत आहे त्याप्रमाणें, हिशोब यावा अशी विनंती आम्हीं केली, त्याप्रमाणें हिशेब देण्याची मेहेरबांनी व्हावी. आपल्याकडून हिशेब येईल तोच सर्वानुमतें योग्य ठरेल तर मग पुढें इमारतीची निराळी किंमत करण्याचें कारण रहात नाहीं. श्री. आठवले यांजकडून इमारत बांधल्यापासून आता-पावतो अशाप्रकारे हिशेब आम्हांस केव्हांही मिळाले नाहीत. ते मिळावे. त्यानंतर पुढे पंच नेमण्यांचा प्रश्न.

यानंतर त्यांच्या आमच्यामधील पत्रव्यवहार बंद झाला.

नोवेंबर १९२९ मधें श्री. न. चिं. केळकर यांच्या घरीं श्री. आठवले व संस्थेचे विश्वस्त याची सभा घेऊन राहिलेल्याबाकी बद्दल संस्थेची इमारत आठवले यांचेकडे गहाण द्यावी असें श्री. केळकर व श्री. बापू-साहेब दीक्षित या दोघांनीं ठरविले. मी या गोष्टीस संमिति देणें केव्हांही शक्य नव्हतं. देणेंच जेथें नाहीं तेथें गहाणाचा संबंध काय? असा प्रश्न सभेंत मी सर्वांस विचारला व रागानें निघून आलों. आठवले यांनीं बाकीच्या दोघा विश्वस्तांची संमती घेऊन गहाण खतासाठीं स्टँप खरेदी करून गहाण–खत लिहून तयार केले, व ते गहाण–खत घेऊन रा. यशवंतराव उर्फ भाऊराव अठवले माझ्याकडे आले व गहाण खतांवर सही मागितली.

" तुम्ही आलात तसें चालते व्हा, तुम्हास काय करावयाचें असेल ते करा, माझ्याकडे पुन्हा येऊं नका असे मी निक्षून सांगितलें. त्यांनीं श्री. केळकर यांनीं दिलेली चिठ्ठी मला दाखविली. त्यांत गहाण खतावर सही करण्यास हरकत नाहीं असे केळकर यांनीं मला लिहिले होते ! मी चिठ्ठी वाचून तशीच ठेविली व सदर आठवले यांस पुन्हा सांगितले कीं, ' तुम्ही मुकाट्यानें येथून निघून जाव हें बरें.

आठवले निघून गेले. विश्वस्तांना आपलेसे करून घेऊन इमारत गहाण घेण्याची आठवले यांनीं शिकस्त केली परंतु तो डाव साधावा तसा साधला नाहीं. पत्रव्यवहार करून कोठे शब्दांत सापडतो किंवा काय हेही त्यांनी पाहिलें. इतकेंही करून कोणताच हेतु साधत नाहीं असें पाहून अखेर १९३२ च्या नोव्हेंबरमध्यें त्यांनीं फिर्यादिची नोटीस आम्हास दिली.

ता. २ जानेवारी १९३३ ला श्री. चिंतामण अनंत तुळपुळे वकील यांच्याकडे जाऊन मीं हें सर्व प्रकरण त्यांना दाखविलें व लगेच वकीलपत्र देऊन काम सुरू करण्यास सांगितलें, खटला सुरू झाला. या कामीं वादी यशवंत नारायण आठवले व प्रतिवादी श्री. केळकर; बापूसाहेब दीक्षित व मी स्वतः अशा चौघांच्या कैंफियती कोर्टापुढें गेल्या.

## विश्वस्ताचा विश्वासघात !

आठवले यांनीं काढलेली बाकी कर्ज म्हणून मान्य करावी व ती देण्यास आम्ही तयार आहो अशा आशयाचें उत्तर आमच्याकडून मिळावें किंवा रक्कम देतां यत नसेल तर इमारत तावे गहाण म्हणून देण्यास आमची कबूली होती असे तरी आम्ही उत्तरीं कळवावें. इतकेंही होत नसेल तर बाकी राहिलेल्या कर्जाची रक्कम अदमासे १४०० रु. श्री केळकर यांजकडे आम्ही अनामत ठेवावी, दोन कॉंट्रॅक्टर पंच नेमून. त्यांचेकडून इमारतीची किंमत करून घ्यावी व पंच देतील तो निकाल मान्य करावा अशी खटपट पत्रद्वारा त्यांनीं केली. पण त्यांच्या पत्रांचीं उत्तेंरत्यांच्या अपेक्षेप्रमाणें त्यांना मिळाली नाहींत त्यामुळें त्यांची सर्वखटपट व्यर्थ गेली.

त्यानंतर, वर लिहिल्याप्रमाणें हें प्रकरण कोर्टांत गेलें. वादी प्रतिवादीनीं दिलेल्या कैफीयतींपैकी वादी यशवंत नारायण आठवले व प्रतिवादी नंबर १ श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या कैफीयतीवरून प्रतिवादी नंबर २ सरदार विनायकराव माधवराव दीक्षित हे फिर्यादीस ( वादीस ) सामील झाले व संस्थेची इमारत गहाण देण्यास तयार होऊन त्याप्रमाणें गहाणखतावर सही देखील करून दिली. १९२६ च्या आगष्ट महिन्यांत संस्थेच्या सर्व मालमत्तेचे इमारतीसुद्धां विश्वस्तपत्र करून ते सरकारांत नोंद केले. म्हणजे श्री. तात्यासाहेब केळकर व मी या दोघाबरोबर सदर दीक्षित हे तिसरे विश्वस्त म्हणून घेतले. परंतु १९२६ सालीं याना विश्वस्त नेमल्यापासून हे गृहस्थ पुणें सोडून गेले ते कोठे असतात व काय करितात याचा आम्हांस पत्ताच लागेना. एक दिवस देखील हे गायन समाजाकडे कधीं आले नाहींत. संस्थेचें कार्य कसें चालले आहे, आवक जावक काय, इमारतीचे देणें किती आहे, दिलें किती यापैकीं एकाही गोष्टीची यांना माहिती नाहीं. १९२९ च्या नोव्हेंबर महिन्यांत वादी श्री य. ना. आठवले यांनीं त्यांचा तपास काढून मुंबईहून त्यांना कसे तरी धरून आणले व वर लिहिल्याप्रमाणें गहाणखतावर सही घेऊन त्यांना सोडून दिले. विश्वस्तानें विश्वासघात केला व वादीनें आपला कार्यभाग साधून घेतला. वास्तविक या गृहस्थांनीं या देण्याच्या बाबतींत आमच्याकडे थोडी तरी चौकशीं करावयास पाहिजे होती. परंतु वादी व हे दीक्षित यांची कांहीं तरी गुप्त मसलत होऊन हे गृहस्थ संस्थेवर तुळशीपत्र ठेवण्यास तयार झाले! वाहरे विश्वस्त !

श्री. केळकर यांनीं आपल्या कैफीयतीमध्यें स्वतःचा तोल फार चांगल्या तऱ्हेनें संभाळला. परंतु प्रतिवादी नं. २ सरदार दीक्षित यांनीं आपल्या कैफीयतीत स्वतः च्या शहाणपणाचे व मुत्सद्दीगिरीचे केलेले प्रदर्शन पाहिल्यावर या गृहस्थांच्याबद्दल त्रयस्थांची काय समजूत होईल ती होवो! परंतु माझ्या माहितीप्रमाणें, सरदार दीक्षितांच्या घराण्यांत ही एक अजब चीज निर्माण झाली असें मला तरी निदान वाटतें.

संस्थेचा संस्थापक व चालक जर लटपटीत व भित्रा असता तर या विश्वस्तांच्या कारवाईमुळें संस्था गमावून बसला असता. विश्वस्तांच्या या गुप्त कारस्थानास व धमकावणीस मी मुळींच मानले नाहीं. इतकेंच नाहीं तर वादी व विश्वस्ताना मी कोर्टांत लबाड ठरवीन अशी माझी खात्री होती. म्हणूनच तात्यासाहेब केळकर यांनीं जरी इमारत गहाण देण्याबद्दल मला उपदेश केला तथापि केळकरांचें हें सांगणे अत्यंत अनिष्ट असल्यामुळें मी तें मानलें नाहीं. संस्थेचे विश्वस्त या नात्यानें तात्यासाहेबांनीं यावेळीं योग्य विचार केला नाहीं हें पाहून मन अतिशय खट्टू झाले व "आत्मबुद्धिहितार्थाय" या न्यायानें वादीशीं झगडण्याचें ठरविलें, व खटल्यास सुरवात झाली. हा दावा दोन वर्षे चालू होता. कोर्टानें वादीकडे योग्य हिशेब मागितले. वादीकडून जरूर ते हिशेब मिळत नाहींत असें पाहून इमारतीचीं किंमत करण्यासाठीं दोन पंच नेमावे असें ठरलें. श्री. पवार व श्री. गो. त्र्यं गोखले हे दोन इंजिनीयर नेमून त्यांच्याकडून इमारतीची फायद्याखेरीज किंमत करवून घेतली. ती ४०१७ रुपये १ आणा इतकी झाली. म्हणजे वादीला आम्ही फक्त १७–१–० अधीक द्यावें असें पंचांच्या निकालावरूव ठरलें. वादीनें अदमासे १४०० रुपये देणें अधिक काढलें. अर्थात आमच्या सरळपणाचा फायदा घेऊन आम्हांकडून जितकी रक्कम अधिक मिळेल तितकी घेण्याचा त्यांचा विचार होता ही गोष्ट स्पष्ट झाली.

आम्ही सावध होऊन हिशोबाची मागणी केली नसतीं तर "आंधळे दळतें व कुत्रे पीठ खाते" असाच प्रकार झाला असता. "ओळखीचा चोर जिवें मारी" या म्हणीचा पूर्ण अनुभव आला. पुढे कांहीं मोठ्या मंडळींच्या मध्यस्थीनें आपसांत तडजोड करण्याची भाषा निघूं लागली. त्यामुळें हें प्रकरण आपसांत संपवावें लागलें.

या तडजोडीच्या बाबतींत आपलेच दांत व आपलेच ओठ असा प्रकार झाल्यामुळें मुद्दल व व्याज मिळून वादीस १९३ रुपये दिले व हे प्रकरण नाइलाजानें मिटवून घ्यावें लागलें. विश्वस्तांच्या ढिल्या व दुप्पटी वर्तनामुळें या खटल्यांत आम्हास बरेच नुकसान सोसावें लागलें, व इतरही अनिष्ट गोष्टी घडल्या. त्याचा या ठिकाणीं आम्ही उल्लेख करूं इच्छित नाहीं. अखेर सत्य तें सत्यच ठरलें यांतच मला समाधान वाटलें.

## जबलपूर–कांच कारखाना

श्री. गणेश दामोदर केळकर या नांवाचे एक गृहस्थ जपानहून Glass expert काचेच्या धंद्यात प्रवीण–होऊन आले होते. जबलपूर येथें त्यांनीं ज्युएल ग्लास फॅक्टरी या नांवाचा काचेचा कारखाना काढला. कारखान्यास भांडवल जमविण्यासाठीं कारखान्याच्या सर्व मालमत्तेचे विश्वस्तपत्र करून कारखाना विश्वस्तांच्या ( ट्रस्टी ) देखरेखीखालीं चालावा अशी सदर केळकर यांची इच्छा असल्यामुळें या बाबतींत ते प्रथम मजकडे आले व कारखान्याची हकीकत त्यांनीं मला निवेदन केली. मी त्यांना घेऊन श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याकडे गेलो व सदर कारखान्याची हकीगत सांगून विश्वस्त होण्याची विनंती केली. तात्यासाहेबांनीं ट्रस्टी होण्याचे कबूल केलें. प्रथम मी व तात्यासाहेब केळकर हे दोन विश्वस्त ठरल्यानंतर वऱ्हाडचे पुढारी डॉ. नरहर शिवराम ऊर्फ बाबासाहेब परांजपे, डॉ. ग. ना. हर्षे ( जबलपूर ), सातारचे सरदार मुतालीक व तळेगांव दाभाडे येथील काच कारखान्याचें व्यवस्थापक श्री. रा. दा. चांदोरकर या गृहस्थांना विश्वस्त होण्याची विनंती केली. ती मान्य करुन वरील सर्व गृहस्थ विश्वस्त झाले. हे विश्वस्त-पत्र तयार करूनें तें रजिस्टर करण्याचें काम मुंबईचे सॉलिसिटर बाळ गंगाधर खेर यांच्याकडे सोपविलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं तें तयार करून १९२६ सालीं हें विश्वस्त–पत्र

रजिस्टर केलें. आमच्या सर्वांच्या प्रयत्नानें अदमासें साठ हजार रुपये भांडवल जमलें. कारखान्याच्या कार्यास सुरुवातही झाली. परंतु दुर्दैवानें कारखान्याचे चालक श्री. गणपतराव केळकर हे एकाएकींच वारल्यामुळें हा ग्रंथ अगदींच थोडक्यांत आटोपला. हल्लीं कारखान्याची सर्व मालमत्ता मी, श्री. द. बा. लिमये, ( रानडे इन्स्टिटयूट ऑफ सायन्स पुणे ) व श्री. सहस्रबुद्धे ( बालोद्यान छापखाना पुणे ) या तिघांच्या ताब्यांत असून पुढें त्याचें काय करावें याचा विचार चालू आहे.

## पुण्यांतील प्लेगची साथ

सन १९३३ सालीं जुलै महिन्यामध्यें पुण्यांत प्लेगचा उपद्रव सुरू झाला. व निराश्रित रोग्यांची व्यवस्था कशी असावी हें पुणे शहर म्युनिसिपालिटीनें ठरवून त्याप्रमाणें गांवाबाहेर एका प्रशस्त इमारतींत हे रोगी ठेविले जात होते. या रोग्यांची औषधपाण्याची व इतर सर्व शुश्रूषेची तजवीज विनामूल्य होत असे. या रोग्यांना मानसिक स्वास्थ्य, समाधान अगर करमणुकीचें साधन मिळाल्यास त्यांची प्रकृती सुधारण्यास मोठी मदत होईल, असे डॉक्टर–वैद्यांचें मत असल्यामुळें पुणे शहर म्युनिसिपालिटीचे त्यावेळचे चीफ ऑफिसर श्री. शंकरराव भागवत हे एक दिवस आमच्या गायन-समाजाकडे आले व सदर रुग्णालयांत दररोज सायंकाळीं सहा ते सात वाजेपर्यंत वरील रोग्यांची करमणूक होऊन त्यांना बरें वाटेल असा गायनाचा कार्यक्रम करण्याची आपलेकडून व्यवस्था झाल्यास म्युनिसिपालिटी आपली आभारी होईल असें सांगितलें.

या ठिकाणीं इतर कोणी जाण्यास धजेनात हें आम्हास समजलें होतें. आम्ही मुळींच भ्यालों नाहीं. म्युनिसिपालिटीकडून नेण्या आणण्याची व्यवस्था उत्तम प्रकारें होत असे. चि. कृष्णराव मेहेंदळे यांनीं ही या वेळीं कोणत्याही प्रकारें न डगमगतां माझ्याबरोबर रुग्णालयांत येऊन हा कार्यक्रम दोन महिनेपर्यंत चांगल्या रीतीनें पार पाडला. प्लेग शांत झाल्यावर म्युनिसिपालिटीची सभा होऊन आम्ही त्यांच्याशीं सहकार्य केल्याबद्दल नगरपालिकेनें जाहीर रीतीनें आमचें आभार मानून तसा एक ठराव ता. १०।२।३४ रोजीं आमच्याकडे पाठवून दिला.

## प्रकरण ८ वें

# महात्माजींच्या सहवासांत

हिंदुस्थानचे पुढारी महात्मा मोहनदास करमचंद गांधी यांचा मुक्काम १९३३ सालीं मे व जून हे दोन महिने पुण्यास सर विठ्ठलदास ठाकरसी यांच्या पर्णकुटींत होता. या त्यांच्या मुक्कामांत त्यांनीं आत्मशुद्धीसाठीं २१ दिवस उपोषण केलें. पाण्याखेरीज गांधींनीं दुसरें कांहींच सेवन केलें नाहीं. अशी खडतर तपश्चर्या चालू असतां मनास समाधान मिळेल अशा कांहीं तरी साधनाची तजवीज झाल्यास बरें असा विचार पर्णकुटीत सुरू झाला. रोज़ सकाळ–सायंकाळ ईश्वर–प्राथना व भगवद्गीतेचें श्रवणपठणादि कार्यक्रम चालू होते. तुकाराम, रामदास, तुलसी-दास, सूरदास, गुरू नानक, कबीर, एकनाथ महाराज इत्यादि साधुसंतांचे अभंग रागरागिणीत गाइलेले ऐकण्यास मिळावे अशी उत्कट इच्छा गांधींना झाली. पुण्यांतील सुप्रसिद्ध गायकांचे कार्यक्रम त्यांच्याकडे मधून मधून होत असत असें समजलें. गोध्रा परिषदेत १९१६ सालीं गाइलेल्या राष्ट्रगीतांची आठवण होऊन त्यांनीं प्रो. जगमोहनदास पीतांबरदास त्रिवेदी ( शेतकी कॉलेज पुणे ) यांना माझी चौकशी करण्यास सांगितलें. प्रो. त्रिवेदी एक दिवस सायंकाळीं आमच्या गायन समाजांत आले व गांधींना आमचें स्मरण झाल्याची हकीगत सांगितली व म्हणाले कीं, गोध्रा परिषदेंत १९१६ सालीं गाइलेलीं गीत —“ भारत हमारा देश है ” व “ वंदे मातरम् ” महात्माजी अद्याप विसरले नाहींत.

"The Voice is Still ringing in my ears" असें महात्माजी नेहमीं म्हणतात यासाठीं एकवार आपण पर्णकुटीपर्यंत यावें अशी आमची सर्वांचीच इच्छा आहे. असें प्रो. त्रिवेदी यांनीं विशेष आग्रहानें सांगितल्या- मुळें मीं पर्णकुटीस जाण्याचें कबूल केलें. लगेच दुसरें दिवशीं पासून दोन मोटारी आम्हास नेण्याआणण्याकरितां येऊं लागल्या तानपुऱ्यांची जोडी व तबला एवढीच साथ असे. मीं हार्मोनियम घेत नव्हतो. तुकारामाचें अभंग म्हणतांना टाळांची साथ लागत असे. ती ही बरोबर घेऊन जात होतो. एकंदर साथीची माणसें आठ ते दहा असत. हा गायन भजनाचा कार्यक्रम एक तास होत असे. कधीं तासापेक्षांही अधिक वेळ होई.

सौ. सरोजिनी नायडू व राजगोपाळाचार्य यांचा मुक्काम यावेळीं पर्ण- कुटींतच असल्यामुळें आमच्या गायनभजनाच्या कार्यक्रमास ते रोज हजर असत. लष्करमधून पारशी–युरोपियन स्त्रिया दररोज येत. महात्माजींची भेट घेण्याकरितां पंडित मदनमोहन मालवीय, बिधानचंद्र राय (कलकत्ता) यांसारखे थोर लोक येत. तेही या कार्यक्रमास बसत. श्री. तात्यासाहेब केळकर आदिकरून पुण्यांतील थोर कार्यकर्ते मधून मधून येत. मराठी- इंग्रजी वर्तमानपत्रांचे बातमीदार आमच्यापूर्वीच पर्णकुटींत जाऊन बसत. पुणें शहरांतून शाळा-कॉलेजचें विद्यार्थी व इतर स्त्रीपुरुष यांचा बराच मोठा समाज सायंकाळीं हें गायन ऐकण्यास पर्णकुटीकडे येत असे. सर्वांस आंत येण्यास मोकळीक नसल्यामुळें शेकडों लोक पर्णकुटीच्या सभोंवतीं बसून हा कार्यक्रम ऐकत असत. मी भजन संपेपर्यंत भजनानंदांत निमग्न असें. परंतु भजन संपल्यावर गांधींच्याकडे एकवार सहज दृष्टी जाई. तुळसीदास, नरसीमेहता, नानकगुरू व रामदास तुकारामादि संत यांचे अभंग–पदें ऐकून झालेला संतोष त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असे. इतर वेळॉ त्यांची प्रकृती कशीं रहात असे हें आम्हास कळत नसे तथापि सायंकाळीं पर्णकुटींत आमचें गायन सुरू झाल्यापासून तें संपेपर्यंत गांधीं- च्या चेहऱ्यावर हास्य दिसत असे. या भजनामुळें त्यांना आनंद होतो हें त्यांच्या त्यावेळच्या प्रकृतीवरून समजून येई.

त्यांची तपश्चर्या पाहून

"प्राप्य पुण्यकृताँल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥

या भगवद्गीतेंतील भगवंतांच्या वाक्याचीं आठवण होई. हा पुण्यवान पुरुष स्वर्गात कित्येक वर्षे वास करून कर्मयोगा पासून अलग झाल्यामुळें पुन्हा इहलोकीं शुचिर्भूत, श्रीमान व बुद्धिमान अशा कर्मयोग्यांच्या कुळांत जन्म घेऊन केवळ भरतभूमीच्या उद्धारासाठींच अवतरला आहे असे वाटत असे. गांधींच्या इच्छेप्रमाणें एकवीस-दिवसपर्यंत मी पर्णकुटींत जात होतो. उपवास सुटल्यानंतर दुसरे दिवशीं पर्णकुटीकडून मोटार आली. "महात्माजींनीं आपणास बोलविलें आहे असें आलेल्या गृहस्थांनीं मला सांगितलें. मी पर्णकुटींत गेलों. अर्धा तासपर्यंत गांधींचें व माझें बोलणें झाले. मुलाखतीच्या शेवटीं गांधींनीं सांगितलें कीं, "मी एकदोन दिवसांत मुंबईस जाणार. सबब जाण्यापूर्वी एकवार आपणाशीं दोन शब्द बोलावें या इच्छेनें आज आपणास बोलाविलें. सत्य गोष्ट अशी कीं,

## आपण मला २१ दिवसपर्यंत संगीतामृताचें प्राशन करविलें.

म्हणून या खडतर उपवासांतून मी निभावलों असें वारंवार मला वाटतें, आणि हें सांगण्यासाठींच मी आपणास इकडे येण्याची आज पुन्हा तसदी दिली. दुसरी विनंती अशी कीं, आम्ही जाण्यापूर्वी पर्णकुटींत देवीदास यांच्या लग्नसमारंभानिमित्त सर्व मंडळी या ठिकाणीं एकत्रित होणार त्यावेळीं आपल्या गायनाचा एक अखेरचा कार्यक्रम व्हावा,आणि आम्हांस "वैष्णव जन तो तेने कहिये" हें पद गाऊन दाखवावें. आपण माझ्या करितां फारच तसदी घेतली व घेत आहां याबद्दल मी आपला आभारी आहें." गांधींच्या इच्छेप्रमाणें मीं गायनाचा कार्यक्रम अडीच तास केला. शेवटीं 'वैष्णव जन तो' हें पद गाऊन दाखविलें व कार्यक्रम संपविला. हा कार्यक्रम सकाळीं सात ते साडेनऊ पर्यंत झाला. यावेळीं खमाज, हमीर, कल्याण, मालकंस, भीमपलास इत्यादि राग गावे लागले. गाणें

झाल्यावर श्री. तात्यासाहेब केळकर यानीं विचारिलें कीं, " तुम्ही तर सकाळच्या बैठकींत दुपारचे व रात्रीचे राग गाऊन दाखविले, बैठक उत्तम रंगली, रात्रीचे राग सकाळीं गाइल्यानें ते कानास बरें लागत नाहींत असें म्हणतात तें फारसें महत्वाचें नाहीं असें आजच्या कार्यक्रमावरून वाटतें." इतक्यांत सौ० सरोजिनी नायडू तेथें येऊन म्हणाल्या,

" Mr. Desai, hundreds of thanks for the trouble you have taken for Mahatmajee. It is said that "One cannot please everybody " but today you have made it false. for, each and every one in the audience is thoroughly satisfied by your music."

इतकें बोलतों आहों तों आलेले पाहुणे गांधींचा निराप घेऊन जाऊं लागले. आम्ही महात्माजींचा निरोप घेतला व तीन आठवडेपर्यंत थोरांचा सहवास घडल्यामुळें झालेल्या आनंदांत परत आलों.

## वर्णबाह्य विवाह

पर्णकुटींत झालेल्या देवीदास–लक्ष्मी विवाहासंबंधानें पुणें शहरांतील सनातनी धर्माभिमानी लोकांनीं जाहीर सभा भरवून या विवाहाचा निषेध केला. भालाकार-भोपटकर व इतर सनातनी मंडळींनीं या विवाहाची हकीगत मला विचारिली. मला जें माहीत होतें तें मी थोडक्यांत त्यांना सांगितलें. " गांधींचा व तुमचा परिचय असल्यामुळें तुम्हीदेखील त्यांना हा विवाह धर्म्य कसा ठरतो हें विचारण्यास काय हरकत आहे?" असा प्रश्न सनातनी लोकांकडून मला करण्यांत आला. मीं सांगितलें, "सनातनधर्म, जुनी–नवी विवाहपद्धति, जातीभेद, रोटीबेटीव्यवहार इत्यादि बाबतींत गांधींचीं मतें काय आहेत हें नीट पाहिल्याखेरीज एवढ्या मोठ्या पुढाऱ्यांस एकदम या विवाहासंबंधाने मी कोणताच प्रश्न करणार नाहीं. तथापि विचार करून जें कांहीं बोलावें अगर लिहावेसें वाटेल तें अवश्य बोलेन किंवा लिहीन. पुढें याबाबतींत जरूर ती माहिती मिळवून ता. ४ जुलै १९३३ रोजीं मी गांधींना पत्र लिहून विचारणा केली ती अशी:—

" आपल्या सौजन्यावर व चित्ताच्या पावित्र्यावर माझा पूर्ण विश्वास

असल्यामुळेंच पुढील चार शब्द आपल्यापुढें विचारार्थ मांडण्याचें धाडस मी करीत आहें.

आपले चिरंजीव देवीदास यांचा विवाह श्री. राजगोपाळाचारियर यांची कन्या कुमारी लक्ष्मी इजबरोबर झाल्यापासून या विषयावर पुष्कळच लिहिलें व बोललें गेलें आहे. तथापि यासंबंधानें मला आपणास विचारावेंसें वाटतें याचें कारण असें की, या विवाहानंतर आपण वधूवरांना उद्देशून जो उपदेश केला त्या उपदेशातील विधानांची संगती मला नीटशी लावतां येईना. हा विवाह अधर्म्य नाहीं अशी आपली खात्री असल्यामुळेंच आपण या विवाहाला संमति दिली, असा आपल्या उपदेशाचा सारांश निघतो. आपल्या 'यंग इंडियांतील' लेखांचा मी एक नम्र वाचक आहें. "हिंदु समाजांत रूढ असलेल्या चातुर्वर्ण्य पद्धतीवर माझी दृढ निष्ठा आहे," असें आपण अनेकवार म्हटलें व लिहिलें आहे. चातुर्वर्ण्य हा हिंदुसमाजाचा खरा पाया असून त्यावरच हिंदुसमाज कित्येक शतकें तग धरून राहिला आहे असेंच आपण समजतां. अर्थात चातुर्वर्ण्य-पद्धतींत बिघाड करणारी प्रत्येक गोष्ट हिंदुधर्म व हिंदुसमाज यांना हानिकारक आहे असें आपलें ठाम मत असल्याचें स्पष्ट दिसून येतें.

ता. २५।२।२० च्या यंग इंडियांत हिंदु मुसलमानांच्या ऐक्यासंबधीं लिहितांना आपण म्हणतां कीं, "जातिसंस्था अपायकारक आहे असें म्हणणाऱ्यापैकीं मी नाहीं. राष्ट्राच्या वाढीसाठी रोटीव्यवहार व बेटीव्यवहार सर्रास चालू झाले पाहिजेत ही कल्पना माझ्या मते भ्रममूलक असून ती आपण पाश्चात्य लोकापासून उसनी घेतली आहे."

"जातिसंस्था या विषयावर ता. ८।१२।२० च्या यंग इंडियात लिहितांना आपण पुढील शब्द योजिले आहेत. "माझ्या मते हिंदु समाजांत रूढ असलेले चार वर्ण हेच काय ते मूलभूत, स्वाभाविक व आवश्यक आहेत. हे मूलभूत भेद नाहींसे करण्याचा कोणी यत्न करील तर मी त्याला विरोधच करीन."

आपण चातुर्वर्ण्य-पद्धतीचा ठाम पुरस्कार करणारे आहांत हें सिद्ध करण्याला वरील दोन अवतरणें पुरीशीं आहेत असें मला वाटतें. माझा प्रश्न असा की, आपण या चिरंजिवांच्या प्रतिलोम विवाहामुळें चातुर्वर्ण्य-

पद्धतीच्या मुळावरच घाव घातला असे आपणास वाटत नाहीं काय ? वर उद्धृत केलेल्या लेखांपैकीं एका लेखांत आपण म्हटलें आहे कीं, काळाच्या वाहत्यां ओघाबरोबर नव्या गरजा व नवे प्रसंग निर्माण होऊं लागतात आणि त्यामुळें रोटी–बेटी–व्यवहारासंबधींच्या निर्बंधांना मुरड घालावी लागते, त्यांत बदल करावा लागतो अगर त्याची घडी नव्यानेंही बसावावी लागते. याहि प्रसंगीं आपण कदाचित् असेंच कांहीं तरी म्हणाल, पण जिच्यामुळे आपण या अंतर्जातिय विवाहाला संमति द्यावी अशी कोणती गरज अगर प्रसंग आज आपल्यापुढे होता. हें मला नीटसें समजत नाहीं. अशा विवाहामुळें होणारा बदल, अगर बसणारी घडी आणि त्यांत आपलें सावधपणाचें धोरण कोणतें होंहि कळत नाहीं. अशा गोष्टी अपवाद या सदरांत ढकलाव्या असें आपण म्हणणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. अशीं उदाहरणें अपवादात्मक तर नसतातच, पण आपल्या लाखो अनुयायांना ती नवीन घडा घालून देणारीं ठरतात ही गोष्ट आपण चांगली जाणता. ”

## महात्माजी व चातुर्वर्ण्य

महात्माजींनीं ता. १ सप्टेंबर १९३३ रोजीं मला लिहून कळविलें कीं,

“ आपल्या शंका आपण मजपुढें मांडल्या हें फार चांगलें झालें. माझ्या लेखांतील जो उतारा आपण उद्धृत केला आहे त्यांतच आपल्या शंकेचें निरसन आपल्याला आढळेल ! चातुर्वर्ण्यावर माझा विश्वास आहे, पण समाजांतील चार वर्गांचे धंदे निश्चित व नियमित व्हावे असा चातुर्वर्ण्याचा हेतू होता. वैवाहिक व अन्नोदक व्यवहारासंबंधींचे निर्बंध म्हणजे वर्णधर्माचा गाभा आहे असे केव्हांच मानण्यांत आलें नव्हतें. नित्याच्या परिस्थितींत लोकांनीं आपल्या वर्गांतच सोयरिकी कराव्या हें स्वाभाविक आहे. पण, विशिष्ट परिस्थिति प्राप्त झाली असतां अंतर्जातिय विवाह नेहमींच झालेले आहेत ही गोष्ट ऐतिहासिक पुराव्यावरून आपल्याला कळण्यासारखी आहे. देवीदास व लक्ष्मी यांच्या विवाहांत गैर अगर धर्मबाहय असें कांहींच नव्हतें, कारण, त्यांना परस्पराविषयीं

अनिवार प्रेम वाटूं लागतांच त्यांनीं ती गोष्ट आम्हास कळविली. "आमच्या या विवाहास आपण आशीर्वाद दिला नाहीं तर आम्ही विवाहाचा विचार सोडून देऊन ब्रम्हचर्य पाळूं" असें त्यांनीं वचन दिलें. श्री. राजगोपाळाचार्य व मी त्या उभयतांच्या वर्तनाचें कित्येक महिने सूक्ष्म निरीक्षण करीत होतों व दीर्घ कालपर्यंत त्या उभयतांची आम्ही केव्हांही भेट होऊं दिली नाहीं. त्यानीं हे निर्बंध पाळले. पण त्यांचे एकमेकावरील प्रेम थोडेसुद्धां कमी झालें नाहीं. सबब अशा विवाहांत व्यत्यय आणणें म्हणजे माणसांच्या अंगीं असलेल्या धर्मभावनेचें उल्लंघन करण्यासारखें आहे असें श्री. राजाजी व मी या दोघांनाही वाटूं लागलें.

कोणी कोणता धंदा करावा या बाबतींत कांहीं नियम न राहिल्यामुळें संकर झाला आहे व आजमितीला वर्णधर्मांचें फक्त नाव तेवढें राहिलें आहे अशी माझी समजूत आहे. चातुर्वर्ण्य या थोर संस्थेचा दुरुपयोग होत असून त्यायोगें हिंदु समाजामध्यें उच्चनीचपणाची घातकी वृत्ती बळावत चालली आहे असेंहि मला वाटतें. खऱ्या वर्णधर्माची स्थापना कशी होईल या प्रश्नाचें उत्तर आज मला देतां येणार नाहीं."

महात्माजींनीं केलेला हा खुलासा मी पुष्कळांना दाखविला. परंतु तो असावा तितका समाधानकारक नसल्यामुळें लोकांना पटला नाहीं. या विवाहासंबंधानें महात्माजींशीं माझा झालेला पत्रव्यवहार व त्यावर महात्माजींची आलेली उत्तरें १९३२ च्या नोव्हेंबरमधील "त्रिकाळच्या" एक दोन अंकांत खुलासेवार प्रसिद्ध झालीं आहेत. सबब त्यांचा हा सारांश अगदीं थोडक्यांत दिला आहे.

## प्रकरण ९ वें

# गायन–समाजाचा उत्कर्ष

श्री गोपाल गायन समाजाच्या कार्याची झपाट्यानें प्रगति होत होती. चि. अवधूतराव पुजारी व चि. कृष्णराव मेहेंदळे या दोन विद्यार्थ्यांची तयारी चांगली झालेली पाहून पदवीदानसमारंभ करावा असें मनांत आलें. संस्थेची स्वतःची इमारत बांधणें, विद्यार्थी तयार करणें व पदवीदान करणें या तीन गोष्टी करावयाच्या अशी माझी पहिल्यापासूनची इच्छा. त्यांपैकीं इमारत व विद्यार्थी या दोन गोष्टी सिद्धीस गेल्या. पदवीदानसमारंभ राहिला होता. तो या वर्षीं करण्याचा योगायोग आला. जून १९३४ पासूनच कार्यास लागलों. " संगीत प्रथमा " व संगीत मध्यमा " या दोन परीक्षा व " संगीत–विद्या–विशारद " ही पदवी–परीक्षा असावी, असें ठरवून त्याप्रमाणें कोणते विद्यार्थी कोणत्या परीक्षेस बसूं शकतात तें पाहून परीक्षा घेण्यास सुरुवात झाली.

देव, गो. कृ. मराठे, चिरमुले व वाटवे हे चार विद्यार्थी मध्यमा परीक्षेंत उत्तीर्ण झाले. प्रमाणपत्राचा नमुना तयार करून त्याप्रमाणें प्रमाणपत्रें छापवून घेतलीं.

### पहिलें पदवीदान

इचलकरंजी संस्थानचे अधिपती श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांचा गायनकलेशीं निकट परिचय तर खराच. परंतु गुरुवर्य गायनाचार्य पंडित बाळकृष्णबुवांपासून परंपरेनें आमच्या गोपाल गायन समाजाशीं श्रीमंतांचा

अगदीं जवळचा संबंध येत असल्यामुळें या पदवीदान समारंभाचे अध्यक्ष-स्थान श्रीमंतांनीं स्वीकारावें अशी मीं त्यांना विनंती केली. त्यांनीं कांहीं सबब न सांगतां आमच्या संस्थेची परंपरा लक्षांत घेऊन समारंभास येण्याचें कबूल केलें. १९३४ सालची गोकुळाष्टमी होतांच ता. २ सप्टेंबर रोजीं टिळक स्मारक मंदिरांत हा प्रथम पदवीदान-समारंभ श्रीगोपाल गायन समाजातर्फे साजरा करण्यांत आला.

या प्रसंगीं हजर असलेल्या गायक-गायिकांनीं व इतर स्त्री पुरुष मंडळींनीं टिळक स्मारक मंदिर भरून गेलें होतें. वाडिया कॉलेजचे प्रो. केशवराव कानिटकर, प्रो. शंकरराव कानिटकर, श्री. दा. वि. गोखले संगीत कलानिधी मास्तर कृष्णराव,: संगीतचूडामणी विनायकबुवा पटवर्धन, पुणे शहर म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर श्री. शंकरराव भागवत, श्री. श्री. म. माटे, गीतावाचस्पती सदाशिवशास्त्री भिडे, प्रो. बोंडाळे, सौ. बोंडाळे, कु. द्वारकाबाई भट इत्यादि मंडळी प्रामुख्यानें दिसत होती.

प्रारंभीं गायन-समाजांतील विद्यार्थ्यांचें ईश्वस्तवन झाल्यावर प्रि. केशवराव कानिटकर यांनीं श्रीमंत बाबासाहेब हेच आजच्या समारंभास योग्य अध्यक्ष कसे हें सांगून श्रीमंतांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. या सूचनेस श्री. दा. वि. गोखले यांनीं अनुमोदन दिल्यावर अध्यक्ष स्थानापन्न झाले. त्यानंतर राजे महाराजे व महाराष्ट्रांतील अनेक संगीत विद्यालयाकडून आलेले संदेश वाचून दाखविले. संस्थेची प्रगति आजवर कशी होत गेली हें सांगताना मीं श्रीमंत जगन्नाथ महाराज यांचा सादर व कृतज्ञतापूर्वक उल्लेख करून पदवीदान समारंभासंबंधीं बोलण्यास सुरवात केली व सांगितलें कीं, अभ्यासक्रम पुरा झाल्याबरोबर हा समारंभ करावयाचा; परंतु झालेल्या अध्ययनाची पुढे आणखी चार पांच वर्षे मेहनत केल्याखेरिज विद्यार्थी प्रमाणपत्र देण्यास लायक होत नाहीं. आज प्रमाणपत्रें घेणारे विद्यार्थी उत्तम अध्यापक असून तीन साडेतीन तासपर्यंत मैफल रंगविण्याची पात्रता त्यांच्या ठिकाणीं आली आहे अशी आमची खात्री असल्यामुळेंच आज हा समारंभ आम्ही

करींत आहों. इतकें झालें तरी आम्ही या विद्यार्थ्यांना असें सांगतों कीं, स्वतःचें अध्ययन व मेहनत करीत असतांना वेळोवेळीं उत्कृष्ट गायकांची गाणीं ऐकावीत व सुरेलपणा, लय, स्पष्ट शब्दोच्चार इत्यादि चांगले तेवढेच गुण घ्यावेत. एकाद्या व्यक्तीमध्यें दहा गुण असतात. पण त्याबरोबर एकादा दोषही असतो. कित्येक गायक गातांना तोंड वाकडे करितात, कित्येक वेडेवाकडे अंग विक्षेप करितात, कित्येकांचे नेत्र व चेहरा गातांना फारच भेसूर दिसतो. या सर्व गोष्टी सभेमध्यें हास्यास्पद होतात. श्रोते त्याचा तिरस्कार करितात. हे दोष गायकामधें नसावेत. शब्दांच्या अर्थाप्रमाणें व रसानुकूल परंतु स्वाभाविक होणारे हावभाव व चेहऱ्यांतील बदल हें क्षम्य आहेत. दुसरें असें कीं, गाण्याच्या अनेक पद्धती व निरनिराळीं घराणीं आहेत. कोणत्याही एका पद्धतीनें विद्यार्थी शेवटपर्यंत एकाच ठिकाणीं राहून मनापासून अध्ययन करील तर इतर कोणतीही पद्धती त्यांस साध्य करून घेता येतें. तसें न होईल तर तें अध्ययनही नव्हे व अध्यापनही नव्हे. तिसरें असें कीं आजच्या समारंभांत "संगीत मध्यमा" हीं प्रमाणपत्रें ज्यांना देत आहों ते मध्यम प्रताचे विद्यार्थी असल्यामुळें त्याबद्दल अधिक बोलण्याची जरूर नाहीं. "संगीत–विद्या-विशारद" ही पदवी ज्याना देत आहो तें या कलेमध्यें अगदीं पूर्णत्वास पोचलें असें समजूं नये. कोणतीही विद्या अगर कला यांना अंत नसतो. स्वामी विवेकानंद, समर्थ रामदास इत्यादि थोर विभूतींनीं गायन कलेची जी थोरवी वर्णन केली ती लक्षांत घेतां आज दिल्या जाणाऱ्या पदव्या या केवळ विद्यार्थ्यांनीं आजवर केलेल्या परिश्रमाच्या गौरवार्थ आहेत हें सहज समजून येईल."

इतकें बोलून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रें अर्पण करण्याची अध्यक्षांना विनंती केली.

श्री. अवधूतराव पुजारी व कृष्णराव मेहेंदळे यांना 'संगीत–विद्या-विशारद व भा. गो. चिरमुले; ग. जी. वाटवे; गो. कृ. मराठे व ल. ग. देव यांना "संगीत मध्यमा" अशी प्रमाण–पत्रें देण्यांत आली. याच वेळीं श्रीगोकुळाष्टमीच्या उत्सवांत गायन–वादनाच्या चढाओढींत यशस्वी

झालेल्या मुलामुलींना बक्षिसें दिलीं. त्यानंतर गीतावाचस्पती सदाशिव शास्त्री भिडे, संगीत कलानिधी मास्तर कृष्णराव व संगीत चूडामणी विनायकराव पटवर्धन या तिघांचीं भाषणें झालीं. त्यांचा आशय असा कीं, पंडित विष्णु दिगंबर यांच्या शिक्षणांतून जे "संगीत-प्रवीण" बाहेर पडले ते संगीताचा प्रचार किती उत्तम तऱ्हेनें करीत आहेत हें आजच्या समारंभावरून प्रत्यक्ष दिसून येतें. अशा तऱ्हेचा पदवीदान-समारंभ आज प्रथमच होत असल्यामुळें त्याचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

श्रीमंत बाबासाहेब घोरपडे आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले कीं, "आज ह्या समारंभाचें अध्यक्षस्थान मीं स्वीकारिलें त्याचें कारण कै. पंडित बालकृष्णबुवा, पंडित विष्णु दिगंबर व श्री. गोविंदराव देसाई अशी परंपरा, व या तिघां बरोबर आमचा घरोब्याचा संबंध हें होय. पं. विष्णु दिगंबर यांनीं संगीत-शिक्षणाचा अभिनव उपक्रम केला. तोच उपक्रम ही संस्था उत्कृष्ट रीतिनें चालवीत आहे. या संस्थेनें आपली स्वतःची इमारत बांधून सर्व मालमत्तेचे विश्वस्तपत्र केलें त्यामुळें संस्था सार्वजनिक व चिरस्थाई झाली हीच गोष्ट या संस्थेच्या बाबतीत विशेष आहे. विश्वविद्यालयीन शिक्षणाप्रमाणें अभ्यास क्रम आखून त्या प्रमाणें अध्ययन करण्यापेक्षां जुन्या पद्धतीप्रमाणेंच या कलेचें अध्ययन करावें असें माझें मत आहे. मराठी करणाचा वाद हल्ली बराच ऐकू येतो त्याला फारसें महत्व देऊं नयें. मोठमोठे गायक गातांना हारमोनियमची साथ घेतात ही गोष्ट त्यांना कमीपणाची आहे. या सर्व गोष्टी आजच्या पदवीधरानीं ध्यानांत ठेवून विद्याव्यासंग निरंतर चालू ठेवावा"

अशा आशयाचें श्रीमंतांचें भाषण झाल्यावर प्रा. श्री. म. माटे आभार मानण्यांस उभे राहिले. ते म्हणाले,

"ही संस्था ज्याप्रमाणें रावांचें मनरंजन करून त्यांना आनंद देते, त्याचप्रमाणें मोलमजुरी करून दमून-भागून चाललेले नव्या पेठेंतील मजूर घरीं जातांना गोविंदरावांच्या ह्या वळचणीखालीं क्षणभर उभे राहून येथें निघत असलेले सुस्वर आलाप ऐकून समाधान पावतात. आम्ही आळीकर

या संस्थेस आमचें भूषण समजतों. या समारंभास पुण्याचे सर्व पुढारी शाळा–कॉलेजचे अधिकारी, लहानमोठे विद्यार्थी व इतर स्त्री–पुरुष यांचा फारच मोठा जमाव आलेला पाहून आनंद होतो आहे. सर्वांत महत्वाची व समाधानाची गोष्ट म्हणजे राजेंद्रखील या समारंभास आले. संस्थेतर्फे आपले सर्वांचे कितीही आभार मानले तरी ते थोडेच होतील”

राष्ट्रगीत होऊन समारंभ रात्रीं ९ वाजतां संपला.

गोपाल गायन समाज स्थापन झाल्यानंतर पंधरा वर्षांनीं मला प्रथम पदवीदान–समारंभ करतां आला व यावेळींसुद्धां अवघे सहा विद्यार्थी पुढें आले व त्यांतही चार मध्य–प्रतीचे व दोनच अभ्यासक्रम पुरा करून पदवीधर झालेले पंधरा वर्षांच्या अवधींत हजारो विद्यार्थी आले व गेले. त्यांत फक्त सहा विद्यार्थी अभ्यास् निघाले. प्रशस्तिपत्रें मिळवून नांवारू पास येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या इतकी अल्प असण्याचें कारण असें कीं, कांहीं विद्यार्थी केवळ शौकाखातर गाणें शिकण्यास येतात. कांहीं वडील माणसांच्या आग्रहामुळें या कलेंत शिरतात पण त्यांना तें जमत नाहीं असें वाटलें कीं कंटाळून सोडून देतात. झटपट रंगाऱ्याप्रमाणें कांहीं विद्यार्थी असतात ते एक दोन परीक्षा दिल्यावर लगेच बाहेर जाऊन दुसरें संगीत–विद्यालय काढून द्रव्य मिळविण्याच्या नादीं लागतात. शालेय शिक्षणांत डोकें चालत नाहीं असें पाहून संगीत कला ही जणू काय निर्बुद्धांकरिताच आहे अशी पुष्कळांची समजूत असल्यामुळें ते आपली मुलें आमच्याकडे पाठवितात परंतु बौद्धिक शिक्षणांत जे विद्यार्थी नालायक समजले जातात ते संगीत–शिक्षण घेण्यास अगदींच टाकाऊ ठरतात. कारण शाळेच्या अभ्यासक्रमांत जे विषय असतात ते पुस्तकांत पाहून व घोकून विद्यार्थी कसे तरी तयार करूं शकतो परंतु संगीत-कला शिकण्यास तालस्वराची नैसर्गिक देणगी असल्याखेरीज येथें शिकणारा व शिकविणारा कांहींच करूं शकत नाहीं. येथें पुस्तकांचें अगर घोकंपट्टीचें काम नाहीं हें लोकांच्या ध्यानीं न आल्यामुळें बुद्धिहीन मुलांची रवानगी आम्हांकडे करण्यांत येते. पण त्यांना निराश होऊन थोड्याच दिवसांत

## गायनसमाजांतील गानकुशल विद्यार्थिनी.



सौ० लीलाताई जोशी.



कु० सिंधुताई मोडक,
चिटणीस र. म. मंडळ.



कु० सुधाताई भागवत,
चिटणीस र. म. मंडळ.

# गायनसमाजांतील गानकुशल विद्यार्थिनी.



कु० तारा मोडक.



कु० विमल नावर.



कु० उषा भागवत.

गायन-समाजाची रजा घ्यावी लागते. परिक्षेंत विद्यार्थी नापास झाला म्हणजे त्याचें मन दिलगीर होतें. काय करावें सुचत नाहीं. असे विद्यार्थी वैतागाच्या भरांत आत्महत्त्या करितात, पण जे विचारी असतात ते आत्म-हत्येसारखें महत्पाप नाहीं हें ध्यानीं आणून मनास समाधान वाटावें व स्थिरता यावी म्हणून पुन्हां परिक्षेस बसेपर्यंत एक वर्ष का होईना गायन-समाजांत दाखल होतात. कित्येकांना आवाजाची देणगी मुळींच नसते पण केवळ विषय समजून घेण्यासाठीं ते येतात.

अलीकडे संगीताचा प्रचार फार झाल्यामुळें मुलाप्रमाणें मुलीही गायन शिकण्यास येऊं लागल्या आहेत. मुलांपेक्षां मुलींची संख्याच अधिक दिसून येते. हल्लींच्या सुधारलेल्या काळांत मुलगी पहावयास येणारे लोक मुलींस संगीत येते कीं नाहीं हेंही पहात असतात. आणि एवढ्याचसाठीं शेकडा नव्याण्णव मुली ही कला शिकतात. कित्येक मुलामुलींचे पालक, सिनेमागृहांत जाण्यासाठीं जरूर तो संगीताचा अभ्यास झाला कीं, केवळ पैशासाठीं आपलीं मुलें तर सिनेमांत पाठवितातच पण मुलींनाही तोच मार्ग दाखवितात. असे बहुरंगी व बहुरूपी विद्यार्थी असल्यामुळें विद्येची सेवा करून शेवट गांठणारांची संख्या हजारांत दोन किंवां तीन एवढीच असूं शकते हे अनुभवानें सिद्ध झालें आहे. आमच्या मनाप्रमाणें अभ्यास करून विद्यार्थी तयार झाला कीं, लगेच आम्ही त्यांस पदवी व प्रमाणपत्र देतोंच.

आमच्या संस्थेतर्फे

## दुसरा पदवीदान-समारंभ

रविवार ता. १७ डिसेंबर १९३९ रोजीं टिळक स्मारकमंदिरांत श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. यावेळीं विद्यार्थी अनंत चिंतामण मराठे यांस " संगीत-विद्या-विशारद " ही पदवी व प्रमाणपत्र देण्यांत आलें. कुमारी विमल शिवराम नात्र, उषा रामचंद्र भागवत, सौ. लीलाताई जोशी, वैद्य लक्ष्मणशास्त्री पुणतांबेकर, श्री. शं. द. लिमये, य. श्री. मराठे, श्री. गो. तळवलकर व धनी रामशर्मा

( दिल्ली ) यांना " संगीत मध्यमा" हीं प्रमाणपत्रें दिलीं. १९४२ सालच्या गोकुळाष्टमीस विद्यार्थी श्रीकृष्ण गोपाळ तळवलकर हा " संगीत-विद्या-विशारद " या पदवी-परिक्षेस बसला व राजाराम गोपाळ ओक व शंकर चिंतामण मराठे हें दोघे " संगीत-मध्यमा या परिक्षेस बसले. तिघेही उत्तीर्ण झालें.

## श्रीमंतांची फिर्याद

सुखस्यानंतरं दुःखं दुःखस्यानंतरं सुखम् ।
चक्रवत्परिवर्तन्ते दुःखानि च सुखानि च ॥
( महाभारत )

१९३४ सालचा गोकुळाष्टमीचा उत्सव व पदवीदानसमारंभ हे दोन्ही कार्यभाग अत्यंत थाटानें व आनंदानें पार पडले. वर्तमानपत्रांतून पदवी-दानसमारंभाची प्रसिद्ध झालेली हकीगत वाचून गोपालगायनसमाजाच्य कार्याबद्दल अखिल महाराष्ट्रांत विशेष आदर उत्पन्न झाला, संस्था अधिक लोकप्रिय झाली, विद्यार्थ्यांचा भरणा जास्त होत चालला व संस्थेचे सर्व कार्यक्रम उत्साहानें होत होते. दुःखें व संकटें बहुतकरून संपलीं असें वाटलें

इतक्यांत कान्या डोळ्याचा, गिड्डा असा एक ब्राम्हण एक दिवस सकाळीं ९ वाजण्याच्या सुमारास गायनसमाजांत आला. मी टेबलावर लिहींत बसलों होतों.

" मालक कोठें आहेत ?" त्या गृहस्थानें प्रश्न केला.

मी त्यांना 'बसा ' म्हणून सांगितलें. " देसाई आपणच का ?" असा दुसरा प्रश्न केल्यावर 'मी' होय म्हटलें. " गायनसमाजाचा पायखाना व न्हाणीघर बांधलें तें कोणाच्या हद्दींत बांधलें आहे व तें बांधतांना मालकाची परवानगी घेतली होती किंवा कसें? " अशी भाषा हे गृहस्थ बोलूं लागल्यावर मी विचारिलें, आपण कोण ? ते म्हणाले, " मी जगन्नाथमहाजांचा कारभारी."

'जगन्नाथमहाराजांचा कारभारी' इतके शब्द ऐकल्य [illegible] अनिष्ट घडणार असें माझें मन सांगूं लागलें. एक क्षणभर थांबून त्यांना सांगि-

तलें कीं, तात्यासाहेब केळकर यांजकडे तुम्ही जा म्हणजे या सर्व गोष्टींचा खुलासा होईल. या गृहस्थांचें नांव विचारिलें व त्यांना तात्यासाहेब केळकर यांच्याकडे पाठविलें. जगन्नाथमहाराजांकडून आलेल्या या गृहस्थाचें नांव बाळकृष्ण नारायण रणभोर. या गृहस्थांची भाषा, बोलण्याचालण्याचा रोख, मुखचर्या व पोषाख इत्यादि गोष्टी पाहून हा मनुष्य सरळ स्वभावाचा नाहीं हें सहज समजण्यासारखें होतें. या गृहस्थाचा चेहरा व डोळे पाहिल्यावर

" क्वचित्काणा भवेत्साधु "

या संस्कृत म्हणीची मला आठवण झाली, व त्याप्रमाणें अनुभवहि आला. ज्या जागेवर प्रथम पायखाना व न्हाणीघर बांधलें त्या जागेवर बांधकाम करण्याची परवानगी जगन्नाथमहाराजांकडून मिळाल्याचें स्वतः तात्यासाहेब केळकर यांनीं गायन–समाजांत येऊन सर्व विद्यार्थ्यांच्या देखत सांगितलें. वाटेल त्यावेळीं कामास सुरुवात करा असें सांगून तात्यासाहेब घरीं गेले.

मी लगेच रा. माधवराम मारुतिराव येवले कॉंट्रॅक्टर यांना बोलावून आणून जरूर तेवढी जागा आखून घेतली व बांधकामास सुरुवात केली. गायन–समाजाची इमारत १९२७ सालीं बांधली. त्यावेळेपासून पायखाना, न्हाणीघर किंवा नुसतां नळ बेण्यासदेखील आमच्याकडे जागा शिल्लक राहिली नव्हती. तथापि ज्यांनीं संस्थेस इमारत बांधण्यासाठीं जागा दिली ते दहा फूट लांब व पांच फूट रुंद जागा मागितल्यास संस्थेच्या सोयीसाठीं अवश्य देतील असें वाटणें साहजिक होतें, व त्याप्रमाणें खटपट करतां करतां १९३१ सालीं ही जागा आम्हांस मिळाल्याचें, वर लिहिल्याप्रमाणें श्री. केळकर यांच्याकडून, आम्हांस समजलें. १९२७ ते ३१ सालपर्यंत आजूबाजूच्या घरांतूनच पाणी आणणें, पायखाना-न्हाणीघराची गरज भागविणें इत्यादि गोष्टीं अतिशय अडचण सोसून आम्ही करून घेत होतों. वरीलप्रमाणें जागेची सोय होतांच पायखाना व न्हाणीघर बांधण्यास जरूर तें द्रव्य जमा करून ही सर्व सोय करून घेतली. हें बांधकाम श्री. माधवराव मारुतिराव येवले कॉंट्रॅक्टर यांनीं केलें. काम चालू असतां श्री. तात्यासाहेब केळकर सहज जातांयेतां काम पहात

असत. पंधरा दिवसांत काम पुरें झालें. ही सोय झालेली पाहून संस्थेच्या सर्व लहान थोर-विद्यार्थ्यांस फार बरें वाटलें. या पन्नास चौरस फूट जागेबद्दल लेखी करार अगर कागदपत्र कांहीं झालें नव्हतें, व एवढ्याशा जागेसाठीं कागदपत्र होण्याची जरूर नाहीं असें स्वत: तात्यासाहेब केळकरच म्हणाले. मोठ्या माणसांच्या शब्दावर विश्वास ठेवून आम्ही निर्धास्त राहिलों. परंतु त्याचें प्रायश्चित आम्हास भोगावेंच लागलें.

जगन्नाथमहाराजांचे कारभारी बाळकोबा रणभोर हे पुन्हां आले व या जागेवर पायखाना बांधण्यास जगन्नाथ महाराजांची लेखी परवानगी असल्यास दाखवा असें म्हणूं लागले. श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं जगन्नाथ महाराजांची लेखी परवानगी मिळाली आहे असें सांगितल्यावरूनच आम्ही त्यांच्या शब्दावर विश्वास ठेविला होता. ही लेखी परवानगी आमच्याकडे द्यावी असेही एकवार केळकर यांना सांगितलें. परंतु केळकर यांनीं उलट असें सांगितलें कीं, कधींकाळीं तक्रार उत्पन्न झाल्यास माझ्याकडे असलेली परवानगी मी तुम्हांस देईन. श्री. रणभोर यांनीं जागेच्या परवानगीचा प्रश्न काढतांच मी त्यांना तात्यासाहेब केळकर यांच्याकडे पाठविलें. पुढें पंधरा दिवस रणभोर माझेंकडे आलेच नाहींत. एक दिवस सहज रस्त्यांत गांठ पडल्यावर मी रणभोर यांना विचारलें कीं, तात्यासाहेब केळकर यांजकडे तुम्ही जागेची परवानगी मिळालेली पाहण्यास गेला होता त्याचें काय झालें? त्यावर रणभोर यांनीं सांगितलें कीं, "परवानगीदाखल आलेले जगन्नाथमहाराज यांचें पत्र माझ्याकडे आहे. परंतु तें आतां सांपडत नाहीं." असें तात्यासाहेब केळकर म्हणतात. इतकें ऐकून मीहि स्वस्थ बसलों. आठ दिवसांनंतर पुन्हां रणभोर गायन-समाजांत आले व म्हणाले, "जगन्नाथ महाराजांनीं पायखाना पाडून टाका व जमीन आमच्या हवालीं करा असें सांगितलें आहे." मी सांगितलें कीं, मालकांच्या व आमच्या संमतीनें हें सर्व झालें आहे तेव्हां मालकांशीं मला काय बोलावयाचें तें बोलेन. रणभोरः—मालकांच्या तर्फेच व मालकांच्या परवानगीनेंच मी बोलतों आहें. मीः—मला तुमच्याशीं बोलण्याची इच्छा नाहीं, पुन्हा तुम्ही या बाबतींत माझ्याकडे येऊं नका. असा बराच वेळ

वाद झाल्यावर रणभोर निघून गेले. पुढें दोन दिवसांनीं तात्यासाहेब केळकर यांजकडून बोलावणें आल्यावरून मी त्यांच्या घरीं गेलों. जगन्नाथ. महाराज माझ्यापूर्वींच तेथें (केळकरांच्या घरीं) येऊन बसले होते.

तात्यासाहेब केळकर:–(माझ्याकडे पाहून) पायखाना व न्हाणीघर काढून टाका असें महाराज म्हणतात.

मी:–अवश्य काढावें.

केळकर:– किती दिवसांत काढतां?

मी:–आपणच तें बांधले आहे; काम चालू असतांना वारंवार आपण येऊन पहात होता. सर्व आपल्या संमतीनें व आपल्याच देखरेखीखालीं झालें असल्यामुळें आपणच तें काढून टाकल्यास अधिक बरें. मी तें केव्हांही काढणार नाहीं.

जगन्नाथमहाराज:—तुम्हास तसें करण्यास आम्ही भाग पाडूं.

मी:—तुम्हास तें शक्य नाहीं.

केळकर:—ज्या जागेवर बांधकाम केलें आहे ती त्यांची जागा गायन–समाजाच्या हद्दीतील ती जागा नव्हे. त्यांना त्या जागेवर नवीन इमारत बांधावयाची असल्यामुळें ती जागा ते मागत आहेत.

मी:—हें बांधकाम करण्यास जगन्नाथमहाराजांनीं दिलेली लेखी परवानगा कोठें आहे?

केळकर:—तें पत्र (दिल्लीहून आलेलें) मला आतां सांपडत नाहीं.

मी:—परवानगी दिली ही गोष्ट खरी आहे. आम्ही आक्रमण केलें नाहीं व आपल्या शब्दांवर विश्वास ठेवून हें सर्व केलें इत्यादि गोष्टीं आपणास कबूल आहेत काय?

केळकर:—मला सर्व कबूल आहे, पण महाराज आतां त्या सर्व गोष्टी नाकबूल करितात त्याला काय करावयाचें?

मी:—जागा मोकळी करून देण्याकरितां हल्लींचें बांधकाम पाडून टाकण्यापेक्षां महाराजांनीं तें आपल्या ताब्यांत घ्यावें व आम्हांस त्याबद्दल

झालेल्या खर्चाची रक्कम द्यावी. कृपा करून रक्कम मिळाल्यास पायखाना व न्हाणीघराची सोय कोठें व कशीं करावयाची हें आम्ही पाहूं.

जगन्नाथ महाराजः—आमच्या परवानगीशिवाय तुम्ही हें बांधकाम केलें असल्यामुळें आम्ही तें ताब्यांत घेऊं इच्छित नाहीं, मग खर्चाची रक्कम देण्याचे लांबच राहिलें.

मीः—तुमच्या व केळकरांच्या संमतीनेंच हें काम झालें आहे, शिवाय या कामास चार वर्षे झालीं. तुम्ही, तुमचे कारभारी कारकून व भय्ये हे सर्व वारंवार इकडे येतात व पायखाना न्हाणीघराचा उपयोग करितात. हें बांधकाम गेली चार वर्षे तुम्ही पहात आहा. असे असतां आजच ही तक्रार कां उत्पन्न होत आहे हे समजत नाहीं. मी जास्त बोलूं इच्छित नाहीं. तुम्हास काय करावयाचें असेल तें करा.

इतकें सांगून मी केळकरांच्या घरांतून बाहेर पडलों.

यानंतर दोन महिन्यांनीं गायन-समाज ज्या जागेवर बांधला त्या सर्व जागेची नवीन भाडेचिठ्ठी करून दिली पाहिजे असा प्रश्न त्यांनीं उपस्थित केला, १९२६ सालीं भाडेचिठ्ठी करून दिली. ती जगन्नाथ महाराज, अध्यक्ष टिळक स्मारक ट्रस्ट, म्हणून करून दिली. आतां १९३८ सालीं जगन्नाथ महाराज, मालक, म्हणून भाडेचिठ्ठी लिहून द्यावी असें आम्हांस सांगण्यांत येऊं लागले. नवीन भाडेचिठ्ठीची मागणी येईपर्यंत टिळक स्मारक ट्रस्टच्या जागेंत गायन समाज आहे अशी लोकांची व आमची समजूत होती. पहिली भाडेचिठ्ठी नोंद करून दिली. ती पाहिली तर टिळक स्मारकाच्या जागेंतच आमची संस्था आहे असेच कोणीहि म्हणेल पुढें जगन्नाथ महाराज जागेची मालकी सांगूं लागल्यानंतर टिळक स्मारकाच्या जागेसंबंधीं झालेले करार व कागदपत्र कशा प्रकारचे आहेत याबद्दल मला शंका उत्पन्न झाली, तथापि या गोष्टीची चौकशी करण्याचें मला कारण नसल्यामुळें मीं त्याबाबतींत स्वस्थच बसलों. पायखाना-न्हाणीघरासंबंधीं तात्यासाहेब केळकर यांच्या घरीं तक्रार झाल्यानंतर जगन्नाथ महाराजांनीं आपलीं माणसें पाठवून पायखाना व न्हाणीघर यांच्या सभोंवतीं काटेरी तारेचें मजबूत कुंपण केलें व आम्हास त्याचा उपयोग

करण्यास प्रतिबंध केला. अन्यायानें प्रतिबंध केल्याबद्दल आम्हास फौजदारी करितां आली असता परंतु आमची कृतज्ञता–बुद्धि आम्ही ढळूं दिली नाहीं. पायखाना व न्हाणीघर १९३५ सालीं आमच्याकडून श्रीमंतांनीं काढून घेतले. संस्थेंत येणाऱ्या विद्यार्थ्यांची अत्यंत गैरसोय होऊं लागली हे पाहून गल्लींतील आजूबाजूच्या लोकास आतिशय चीड आली.

गायन–समाजासमोर आपटे यांच्या घरीं शेतकी कॉलेजचे प्रो. जग-मोहनदास पीतांबरदास त्रिवेदी रहात असत. त्यांनीं हें सर्व प्रकरण पाहि-लेंच होते. गायन–समाजांत येणाऱ्या मुलामुलींची होत असलेली गैरसोय पाहून "पाण्याची व इतर अडचण वाटल्यास आपल्या घरीं या सर्व मुलांनीं यावें. मी घराचा दरवाजा नेहमीं उघडा ठेवीन" असें त्यांनीं स्वतः एक दिवस गायन–समाजांत येऊन मला सांगितलें. याप्रमाणें शेजारच्या सर्व लोकांची सहानुभूति असल्याचें पाहून आम्हासही समाधान वाटलें. तथापि आपल्यापासून इतरास शक्य तो तसदी होऊं नये असें आमचें नेहमींचें धोरण असल्यानें सदर तारेच्या कुंपणालगतच एक लहानशी मोरी येवले कॉंट्रॅक्टरकडून एक दिवसांत तयार करून घेतला व तेथेंच पाण्याचा नळही सुरू केला.

श्रीमंतांनीं अनेक अडचणी उत्पन्न करून संस्थेचें कार्य बंद पाड-ण्याचा बराच प्रयत्न केला. पायखाना व मोरी बंद केल्यानें विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होऊन त्यायोगें विद्यार्थ्यांची संख्या पुष्कळच कमी होण्याचा संभव होता. परंतु आमच्या सुदैवानें सर्व प्रकारें गैरसोय अस-तांनासुद्धां या गैरसोयींच्या वेळींच विद्यार्थी–विद्यार्थिनींची संख्या दुप्पट झाली. गायनसमाजाचें कार्य पूर्वीपेक्षां अधिक जोरानें चालू असून उत्पन्न झालेल्या अडचणीमुळें संस्थेचे चालक मुळींच डगमगले नाहींत हें पाहून श्रीमंतांना रात्रंदिवस चैन पडेना. गायनसमाज हलविण्या-करितां काय उपाय करावा याचा विचार चालू झाला. गायनसमाजाच्या विश्वस्त मंडळांत ( ट्रस्टी ) आपण शिरावें असें श्रीमंतांच्या मनांत आलें. यांच वेळीं श्री. केळकर यांनीं सर्व ठिकाणचे राजीनामे दिलें. त्यांत

आमच्या संस्थेंतील विश्वस्तपदाचा राजीनामा दिल्याचें त्यांनीं आम्हांस कळविलें. परिस्थिती लक्षांत घेतां केळकर यांचा राजीनामा मंजूर करावा लागला. राजीनामा मंजूर केल्याचें त्यांना कळविल्यावर इतर कांहीं कामासाठीं एक दिवस त्यांच्याकडून बोलावणें आल्यावरून गेलों. बोलतां बोलतां नवीन ट्रस्टी कोण घ्यावे यासंबंधीं थोडी वाटाघाट झाली. तात्यासाहेबांनीं आपल्याऐवजीं जगन्नाथमहाराजांचें नांव सुचविलें, परंतु मीं त्यास नकार दिला. प्रा. श्री. म. माटे व चिं. अ. तुळपुळे वकील यांना विश्वस्त नेमल्याचें सांगून मी निघून आलों.

नवीन विश्वस्त नेमले गेले, विश्वस्त होण्याची आपली खटपट व्यर्थ गेली, तात्यासाहेब केळकर यांनीं सांगूनसुद्धां देसाई यांनीं मानलें नाहीं हें समजतांच श्रीमंतांचा राग अनावर झाला. पुन्हां एक दिवस जगन्नाथमहाराज श्री. तात्यासाहेब केळकर यांजकडे गेले व नवीन भाडेचिट्ठी करून घेण्याबद्दल बोलूं लागले. केळकरांचें बोलावणें आल्यावरून त्यांच्या घरीं गेलों. जगन्नाथमहाराज होतेच. मीच बोलण्यास सुरुवात केली व सांगितलें कीं, पूर्वीचें बांधकाम आमच्या ताब्यांत द्यावें अगर त्याची किंमत देऊन नवीन पायखाना व न्हाणीघर बांधण्यास जागा द्यावी, या दोन गोष्टी होत असतील तरच नवीन भाडेचिठी करून देईन.

यावर कडाक्याचा वाद होऊन अखेर वर उल्लेख केल्याप्रमाणें पूर्वीच्या बांधकामाची किंमत व अधिक पाहिजे तेवढी जागा आम्हास मिळाली. अधिक जागा घेतल्याबद्दल जागेचें भाडें पूर्वी दरसाल २ रुपये होतें तें ९ रुपये केलें. १९३८ सालीं श्रीमंतांच्या नांवची मालक म्हणून भाडेचिठी करून दिली.

## थोरांचें नांव, कुटिल डाव

इतकें करूनही श्रीमंतांचें समाधान झालें नाहीं. गायन-समाजाची सर्व जागा काढून घेण्याची इच्छा झाल्यामुळें सदोदित त्याच विचारांत ते असत. विचार करितां करितां एक अजब युक्ति निघाली.

—: संस्थेचे माजी विश्वस्त :—



श्री. न. चिं. केळकर.



प्रा. श्री. म. माटे.

—: विद्यमान विश्वस्त. :—



श्री. चिं. अ. तुळपुळे, वकील.



श्री. गोविंदराव गोखले, इंजिनीअर.



श्री. गोविंदराव देसाई.

श्रीमंतांचे कारभारी एक दिवस गायन–समाजाकडे आले व श्रीमंतांची एक इच्छा म्हणून त्यांनीं निवेदन करण्यास सुरुवात केली. कारभारी म्हणाले कीं, तुम्हास अधिक जागा देऊन संस्थेची आम्ही सर्व प्रकारें सोय करून दिली. टिळक–स्मारक–मंदिराजवळ तुमच्या संस्थेस आम्ही जागा दिली ती टिळकांच्या कृपेनेच तुम्हांस मिळाली असें तुम्ही समजा व टिळकांचें या ठिकाणीं कांहीं तरी स्मारक करा.

ही अनपेक्षित व अजब कल्पना निघाल्याचें पाहून मी त्यांना सांगितलें कीं, तुम्ही असंबद्ध बोलत आहां, तथापि काय करावें तें स्पष्ट सांगा. कारभारी उद्गारले कीं, " टिळक–निकेतन " अशीं अक्षरें एका संगमरवरी दगडावर कोरली आहेत तो दगड तुमच्या गायन–समाजाच्या मुख्य इमारतीच्या मध्यभागीं बसविण्याकरितां आम्ही उद्या घेऊन येऊं, आम्ही आमच्या खर्चानें तो बसवूं. फक्त तुमची संमती असली म्हणजे झालें. मी सांगितलें कीं, "हा दगड आमच्या इमारतींत बसविण्याचा कांहीं संबंध नाहीं. आम्ही ही गोष्ट तुम्हांस करूं देणार नाहीं. यांवर हे गृहस्थ परत गेले. व " चार दिवसांनीं जगन्नाथ महाराज गायन–समाजात येऊन 'टिळक निकेतन' हा संगमरवर तुमच्या इमारतींत बसवितील–तुमची संमति मिळाली नाहीं तर तुम्हांस बाजूस सारून हें काम आम्हास करावे लागेल " अशी चिठ्ठी या गृहस्थांनीं भय्याबरोबर पाठविली. ती चिठ्ठी पहिल्याची साक्ष आजूबाजूचे अनेक लोक देतील. चिठ्ठीप्रमाणें पुन्हां चार दिवसानीं हे गृहस्थ प्रथम आले. मी गायन–समाजाचें काम आटोपून स्नानास जाण्यासाठीं बाहेर आलों तों कारभारी दारांत उभे ! त्यांनीं जगन्नाथमहाराज आल्याची वर्दी मला दिली. मी विचारलें " काय काम आहे ? " कारभारी म्हणाले:— " टिळक–निकेतन कोरलेला संगमरवर महाराजांनीं आणला असून तो गायन–समाजाच्या इमारतींत बसविण्याचा त्यांचा इरादा आहे. या कामीं तुम्ही हरकत कराल तर तुम्हास दूर सारून आम्ही हा कार्यभाग करूं. आम्ही आमच्याबरोबर आमचे भय्ये व इतर चार मंडळींही आणली आहेत. महाराजांनीं मला हें कळविण्यास पुढें पाठविलें आहे. "

मी विचारिलें, महाराज कोठें आहेंत ?

कारभारी:–ते पहा मोटारींत आहेत.. मोटार बादशाही भोजनगृहाच्या चौकांत उभी आहे.

मी:–मोटार दिसली; महाराज कांहीं लोक घेऊन आले आहेत व अरेरावी करण्याचा त्यांचा रोख दिसतो खरा; तथापि टिळक-निकेतन हा दगड मी तुम्हांस वसवूं देणार नाहीं.

कारभारीसाहेब यांनीं काय सांगितलें असेल तें असो, पण महाराजांनीं मोटार परत आपल्या घराकडे वळविली व हें टिळक-निकेतन प्रकरण तितकेंच थांबलें.

## फिर्यादीची घोरपड

टिळक-निकेतन प्रकरण थांबल्यानंतर आपल्या दोस्त मंडळींच्या सल्ल्यानें श्रीमंतांनीं गायन–समाजाच्या तिघा विश्वस्तांना कोर्टांत खेचण्याचें ठरविलें. १९३९ च्या जुलैमधें वकिलामार्फत मला नोटीस देण्यांत आली. भाडेचिठ्ठींतील अटी मोडल्या असल्यामुळें गायन–समाजाची इमारत काढून घेऊन जागा ताबडतोब खालीं करून द्यावी, नाहीं तर कोर्टांत तुमच्यावर फिर्याद करून आम्हांस या गोष्टीची अंमलबजावणी करावी लागेल, असें या राजिस्टर पत्रानें आम्हांस श्रीमंतांनी कळविलें. आम्ही कोणतीही अट मोडली नाहीं सबब जागा खालीं करून देणार नाहीं असें उलट श्रीमंतांना कळविलें. त्यांनीं तिघा ट्रस्ट्रीवर (मी, प्रा. श्री. म. माटे व चिं. अ. तळपळे वकील)· फिर्याद केली. मार्च १९४० मधें कोर्टानें आम्हां तिघांनाहा बोलावणं केलं !

कोर्टांत काम सुरू झालें. फिर्यादीचे मुख्य मुद्दे दोन. पहिला मुद्दा असा कीं, १५ फुटांपेक्षां इमारतीची उंची जास्त नसावी अशी भाडेचिठ्ठीतील अट आहे ती मोडून इमारत १५ फुटापेक्षां अधिक उंच बांधली आहे. व दुसरा मुद्दा असा कीं, आमच्या इमारतीचे पत्रे स्मारक–मंदिराच्या हद्दींत असलेल्या श्रीमंतांच्या इमारतीवर गेले त्यामुळें तें अन्यायानें आक्रमण झालें. १९२७ च्या एप्रील महिन्यांत इमारत बांधून पूर्ण झाली

इमारतीची उंची व अतिक्रमण इमारत बांधल्यापासूनच जें आहे तें आहे. श्रीमंतांना तें सतत बारा वर्षें दिसत होतें. पण शक्य तितका त्रास देऊन पोटांत असलेला दुष्ट हेतु साध्य करण्याची प्रतिज्ञा श्रीमंतांनीं केली होती. त्यास अनुसरूनच हे सर्व उद्योग चालू होते. फिर्याद अर्जीमध्यें आणखी चार मुद्दे होते. " त्यांत टिळक निकेतन हा मुद्दा होताच. सर्वच मुद्दे निराधार व खोटे असल्यामुळें ही फिर्याद अखेर श्रीमंतांना काढून घ्यावी लागली.

श्रीमंत सरदार जगन्नाथमहाराज यांनीं उदार अंतःकरणानें संस्थेस जागेची देणगी देऊन आम्हास उपकृत केल्याबद्दल जगन्नाथमहाराजांचा जाहीर रीतीनें अत्यंत गौरवपूर्ण असा उल्लेख आम्ही करीत होतों व अजू-नही करतों. संस्थेस मूर्त स्वरूप देण्यास तेच कारणीभूत झाले म्हणून संस्थेमार्फत झालेल्या पहिल्या पदवीदानसमारंभाचें अध्यक्षस्थान त्यांना देऊन संस्थेतर्फें त्यांचा जाहीर सत्कार करावा अशी आमची इच्छा होती व त्याप्रमाणें त्यांना विनंती केली परंतु श्रीमंतांनीं तिचा अव्हेर केला. श्रीमंतांचें एक तैलचित्र संस्थेमध्यें असावें म्हणून प्रयत्न केला परंतु तेंही त्यांना आवडलें नाहीं. आमच्या व त्यांच्यामध्यें सलोखा असावा म्हणून शेंकडों वेळां मी स्वतः त्यांच्याकडे गेलों. परंतु नेहमी भाषा उर्मटपणाची बोलत. कितीही नम्रतेनें, शिस्तीनें व चांगुलपणानें वागलों तरी त्यांना ते रुचेना. कावीळ झालेल्या मनुष्याप्रमाणें जगन्नाथमहाराजांची स्थिति झाली. चांगल्या गोष्टीसुद्धां वाईट दिसूं लागल्या व आमच्याबद्दल त्यांचा दृष्टिकोन अगदींच बदलला. जागा दिली त्यावेळचे जगन्नाथमहाराज आज राहिले नाहींत. पूर्वीचें औदार्य व अंतःकरण लोपलें. केवळ जागे-चा लोभ व ती परत मिळेल अशी आशा उत्पन्न झाल्यामुळें आमच्याशीं वागतांना व बोलतांना व्यवहार व शिष्टाचार हे त्यांनीं अजिबात सोडले. वारंवार श्रीमंतीची, पैशाची, आणि वशिल्याची घमेंड सांगूं लागले.

१९२६ सालीं जगन्नाथमहाराजांनीं इमारतीसाठीं जागा दिल्यानंतर गायनसमाजाच्या स्थावर जंगम मिळकतीचें विश्वस्तपत्र (ट्रस्टडीड) केलें. त्यावेळीं तात्यासाहेब केळकर यांच्याबरोबर आपणही ट्रस्टी व्हा

अशी श्रीमंतांना आग्रहाची विनंती केली होती. परंतु त्यावेळीं श्रीमंतांनीं असें सांगितलें कीं, मीं ट्रस्टी झालें पाहिजे असें मुळींच नाहीं, कोणीही ट्रस्टी नेमणें हें तुमच्या इच्छेचें काम आहे, सबब तुम्ही वाटेल ते ट्रस्टी नेमून आपलें कार्य चालू करावें, मला त्याबद्दल कांहीं वाटणार नाहीं. तेच सरदार जगन्नाथमहाराज १९३६ सालीं तात्यासाहेब केळकर यांनीं विश्वस्ताच्या जागेचा राजीनामा दिल्याबरोबर त्या जागीं आपणास ट्रस्टी नेमावें अशी जबरदस्तीची भाषा बोलूं लागले—माटे व तुळपुळे यांचे राजीनामे घ्या व त्यांच्याऐवजीं मी सांगेन तेच विश्वस्त घ्या असली अव्यवहार्य सल्ला श्रीमंत देऊं लागले! अशा प्रसंगीं संस्थेचें कार्य सुरळीत चालण्यासाठीं विश्वस्तांची निवड करणें हें सर्वस्वीं माझ्यावरच अवलंबून असल्यामुळें मला काय करावयाचे तें मी करून पार झालों.

ट्रस्टी होण्यामध्यें त्यांचा काय हेतु होता हें आम्ही पूर्ण जाणून होतों. म्हणून श्रीमंतांनीं या कामीं आकाशपाताळ एक केलें तथापि आम्ही तें सर्व झुगारून दिलें. उलटसुलट मिळालेला सर्व सल्ला ऐकल्यावर अखेर प्रा. माटे व तुळपुळे वकील यांचीच ट्रस्टींच्या जागीं नेमणुक करून आमचें कार्य आम्ही चालू केलें. यावच्चंद्रदिवाकरौ भाडेपट्यानें दिलेली जागा पुन्हा परत घेण्याचा अनावर लोभ उत्पन्न झाल्यामुळें या बाबतींत श्रीमंतांनीं १९३५ ते १९४१ पर्यंत सतत सहा वर्षे जें अकांडतांडव केलें त्याची कल्पना येण्यासाठीं ही हकीगत अगदीं थोडक्यांत लिहिली आहे. खुलासेवार लिहिली तर ग्रंथ-विस्तार होईल. परंतु असल्या हलक्या व वाईट गोष्टींचा खुलासा केव्हांही अधिक करावयाचा नसतो. म्हणून अवश्य तेवढीच हकीकत येथें देऊन दुसऱ्या महत्वाच्या गोष्टींकडे वळतों.

१९२३ सालीं जे अनिष्ट प्रकार घडले त्याचीच पुनरावृत्ती १९३५ सालीं बारा वर्षानंतर झाली. कितीही प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाला तरी हयातीपर्यंत गायन—समाजाचें कार्य सोडावयाचें नाहीं अशी प्रतिज्ञा ज्यानी केली होती,त्यांना आपल्या प्रतिज्ञेचा व कर्तव्याचा विसर पडला. त्या सर्वांचीं मनें भलत्याच गोष्टींकडे ओढ घेऊं लागलीं. दिवसेंदिवस या

भांडणास ऊत येऊं लागला. कोणाचाही स्वतःच्या मनावर ताबा राहीना. शक्य तों एकमेकाचा कमीपणा करण्याकडे सर्वांची प्रवृत्ती वाढूं लागली. आणि यापुढें संस्थेंत पूर्वीप्रमाणें आपला बोज राहणें अशक्य आहे असें वाटूं लागतांच अखेर संस्थेच्या या तहाहयात [ Life Member ] घटकांनीं रजा घेण्यास सुरवात केली. यावेळीं मीं ता. १२।६।३५ रोजीं श्री. कृष्णराव मेहेंदळे यांस—सर्व मंडळींना उद्देशून—पत्र लिहिलें, त्याचा सारांश असाः—

"तुम्ही रजा घेऊन गेलांत तथापि रजा संपतांच पुन्हां पूर्ववत आपल्या कार्यास लागावें. ज्या कारणामुळें तुम्ही सध्या रजा घेतली तीं कारणें अगदींच क्षुल्लक. कांहीं विघ्नसंतोषी लोकांनीं आपला कावा साधण्यासाठीं हे उपद्व्याप केलें त्यामुळें भांडणें उत्पन्न झालीं. एकमेकांचीं मनें बिघडलीं. हलक्यासलक्या लोकांनीं चाहड्या सांगून ही फाटाफूट उत्पन्न केली. या सर्व गोष्टी तुम्हासही समजतात. पुन्हां विचार करून पाहिल्यास या भांडणांना कांहीं किंमत नाहीं असें समजून येईल. तुम्ही आतांपावेतों अत्यंत कष्ट घेऊन संस्थेचें कार्य केलें. तुमच्याइतका अनुभवी जुना व संस्थेचा अभिमानी विद्यार्थी दुसरा नाहीं. आतां तुम्ही चालक म्हणून काम करीत आहां. तेंच कार्य तुम्ही पुन्हां हातीं घेऊन पूर्ववत चालू करावें. तुम्हांस हवीं असतील तीं माणसें साहाय्यास घ्यावीं. संस्थेच्या मिळकतीचा [ उत्पन्नाचा ] विनियोग तुमच्या इच्छेप्रमाणें करावा. सर्व संस्था तुम्ही ताब्यांत घेऊन ती चालविण्याचें धोरण तुम्ही ठरवावें. वाद, भांडणें व आपसांतील कलह हे तेवढ्या वेळेपुरतेंच असतात. त्यांना अधिक किंमत देऊं नये. तुम्ही बारा वर्षे केलेलें कार्य अत्यंत महत्वाचें असल्यामुळें तें तुम्ही हातचें सोडूं नये."

हें पत्र लिहिल्यानंतर आठ दिवस वाट पाहून मी स्वतः एक दिवस दुपारीं एक वाजतां त्यांच्या जुन्या घरीं गेलों. पुष्कळ समजून सांगितलें. उपयोग झाला नाहीं. कृष्णराव मेहेंदळे गेले तसे आणखी अदमासें तीस विद्यार्थी व गायन-समाजाचे दुय्यम शिक्षक गायन-समाज सोडून गेले.

आमचे कित्येक समंजस व विद्वान मित्र व कांहीं खादीभक्त गेलेल्या लोकांची बाजू घेऊन दोन–तीन वर्षेपर्यंत गुप्त रीतीनें आम्हांस विरोध करीत व झगडण्याचा प्रयत्न करून गायन समाज कायमचा बंद होण्यासाठीं त्यांनी शिकस्त केली. १९२३ सालचा प्रसंग बरा म्हणण्याची वेळ आली ! तरीदेखील मनाचें स्थैर्य व धैर्य मीं ढळूं दिलें नाहीं. समाजाचें सर्व काम मीं अंगावर घेतलें.

## कुऱ्हाडीचा दांडा गोत्यास काळ

अशी परिस्थिती क्षणोक्षणीं निर्माण होऊं लागली. परंतु–

हाथी चलत है आपनी गती मो
कुतर भुकत वाको भुकवा दे,
तूतो राम सुमर जग लढवा दे ॥

या कबीराच्या उक्तिप्रमाणें आमचें कार्य चालू होतें. विद्यार्थी **अनंत चिंतामण मराठे, भास्कर गोपाळ चिरमुले, यशवंत श्रीधर मराठे** व इतर दोघे यांना एक दिवस बोलावून प्राथमिक वर्ग घेण्याबद्दल विचारिलें. यावेळीं समाजांत येऊन त्यांना सहा वर्षे होऊन गेलीं होतीं. स्वतः त्यांची गाण्याची जरूर ती तयारी अ न वर्ग घेण्याचें अवश्य तें शिक्षण त्याना मिळालें असल्यामुळें या तिघांनीं या प्रसंगीं चांगली मदत केली. या तिघानींही गायन समाजांत अखेरपर्यंत मोफत शिक्षण घेतलें असल्यामुळें संस्थेंस असल्या बिकट प्रसंगीं सहाय्य करणें आपलें कर्तव्य आहे अशी जाणीव त्यांना यावेळीं झाली व ही कार्य करण्याची संधी त्यानी वाया जाऊं दिली नाहीं. अशा प्रकारें १९३५ साल संपलें.

श्रीरामकृष्ण परमहंस यांचा शतसांवत्सारिक पुण्यतिथी महोत्सव १९३६ च्या मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत पुणें येथील गोखलें स्मारक मंदिरांत थाटानें व उत्साहानें साजरा करण्यांत आला. हिंदुस्थानच्या सर्व भागांतून थोर लोक व पुढारी जमा झाले होते. स्मारकासभोंवतीचें मैदान लोकांनीं भरून गेलें होतें. एकंदर स्त्रीपुरुषांचा समाज अद-

मासें चार ते पांच हजार होता. याप्रसंगीं माझा गाण्याचा कार्यक्रम व्हावा अशी श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं इच्छा प्रदर्शित केली. तीस अनुसरून एक तास गाण्याचा कार्यक्रम केला. हा कार्यक्रम ऐकल्यानंतर गायनसमाजांत अदमासें वीस विद्यार्थी अधिक दाखल झाले. अडचणी व संकटाचा काळ, पण त्यांतसुद्धां संस्थेची प्रसिद्धि व प्रगति होतच होती.

१९३६ सालच्या एप्रिल महिन्यामध्यें एक दिवस सायंकाळीं पांच वाजतां गायनसमाजांत मी एकटाच विचार करीत बसलों होतों. सुखदुःखाच्या प्रसंगांची क्रमाक्रमानें आठवण होत होती. १९३५ सालची गोकुळाष्टमी मोठ्या शिकस्तीनें चांगल्या प्रकारें साजरी केली होती. आपसांतील चुरस व द्वेष अत्यंत वाढलेला. तथापि दोन्ही बाजूच्या लोकांस युक्तिनें सांवरून धरलें. गोकुळाष्टमीस मेहेंदळेआदीकरून सर्वच हजर होते. श्री. पुजारी—मेहेंदळे यांच्या गायनाचे कार्यक्रम होते. परंतु केवळ लोकाग्रहास्तव माझा गायनाचा कार्यक्रम मुद्दाम जाहीर केला होता. या कार्यक्रमामुळेंच गोकुळाष्टमीनंतर नवीन विद्यार्थी—विद्यार्थिनींची संख्या दुप्पट वाढली व कार्य अधिक उत्साहानें सुरू झालें. एकंदरींत भांडणें अत्यंत विकोपास गेलीं होतीं. तरी हा गोकुळाष्टमीचा कार्यक्रम फारच मनोरंजक झाला. वर लिहिल्याप्रमाणें १९३६ सालची गोकुळाष्टमी जवळ आली. विशेष कार्यक्रम असावा, कांहीं तरी नावीन्य लोकांपुढें ठेवावें, गायन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्यें स्फूर्ति उत्पन्न होण्याजोगी नवीन कल्पना निघावी असे अनेक विचार मनांत येऊं लागले. इतक्यांत बाहेर मनुष्य आल्याची चाहूल झाली म्हणून उठून पाहतां तों आमचे जुने मित्र व गोपालगायनसमाजाचे अभिमानी

श्री. वासुदेव दामोदर पळणीटकर

एकाएकीं त्या दिवशीं गायनसमाजांत आले. पळणिटकर हे मल्लविद्याविशारद तथापि गायनकलेचो त्यांना अतिशय आवड. नुसती आवड किंवा शौक नव्हे तर त्या कलेबद्दल त्यांना अत्यंतआदर वाटतो. गायन-

समाजांतील सर्व हकीगत त्यांना कळली होती. आल्याबरोबर घडलेल्या गोष्टीबद्दल त्यांना अतिशय चीड आल्याचें त्यांनीं सांगितलें, ते म्हणाले,

" पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम् ॥"

हा अनुभव केव्हां केव्हां येतोच. गायनकला शिकण्यास चोहोकडे नालाक ठरला तरी त्याला हातीं घेऊन दगडाचा देव बनविला परंतु अखेर तो जातीवर गेला. शेंवटी ते म्हणाले की! " गायन समाजाच्या विरुद्ध हे लोक प्रचार करीत आहेत असे प्रत्यक्ष नजरेस आले सबब आपल्या कार्यास कांहीं हातभर लावतां आल्यास लावावा असा संकल्प करून मी आपणास भेटण्यासाठीं मुद्दाम आलों. अदमासें पसतीस रुपये किंमतीचा चांदीचा पेला तयार केला असून तो पुढील आठवड्यांत आपल्या स्वाधीन करीत आहें. यंदाच्या गोकुळअष्टमीच्या उत्सवांत त्या पेल्याचा कसा उपयोग करावयाचा ते पहावें. "

एवढें सांगून श्री. पळणिटकर आपल्या उद्योगास गेले. ईश्वरकृपेनें या गृहस्थांना सद्बुद्धि होऊन ते अगदीं योग्य वेळीं आले. हें पाहून समाजाच्या सर्व हितचिंतकांस मोठा आनंद झाला.

## पारितोषिकांची पर्वणी

" संगीत–कलेस नवीन प्रोत्साहन"या सदराखालीं 'पळणिटकर फिरता कप' त्याचे नियम व उद्देश यासबंधी खुलासेवार मजकूर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केला. प्रसिद्ध झालेल्या नियमानुसार १९४० सालापर्यंत हे संगीताचे सामने उत्तम प्रकारें पार पडले. पुणे–गांधर्व महाविद्यालय, भारत गायन समाज-पुणे, संगीत भवन–पुणे, गांधर्व महाविद्यालय–कोल्हापूर, गोपाल गायन समाज–पुणे, व बाहेर गांवाहून इतर संगीत–विद्यालयातर्फे व खासगी रीतीनें अध्ययन केलेले दूर दूरचे कित्येक विद्यार्थी या कार्यक्रमांत सामील झाले.

१ ९३६ सालीं या सामन्यांत पुणे गांधर्व महाविद्यालयातर्फे श्री. द. वि. पलुस्कर—गुरुवर्य पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे चिरंजीव—यांनीं भाग घेऊन पहिला नंबर मिळविला.

१९३७ सालीं श्री. मिराशीबुवा यांचे शिष्य कुमार दयानंद कामत हे यशस्वी झाले.

१९३८ सालीं श्री. भास्कर हरि गोडबोले, माजी अध्यापक माधव संगीत विद्यालय ग्वालेर यांचे शिष्य, श्री. राम. कृ. फाटक बी. ए. हे विजयी होऊन त्यांनीं पहिलें बक्षिस मिळाविलें.

१९३९ सालीं दुसरा उमेदवार न आल्यामुळें सदर फाटक यांनाच तो पेला मिळाला.

१९४० सालीं गायन—समाजाचे विद्यार्थी रा. श्री. गो. तळवलकर व बाहेरून आलेले उमेदवार श्री.जयवंतराव वैद्य या दोघांनींच भाग घेतला होता. दोघांनाही समान गुण मिळाल्यामुळें त्यांना सारखीं बक्षिसें देण्यांत आलीं. त्यानंतर या मैफलींत भाग घेण्याकरितां कोणी आले नाहींत. सतत पांच वर्षे हीं मैफल अत्यंत मनोरंजक झाल्यामुळें गायनसमाजाची प्रसिद्धी व लौकिक साहजिकच वाढत गेला. श्री. वासुदेवराव पळणिटकर यांच्या कृपेनें गायनसमाजाच्या कार्यास उत्तम प्रकारची चालना मिळून संस्थेबद्दल लोकांमध्यें मोठा आदर उत्पन्न झाला.

दुसरी एक महत्वाची गोष्ट अशी कीं, वाडिया कॉलेजचे प्राध्यापक श्रीधर भिकाजी बोंडाळें यांनीं गोकळ—अष्टमीच्या उत्सवांत होणाऱ्या गायन—वादनाच्या चढाओढींत भाग घेऊन यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यां-करितां तीन नंबरपर्यंत पारितोषिक देऊं केल्यामुळें गोकुळअष्टमीच्या उत्सवांतील मुलामुलींच्या चक्री गायनाच्या कार्यक्रमास विशेष शोभा येऊं लागली. यावेळीं खुद्द गायनसमाजांत प्रौढ व लहान मुलामुलींची संख्या भरपूर होतीच. त्याखरीज बाहेरून इतर संगीत—विद्यालयातर्फे बरेच विद्यार्थी या कार्यक्रमांत भाग घेण्यासाठीं येऊं लागले.

प्रा. बोंडाळे यांचें पारितोषिक १९३५ सालीं ठेवण्यांत आलें, तें १९३८ सालपर्यंत चालू होतें. त्यानंतर घरगुती अडचणीमुळें त्यांना हा खर्च करणें अशक्य झालें.

१९३८ सालापासून आमचे स्नेही श्री. वामन सीताराम उर्फ बाबूराव गोखले, रिटायर्ड अकौन्टंट, राहणार देशमुखवाडी पुणें, यांनीं मोठ्या संतोषानें आपण होऊन अशींच पारितोषिकें देऊं केलीं. श्री. गोखले हे गुणग्राही, अत्यंत हौशी व दिलदार असून विद्या व कला यांना शक्य तें प्रोत्साहन देण्याची त्यांची इच्छा असल्याचें स्पष्ट दिसून येई. संगीत-कलेचे ते अतिशय शौकी. आमचे दरसाल होत असलेले गोकुळाष्टमीच्या उत्सवांतील विविध व मनोरंजक कार्यक्रम पाहून ते अत्यंत खूष झाले व आपणही या बाबतींत या संस्थेस साहाय्य करावें असें त्यांच्या मनांत येऊन त्यांनीं बक्षिसें देण्यास सुरवात केली. त्यांनीं ठेविलेलीं पारितोषिकें अद्याप चालू आहेत. श्री. शं. सी. हिर्लेकर यांनीं १९४१ सालीं पांच रुपये बक्षिसाकरितां दिले. अशा रीतीनें हीं बक्षिसांची प्रथा प्रा. बोंडाळे यांनीं सुरू केली. ती पुढें श्री. गोखले यांनीं अजूनपर्यंत चालू ठेविली.

तिसरी एक महत्वाची गोष्ट अशी कीं, आमच्या गायन-समाजाची स्थापना झाल्यापासून श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार हे आमचें कार्य कसें चाललें आहे हें विशेष बारकाईनें पहात असत. आमच्या संस्थेंत होणाऱ्या समारंभास ते वेळोवेळीं येत असत. विद्यार्थ्यांचें गायन-वादनाचे कार्यक्रम पाहून मधून मधून ते बक्षिसेंही देत असत. १९२७ सालीं गायन-समाजाच्या इमारतीचा उद्घाटन-समारंभ झाला त्यावेळीं ते हजर होतेच. गायनपद्धतीसंबंधानें त्यांच्या-आमच्यामध्यें मतभेद होत, परंतु श्रीमंत आबासाहेब हे अत्यंत गुणग्राही व थोर मनाचे असल्यामुळें हे मतभेद कार्याच्या आड केव्हांही आले नाहींत. इमारतीसाठीं श्रीमंतांनीं आपण होऊन १०१ रुपये रोख दिले व त्याचवेळीं त्यांनीं आमच्या गायन-समाजांत शिकून तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां शिष्यवृत्तिहि

ठरिली. गायन—समाजाच्या कार्यासंबंधीं त्यांनीं आपलें मत ता. १५।२।२७ रोजीं पाठविलेल्या पत्रांत प्रगट केलं, तें पुढीलप्रमाणें:——

" आपला समाज येथें सुमारें आठ वर्षे सतत शिक्षणाचें काम उत्तम प्रकारं करीत आहे हें मला माहीत आहे. आपण तयार केलेल्या काहीं विद्यार्थ्यांचं गायन-वादन मी स्वतः ऐकिलें आहे. त्यावरून आपली एकंदर शिक्षणाची दिशा उत्तम तऱ्हेची दिसून येतें. आपण समाजाकरितां इमारत बांधीत आहां हें फारच स्तुत्य आहे. सदर इमारत पुरी होऊन आपल्या समाजास पूर्ण सार्वजनिक स्वरूप प्राप्त झाल्यानंतर मी आपल्या समाजांत शिकून तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांस दरसाल तिसे-साठ रुपये पावेतों शिष्यवृत्ति देण्याचा संकल्प ठरविला आहे. तो आपणांस मी मुद्दाम कळवीत आहें. ईशकृपेनें आपण हातीं घेतलेल्या या पवित्र कार्यास यश येवो अशी ईश्वरास माझी मनोभावें प्रार्थना आहे."

या पत्राप्रमाणें श्रीमंत आबासाहेबांनीं प्रत्यक्ष साहाय्य केलें त्याचा उल्लेख वर केलाच आहे. श्री. आबासाहेबांची शिष्यवृत्ति गायन—समाजाचा एक विद्यार्थी भास्कर गोपाळ चिरमुले यांस अद्यापि तीन वर्षे पर्यंत मिळत होती.

## देवच भेटला म्हणावयाचा !

नवीन इमारतीचा उद्घाटन—समारंभ झाल्यावर लगेच तेथें वर्ग सुरू झाले. या वेळीं आम्हांस द्रव्य—साहाय्य कमी असल्यामुळें विजेचे दिवे घेणें शक्य झालें नाहीं. ग्यासची एक बत्ती देणगीदाखल आम्हांस मिळाली होती तिचा उपयोग करीत होतो. दोन किंवा सव्वा दोन रुपयांस रॉकेल तेलाचा डबा त्यावेळीं मिळत असे. एक डबा तीन महिने पुरत असे. विजेपेक्षां खर्चाच्या दृष्टीनें हें आम्हांस अधिक सोयीचें होतें. तथापि यांतही कधीं कधीं अडचण उत्पन्न होई पैशाचा जमाखर्च चि. लक्ष्मणराव पुणतांबेकर यांच्याकडे होता व अजूनही त्यांच्याकडेच आहे.

एक दिवस सकाळीं आठ वाजण्याच्या सुमारास पुणतांबेकर आले व " आज संध्याकाळीं बत्ती लावण्यास रॉकेल शिल्लक नाहीं " असें त्यांनीं

मला सांगितलें. खजिना तपासून पाहतां फक्त तेरा आणे शिल्लक निघाली ! पुणतांबेकर यांनीं आपल्या खिशांतून सहा आणे काढले. एकूण एक रुपाया तीन आणे जमले. आणखी एक रुपाया मिळाल्याखेरीज रॉकेलचा डबा आणतां येईना. एखादा रुपाया उसनवार आणणें अगर उधार माल घेऊन येणें हें मला केव्हांही पसंत नसल्यामुळें पुणतांबेकर व मी दोघेही विचार करीत बसलों. दोन तास विचारांत गेले. दहा वाजले. पुणतांबेकर घरीं जाण्यास निघाले. मी बादशाही भोजनगृहांत स्नानास आण्याकरितां बाहेर पडलों. गायन–समाजास कुलूप घालून आम्ही दोघेही रस्त्यावर जातों न जातों इतक्यांत श्रीमती काशीबाई देवधर यांची गायन–समाजाजवळच गांठ पडली.

काशीबाई:—मी एक दोन वेळ येऊन गेलें पण आपली गांठ पडली नाहीं.

मी:—काय काम होतें ?

काशीबाई:—गायन–समाजास पांच रुपये देणगी देण्याचें कित्येक दिवस मनांत आहे, परंतु विस्मरणानें एकमेकांची भेट न झाल्यामुळें तें आजवर राहून गेलें. आज रुपये देऊन टाकावें असा विचार करीतच येत होतें. असें बोलून त्यांनीं पांच रुपये दिलें ! श्री. काशीबाईना लगेंच पावती दिली व रॉकेलचा डबा खरेदी केला !!

॥ महाराज तो स्वामि कैवल्यदाता ॥
॥ वृथा वाहणें, देह–संसार–चिंता ॥

हेंच खरें.

## संस्कृत कीर्तन


दर शनिवारीं रात्रीं गायन–समाजांत गायन–भजनाचा कार्यक्रम होत असतो. कीर्तनाचाहि अभ्यास करून संधि मिळाली त्या त्या वेळीं मी विद्वान् लोकांच्या समुदायामध्यें कीर्तनास उभा राहिलों व यश मिळविलें. पहिलें कीर्तन ता. २४।३।३२ रोजीं शिवजयंतीनिमित्त पुणें येथील शिवाजी-

मंदिरांत केलें. गायन-समाजांतील गोकुळाष्टमीच्या उत्सवांत ता. २४।८।३२ रोजीं दुसरें कीर्तन केलें. कांहीं देशभक्तांच्या आमंत्रणावरून १९३६ सालीं श्रीरामनवमीच्या कीर्तनासाठीं जातेगांवास गेलों. १९३९ सालच्या श्रीहरीकीर्तनोत्तेजक सभेच्या वार्षिकोत्सव-प्रसंगीं शास्त्रीपंडितांच्या आग्रहावरून संस्कृत भाषेंत कीर्तन केले. तें ऐकून श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य यांना संतोष झाल्यामुळें आचार्य-मठांत संस्कृत भाषेंत कीर्तन व्हावें अशी आचार्यांनीं इच्छा प्रकट केली. आचार्यांच्या आज्ञेप्रमाणें मिती जेष्ठ व॥ १ शके १८६१ ( जून १९३९ ) रोजीं रात्रीं आचार्य-मठांत कीर्तनाचा कार्यक्रम झाला. यानंतर ता. १४ व १५ फेब्रुवारी १९४२ या दिवशीं पुण्यांस द्वितीय संस्कृत साहित्य संमेलनाचें अधिवेशन पंडित राजेश्वरशास्त्री द्रवीड यांच्या अध्यक्षतेखालीं फारच थाटानें साजरें करण्यांत आलें. याप्रसंगीं संस्कृत भाषेंत कीर्तन करण्याची विनंती स्वागत-मंडळानें मला केली. ती मान्य करून रुक्मिणी-स्वयंवर याविषयावर संमेलनाच्या पहिल्याच दिवशीं ( ता. १४।२।४२ ) सदाशिव पेठेंतील ब्राम्हण कार्यालयाच्या प्रशस्त दिवाणखान्यांत कीर्तनाचा कार्यक्रम झाला. पंडित राजेश्वरशास्त्री, हिंदुस्थानच्या निरनिराळया भागांतून आलेले शास्त्री-महामहोपाध्याय, मीमांसा-विद्वान्, न्याय-विद्वान्, पुण्यांतील महाविद्यालयांचे प्राध्यापक, संगीत विद्यालयाचें चालक; श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. ज. स. करंदीकर, व इतर अनेक पुढारी व थोर गृहस्थ, त्याचप्रमाणें कॉलेजचे विद्यार्थी यांची हा कार्यक्रम ऐकण्यास खूपच गर्दी झाली होती. कीर्तन दोन तास झालें. कीर्तनानंतर पंडित राजेश्वरशास्त्री द्रविड,सुब्रम्हण्यशास्त्री पाटणकर, पुरुषोत्तमशास्त्री रानडे, मिरजकर-शास्त्री,उंबरकरशास्त्री यांचीं भाषणें झालीं. सर्वांनीं या कीर्तनाबद्दल अपार आनंद व्यक्त केला. बेळगांव येथील " गीर्वाण वाग्वर्धिनीं व मधुर वाणी " या दोन संस्थेतर्फे या कीर्तनाबद्दल मला सुवर्ण-पदक देण्यांत आलें. मराठी व संस्कृत भाषेत कीर्तनें करण्याच्या बाबतींत वे चिंतामणशास्त्री गुर्जर यांची मदत मला चांगली झाली. हा कीर्तनाचा कार्यक्रम होतांच पुन्हां विश्रांतीसाठीं उगारास गेलों व तेथून तीन माहेन्यानीं मी परत आलों.

नंतर एक दिवस सकाळीं पुरंदरे-वसाहतींत जागेचा शोध करीत असतां श्री. गोविंदराव गोखले इंजिनीअर यांची भेट झाली. आठवले कंत्राटदार यांनीं केलेल्या फिर्यादीच्या वेळीं इमारतीची किंमत करण्यासाठीं दोन पंच नेमिले. त्यांपैकीं श्री. गोखले हे एक पंच होते. याच वेळीं त्यांचा परिचय झाला व तो पुढें वाढत गेला. मला रहावयास चांगली जागा मिळत नाहीं असें पाहून त्यांनीं आपल्या "हरिहर निवास" मधें तिसऱ्या मजल्यावर माझी राहण्याची व्यवस्था केली. ही जागा शांत व स्वच्छ असल्यामुळें प्रसन्न मनानें माझीं कामें मला तेथें करितां येतात. जून १९४२ पासून मी त्यांच्या घरीं राहूं लागलों. घरच्या मनुष्याप्रमाणें माझी सर्व सोय त्यांनीं करून दिली. हल्लीच्या कठीण परिस्थितिंत दुसऱ्या-करितां एवढी तसदी सहन करणें अगदींच अशक्य. श्री. गोविंदराव गोखले नेहमींच अशा रीतीनें पुष्कळांना साहाय्य करितात यावरून त्यांचा स्वभाव, मन व अंतःकरण कसें आहे हें निराळें सांगावयास नको. श्री. गोखले यांना सार्वजनिक कार्य करण्याची हौस व उमेद असल्यामुळें पुण्यांतील अनेक कार्यक्षेत्रांत वावरताना ते दिसून येतात. ता. ३ जानेवारी १९४३ रोजीं प्रा. श्री. म. माटे यांनीं गोपालगायनसमाजाच्या विश्वस्तपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागीं कोणास नेमावें अशा विचारांत मी पडलों. अनेकांची नांवें पुढें आली पण संसाराप्रमाणेंच संस्थेचें हित पाहणारे गोविंदराव गोखले यांच्याखेरीज दुसरे विश्वस्त दिसेनात. श्री. गोखले यांना विश्वस्त होण्याची विनंती केली, ती मान्य करून ता. १।३।४३ पासून विश्वस्त या नात्यानें ते आमच्या संस्थेंत काम करूं लागले.

संस्थेंत शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं श्री. दत्तात्रेय मोरेश्वर जोशी, श्रीकृष्ण गोपाळ तळवलकर, यशवंत श्रीधर मराठे यांनीं अनुक्रमें श्रीकृष्ण संगीत विद्यालय, नूतन संगीत विद्यालय व श्रीधर संगीत विद्यालय अशीं तीन विद्यालयें सुरू केलीं. त्यांपैकी जोशी यांचें विद्या-

लय पुणे येथें आप्पाबळवंत चौकांत असून ते आपलें कार्य गेलीं बारा वर्षें उत्तम तऱ्हेनें करीत आहेत. तळवलकर यांचें विद्यालय सांगलीस असून त्याचेंही काम व्यवस्थित चालू आहे. श्री. मराठे यांनीं पुणे येथें नव्या विष्णूनजीक विद्यालय सुरू करून संगीताचें कार्य चांगल्या तऱ्हेनें चालविलें आहे. पंढरपुरचे रहिवासी श्री. सोपान आत्माराम पराते यांनीं आमच्या संस्थेचे नियम मान्य करून आपली संस्था गोपाळगायनसमाजास या वर्षापासूनच जोडली आहे.



प्रकरण १० वें

# गायकाचा दर्जा

फर्ग्युसन कॉलेजच्या ॲंफी थिएटरमधें १९३१ सालीं कॉलेजचें वार्षिक संमलन होतें. तेथील विद्यार्थी गायनाचा कार्यक्रम ठरविण्यासाठीं मजकडे आले. साथीदाराच्या व जाण्यायेण्याच्या खर्चाखेरीज नव्वद रुपये आम्हांस देण्याचें नक्की होऊन विद्यार्थी परत गेले. फक्त नाटकांतील पदें म्हणणारा गायक असल्यास अधिक चांगलें असा फेरविचार होऊन तेंच विद्यार्थी पुन्हां मजकडे आलें व "आपण अलिकडील नाटकांतील पदें म्हणतां किंवा कसें ?" असा त्यांनीं प्रश्न केला. मी सांगितलें कीं, ज्या चाली तुम्हांस आवडतात त्याच चालीवर मराठी भाषेंतील सुबोध पदें म्हटलीं तर हा कार्यक्रम तुमच्या इच्छेप्रमाणें साजरा होईल. पण हें ऐकून त्यांचें समाधान होईना. केवळ शृंगारिक, अश्लील पदांवरच ते नेहमीं खुष असल्यामुळें त्यांना पाहिजे तसा गायक त्यांनीं तावडतोब शोधून काढला व कार्यक्रमापूर्वी दोनच तास मला नकार दिला.

महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीं ही अनुदार व हलकी वृत्ति पाहून वाईट वाटलें. ज्या तारखेस रात्रीं गाणें होतें त्या तारखेस सायं-काळीं सम्मेलनाच्या कार्यकारी मंडळास निरोप पाठविला कीं, आगाऊ ठरल्याप्रमाणें साथीदारासह नियमित वेळीं मी फर्ग्युसन कॉलेजच्या ॲंफी थिएटरमध्यें हजर होत आहे. निरोप ऐकल्याबरोबर सर्वच गोंधळ

उडाला. प्रिन्सिपलसाहेबांकडे विद्यार्थी गेले. झालेल्या मूर्खपणाबद्दल प्रिन्सिपलनीं विद्यार्थ्यांची कडक शब्दांत कानउघाडणी करून देसाई यांची लेखी क्षमा मागितली पाहिजे असें सांगितलें. विद्यार्थी पेचांत सांपडल्यामुळें दिलगिरी प्रदर्शित केल्याचें पत्र घेऊन मजकडे आले. मीं तें पत्र तर ठेवून घेतलेंच पण हें प्रकरण शांतपणें मिटविण्यासाठीं रोख रुपये पन्नास त्यांच्याकडून घेतले व विद्यार्थ्यांना रजा दिली. ही हकीगत समजल्यावर नाटकांतील पदें गाणारा गायकदेखील नाखूष होऊन आयते वेळीं न गेल्यामुळें गायनाचा कार्यक्रम अखेर झालाच नाहीं. आजच्या युगांत गायकांनीं आपला बाज कसा राखिला पाहिजे हें मला दाखवावयाचें होतें.

## विलंब कां ?

गगन बावडा संस्थानचे अधिपती श्रीमंत बाळासाहेब पंत अमात्य यांनीं पुन्हां १९२९ सालीं श्रीरामनवमीउत्सवास गाण्याच्या कार्यक्रमासाठीं विशेष अगत्यानें व आग्रहानें बोलाविल्यावरून बावड्यास मी गेलों. या वेळीं बावड्यास दीड महिना मुक्काम करावा लागला. रामनवमीनंतर मधून मधून आसच्या गायनाचे जलसे होतच होते. श्री. गोविंदराव टेंबे व इतर प्रसिद्ध गायक व गुणी लोक पुष्कळच आले होते. आम्हीं जाण्यापूर्वी गायनाचे आणखी दोन कार्यक्रम राजवाड्यांत व्हावे अशी श्रीमंतांचीं इच्छा होती. त्याप्रमाणें पहिला कार्यक्रम दिवसा चार वाजतां होण्याचें निश्चित झालें. मी सर्वशिष्यगणासह राजवाड्यांत हजर झालों. दरबारचे मानकरी, परठिकाणाहून आलेले गायनाचार्य व वादनाचार्य आणि इतर श्रोतेजनांची दरबारांत गर्दी झाली होती. वाद्यें जुळवून बरोबर चार वाजतां गाण्यास आरंभ करणार इतक्यांत श्रीमंतानीं थोडा वेळ थांबण्यास सांगितलें. चार वाजून दहा मिनिटें झालीं. थांबण्याचें कारण समजेना. म्हणून श्रीमंतांनाच मोठ्या नम्रतेनें विचारिलें. श्रीमंतांनीं सांगितलें कीं, आमचे डॉक्टर व वैद्य चहा घेऊन येत आहेत त्यांची वाट पहात आहे. श्रीमंताचे हे शब्द जरा चमत्कारिक वाटले. वास्तविक सरकारस्वारी गादीवर येऊन बसण्यापूर्वीं या गृहस्थांनीं दरबारांत हजर व्हाव-

यास पाहिजे होते. पण तसें न होतां उलट प्रकार झाला.तो कोणासही पसंत पडला नाहीं. तें पाहून मी श्रीमंतांना अगदीं शांतपणें व नम्रतेनें सांगितलें कीं,

" मी खुद्द श्रीमंतांच्या आमंत्रणावरून श्रीरामचंद्रप्रभूच्या व श्रीमंतांच्या सेवेकरितां येथें आलों. श्रीरामरायाचें भव्य–सुंदर चित्र समोर असून सरकारही स्वत: वेळेवर दरबारमध्यें हजर आहेत. अशा स्थितींत इतरेजनांची वाट पाहण्याची मला जरूर वाटत नाहीं. वाद्यें जुळविल्यावर तीं नुसतीं हातीं घेऊन तिष्ठत बसल्यानें साथीदारांना किंचित् कंटाळवाणें वाटतें व आळस येतो आणि त्याचा कार्यक्रमावर परिणाम होतो. यासाठीं अधिक वाट न पाहतां गाण्यास सुरवात करावी असें मला वाटतें."

माझ्या बोलण्याचा एकंदर रोख पाहून श्रीमंतांनीं लगेच सुरवात करण्यास सांगितलें. दुसरा व शेवटचा कार्यक्रम सकाळीं झाला. त्यांत "कृति विधिची अघटित भासतसे मज दैन्य सदा विबुधा मूढा विपुलें धनातें देई ॥" हें पद गाइलें. वास्तविक हें पद ऐकून श्रीमंत नाराज होतील असें मला वाटलें होतें. परंतु हें पद भर दरबारांत गाण्याचा माझा उद्देश ध्यानीं आणून नाखूष होण्याऐवजीं ते फारच खूष झाले व जातेवेळीं रोख रुपये शंभर व जरीचीं वस्त्रें त्यांनीं दिलीं. लवकरच एक हजार रुपये पाठवीन, असें वचन देऊन त्यांनीं आमची पाठवणी केली. पण श्रीमंत अर्धांगाच्या विकारानें एकाएकींच वारल्यामुळें हजार रुपयांचें नुकसान झालें.

## भालदाराला समज

ग्वाल्हेरीस १९२७ सालीं छत्रपती शिवाजीमहाराजांचा त्रिशतसांवत्सरिक उत्सव अत्यंत थाटानें साजरा करण्यांत आला. उत्सवमंडळ व राणीसरकार यांच्या आमंत्रणावरून मी विद्यार्थिगणासह ग्वाल्हेरीस गेलों.

श्रीमंत सरदार दाजीसाहेब आपटे

यांजकडे आमची राहण्याची सोय केली होती. ग्वाल्हेरीस व आजूबाजूच्या शहरीं गाण्याचे व ऐतिहासिक पोवाड्यांचे कार्यक्रम पुष्कळच झाले. ठिकठिकाणीं सन्मानही चांगला झाला. श्रीमंत दाजीसाहेब,

त्यांचे तीन चिरंजीव व घरची इतर सर्व मंडळी दिलदार स्वभावाची असल्यामुळें आम्हीं परठिकाणीं राहिलों असें केव्हांही वाटलें नाहीं. श्रीमंत दाजीसाहेब यांचे मधले चिरंजीव श्रीमंत भाऊसाहेब हे पुण्यास असतांना आमच्या गायनसमाजांत शिकावयास येत असत. ते पुण्याहून ग्वाल्हेरास परत गेल्यावरच आम्हास ग्वाल्हेरास जाण्याचा योग आला. आमचा मुक्काम ग्वाल्हेरीस दोन महिने होता. आणखी दोन महिने आम्ही तेथें राहावें असा लोकांचा आग्रह होता. परंतु त्याचवेळीं पुण्यास साहित्य-सम्मेलनाचें अधिवेशन श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखालीं व्हावयाचें ठरलें व आम्हास तशी आमंत्रण-पत्रिकाही आली. शिवाय प्राध्यापक दत्तोपंत पोतदार ग्वाल्हेरास कांहीं कामानिमित्त आले होते, ते मला येऊन भेटले व साहित्यसम्मेलनाकरितां पुण्यास आलें पाहिजे असें त्यांनीं सांगितल्यावरून आम्ही परत जाण्याचें ठरविलें व तसें श्रीमंत राणीसाहेब यांना कळविलें. जाण्यापूर्वी शेवटचा गाण्याचा एक कार्यक्रम करून चला असें राणीसरकारांनीं सांगितलें. त्याप्रमाणें ठरल्या वेळीं आम्ही राजवाड्यांत हजर झालों. ग्वालेरचे सरदार श्रीमत चन्द्रोजीराव आंग्रे, शितोळे, घोरपडे, फाळके, आपटे व शहरांतील सर्व थोर गृहस्थ व सरकारी अमलदार या कार्यक्रमास हजर होते. कार्यक्रम तिसऱ्या मजल्यावर होता. तेथें राणीसरकारचे भालदार-चोपदार उभे होते. त्यापैकीं एकानें मला विचारिलें, " तुम्ही पादत्राण घालून वर कसे आलांत ?

मी:—कसे म्हणजे ? नेहमींप्रमाणें.

भालदार:—( रागानें ) आलांत तसे खालीं जा व पहिल्या मजल्यांत पादत्राणें ठेवून मग वर या.

मी:—पहिल्या व दुसऱ्या मजल्यांत शिपाई उभे आहेत त्यांनीं आम्हांस हें सांगावयास पाहिजे होतें. ही चूक त्या शिपायांची आहे; आमची नाहीं. आम्ही केवळ पादत्राणें काढण्यासाठीं तीन मजले उतरून खालीं जाणार नाहीं.

भालदार:—येथें पादत्राणें ठेवितां येत नाहींत.

मीः—आम्ही आमचीं पादत्राणें येथें काढणार, तुला कोठें नेऊन ठेवावयाचीं असतील तेथें तूं नेऊन ठेव.

भालदारः—तळमजल्यांत जाऊन पादत्राणें ठेवून या म्हणून आतांच तुम्हांस सांगितलें.

मीः—पादत्राणें काढून ठेवण्यासाठीं आम्हांस पुन्हां तीन मजले उतरून खालीं जावें लागत असेल तर आम्ही पुन्हां वर येऊन कार्यक्रम करणार नाहीं. कार्यक्रम करावयाचा असेल तर येथेंच पादत्राणें काढून ठेवूं व कार्यक्रमास सुरुवात करूं. असा हा भालदाराशीं चालूं असलेला वाद बराच विकोपास गेला. राणीसरकार वीस फूट अंतरावर पडद्यामध्यें होत्या. जमलेला श्रोतृसमाज अगदींच जवळ होता. शिपायाची व आमची बोलाचाली सर्वांच्या कानावर गेली. श्रीमंत दाजीसाहेब आपटे यांचें थोरले चिरंजीव श्रीमंत अण्णासाहेब लगेच आमच्याजवळ आले. त्यांनीं शिपायाची चांगली कानउघाडणी केली, आम्हांस पादत्राणें तेथेंच काढावयास सांगून कार्यक्रमाच्या जागीं घेऊन गेले. गाण्याचा कार्यक्रम झाल्यावर राणीसरकार व इतर सरदारमंडळींचा निरोप घेऊन बाहेर पडलों. शिपायानें केलेल्या चुकीमुळें तो नोकरीवरून कमी होण्याचा संभव आहे असें समजतांच ग्वालेर सोडण्यापूर्वी तसें न होण्याबद्दल एक दोन सरदारांस भेटून सांगितलें व ग्वालेरचा मुक्काम हालविला.

## समान बैठक हवी

मुधोळच्या राणीसरकार नेहमींप्रमाणें पुण्यास आल्या असतांना त्यांना आमचें गायन ऐकण्याची इच्छा झाली. प्रा. वा. गो. मायदेव व श्री. य. रा. दाते ( महाराष्ट्र शब्द कोशमंडळ ) हे माझ्याकडे आले व त्यांनीं हा कार्यक्रम ठरविला. राणीसाहेबांकडून मोटार आल्यावर आम्ही गेलों. ज्या बंगल्यांत राणीसाहेब रहात होत्या त्या बंगल्याच्या मध्यभागीं दिवाणखान्यांत बैठकीची व्यवस्था केली होती. श्रोतेमंडळीकरितां चोहोबाजूस मोठमोठे मखमलचे कोच व खुर्च्या ठेविल्या होत्या. आमच्याकरितां जमिनीवरील सतरंजीवर फक्त एक गालिचा घालून ठेविला होता. वास्तविक गायक, वक्ता, प्रवचनकार अगर पुराणिक यांचें आसन श्रोत्यापेक्षां उंच पाहिजे ही गोष्ट कोणालाही सहज समजण्यासारखी आहे.

परतुं या ठिकाणीं या थोर लोकांनीं इकडे लक्षच दिलें नाहीं. कार्यक्रम करणारा मनुष्य श्रोत्यापेक्षां दोन हात खालीं बसला तर दिसतांनादेखील तें विसंगत दिसतें. परंतु हें कोणी कोणास सांगावयाचें? बरें, आमचा कार्यक्रम ज्यांनीं ठरविला त्यांनीं तरी आमची बसण्याची व्यवस्था योग्य रीतीनें करावयास पाहिजे होती. परंतु तेही श्रीमंतांच्या दरबारांत रंगल्या-मुळें आम्हांस विसरलें. आम्ही मोटारमधून उतरलों तों दिवाणखान्यांत आलों व सर्व व्यवस्था पाहून लगेच परत जाण्याचें ठरविलें. श्रीमंतांच्या चपराशांनीं आम्ही परत निघाल्याचें वर्तमान राणीसरकारांच्याकडे कळ-विलें. एका गृहस्थांनीं येऊन आम्हांस बसण्यास सांगितलें.

मी:—कोठें बसावयाचें ?

गृहस्थ:—गालिच्यावर.

मी:—इतक्या खालच्या आसनावर बसून कार्यक्रम करणें सोयीचें होणार नाहीं.

गृहस्थ:—मग तुम्हांस काय पाहिजे ?

मी:—सभोंवतीं ठेवलेले कोच व खुर्च्या यापेक्षां आमची बैठक अधिक उंच पाहिजे, तें नाहीं तर नाहीं पण निदान श्रोत्याची व आमची बैठक सारख्या प्रमाणांत उंच ठेवा. असें झालें तरच कार्यक्रम करणें सोईचें होईल नाहीं तर जमणार नाहीं.

गृहस्थ एका पडद्यांत शिरले व थोड्या वेळानें बाहेर येऊन आम्हांस पाहिजे तशी व्यवस्था त्यांनीं केली. तेवढ्या अवधींत सर्व मंडळीं जमली. दोन तास कार्यक्रम झाल्यावर रात्रीं १ च्या सुमारास गायनसमाजाकडे परत आलों.

## प्रकरण ११ वें

# आनंदमूर्तींचें प्रकरण

पुण्यास छत्रपती शिवाजीमहाराजांचा जन्मोत्सव दरसाल थाटानें साजरा केला जातो. आट्यापाट्या, हुतुतु, खोखो, इत्यादि मर्दानी खेळ, व ऐतिहासिक पोवाडे, व्याख्यानें, कीर्तन असा विविध व मनोरंजक कार्यक्रम तीन दिवस चालू असतो त्यांत ऐतिहासिक पोवाडे व कीर्तन हे मुख्य व महत्वाचे कार्यक्रम. सन १९३४ सालच्या शिवजयंतीकरितां मसूर–ब्रम्हचर्याश्रमाचे चालक श्री. विनायकबुवा मसूरकर यांचे शिष्य आनंदमूर्ती डिग्रजकर यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम ठरविला होता. आनंदमूर्ती पुण्यांत आल्यावर मला येऊन भेटले.

“ शिवाजी–मंदिरांत आज माझें कीर्तन आहे. तुम्हीं सर्व कामें सोडून कीर्तनाच्या वेळीं हजर राहण्याची तसदी घेतली पाहिजे. ”

अशी विनंती त्यांनीं केली. याच वेळीं विनायकबुवा व आपण यांच्यामध्यें अतिशय द्वेष माजल्यामुळें आपण हल्लीं मसूर ब्रह्मचर्याश्रमाचा संबंध कायमचा सोडल्याचें त्यांनीं सांगितलें. शिवजयंतीच्या कीर्तनांत मारामारी करून कीर्तन बंद पाडण्याचा मसूराश्रमांतील कांहीं लोकांचा विचार असल्याचेंही आनंदमूर्तींनीं मजजवळ ध्वनित केलें.

ज्या दिवशीं शिवाजी–मंदिरांत हें कीर्तन होतें त्याच दिवशीं ( ता. ४ मार्च १९३४ ) ‘ श्रीकृष्ण संगीत विद्यालय पुणें ’ या संस्थेचें वार्षिक संमेलन असून त्यावेळीं होणारा बक्षिस–समारंभ नूतन मराठी

विद्यालयाच्या सभागृहांत रात्रीं ९ ते १२ पर्यंत माझ्या हस्तें होण्याचें आगाऊ पंधरा दिवस ठरून तसें जाहीरही झालें होतें. सबब या कीर्तनास प्रथमपासून हजर राहणें मला शक्य नव्हतें. 'समारंभांतून मोकळा झाल्यावर शिवाजी–मंदिरांत येण्याचें करितों' असें आनंदमूर्तींना मीं सांगितलें.

त्याच दिवशीं दुपारीं श्री. सदाशिवराव गोडबोले मजकडे आले व "शिवाजी–मंदिरांत कीर्तनाच्या वेळीं कांहीं तरी विशेष प्रसंग घडून येण्याचा रंग दिसतो आहे. आपण श्रीकृष्ण संगीत विद्यालयाचा बक्षिस-समारंभ शक्य तों लवकर आटोपून शिवाजी–मंदिरांत यावें" असें त्यांनींही मला सांगितलें. मला येण्यास वेळ होईल, तुम्ही वेळेवर मंदिरांत जावें असें श्री. गोडबोले यांना मी सांगितलें श्री. सदाशिवराव गोडबोले प्रथमपासूनच शिवाजीमंदिरांत हजर राहिले होते.

कीर्तन सुरू होऊन अर्धा तास होतो न होतो तोंच मसूर–ब्रम्हचर्याश्रमांतील बायका–पुरुषांचें एक टोळकें हातांत डांबराची गाडगीं व काठ्या घेऊन शिवाजीमंदिरांत आले. ब्रम्हचारी–आश्रमांत बायका असतात ही गोष्ट याचवेळीं लोकांच्या नजरेस आली. या बायका–पुरुषांनीं एकदम सभेंत घुसून कीर्तन करीत असलेल्या आनंदमूर्तींवर डांबर व जोडे फेकून त्यांच्यावर काठ्यांचा हल्ला केला.

श्री. सदाशिवराव गोडबोले यांनीं मसूराश्रमांतील लोकांवर चाल करून सर्वांचीं टाळकीं, नारळ फोडतात तशीं फोडलीं त्यामुळें या सर्व ब्रम्हचाऱ्यांना बरोबर आणलेल्या विधवा व सकेशा यांच्यासह जीव घेऊन पळावें लागलें. श्री. गोडबोले यांच्या या धाडसाचें शिवाजी–मंदिरांतील हजारो लोकांनीं मोठें कौतुक केलें. साहजिकच आहे. गोडबोले नसते तर आनंदमूर्तींचा शिवाजीमंदिरांत कदाचित खूनही झाला असता. परंतु श्री. गोडबोले यांच्या कृपेनें आनंदमूर्ती जिवंत सुटले.

असा भयंकर प्रसंग आल्यामुळें साहजिकच कीर्तन बंद होऊन कीर्तनासाठीं जमलेला हजारो लोकांचा श्रोतृसमाज या भयानक व चमत्कारीक

घटनेची वाटाघाट करीत अदमासें ११॥–१२ पर्यंत शिवाजीमंदिरांतच थांबला होता. बारानंतर सर्व लोक आश्चर्य करीत आपआपल्या घरीं गेलें.

श्रीकृष्ण संगीत विद्यालयाचा बक्षीस-समारंभ आटोपून मी तेथून पावणे बारा वाजता निघालों व बाराच्या सुमारास शिवाजीमंदिराजवळ आलों; तों लोकांचा प्रचंड समुदाय घडलेल्या प्रकाराची वाटाघाट करीत मंदिरांतून नुकताच बाहेर पडत होता. आनंदमूर्ती शिवाजी–मंदिरांतून मी येण्यापूर्वींच कोठे तरी सुरक्षित ठिकाणीं गेल्याचें मला समजलें. शिवाजी–मंदिराजवळ येतांच लोकांनीं घडलेली सव हकीगत मला सांगितली. ती हकीगत ऐकून मी घरीं परत आलों.

दुसरे दिवशीं आनंदमूर्ती स्वतः घरीं आले व शिवाजी मंदिरांत घडलेला सर्व वृत्तांत त्यांनीं मला निवेदन केला, व बाहेरगांवीं न जातां पुण्यासच आपल्याजवळ कोठें तरी राहिलें पाहिजे असें ते बोलले. त्यांचा जीव रात्रंदिवस धोक्यांत असल्यामुळें ते फार सावधगिरानें राहात. शिवाजी–मंदिरांतलि मारामारीनंतर मसूराश्रमाचे लोक फारच खवळले. आनंदमूर्तींच्या हालचालीवर त्यांची गुप्त नजर असे. एक दिवस सायंकाळीं साडेपांचच्या सुमारास आनंदमूर्तींच्या राहत्या ठिकाणीं मसूराश्रमाचे कांहीं लोक एकदम गेले. त्यांना पहातांच घराच्या मागील बाजूनें आनंदमूर्ती बाहेर पडले. ते पळत गोपाल गायन समाजाकडे आले. त्यांच्या-मागोमाग मसूराश्रमाचे लोकही गायनसमाजाजवळ आले. आनंदमूर्तींना आम्हीं गायन समाजाच्या कचेरींत बसावेलें होतें.

" आनंदमूर्ती येथें आले आहेत त्यांना बाहेर पाठवा " असें या आश्रमस्थांनीं मला सांगितलें.

" आनंदमूर्ती बाहेर येणार नाहींत " मीं उत्तर दिलें.

" बाहेर येणार नाहींत तर येथेंच मारामारी होईल " असें त्यांपैकीं एकजण बोलला.

मी सांगितलें, " माझी तुमच्याशीं दोन हात करण्याची तयारी आहे." एवढें बोलतांच ते लोक मुकाट्यानें निघून गेले.

आनंदमूर्ती त्यानंतर आठ दिवस माझ्या घरींच रहात होते. परंतु पुढें बाहेर पडल्याखेरीज भागणार नाहीं असा विचार करून आनंदमूर्तींचें कीर्तन पुन्हा शिवाजी-मंदिरांतच करण्याचें आम्ही ठरविलें. बाहेर मैदानांत आनंदमूर्ती कार्यक्रमास आले तर त्यांचा निकाल करण्याच्या इराद्यानें मसूराश्रमांतील लोकांनीं पुण्यांत तळ दिला होता.

दुसरी बाजू अशी कीं, आनंदमूर्ती आमच्या आश्रयास आहेत तोपर्यंत मसूरकर त्यांचें कांहीं करूं शकत नाहींत हें आम्हांस जाहीर रीतीनें सिद्ध करून दाखवावयाचें होतें. सर्व तयारी करून आनंदमूर्तीचें कीर्तन ता. १६।३।३४ रोजी रात्रीं ९॥ वाजतां शिवाजी-मंदिरांत होणार असून सर्वांनीं श्रवणांस अगत्य यावें असा मजकूर माझ्या सहीनें सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला. मसूराश्रम व आनंदमूर्ती यासंबंधीं पुणें शहरांत घरोघरीं चर्चा चालूच होती. आनंदमूर्तीचें कीर्तन पुन्हां एकवार शिवाजी-मंदिरांतच व्हावें अशा सूचना लोकांकडून दररोज येत होत्या. इतक्यांत शिवाजीमंदिरांत कीर्तन होणार असल्याचा मजकूर वर्तमानपत्रांत वाचून लोकांना बरें वाटलें.

ता. ४ मार्च रोजीं रात्रीं घडलेल्या प्रसंगामुळें श्री. आनंदमूर्तीबद्दल पुणेंकर मंडळींत बरेंच कुतूहल उत्पन्न झालें होतें आणि त्यांना पाहण्याच्या उत्सुकतेनें शिवाजीमंदिरांतील कीर्तनास स्त्रीपुरुषांची व विद्यार्थ्यांची खूपच गर्दी झाली होती. त्यांत कीर्तनाला हजर न राहणारीहि कित्येक मंडळी दिसत होती. ता. ४ मार्चच्या रात्रींची पुनरावृत्ती होऊं नये म्हणून आम्ही कडक बंदोबस्त ठेविला होता. प्रत्यक्ष कीर्तनाच्या वेळीं शिवाजी-मंदिराच्या आवारांत स्वयंसेवकांची चोहोंकडे पेरणी झालेली दिसत होतीच पण त्याशिवाय कीर्तन सुरू होण्यापूर्वींही शिवाजी-मंदिराच्या बाहेरील चारी बाजूंच्या रस्त्यावर सायकलस्वारांची फिरती-गस्त ठेवण्यांत आली होती. कीर्तनास डॉ. गोपाळराव पळसुले, उत्सव मंडळाचे चिटणीस श्री. गोडबोले, स्वयंसेवक मंडळाचे प्रमुख श्री. सदाशिवराव गोडबोले, ही मंडळी विशेष सावध असल्याचें दिसत होतें. श्रोतृसमाजांत श्री. दा. वि. उर्फ बाबूराव गोखले, श्री. रा. गो. भिडे,

श्री. रामभाऊ सहस्रबुद्धे, देशदास रानडे, श्री. चित्रावशास्त्री इत्यादि मंडळी प्रामुख्यानें दिसत होती.

आगाऊ ठरल्यावेळीं कीर्तन उभें राहिलें. श्री. आनंदमूर्तींनीं शिव-चरित्रांतील बजाजी निंबाळकरांच्या शुद्धि–प्रसंगाचें आख्यान घेऊन त्यावर सुमारें एक तास कीर्तन केलें. कथाभाग संपल्यावर ते म्हणाले कीं, " पुणेकरांनीं माझे चार शब्द ऐकून घेतले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. यापुढें जगलों–वाचलों व जगांत माझा अन्नपाण्याचा योगायोग असला तर पुन्हां ज्या ज्या वेळीं आपल्या सेवेला येईन त्या त्या वेळीं ती अशीच गोड करून घ्या एवढेंच माझें मागणें आहे. यानंतर श्री. गोविंदराव देसाई खुलाशादाखल चार शब्द सांगणार आहेत ते ऐका. "

एवढें बोलून श्री. आनंदमूर्ति मागे झाले व त्यांच्या जागीं मी जाऊन उभा राहिलों. मी सांगितलें कीं,

" श्री. आनंदमूर्ती यांच्या शिवजयंतीच्या कीर्तनप्रसंगीं शिवाजी–मंदिरांत कांहीं बायकांनीं व पुरुषांनीं जो निंद्य प्रकार केला त्या प्रकारांशीं–तो करणाऱ्या मंडळीशीं ( विशेषेंकरून बायका–मंडळींशीं ) मसूर आश्रमाचा कांहीं संबंध नाहीं असा खुलासा त्याच आश्रमांतील ब्रम्हचारी क्षीरसागर यांच्या सहीनें वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला आहे. परंतु मसुराश्रमाचे चालक श्री. विनायकबुवा मसूरकर दुसऱ्या कांहीं कामानिमित्त पुण्यास आले होते, तेव्हां स्वतः विनायकबुवा व शिवाजी–मंदिरांत आनंदमूर्तींला ता. ४।३।३४ रोजीं रात्रीं कीर्तनाच्या वेळीं मारण्याकरितां आलेला बायका-पुरुषांचा गट एकत्र रहात होता हें आम्ही स्वतः व पुण्यांतील इतर शेंकडो मंडळींनीं पाहिलें आहे. अशा स्थितींत क्षीरसागर यांनीं केलेल्या खुलाशानें कोणाचेंही समाधान होणार नाहीं, उलट असल्या खोट्या गोष्टी प्रसिद्ध केल्यानें मसूराश्रमाविषयीं लोकांच्या मनांत जास्तच अनादर उत्पन्न होत आहे. शिवजयंतीच्या कीर्तनप्रसंगीं बायकापुरुषांचें हें टोळकें कोठून आलें हें तुम्ही–आम्ही सर्व जाणतच आहों. तेव्हां मसूराश्रमाबद्दल लोकांना वाटणारी सहानुभूति कायम रहावी असें आश्रमाच्या चालकांना वाटत असेल तर त्यांनीं झालेली चूक सरळ कबूल करून ती जाहीर करावयास

पाहिजे. त्याखेरीज मसुराश्रमाबद्दल लोकांना केव्हांही आदर वाटणार नाहीं. गुन्हा कबूल करण्यांत अपमान वाटतो परंतु त्यामुळेंच मनुष्य पुढें लोकादरास पात्र होतो हें मसूरकरांना मी सांगावें असें नाहीं. शिवजयंतीच्या दिवशीं शिवरायाच्या गुणाचें कीर्तन करणावर डांबराचा व जोड्याचा वर्षाव झाला तो छत्रपती शिवाजीमहाराजांचा मान कीं अपमान ? आनंदमूर्तीचा सूड घ्यावयाचा तर मसूरकरांना अन्यवेळीं व अन्यतऱ्हेनें घेतां आला असता. कीर्तन उभे राहतांच भरसभेंत येऊन असली निंद्य अरेरावी मसूरकरांनीं केली त्यामुळें कीर्तनास आलेल्या हजारो स्त्रीपुरुषांचा उपमर्द झाला नाहीं काय ? या नीच कृत्यामुळें शिवजयंतीच्या उत्सवासंबंधीं अनादर व्यक्त केल्याचा अक्षम्य गुन्हा मसूरकरांनीं केला आहे. शिवाजीमंदिरांतून बाहेर पडल्यावर मसूरकर व आनंदमूर्ती यांची मारामारी होऊन खून पडले असते तर त्याचें सुतक पुणेंकरांना आलें नसतें. पण शिवजन्माचे दिवशींच ही गोष्ट जाणूनबुजून केली गेली. त्यामुळें साहाजिकच पुणेंकरांचीं मनें रुष्ट झालीं. शेवटीं आनंदमूर्तीचा बचाव केल्याबद्दल वीर सदाशिवराव गोडबोले यांचें अभिनंदन करून आजचा कार्यक्रम संपला असें मी जाहीर करतों."

प्रकरण १२ वें

# नरवीराचें स्मारक

—:०:—

'आपण स्वतःलाच नव्हे तर महाराष्ट्रालाही अल्पस्वल्प प्रमाणांत तरी नरवीर तान्हाजीच्या आम्हावर असलेल्या ऋणांतून अनृणी केलें आहांत.'—सावरकर

एक दिवस टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे दुय्यम कार्यवाह श्री. ना. अ. सोहनी हे १९३५ सालीं मजकडे आले. सिंहगड येथें तान्हाजीची पुण्यतिथी केव्हांपासून सुरू झाली, आरंभ कोणी केला, पूर्वी कोण मंडळी येत होती व हल्ली कोण जात असतात याची माहिती त्यांनीं मला विचारिली. अवश्य ती माहिती दिल्यानंतर १९३५ च्या पुण्यतिथीस सिंहगडावर येण्याबद्दल त्यांनीं मला आग्रहाची विनंती केली. पुष्कळ विद्यार्थी व इतर लोक यावेळीं गडावर जमण्याचा रंग दिसल्यामुळें कित्येक वर्षें मनांत घोळत असलेल्या कल्पनेला चालना मिळाल्यास पहावें या हेतूनें श्री. सोहनी यांची विनंती मान्य करून मी सिंहगडावर नरवीराच्या पुण्यतिथीस गेलों. दरसाल चैत्र–वैशाखमासी आम्ही गडावर जात होतों. परंतु केवळ तान्हाजी–पुण्यतिथी दिवशीं ( माघ व. ९ ) गडावर आधी एक खेप होतच असे.

या पुण्यतिथीस १९१६ सालीं मीच प्रारंभ केला. त्यावेळीं तीन किंवा चार माणसें माझ्याबरोबर गडावर आली होती. हा कार्यक्रम अदमासें तेरा चौदा वर्षें सतत चालू होता. त्यानंतर माझी प्रकृती बरी नसल्यामुळें मी गडावर जाऊं शकत नसे. तथापि कोणी ना कोणी तरी ओळ-

र्वीचे विद्यार्थी अगर शहरांतील माणसें गडावर त्यावेळीं जात. त्यांना पुण्यतिथीचा दिवस साजरा करण्यास मी सांगत असें. पुढें वर लिहिल्याप्रमाणें १९३५ सालीं गडावर जाण्याचा प्रसंग आला. ती संधी साधून सिंहगडावर भरलेल्या रात्रीच्या सभेंत सभेचा अध्यक्ष या नात्यानें समारोपाचें भाषण करून नरवीर तान्हाजी मालुसरे यांच्या स्मारकाचा जीर्णोद्धार करण्याचा ठराव मांडला, स्मारकाची योजना ठरविली व "तान्हाजी स्मारक–मंडळ" पुढीलप्रमाणें स्थापन केलें.

अध्यक्ष–गोविंदराव देसाई, चिटणीस–ना. अ. सोहनी. सभासद–चिं. ज. काशीकर, शि. चिं. लेले व धामणकर (मुंबई) हें मंडळ स्थापन झाल्यावर स्मारकाची साधारण योजना तयार करून वर्तमानपत्रद्वारां लोकांपुढें मांडली व लगेच निधी जमाविण्यास सुरुवात झाली.

## छत्रपतींचा श्रीकार

१९३५ सालीं सिंहगडावर "तान्हाजी स्मारक मंडळ" स्थापन झाल्यानंतर मीं गायनसमाजाच्या कार्याबरोबर ते कार्यही पुढें चालूं केलें. मंडळाचे चिटणिस श्री. ना. अ. सोहनी व श्री. शिवराम चिंतामण लेले यांनीं स्मारकासाठीं द्रव्य जमविण्याची खटपट सुरू केली. परंतु थोडक्याच दिवसांत त्यांचा हा प्रचार बंद पडला. पैसे जमतील असें वाटेना. मंडळांतील बाकीच्या मंडळींनाही या कामाचा अनुभव नसल्यामुळें निधी जमविण्याच्या कामीं कोणी पुढें होईनात. अशा स्थितींत एक वर्ष गेलें. कोल्हापूर-नरेश श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज यांना विनंती केली असतां मदत होईल असें मनांत आल्यावरून छत्रपतींना पत्र लिहिलें.

छत्रपती राजाराममहाराज यांनीं विनंतीस मान देऊन ताबडतोब शंभर रुपये आम्हांकडे पाठविलें. छत्रपतींच्या या देणगीमुळेंच स्मारकाच्या कार्यास आरंभ झाला. १९३६ सालची पुण्यतिथी आली. रविवार ता. १६-२-३६ रोजीं सिंहगडावर येऊन पुण्यतिथी साजरी करण्याबद्दल वृत्तपत्रांतून लोकांना विनंती केली. गडाच्या पायथ्यापर्यंत जाण्यासाठी मोटारची व्यवस्था व गडावर यात्रेकरूंची राहण्याची व्यवस्था आम्हीच करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें जाण्यायेण्याची व गडावर राहा-

ण्याची व्यवस्था मंडळानें केली. गडास जाणाऱ्या मोटारी पहाटे चार वाजल्यापासून गोपाल गायन समाज रस्त्यावरून सुटतील असें प्रसिद्ध केलें. या वर्षीं पुण्यतिथी उत्सव उत्तम रीतीनें साजरा झाला. केसरीचे उपसंपादक श्री. दामोदर नरहर शिखरे एम्. ए. यांच्या साहाय्यानें या वर्षापासून स्मारकाच्या कार्यास अधिक चालना मिळाली. केसरीचे संपादक श्री. जनार्दन सखाराम उर्फ तात्यासाहेब करंदीकर यांना या कार्याबद्दल अत्यंत आदर व सहानुभूति असल्यामुळें त्यांचाही आधार चांगल्या प्रकारें मिळाला.

१९३५ सालीं थोडे लोक गडावर गेले होते. पण १९३६ सालचा जमाव व त्याचा उत्साह पाहून हा उत्सव बद्धमूल होत चालल्याचें स्पष्टपणें दिसलें. बायकामुलें व अगदीं वृद्ध माणसेंहि पायीं गड चढत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, समर्थ व्यायाम मंडळ, महाराष्ट्रीय व्यायाम-मंडळ, आयुर्वेद महाविद्यालय यांतील तरुण विद्यार्थिवर्ग व विश्राम-मंडळातील सेवानिवृत्त व इतर दोनतीनशें लहानमोठी माणसे उत्सवास जमली होती. याच वर्षी समाधिस्थानापुढील पटांगण तयार केल्यामुळें मैदानी व मर्दानी खेळाचे कार्यक्रम तेथें होऊं शकले. थंडीचा कडाका व सोसाट्याचा वारा यामुळें रात्रीं सभेचा कार्यक्रम रतन बंगल्यांत करावा लागला.

## उत्सवाचें मर्म व महत्त्व

आरंभीं श्री. बा. ज. गोखले वकील व श्री. म. सहस्रबुद्धे यांनीं तान्हाजींची स्वामिनिष्ठा व धर्माभिमान या दोन गुणांचें वर्णन केलें.

श्री. रा. गो. कानडे यांनीं उत्सवाचें स्वरूप किती व्यापक व्हावयास पाहिजे हें सूचित करून महाराष्ट्रांतील संस्थानिकांनीं या स्मारकास साहाय्य केलें पाहिजे जसें सांगितलें.

श्री. दा. न. शिखरे म्हणाले, "पाण्यांत राहणाऱ्या माशाला हवा घेण्यासाठीं पाण्यांतून उसळी मारून वर यावें लागतें, त्याप्रमाणें पारतंत्र्याच्या उकाड्यांत तगमगणाऱ्या आपल्यासारख्या लोकांना स्वातंत्र्याचा वारा घेण्यासाठीं अशा स्थानीं यावें लागतें. आज जसा तान्हाजी–उत्सव आहे

तसाच समर्थांचाही उत्सव आहे. दास-नवमी व तान्हाजी–नवमी हे एका तिथीला येतात व हा योगायोग धर्म व राजकारण यांची सांगड असावी हेंच सुचवितो. या दिवशीं सिंहगड व सज्जनगड यामध्यें हृदयाचें तारायंत्र सुरू असेल. जरीपटका व भगवा झेंडा यांचा हा मिलाफ आहे. आणि

" शक्तियुक्ति जये ठायीं । तेथें श्रीमंत धावती "

असा त्याचा आशय आहे. सिंहगड, शिवनेरी, सज्जनगड व तुळापूर हीं राजकारण आणि धर्मकारण यांचीं चार धामें आहेत. त्यांची यात्रा प्रत्येक महाराष्ट्रीयानें केल्यास त्याला स्वातंत्र्याची स्फूर्ति मिळण्यासारखी आहे. महाबळेश्वर–माथेरानसारख्या ठिकाणीं हवा खाण्यास जाणाऱ्या लोकांनींहि या चतुष्कोणांत वास्तव्य केल्यानें त्यांना स्वार्थ व परार्थ हे दोन्ही ही साधतील. फ्रान्समधील नेपोलियन किंवा आर्कची जोन यांच्या उत्सवाशीं या उत्सवाची तुलना करून पहावी आणि या उत्सवांत जोम व तेज आणावें."

शेवटीं समारोप करतांना मी सांगितलें कीं, "सध्यां जो तो आपआपल्या धंद्यांत गर्क असून आपल्या पाया पुरतेंच वहाण कापतो. पण स्वार्थाच्या पलीकडे नजर पोहचवून समाज व राष्ट्र याबद्दलचें आपलें कर्तव्य आपण पार पाडलें पाहिजे. दधीचि ऋषींनीं आपली हाडेंसुद्धां लोककल्याणासाठीं दिली हें आपण विसरतां कामा नये. ते तर ऋषीच होते पण सांसारिक गृहस्थ असलेला तान्हाजी आपल्या एकुलत्या एक मुलाच्या लग्नाचा पाश तोडून देश व धर्म यांच्यावर आलेल्या विघ्नाशीं झुंज खेळण्यास तयार झाला व अखेर महाराष्ट्रासाठीं मेला, पण कीर्तिरूपानें आमच्यासमोर कायम राहिला आहे. त्याची स्मृति अखंड रहावी म्हणून हा उत्सव सुरू केला. कोल्हापूरचे छत्रपती राजाराममहाराज यांनीं शंभर रुपये पाठवून कार्यास चालना दिली. इतर संस्थानिक व स्वातंत्र्यप्रेमी जनता इकडे लक्ष देईल तर नरवीराला उचित असें स्मारक या ठिकाणीं होऊन उत्सवाचें स्वरूपहि आपोआपच व्यापक होईल." या समारोपानंतर पोवाड्याचा कार्यक्रम होऊन रात्रीं बारा वाजतां उत्सव समाप्त झाला.

## याला म्हणावें पूर्वज-प्रेम !

१९३६ सालची तान्हाजी-पुण्यतिथी यशस्वी रीतीनें पार पडली. सिंहगडावरील तान्हाजीस्मारकाची प्रसिद्धी अखिल महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत दुमदुमुन गेली. लहान लहान देणग्या तर स्वयंस्फूर्तीनें जमा होऊं लागल्या. परंतु सरदार, जहागिरदार, राजेमहाराजे व इतर धनिक लोक यांच्याकडूनही मदत मिळूं लागली. स्मारकाचें कार्य आपल्या हातून पूर्ण होईल असा विश्वास वाटूं लागला. जमा झालेली रक्कम शंभर सव्वाशेपेक्षां अधिक नव्हती.तथापि प्रत्यक्ष कार्यास सुरुवात झाली म्हणजे जरूर ती रक्कम हातीं येईल अशी मनाची खात्री झाल्यामुळें रा. श्री. ज. करंदीकर कंत्राटदार यांजकडे मीं एक दिवस गेलों व सिंहगडावरील मेघडंबरीचें बांधकाम सुरू करण्याचा माझा विचार त्यांना सांगितला.

श्री.करंदीकर यांनीं या गोष्टीस तावडतोब सुरुवात केली. दुसरा कंत्राटदार असता तर त्यानें प्रथम आमच्याकडे पैशाची मागणी आगाऊ केली असती. परंतु करंदीकर यांनीं अगोदर कार्यास आरंभ केला. अडीच तीन महिन्याच्या आंत मेघडंबरीचें काम पूर्ण झालें. आमच्या सवडीप्रमाणें आम्ही त्यांना पैसे देत होतों. अक्कलकोट, फलटण, जमखंडी, सांगली, इचलकरंजी, भोर इत्यादि संस्थानच्या अधिपतींकडून चांगल्या प्रकारें साहाय्य झाल्यामुळें मेघडंबरीच्या कर्जातून बहुतेक मुक्त झालों होतों. फक्त दोनशें रुपये देणें राहिलें होतें. त्याबद्दल वर्तमानपत्रांतून विनंती केली. सासवडचे

### श्रीमंत सरदार मल्हारराव पुरंदरे

यांनीं मीं केलेली विनंती वाचून, लगेंच पत्र लिहिलें तें असें:—

"ज्या श्रीशिवरायाच्या जिवलग स्नेह्यानें केवळ हिंदुधर्म-रक्षणाकरितां आपले प्राण खर्ची घातले त्याच्या स्मारकाची बाकी अजून रहावी हें आम्हां हिंदुधर्मीयांना लांछनास्पद आहे. वरील अवतारी पुरुष झाले नसते तर आज शेंडी व जानवें राहिलें नसतें. निदान याची तरी ओळख सर्व हिंदु लोकांस व त्यांच्यांतील धनिकांस

पाहिजे होती. आम्ही आपल्या कातड्याचे जोडे करून श्रीशिवाजीच्या व तानाजीच्या पायांत घातले असते तरी त्यांचे उपकार फिटले नसते. असो; राहिलेल्या बाकीची मागणी यापुढें वर्तमानपत्रांत करूं नये. मी स्वतः ती सर्व देण्यास तयार आहें. पुन्हां आपणास याचनेचा प्रसंग येऊं नये सबब लिहिलें आहे."

याप्रमाणें पत्र लिहिल्यानंतर लगेच तीन—चार दिवसांनीं श्रीमंत मल्हारराव हे स्वतः दोनशें रुपये बरोबर घेऊन माझ्याकडे आले, तेवढ्या अवधींत नव्वद रुपयांची फेड झालीं होती. सबब सरदार पुरंदरे यांच्याकडून फक्त ११० रुपयेच घेतले व लगेच कर्जमुक्त झालों.

मेघडंबरीचें कार्य १९३७ च्या पुण्यतिथीपूर्वी आठ दिवस पूर्ण झालें. पुण्यतिथी व मेघडंबरीचें उद्घाटन हे दोन्ही समारंभ तान्हाजी नवमी दिवशी सिंहगडावर करावयाचे निश्चित होऊन सुप्रसिद्ध रियासतकार रा. ब. गोविंदराव सरदेसाई यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल विनंती केली. श्री. सरदेसाई यांनीं आमच्या विनंतीस मान देऊन सिंहगडावर येण्याचें कबूल केलें. हा समारंभ गुरुवार ता. ४ फेब्रुवारी १९३७ रोजीं सिंहगडावर अत्यंत थाटानें साजरा झाला.

गुरुवारीं सकाळी श्री. **चौंडेमहाराज** यांच्या हस्तें तान्हाजीस्मारकासान्निध भगवा झेंडा उभारण्यांत आला व त्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघानें प्रणाम केला. या राष्ट्रनिशाणाकडे पाहून **केसकरमहाराज** म्हणाले, "तान्हाजीरावांचें रक्त येथें स्वातंत्र्यासाठीं सांडलें आहे याचें विस्मरण होऊं देऊं नका असा या निशाणाचा संदेश आहे. राष्ट्रासाठीं त्याग करण्यास शिका. त्याग हा गुण सर्वांच्या रोमरंध्रांत इतका भरला पाहिजे कीं तो सर्वांचा स्वभावच बनला पाहिजे." समाधीची पूजाअर्चा व आरती होऊन सकाळचा कार्यक्रम संपला.

## इतिहासाचार्यांची प्रेरणा

दुपारीं भोजनोत्तर समाधीपुढें "समर्थांचें राजकारण" या विषयावर चौंडेमहाराजांचें सुश्राव्य प्रवचन झालें. स्मारकाच्या उद्घाटनाची सभा

सायंकाळीं ६ वाजतां सुरू झाली. अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर स्मारकाचा वृत्तांत सांगतांना गेलीं सत्तावीस वर्षे या पुण्यतिथीचा उत्सव सुरू असून १९३५ सालीं जीर्ण झालेल्या समाधीचा जीर्णोद्धार करण्याचा योग कसा आला हें मीं सविस्तर सांगितलें. "जवळ पैसा नसतांना कामाला आरंभ केला. कोल्हापूरचे छत्रपति राजाराममहाराज यांनीं सर्वांच्या आधी देणगी देऊन कार्याला आशिर्वाद दिला, सातारच्या महाराजांनीं समाधी आणि आजूबाजूची जागा मंडळाच्या स्वाधीन केली. श्री. श्री. ज. करंदीकर कंत्राटदार यांनीं अल्पावधींत मेघडंबरीचें काम भव्य व भक्कम केलें. महाराष्ट्राच्या भूषणाचें व अभिमानाचें हें कार्य आपण सर्वांनीं पूर्ण करावें." अशी सभेस विनंती केल्यावर केसरीचे सहसंपादक श्री. दा. न. शिखरे म्हणाले, आपल्या स्वतंत्र–संपन्न इतिहासाला सगुण साकार स्वरूप देण्याचा उपक्रम 'गोविंदा'च्या कृपेनें यशस्वी झाला असला, तरी तान्हाजी स्मारकमंडळाला ऋणमुक्त करणें हें आपलें कर्तव्य होय.

श्री. बाबासाहेब देशपांडे म्हणाले, एकटा नेपोलियन हा चाळीस हजार योद्ध्यांच्या बरोबरीचा होता असें त्याचें वर्णन करितात, परंतु आमचा तान्हाजी लाखो वीरांच्या बरोबरीचा होता.

अध्यक्ष श्री. सरदेसाई यांनीं पुणे प्रांत व सिंहगड यांचें मध्यस्थान म्हणून किती महत्व होतें तें सविस्तर सांगितलें. औरंगजेबानें काशी-विश्वेश्वराच्या देवळाची १६६९ सालीं मशीद केली त्यामुळें संताप येऊन मातोश्री जिजाबाईच्या प्रेरणेनें शिवाजीनें सिंहगड हस्तगत केला हा इतिहास अध्यक्षांनी बहारीनें रंगविला आणि "आम्ही शूर क्षत्री, नाहीं भिणार मरणाला" हा बोध या समाधिस्थानापासून आपण घेतला पाहिजे असें कळकळीनें सांगितलें. आपण मरायला शिकलें पाहिजे. जीवंतपणीं केलें नाहीं इतके कार्य संभाजीनें मरून केलें. त्याच्या मृत्युनें महाराष्ट्र जीवंत झाला. आपण देशाच्या स्वातंत्र्यासाठीं मरणास सिद्ध असलें पाहिजे. हा अध्यक्षांचा स्फूर्तिदायक समारोप प्रत्येकाच्या कानांत घुमत राहिला. रात्रीं समाधीपुढें पोवाडे व कीर्तन होऊन समारंभ संपला.

## घोरपडीचा प्रयोग

अशा प्रकारें १९३७ सालची तान्हाजी–पुण्यतिथी व मेघडंबरीचा उद्‌घाटन–समारंभ उत्तम प्रकारें साजरा झाला. या प्रसंगीं कांहीं अपघात झाले. तें पाहून लोकांना सिंहगडावर जाणें धोक्याचें वाटूं लागलें. तथापि लोकांना या सर्व अपघातांचा व सिंहगडास जाण्यायेण्याच्या दगदगीचा विसर पडत असे. १९३८ सालीं कांहीं तरी नवीन व आकर्षक असा कार्यक्रम ठेवावा असें मनांत आलें. गड चढणे; कुस्त्या, हुतुतु, लाठी-हल्ला, दांडपट्टा इत्यादि मर्दानी खेळ नेहमीं असत. या वर्षी विचार करितां करितां घोरपडीच्या साहाय्यानें कडा चढून जाण्याची शर्यत ठेवावी असें मनांत आलें. केसरी मराठा संस्थेनें घोरपडीच्या साहाय्यानें कडा चढून जाणारास रोख रुपये ५० बक्षीस देण्याचें ठरविल्यामुळें माझ्या या कल्पनेस फारच मोठा दुजोरा मिळाला. तथापि ही गोष्ट अत्यंत कठीण व मोठ्या धोक्याची असल्यानें हा कार्यक्रम घडून येईल किंवा कसें असा मनामध्यें वारंवार संशय उत्पन्न होई. अशा स्थितींत कार्यक्रम वर्तमानपत्रांत जाहीर करून पहावा व कोणी धाडसी मनुष्य आल्यास त्याला आपण या बाबतींत जरूर तें शिक्षण देऊन कार्यक्रम घडवून आणावा असें मनाशीं ठरवून त्याप्रमाणें घोरपडीच्या साहाय्यानें कडा चढण्याचा कार्यक्रम सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केला.

एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा तो असा कीं, गगनबावडा संस्थानचे अधिपती श्रीमंत बाळासाहेब पंत अमात्य यांचा व माझ्या वडिलांचा अत्यंत स्नेह दोघेही बंधुप्रेमानें एकमेकांशीं वागत. मी लहानपणीं वडिलांच्याबरोबर एकदा बावड्यास गेलों होतों. माझे मामा बावड्यासच रहात असत. त्यांच्याकडे आमचा मुक्काम होता. १५ दिवसानंतर वडील बावड्याहून कोल्हापुरास गेले व मी बावड्यासच राहिलों. या वेळीं माझें वय दहा वर्षांचें होतें. राजवाड्यांत मी नेहमीं जात–येत असें. राजवाड्यासमोरच्या मैदानांत मावळे लोकांचा बसण्याचा अड्डा असे. या मावळ्यांच्याजवळ एकादी तरी घोरपड पहावयास मिळे. घोरपड जमिनीवर ठेवून तंबाखू ओढीत हे मावळे त्याठिकाणीं तास दोन तास

मुक्काम करीत. मी जातां-येतां जमीनीवर पडलेली घोरपड पहात असे. एक दिवस जमिनीवर ठेवलेल्या घोरपडीस एक मावळा उचलीत असतां ती घोरपड कांहीं केल्या जमिनीपासून अलग होईना. लहानशा खडकावर पायाचीं नखें रोवून घोरपड इतकी मजबूत बसली होती कीं, तिला तेथून सोडविण्यास त्या मावळ्यास फारच प्रयास पडले. ही गोष्ट मी प्रत्यक्ष अनेक वेळ पाहिली असल्यामुळें मला तें स्मरण राहिलें. घोरपड खडकावर पकड धरून कशी बसते, तिनें धरलेली पकड कशी सोडवावयाची हें मीं पाहिलें असल्यामुळें घोरपड उपलब्ध झाल्यास हा प्रयत्न करून पहावा असें वाटलें. वर लिहिल्याप्रमाणें मजकूर वर्तमान-पत्रांत प्रसिद्ध केला. प्रसिद्ध झालेला मजकूर वाचून

नारायण काशिनाथ नामजोशी

या नांवाचे वैदिक ब्राम्हण ( वय वर्षे अदमासें २४ ) मजकडे या कार्यक्रमाची अधिक चौकशी करण्यासाठीं आले. त्यांना जरूर ती माहिती दिली. घोरपड डोंगरांत अगर जंगलांत जेथें पाण्याचा साठा अगर दलदल असते तेथें घर करून राहते. तेथें जाऊन शिकारी कुत्र्या-कडून ती धरवावी लागते. कुत्रे घोरपड धरतात परंतु ते तिला मारीत नाहींत. कुत्र्यांनीं तिला धरल्याबरोबर त्यांच्या तोंडातून अगर पंजातून तिला झटदिशी सोडवून घ्यावी लागते. तसें न केल्यास ती किंचित् जखमी होईल इतकेंच. एवढें सांगितल्यावर नामजोशी घोरपड मिळ-विण्याच्या उद्योगास लागले. महत्प्रयासानें मध्यम वयाची घोरपड त्यानीं मिळविली व पुन्हा मजकडे ती घोरपड दाखविण्यास आले. एकदोन दिवस तिला विश्रांति दिल्यावर एक दिवस तिच्या कमरेस दोर बांधून नामजोशी यासह पर्वतीच्या मागील एका लहानश्या कड्यानजीक गेलों. तेथील कड्यावर घोरपड सोडली ती मजबूत बसलेली पाहून नामजोशी यास चढण्यास सांगितलें. चार पांच वेळ ही कसरत झाल्यावर नामजोशी यांस या कार्यक्रमाबद्दल विश्वास उत्पन्न होऊन पुढें सिंहगडास जाईपर्यंत ते स्वतःच या गोष्टीचा अभ्यास करूं लागले. सिंहगडास जाण्यापूर्वी नामजोशी यांस बोलवून घोरपड कल्याण-दरवाज्याच्या बुरुजावरच




**श्री. गोविंदराव देसाई.**

अध्यक्ष तान्हाजी स्मारक मंडळ, पुणें.



**श्री. नारायणराव नामजोशी.**

घोरपडीच्या साहाय्यानें सिंहगड कडा चढणारे. ( सन १९३८. )



सिंहगडाचा देखावा.

सोडावी, इतर ठिकाणीं कोठेही सोडूं नये असें बजावून सांगितलें होतें.

पुण्यतिथीचा कार्यक्रम प्रसिद्ध झाला. विद्यार्थी, शिक्षक, पुढारी, लहान मुले, पुण्यांतील अनेक संस्था व स्त्रीपुरुष मिळून अदमासें ५ ते ६ हजार लोक या उत्सवास हजर होते. नामजोशी घोरपडीसह गडावर एक दिवस आगाऊच गेले होते. श्री. न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर हे यंदाच्या पुण्यतिथी–उत्सवाचे अध्यक्ष हाते. कुस्त्या, हुतुतु, दांडपट्टा, फरीगदगा इत्यादि कार्यक्रम होतेच. दुपारीं दोन वाजतां घोरपडीच्या साहाय्यानें कडा चढण्याचा कार्यक्रम होता. गडावर जिकडे तिकडे माणसांची गर्दीच गर्दी होऊन गेली होती ! सकाळीं ९ वाजतां स्मारकावर शिलालेख बसविण्याचा कार्यक्रम इतिहास–संशोधक प्राध्यापक दत्तोपंत पोतदार यांच्या हस्तें करण्यांत आला. त्यानंतर पुढें भोजनाचा कार्यक्रम होऊन मंडळी विश्रांति घेत होती. तेवढ्या अवधींत श्री. नामजोशी हे घोरपड घेऊन कल्याण दरवाज्याच्या खालीं उतरले. कल्याण दरवाज्याचा बुरुज त्यांना सोपा व लहान वाटल्यामुळें दरवाज्याच्या पलीकडे जाऊन एका उंच, चढण्यास अत्यंत कठीण व भयानक अशा पूर्वबाजूच्या कड्यावर त्यांनीं घोरपड सोडली. कड्याच्या अगदीं वरच्या बाजूनें म्हणजे जमिनीपासून अदमासें वीस हात उंचीवर कडा दुभंग झाल्या ठिकाणीं घोरपड जाऊन बसली. नामजोशी यांनीं एक दोन वेळ दहा हात उंचीपर्यंत चढून पाहिलें. घोरपड अतिशय मजबूत बसल्याची पूर्ण खात्री झाली. कड्यावर घोरपड सोडल्याचें लोकांना समजतांच हजारो लोक तिकडे धावत चाललें. मी श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याबरोबर सभेच्या कार्यक्रमासंबंधीं बोलत बसलों होतो.

इतक्यांत प्रा. दत्तोपंत पोतदार तेथें आले. 'कड्यावर घोरपड सोडली असून सर्व प्रेक्षकांची तेथें अतोनात गर्दी झाली आहे. लोक तुमची वाट पहात आहेत.' इतकें पोतदार यांनीं सांगितल्याबरोबर कल्याण दरवाजाचा रस्ता धरला. दरवाज्यापर्यंत कसा तरी आलों. परंतु दरवाज्यांतून बाहेर पडण्यास वीस मिनिटापेक्षां अधिक वेळ लागला. पाऊल ठेवण्यास जागा नाहीं इतकी गर्दी दरवाज्यापासून पुढें घोरपड लाविलेल्या ठिकाणापर्यंत झाली होती. मधून मधून लोक टाळ्यांचा गजर करीत होते

लोकांच्या ह्या गर्दीमधन मी येत आहें असें पाहून कार्यक्रम सुरू होणार हें लोकांना कळलें. शिवाजीच्या व तान्हाजीच्या नांवाचा जयघोष होऊं लागला. या जयघोषानें व टाळयाच्या कडकडाटानें गड दणाणून गेला!!

## अर्वाचीन काळांत प्राचीन दृश्य

घोरपड लावलेल्या ठिकाणीं जाईपर्यंत सर्व शरीर अगदीं खिळखिळें झालें. ठिकाणावर पोचल्यावर मी तेथलि परिस्थिती पाहिली. ती अत्यंत भयानक ! कडा पाहिला तोही भयंकर ! खालची जमीन पाहिली ती अतिशय अडचणीची असून हत्तीसारखे मोठमोठे दगड पडलेले ! कदाचित् चढतांना दोराचे हात सुटून दुर्दैवानें मनुष्य खालीं आला तर त्यास सहसा दुखापत होऊं नये म्हणून जाळें धरण्याची तजवीज आगाऊ करून ठेविली होती. परंतु आयते वेळीं तेंही जमलें नाहीं, सर्वच गोष्टी प्रतिकूल दिसल्या. मनाला भीति वाटली. इकडे लोक कार्यक्रम पाहण्यास अत्यंत उत्सुक झालेले. लोकांची आरडाओरड व दंगा पाहून मी मधून मधून हात वर करून लोकांना शांत करण्याचा प्रयत्न करीत होतों. चढणारा मनुष्य जमिनीवर पडल्यास त्यास दुखापत होऊं नये म्हणून जमिनीवर अंथरण्यासाठीं गवत आणण्यास मावळे पाठविलें तेही वेळेवर येऊं शकले नाहींत. अखेर जमलेल्या लोकांचीं कांबळीं व सतरंज्या मागून घेऊन त्यांचा उपयोग केला. नामजोशी यांस चढण्यास परवानगी दिली.

नरवीराच्या प्रचंड जयघोषांत नाम जोशी चढूं लागले. शेवट गांठण्यास हात दीड हातच अंतर राहिलें होतें. इतक्यांत दोराचे हात सुटून अपघात झाला. दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. जिकडे तिकडे हा:हाकार उडाला ! सरकारचे पोलीस येऊन बसलेच होतें. नामजोशी अगदीं बेशुद्ध होऊन गेले, सर्व शरीर रक्तानें लाल होऊन गेलेलें पाहून सर्व समाज घाबरून गेला. यावेळीं गडावर मेहेता या नांवाचे एक पारशी डॉक्टर ( वैद्य ) येऊन राहिले होते. तेही याप्रसंगीं हजर होतेच. डॉ. मेहता ताबडतोब पुढें आले व आपल्या नोकराकडून नाम-

जोशी यांना उचलून गडावरील आपल्या दवाखान्यांत नेण्याची तयारी त्यांनीं केली. डॉ. पराडकर व डॉ. घैसास हे उत्सव-मंडळातर्फे गडावर आलेलें होते. नामजोशी खालीं पडून बेशुद्ध होतांच घैसास व पराडकर यांनीं जवळ येऊन त्यांना तपासले. रक्तानें भरलेलें शरीर पुसून ठिक-ठिकाणीं झालेल्या जखमा बांधण्यास सुरवात केली. डॉ. मेहता आपल्या लोकासह आले. गडावर जमलेल्या विद्यार्थ्यांनीं याकामीं सहाय केलें.

सर्वांनीं मिळून नामजोशी यांना त्या हजारो लाकांच्या प्रचंड यात्रेतून मेहता यांच्या दवाखान्यांत नेलें. इकडे कुस्त्यांचा कार्यक्रम करण्यासाठीं मी निघून आलों. कुस्त्या व इतर मर्दानी खेळ झाल्यावर श्री. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य सभेच्या कामास सायंकाळीं साडेपांच वाजतां सुरुवात झाली. सायंकाळची सभा होतांच श्री. तात्यासाहेब केळकर गडाखालीं उतरलें व पुण्यास गेले. नामजोशी यांच्या घरीं जाऊन अपघाताची हकीगत त्यांनीं निवेदन केली. ससून हॉस्पिटलमध्यें जाऊन तेथील रुग्णगाडी त्यांनीं सिंहगडास पाठविली व त्या गाडींतूनच नाम-जोमजोशी यांना दुसऱ्या दिवशीं सकाळीं ससून रुग्णालयांत नेलें. श्री. तात्यासाहेबांना या कामीं फारच तसदी झाली व त्यांनीं ती थोर मनानें सहन केली.

याच वर्षी श्री. बॅ. विनायकराव सावरकर यांनीं केलेल्या तान्हाजीच्या पोवाड्यावरील जप्ती सरकारनें उठवावी अशी विनंती करण्यासाठीं शनिवारवाड्यासमोर नागरिकांची मोठी सभा भरली. श्री. बाळुकाका कानिटकर, श्री. ग. म. नलावडे, वा. वि. साठे इत्यादि वक्त्यांचीं भाषणें होऊन सदर पोवाड्यावरील बंदी उठविण्याचा ठराव सर्वानुमतें झाला. तो सभेचा अध्यक्ष या नात्यानें मी कॉंग्रेस सरकारकडे पाठविला.

आपल्या या ठरावाचा विचार आपल्या इच्छेप्रमाणें लवकरच होईल असें ना. खेर व मुनशी यांनीं मला कळविलें. एवढ्याच आधारावर हा पोवाडा पुण्यतिथी-उत्सवाच्या वेळीं सिंहगडावर म्हटला गेला. १९३८ ची पुण्यतिथी श्री. न. चि. केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी झाली हें वर लिहिलेंच आहे. तान्हाजी सारख्या एका अद्वितीय रणझुंजाराची

पुण्यतिथी, स्मारक–मंडळानें नुकतीच बांधून पुरी केलेली त्याची ती डौलदार समाधी आणि उत्सवांत बोलणारे विद्वान् इतिहासभक्त या त्रिवेणी–संगमांत अवगाहन करण्यास सिंहगडावर या उत्सवास हजारो लोकांचा जमाव जमला असल्यास त्यांत नवल काय? पुण्यांतील नूतन मराठी विद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल, लष्करमधील कँप एज्युकेशन सोसायटी व इतर शाळा यांचे विद्यार्थी सायकलवरून आले होते, तर तालमींतील बलोपासकांच्या टोळया पायींच आल्या होत्या; याशिवाय खासगी मोटारीनें, भाड्याच्या मोटारीनें, बैलगाड्यांनीं शेकडो यात्रेकरू पुण्याहून, परगावाहून, गडाभोंवतीच्या पंचक्रोशीतून सहकुटुंब सहपरिवार गडावर आले होते. एकंदर समुदाय सुमारें पांच ते सहा हजारांच्या दरम्यान होता. गड चढणारामधेंहि मोठी गमतीदार विविधता दिसून येत होती. अगदी लहान बालकें आईच्या कडेवर बसून गड चढण्याचा आनंद लुटीत होतीं. त्याहून वयानें थोडे मोठे असे बटू व कुवार मुली कांहीं वेळ चालत, तर कांहीं वेळ आपल्या वडिलांच्या खांद्यावर बसून गडाचें शिखर गांठीत होत्या. त्यापेक्षां अधिक वयाचे तरुण व तरुणी गळयांत पिशव्या अडकवून, कॅमेरे घेऊन गड पादाक्रांत करीत होते.

ज्यांची अद्याप षष्ट्यब्दिपूर्ति झाली नाहीं असे गृहस्थ व स्त्रिया मुक्काम करीत करीत पण मोठ्या उमेदीनें चढण चढत होत्या आणि त्यापुढील वृद्ध मंडळी व वयस्क स्त्रिया मावळयांच्या खांद्यावरील खुर्च्यांवर बसून लहान मुलाप्रमाणें गड चढण्याचा आनंद लुटीत होत्या. गडावरील बंगल्यांत उतरण्याची ज्यांची सोय झाली त्यांनीं आपल्या पडशा बंगल्यांत ठेविल्या आणि ज्यांना बंगल्यांत जागा मिळाली नाहीं त्यांनीं वृक्षाखालीं आपलें बिऱ्हाड थाटलें. अशा तरुतलवासीयांचीच संख्या अधिक होती. गडाच्या पायथ्यापासून तो वर शिखरापर्यंत पेढे, बर्फी, चिवडा, सुकामेवा, पुरीभाजी व इतर अनेक खाद्यपेयें यांची दुकानें दरसालप्रमाणें दोन दिवस आगाऊच आलेलीं होतीं. कढत व कोमट अशीं 'प्रभात–पेयें' घेऊन सर्वजण समाधीच्या दर्शनास निघाले. गडावरील पुजाऱ्यानें समाधीची व भगव्या झेंड्याची पूजा केली. सुवासिक फुलांचे व तुळशीचे

हार समाधींवर व भगव्या झेंड्यास घालतांच पूर्वजांच्या नांवाचा प्रचंड जयघोष झाला. सर्व वातावरण राष्ट्रप्रेमानें भरून गेलें, व पुण्यवान पुरुषांच्या कार्याच्या परिमलानें सुगंधित झालें. अस्पृष्टांच्या शाळेतील मुलांनीं ईशस्तवन म्हटल्यावर प्रा. दत्तोपंत पोतदार यांचें भाषण झालें. तान्हाजी स्मारक मंडळानें नवीन खोदलेला समाधीवरील शिलालेख त्यांनीं वाचून दाखविला व सिंहगडचा पूर्वेतिहास सांगितला. श्री. बाबासाहेब देशपांडे यांनीं ध्वजाच्या चौथऱ्यावरील शिलालेख वाचून दाखविला व अटकेपार नाचलेला महाराष्ट्राचा भगवा झेंडा १२० वर्षांनंतर पुन्हां आज सिंहगडावर चढला आहे, तो आपणा सर्वांस स्फूर्ति देवो असें सांगितल्यावर सकाळचा कार्यक्रम समाप्त झाला.

## श्री. केळकरांचा पुरस्कार

दुपारीं २॥ वाजतां घोरपडीच्या साहाय्यानें कडा चढण्याचा कार्यक्रम झाला त्याची हकीगत पूर्वी दिलीच आहे. साडेतीन वाजतां समाधीपुढें कुस्त्या व इतर खेळ झाल्यावर श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं सभेस सुरवात झाली. प्रथम मीं जमलेल्या सर्व मंडळींचें स्वागत करून स्मारकास मिळालेल्या देणग्यांची यादी वाचून दाखविली. 'दंडधारी' या टोपण नांवाखालीं "त्रिकाळ" मध्यें स्मारक मंडळावर बेजबाबदारपणानें ज्यानें टीका केली त्याचा निषेध करून मी जशास तसें उत्तर दिलें. अध्यक्षांनीं आपल्या समारोपांत प्रथम स्वतःचें नांव पडद्याआड दडवून "दंडधारी" या नांवाखालीं स्मारकमंडळावर टीकास्त्र चालविणाऱ्या शहाण्या गृहस्थाची अत्यंत कडक शब्दांत हजेरी घेतली.

पुढें ते म्हणाले कीं, "श्री. गोविंदराव देसाई हे १९१६सालापासून ही पुण्यतिथी साजरी करण्यास दरसाल गडावर येत आहेत हें मला माहीत आहे. सिंहगडाकडे फक्त उन्हाळ्याच्या दिवसांत १०।१५ माणसे फार तर दिसावयाचीं. इतर वेळीं हा प्रांत ओसाड व भयाण असल्यामुळें इकडे येण्यास कोणी धजत नसे. परंतु श्री. देसाई यांनीं या पुण्यतिथी-उत्सवास गेल्या १० वर्षांपासून फार मोठी चालना देऊन सिंहगडाकडे हजारो माणसें खेचलीं. म्हणूनच स्मारकमंडळ स्थापन करून एवढा

मोठा उत्सव या ठिकाणीं करण्याचें सर्व श्रेय आपण त्यांना आज देत आहों. रायगड—स्मारकाचा उल्लेख करून राष्ट्रपुरुषांचें उत्सव साजरा करण्याचा खरा हेतू काय हे थोडक्यांत सांगून अध्यक्षांनीं आपलें भाषण संपविलें. रात्रीं पोवाड्याचा कार्यक्रम झाल्यावर उत्सव समाप्त झाला.

## केसरीची वार्षिक देणगी

या पुण्यतिथी—उत्सवांत घोरपडीच्या साहाय्यानें कडा चढून जाणारास बक्षीस देण्यासाठीं केसरी—मराठा संस्थेनें आमच्याकडे रोख रुपये पन्नास दिले. त्याशिवाय या उत्सव खर्चास मदत म्हणून दरसाल पंचवीस रुपये सदर संस्थेकडून आम्हास मिळत असतात. मिळून पंचाहत्तर रुपये या वर्षी उत्सवाच्या दिवशीं गडावर श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं माझ्या स्वाधीन केले. त्यापैकीं नामजोशी यांना पन्नास रुपये द्यावयाचें ते, अपघात होऊन नामजोशी ससून रुग्णालयांत गेल्यामुळें माझ्या-जवळच राहिलें. गडावरून परत आल्या दिवसापासून नामजोशी यांची प्रकृती पाहण्यास मी रोज जात असें. अदमासें पाऊण महिन्यानंतर नाम-जोशी बरे होऊन घरी परत आले. घरीं येतांच ता. २९ मार्च १९३८ रोजीं केसरीच्या सभागृहांत जाहीर सभा भरवून मराठा पत्राचें संपादक श्री. गजाननराव केतकर यांच्या हस्तें रोख रुपये पन्नास नामजोशी यांस दिलें.

घोरपडीच्या सहाय्यानें सिंहगड चढण्याच्या कार्यक्रमामुळें तान्हाजी-स्मारक हिंदुस्थानच्या सर्व भागांत गाजलें, इतकेंच नव्हे तर परदेशांत-देखील या स्मारकाची हकीगत पोचली. ऑलिजबरीहून हचिन्सन् नांवांच्या एका युरोपियन गृहस्थांचें पत्र आलें. त्यांत त्यांनीं हें स्मारक केल्याबद्दल स्मारकमंडळाचें अभिनंदन करून या स्मारकास देणगी देण्याचेंही वचन दिलें. तान्हाजीसंबंधीं लिहितांना ते म्हणतात.

" Tanhajee is the best example of selfless valour and selfless devotion to duty"

अशा रीतीनें या नरवीराचें २५० वर्षानंतर महाराष्ट्रास व बाहेरच्या सर्व जगास पुन्हा एकवार स्मरण करून दिल्यामुळें या पुण्यतिथीस राजापासून तों रंकापर्यंत सर्व लोक सिंहगडावर येऊन तान्हाजीच्या समाधीचें दर्शन घेऊं लागले. १९३९ सालीं औंध संस्थानचे अधिपती श्रीमंत राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी पुण्यतिथी–उत्सवास अध्यक्ष योजिले व तशी स्मारक–मंडळानें त्यांना विनंती केली. श्रीमंतांनीं आमची विनंती मान्य करून येण्याचे कबूल केले याच वेळीं बडोद्याचे सेनापती नानासाहेब शिंदे यांना येण्याची विनंती केली होती. परंतु बडोदे संस्थानचे अधिपती श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड यांच्या आकस्मिक निधनामुळें ते येऊं शकले नाहींत. पंतप्रतिनिधी यांच्याच अध्यक्षतेखालीं सर्व कार्यक्रम करण्यांत आले. या उत्सवाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे हें जमलेल्या लोकसमूहावरून दिसून येत होते. पुणे येथील शाळा–कॉलेजचे विद्यार्थी, वर्तमानपत्रांचे संपादक, शास्त्री–पंडित, आंजूबाजूच्या खेड्यांतील मावळे व पुण्यपत्तनस्थ स्त्री–पुरुष मोटारींतून, चालत व सायकलवरून गडास आले.

समाज अदमासें चार हजार होता. सकाळीं सात वाजल्यापासून गडाच्या माथ्यापर्यंत पळत जाण्यांत बाबू मोकाटे हा मावळा पहिला आला, व श्री. महादेव काशिनाथ गोखले हे दुसरे आले. या कार्यक्रमानंतर प्रथम स्मारकाचा सर्व इतिहास निवेदन केल्यावर समाधीची पूजा होऊन श्रीमंतांच्या हस्तें ध्वजारोपण करण्यांत आलें. पुढे भोजनानंतर समाधी-पुढील मैदानांत हुतुतुचे सामने व कुस्त्या झाल्या. या सर्व खेळांत व शर्यतींत भाग घेऊन यशस्वी झालेल्या उमेदवारांना श्रीमंतांच्या हस्ते बक्षिसे देण्यांत आलीं. सायंकाळीं ६ वाजतां श्रीमंतांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सभा भरली. मालुसरे, पासलकर व कंक यांचे वंशज या सभेस हजर होते. ब्राम्हण क्षत्रियांचा हा प्रचंड मेळा पाहून "ब्रम्हक्षत्रेण सहितं क्षत्रं च ब्रम्हणासह। संयुक्तौ दहतः शत्रून्वनानि वाग्निमारुतौ" या महाभारताच्या वाक्याची आठवण झाली, व याच विषयावर पाऊण तास भाषण केलें. माझ्या भाषणानंतर केसरीचे संपादक श्री. ज. स. उर्फ

तात्यासाहेब करंदीकर, रावसाहेब रूपचंद मोतीचंद व बाबासाहेब देशपांडे यांचीं भाषणें झालीं. अखेर अध्यक्षांनीं समारोप केल्यावर सभा संपली. रात्रौ श्रीमंतांचे चिरंजीव राजकुमार तात्यासाहेब यांचें कीर्तन झालें. राजकुमारांचें वय अवघे १० वर्षांचें परंतु तान्हाजीचें आख्यान एकाद्या कसलेल्या हरिदासाप्रमाणें त्यांनीं वठविलें. या बालकीर्तनकारांचा तान्हाजी स्मारक मंडळातर्फे योग्य गौरव करण्यांत आला. त्यानंतर ११ च्या पुढे समाधीसमोर ऐतिहासिक पोवाड्यांचा कार्यक्रम व राष्ट्रगीत होऊन समारंभ समाप्त झाला. दुसऱ्या दिवशीं यात्रेकरू आपआपल्या ठिकाणीं जाण्यास गडावरून परत फिरले.

सिंहगड येथील तान्हाजीस्मारकासंबंधीं वर्तमानपत्रांतील स्फूर्तिदायक व मनोरंजक हकीगती दरसाल प्रसिद्ध होत त्या वाचून

**स्वातंत्र्यवीर विनायकराव सावरकर**

यांना सिंहगडचें एकवार दर्शन घेण्याची इच्छा व्हावी हें अगदीं स्वाभाविक, परंतु हिंदुमहासभेच्या कार्याचा व्याप कल्पनातीत मोठा त्यामुळें त्याना कोठेंच जाता येत नसे. १९३८ सालीं पुण्यतिथीउत्सवाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची मी त्यांना विनंती केली. " यंदा येणें अगदीं अशक्य, यासाठीं पुढील वर्षी नरवीराचें दर्शनास सिंहगडीं मी खात्रीनें येइन " असें त्यांनीं उत्तरीं लिहिलें. तथापि प्रकृतिच्या अस्वास्थ्यामुळें ते येऊं शकले नाहींत. १९४० सालीं पुण्यतिथी–उत्सवाची आमंत्रण–पत्रिका आम्ही पाठविली. तेव्हां सावरकर लिहितातः—

**आपण नि आपले सहकारी यांनीं अगदीं लहान प्रमाणावर आरंभ करून तान्हाजी स्मृत्युत्सवास आज जें विस्तृत स्वरूप आणलें आहांत, त्यांचे समाधीचा जीर्णोद्धार करून, सहस्रावधी जनांची यात्रा भरवून त्यानिमित्त हिंदु संघटनेचा संदेश नि आदेश आजूबाजूच्या खेड्यापाड्यांतून पसरविण्याचे जे महत्वाचे कार्य करीत आहांत त्यायोगें आपण स्वतःलाच**

हिंदुराष्ट्रपति



बॅ. विनायक राव सावरकर.

शाहीराचे कुलपति



श्री. गोविंदराव देसाई.



श्री. अ. वि. पुजारी,
संगीत विद्याविशारद
अध्यक्ष–र. महोत्सव मंडळ,



श्री. ना. वा. कोगेकर,
एम्. एस्सी,



रा. श्री. ह. मेहेंदळे,
संगीत विद्याविशारद,

नव्हे तर महाराष्ट्रालाही अल्पस्वल्प प्रमाणांत तरी नरवीर तान्हाजीच्या आम्हावर असलेल्या ऋणांतून अनृणी केलें आहांत.'

श्रमविभागानुसार एकेका संस्थेनें: असेच एकएक लहान-मोठें कर्तव्य निवडून तें यथाशक्ति पार पाडण्याच्या कार्यास वाहून घ्यावे. म्हणजे एकंदर राष्ट्राचा संसार नेटका चालतो. त्याच श्रमविभागानुसार मजकडे सध्यां हिंदुमहासभेचे जे कार्य सोपविण्यांत आले आहे त्याच्या व्यापांत गुंतल्यामुळें मला आपले आमंत्रण स्वीकारतां आलें नाहीं याविषयी आपण मला क्षमा करावी. आपल्या कार्यास अंतःकरणापासून यश चिंतणारा

आपला,

**विनायक सावरकर.**

पुण्यांतील राष्ट्रीय स्वयंसेवक संघांतील कांहीं प्रमुख कार्यकर्त्यांनी १९४० सालच्या पुण्यतिथी–उत्सवाची सर्व जबाबदारी घेतली व संघचालकांनीं त्या वर्षीचा उत्सव साजरा करून दाखविला.

या पुण्यतिथी–उत्सवास कुरुंदवाड संस्थानच्या राजघराण्यांतील श्रीमंत केशवराव मारेश्वरराव उर्फ रावसाहेब पटवर्धन हे आले होते. उत्सव संपवून दुसऱ्या दिवशीं परत येतांना आम्ही सर्व कल्याण–दरवाज्यानें खालीं उतरत असतां तान्हाजी–स्मारकाच्या दुसऱ्या योजनेंसंबधीं म्हणजे पुतळ्यासंबधीं बोलणें सुरू झालें. सदर पटवर्धन यांनीं उत्कृष्ट शिल्पकार आणवून त्याकडून सुंदर पुतळा अगदीं थोडक्या खर्चांत तयार करवून देण्याचे वचन दिलें. उत्सव संपवून पुण्यास आल्यावर थोडे दिवस विश्रांति घेऊन पुतळ्याची योजना कडेला नेण्याच्या

खटपटीस लागलों. पुतळा तयार करण्याचे कामीं केवळ संस्थानिकांनीच मदत केली पाहिजे असे माझें मत असल्यामुळें शक्य तों तसाच प्रयत्न आम्हीं केला. अवश्य तें द्रव्य सहाय मिळताच पुतळा तयार करून घेतला. उत्सवापूर्वी दोन दिवस पुतळा सिंहगडावर पोचविला. पुतळा कल्याण दरवाज्याच्या बाजूनें गडावर नेला. गडावर पुतळा नेण्याचे कामीं रावसाहेब पटवर्धन, शिल्पकार नरवणे, श्री. का. य. रास्ते. श्री. ग. श्री. गोखले श्री. अण्णासाहेब कर्वे (कर्वे ट्रान्सपोर्ट सर्व्हिसचे मालक) व सिंहगडच्या पायथ्याशी असलेल्या कल्याण गावचे पाटील रा. डिमळे व इतर मावळे लोक यांचीं मदत झाली म्हणूनच पुतळा गडावर नेण्यांत आला. अदमासे ६ मण वजनाचा पुतळा सिंहगडावर चढविण्यास किती प्रयास पडले याचे वर्णन करून सांगण्यापेक्षां त्याची कल्पना करण्याच काम वाचकांवरच सोपविणें बरे पुतळा तयार होऊन तो १९४१ च्या पुण्यतिथीस सिंहगडावर जाईपर्यंत पुतळ्याप्रीत्यर्थ खर्च होणारी रक्कम जमविण्यासाठीं प्रयत्न केले. प्रयत्नास यश आले व पुतळ्याची स्थापना शके १८६२ च्या माघ व ॥ ९ स म्हणजे गुरुवार ता. २०।२।४१ इसवी रोजी पुतळ्याची स्थापना करण्यांत आली. सोंडूर संस्थानचे अधिपती

## श्रीमंत राजे यशवंतराव घोरपडे ( भोसले )

यांच्या अध्यक्षतेखालीं या पुण्यतिथीचा उत्सव साजरा झाला.राजे यशवंतराव घोरपडे यांना या स्मारकाची हकीगत वर्तमानपत्रावरून माहीत होतीच. श्रीमंतांना पूर्वजाबद्दल खरा अभिमान असल्यामुळें यावेळीं ते सिंहगडीं खात्रीनें येतील असा आम्हांस भरंवसा वाटून श्रीमंतांना अध्यक्षस्थान मंडित करण्याची आम्ही विनंती केली. ही विनंती करण्याच्या बाबतींत पुण्याचे सुप्रसिद्ध इंजिनिअर व आमचे परमस्नेही श्री. गोविंद त्र्यंबक गोखले यांची फार मोठी मदत झाली. सोंडूरच्या महाराजांना सिंहगडावर आणण्याच्या कामीं श्री. गोखले यांचें साहाय्य झाल्यामुळें हा कार्यभाग घडून येण्यास फारसा वेळ लागला नाहीं. ताबडतोब सोंडूरकरांनीं

आमची विनंती मान्य केली व तसदी सहन करून सिंहगडावरील १९४१ च्या पुण्यतिथीचा उत्सव यशस्वी रीतीनें पार पाडला.

पुतळा तयार झाला परंतु तो गडावरील मेघडंबरींत बसविण्यापूर्वी पुतळ्याच्या संरक्षणार्थ मेघडंबरीच्या तिन्ही बाजूस लोखंडाची जाळी व पुढें लोखंडी दरवाजा केल्याखेरीज पुतळा सुरक्षित राहणं शक्य नव्हते. ही गोष्ट मोठ्या खर्चाची असल्यामुळें या बाबतींत कोणाकडे जावें हें प्रथम सुचेना. एक दोन कंत्राटदाराकडे जाऊन ते काय म्हणतात याची चौकशी केली. इतर एक दोन ठिकाणीं रक्कम मिळविण्याचा खटपट करूं लागलों. तथापि कांहीं जमून येईना. याच काळजींत इकडे तिकडे फिरतां फिरतां एक दिवस आमचे जुने व अत्यंत आपलेपणानें आमच्या कार्याकडे पाहणारे पुण्याचे सुप्रसिद्ध कंत्राटदार श्री. जगन्नाथ विश्वनाथ ऊर्फ बंडोपंत दातार यांची गांठ पडली. सिंहगड–स्मारकाविषयीं बोलत बोलत मी त्यांच्या घरी गेलों.पुतळ्याच्या चारी बाजूस लोखंडी काम करण्याबद्दल त्यांना विनंति केली. शब्द काढतांच श्री. दातार यांनीं हें काम उत्तम प्रकारे करून देण्याची जबाबदारी घेतल्याचा होकार ताबड-तोब दिला. देव प्रसन्न झाला असे वाटलें व त्या आनंदांत मीं घरी परत आलो. वचन दिल्याप्रमाणें श्री. दातार यांनीं गडावर पुतळा नेण्यापूर्वीं आठ दिवस लोखंडी जाळया व दरवाज्याचें काम पूर्ण करून दिलें. पुण्यतिथीचा कार्यक्रम जाहीर झाला. सोंडूरचे महाराज पुण्यास आले. ता. २०।२।४१ रोजीं पहाटें चार वाजल्यापासून सिंहगडच्या मोटारी सुरू झाल्या. परगांवचे लोक आगाऊ एक दिवस गडावर येऊन राहिले होते. समारंभ अत्यंत थाटानें पार पडला.

या वर्षी उत्सवांत तान्हाजीच्या पुतळ्याचे अनावरण होणार असल्यानें उत्सवाला विशेष स्वरुप आलें होतें व त्यासाठीं अनेक प्रमुख मंडळी उत्सवाकरितां मुद्दाम गडावर आली होती. मेघडंबरीत पुतळा बसविण्याचें काम उत्सवाच्या आधींच दोन दिवस करण्यांत आलं होतें· उत्सवाच्या दिवशीं पहाटेपासून डोणजे व कल्याण–दरवाजा या दोन्ही बाजूंनीं

उत्सवाकरितां येणाऱ्या यात्रेकरूंची रीघ सुरू झाली. उत्सवाचें अध्यक्ष सोंडूर संस्थानाधिपति श्रीमंत राजे यशवंतराव घोरपडे


हें आपल्या परिवारासह मोटारीनें कल्याण दरवाजाच्या बाजूस येऊन पोचले. मी त्यांच्याचबरोबर होतो. आम्ही मोटारमधून उतरताच श्री. ज. स. करंदीकर, बाबासाहेब देशपांडे, यशवंतराव दाते, कल्याणचे पाटील व शेकडो मावळे अध्यक्षांना सामोरें आले. सकाळीं साडेसात वाजतां गड चढण्यास प्रारंभ केला. अध्यक्ष कल्याण दरवाजांतून आंत आल्याबरोबर स्मारक-मंडळातर्फे त्यांना हार घालून त्यांचें स्वागत करण्यांत आलें नंतर सर्व मंडळीं गडावरील आपआपल्या निवासस्थानीं गेली.

सकाळीं साडेनऊ वाजतां पुतळ्याच्या समोरच्या मैदानांत उत्सवाच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रथम अध्यक्षांनीं भगवा ध्वज वर चढविला. संदेशवाचन झालें. त्यानंतर उत्सव-मंडळाचा अध्यक्ष यांत्यानें सभेस जमलेल्या सर्व मंडळींचे स्वागत करून या समारंभाचे अध्यक्ष हे छत्रपती शिवाजीमहाराजांच्या वंशांतले असल्यामुळें त्यांचे उपनांव भोसले असून घोरपडीच्या सहाय्यानें यांच्या पूर्वजांनीं किल्ले सर करण्याची युक्ति प्रथम काढली म्हणून पुढें त्यांना घोरपडे म्हणूं लागले इत्यादि ऐतिहासिक हकीगत निवेदन करून श्रीमंतांनीं अध्यक्षस्थान मंडित करावें अशी त्यांना विनंती केली.

श्री. ज. स. करंदीकर यांनीं या सूचनेस अनुमोदन दिलें. व तान्हाजीच्या पराक्रमाचें वर्णन करून शिवाजी, तान्हाजी, बाजीप्रभतींच्या अद्भुत करामतीमुळें हिंदवी स्वराज्याची स्थापना होऊन हिंदुधर्माचें रक्षण कसें झालें व त्याकरितां तान्हाजीचें स्मारक या ठिकाणीं उभारून त्याचा उत्सव साजरा करणें हें महाराष्ट्रीयांचें पवित्र कर्तव्य कसें आहे याचें विवेचन केलें. त्यानंतर अध्यक्षांनीं तान्हाजीच्या पुतळ्याचें अनावरण करून त्यास हार घातला व भाषणास सुरुवात केली.

## हजार रुपयांची देणगी


ते म्हणाले कीं, “ आपल्या पूर्वजांनीं एकजुटीनें देशसेवेसाठीं अविश्रांत श्रम करून आपली कीर्ति या भूतलावर कायम करून ठेविली. या



सिंहगडावरील तान्हाजींची मेघडंबरी.



नरवीर तान्हाजी मालुसरे ( गडावरील पुतळा )



सिंहगडावरील तान्हाजी-पुण्यतिथि. ( सभेचा देखावा सन १९३९.)

विभूतींनीं घालून दिलेल्या देशसेवेच्या मार्गाचें अवलंबन आज केलें पाहिजे. तान्हाजी स्मारक मंडळाचे संस्थापक व अध्यक्ष श्री. गोविंद-राव देसाई यांनीं पुतळा बसविण्याचा संकल्प केला व तो त्यांनीं शेवटास नेला. याबद्दल गोविंदराव व स्मारक मंडळांतील इतर सर्व मंडळी यांचें महाराष्ट्र आज अभिनंदन करीत आहे. तान्हाजीरावांचा पुतळा इतका उत्कृष्ट साधला आहे कीं, त्यांच्या अंगचे सर्व गुण त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत आहेत."

अशा आशयाचें अध्यक्षांचें भाषण झाल्यावर अध्यक्ष व पुतळा बस-विण्याच्या कामीं ज्यांनीं सहाय्य केले त्यांचे आभार मानतांना श्रीमंत पटवर्धन, शिल्पकार नरवणे, कंत्राटदार श्री. ज. वि. उर्फ बंडोपंत दातार, गडाच्या आजूबाजूचे मावळे, श्री. हरि गोविंद कर्वे, श्री. रा. परांजपे, भा. के. जोशी इत्यादि मंडळींचा मीं प्रामुख्यानें उल्लेख केला. अध्यक्ष राजे यशवंतराव घोरपडे यांनीं पुढें होणाऱ्या धर्मशाळेकरितां एक हजार रुपये देणगी दिली.

श्री. दातार व नरवणे यांचा अध्यक्षांच्या हस्तें सम्मान करण्यांत आला व राष्ट्रगीत होऊन सकाळचा कार्यक्रम संपला. दुपारच्या मोटारनें प्रा. द. वा. पोतदार व डॉ. पळसुले गडावर आले. प्रेक्षकांची गर्दी वाढ-तच होती. दुपारीं हुतुतूचे सामने होऊन त्यांत विजयी झालेल्या संघांना श्री. तात्यासाहेब करंदीकर यांच्या हस्तें बक्षिसें देण्यांत आलीं. सायं-काळीं कुस्त्यांचा फड सुरू झाला. कुस्त्या पाहण्यास लोकांचा जमाव फारच मोठा होता. विजयी उमेदवारांना प्रा. दत्तोपंत पोतदार यांच्या हस्तें नारळ, पागोटीं व रोख रकमा देण्यांत आल्या. रात्रीं पोवाडे व भजनाचा कार्यक्रम होऊन हा उत्सव मोठ्या आनंदानें पार पडला.

१९४२ ची तान्हाजी-पुण्यतिथी श्री. केशव बाळकृष्ण वैद्य यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी झाली. स्मारक-मंडळाचें काम मी एकटाच करीत असें. पुढें श्री. चिं. ग. काशीकर व लोकमान्यांचे नातू श्री. जयंत-राव टिळक यांना मंडळाचे चिटणीस नेमिलें व पुढील कार्याची जबाब-दारी त्यांच्यावर सोपविली.

तान्हाजी–स्मारकाच्या दोन योजना पूर्ण झाल्या. तिसरी धर्मशाळेची योजना १९४३ च्या पुण्यतिथीस पूर्ण करावी असा हेतु होता. परंतु महायुद्ध सुरु होऊन अनेक अडचणी उत्पन्न झाल्यामुळें हें कार्य नाइलाजानें थांबवावें लागलें. पुतळा गडावर बसेपर्यंत इतिहास-संशोधकांच्या संशोधनामुळें स्मारकाच्या कार्यांत शाब्दिक अडथळे आले. पण हें संशोधन रोकड्या कृतीमुळें हास्यास्पद झालें. आम्ही तिकडे लक्ष न देतां स्मारकाचें कार्य शेवटास नेलें.

तान्हाजीच्या पुतळ्याची स्थापना करून सिंहगडावरून परत पुण्यास आल्यावर दगदगीमुळें मला जोराचा ताप येऊं लागला. ताप हटेना, शुद्ध नाहींशी झाली. वैद्य व डॉक्टर निराश झाले. पण पंधरा दिवसानंतर ताप कमी होऊन प्रकती सुधारूं लागली. ता. २७।३।४१ रोजीं गायन समाजाच्या कामाची सर्व व्यवस्था चि. अनंतराव मराठे यांजकडे सोपवून उगार मुक्कामीं विश्रांतीसाठीं गेलों.

## जन्मग्रामाचें आनृण्य

लहानपणीं उगारास असतांना श्रीकृष्णादेवीचा उत्सव, लक्ष्मीदेवीची जत्रा व खेडेगांवीं होणारीं लहानसहान सार्वजनिक कार्यें मी करीत असें. याच वेळीं गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या कामीं साहाय्य करण्यासाठीं द्रव्यनिधी जमवून ठेविल्याचें मला स्मरतें. इंग्रजी शिक्षणासाठीं उगारांतून बाहेर पडलों तों पुन्हां तिकडे गेलों नाहीं. १९३९ सालीं तान्हाजीस्मारकासंबंधानें छत्रपती राजाराममहाराज यांना भेटण्यासाठीं मी कोल्हापुरास गेलों. तेथून उगार नजीक असल्यामुळें श्रीकृष्णादेवीच्या उत्सवासाठीं उगारास गेलों होतों. उत्सवामध्यें माझें व्याख्यान व गायनाचे कार्यक्रम झाले. उत्सवांतील विविध व मनोरंजक कार्यक्रमांत भाग घेऊन यशस्वी झालेल्या मुलामुलींना बक्षिसें देण्याचा समारंभ माझ्या हस्तें झाला.

१९४० सालीं उगार येथील लक्ष्मीदेवीच्या जत्रेंतील शर्यतीचा बक्षिस-समारंभ साजरा करण्यास उगारकरांकडून आलेल्या आमंत्रणाचा

मीं स्वीकार केला. १९४२ ते ४४ साल अखेर श्रीकृष्णादेवीच्या उत्सव-मंडळाच्या अध्यक्षस्थानीं माझी निवड झाली. म्हणून अलीकडे दरसाल उगारास जावें लागतें. मार्च ते मे अखेर उगारास मुक्काम होतो.

१९०८ सालीं मातुःश्रींचा निरोप घेऊन घराबाहेर पडलों तों प्रथम समर्थविद्यालयांत गेलों असें पहिल्या प्रकरणांत लिहिलें आहे. परंतु समर्थ-विद्यालयांत प्रवेश करण्यापूर्वीं घडलेल्या दोन–तीन गोष्टींचा उल्लेख येथें करावासा वाटतो. तो असा कीं, घर सोडल्यावर पुन्हां सांगलीसच एका मित्राच्या घरीं एक आठवडा मुक्काम केला. तेवढ्या अवधींत अर्जुनवाडकर इनामदार यांचें बोलावणें आलें. तें स्वीकारून अर्जुनवाड ( जि. बेळगांव ) येथें गेलों. मराठी चार इयत्ता व इंग्रजी चार इयत्ता यांचें शिक्षण देण्याची राष्ट्रीय शाळा काढण्याचा मानस अर्जुनवाड-रांनीं सांगितला. त्यांच्या इच्छप्रमाणें लगेच कार्यास आरंभ केला. विद्यार्थ्यांची संख्या सोळा होती. अदमासें सहा महिने ही शाळा चालू होती. सरकारी अधिकाऱ्यांनीं एकच वेळ या शाळेची पाहणी केली. त्यानंतर अनपेक्षित सरकारी अडचणीमुळें हें कार्य बंद करावें लागलें.

## समर्थांच्या चरणाशीं

अर्जुनवाड सोडून समर्थविद्यालयांत जाण्यासाठीं निघालों तों वाटेंत सज्जनगडाकडे वळलों. श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या पुण्यतिथी–उत्सवास यापूर्वीं मी दरसाल गडावर दहा दिवस जात असें. त्याप्रमाणें यंदाही गडावर जाण्यासाठीं साताऱ्यास आलों. साताऱ्यास आल्यावर एकाएकींच माझ्या दोन्हीं पायास घोट्यानजीक मोहरीसारखा बारीक फोड येऊन पायास सूज आली. किंचित् ठणकाही लागला. परंतु एवढ्याशा दुःखास मी केव्हांही जुमानीत नसे. साताऱ्याहून कांहीं यात्रेकरू माझ्याबरोबर निघाले. गडाखालीं येईपर्यंत पाय फारच सुजले व सहन न होण्याइतका ठणका लागला व तापही भरला. माझी ही स्थिति पाहून बरोबरच्या लोकांनीं मला परत पोंचविण्याचें ठरविलें. मी परत जाण्याचें नाकारलें.

सज्जनगडाखालीं डोली अगर दुसरें वर जाण्याचें कोणतेंही साधन नाहीं आणि पाय अतिशय सुजून ताप तर फारच भरलेला! अशा स्थितींत मी गडावर कसा जाणार? याची सर्वांस काळजी वाटूं लागली. अशा स्थितींत मीं गडाच्या पायथ्याशीं येऊन पोचलों.

बरोबरचे यात्रेकरू जवळ आले व त्यांनीं प्रकृति पाहिली. गडावर जाणें अगदींच अशक्य होतें व तें सर्वांना समजलें. तथापि माझा गडावर जाण्याचा निश्चय मीं त्यांना सांगितल्यामुळें ते बिचारे गप्प बसले. गड चढण्यास मीं सुरवात केली. बसत, उठत, विश्रांति घेत घेत निघालों. बाकीच्या मंडळींना पुढें जाण्यास सांगितलें. हजारों यात्रेकरू गड चढत होते. ते माझी स्थिति पाहून "आपलें नांव काय? कोणत्या गांवाहून आलांत. पायास एवढे मोठें दुःख कशाचें, तुम्हास ताप भरला आहे, पाणी पाहिजे काय? कांहीं खाता का?" असें विचारून आपलेपणानें माझ्या-बरोबर हळुहळु येऊं लागले. असल्या कष्टमय स्थितींत सायंकाळीं साडे सहाच्या सुमारास गडाचा दरवाजा गांठला. तेथें अर्धा तास बसून नंतर मंडपाकडे गेलों.

गडावर दरसाल सासवडचे श्री. सखारामबुवा व शंकरबुवा बुधकर हे दोघे सख्खे बंधु सासवडचा प्रसिद्ध भजनी मेळा घेऊन उत्सवास येत असत. आमच्यापूर्वीं एक दिवस ते गडावर येऊन् राहिले होते. मी दरसाल त्यांच्या मेळ्यांत मुक्काम करीत असें. ते कोठें उतरले आहेत याची चौकशी करीत होतों तों माझ्याबरोबर आलेल्या यात्रेकरूंनीं मला मंडपा-नजीक गांठलें. त्या सर्व मंडळींनीं एक ठिकाण पाहिलें तें श्री. बुधकर-बुवाच्या अगदींच शेजारीं होतें. मी तेथें जातांच बुधकरबुवांची भेट झाली व ते मला आपल्या भजनी मंडळांत घेऊन गेले. पौर्णिमेच्या दिवशीं सायंकाळीं ७॥ वाजतां मी गडावर पोचलों.

दुसरे दिवसापासून उत्सव सुरु झाला. आधींच पायाच्या दुःखानें ताप येऊन मी हैराण होऊन गेलों होतों. त्यांत गड चढण्याचे श्रम झाल्यामुळें दुखणें फारच विकोपास गेलें. गुडघ्याच्या खालीं दोन्ही पाय सुजून मांडीसारखे जाड झाले व वेदना होऊं लागल्या. तापानें सर्व शरीर आगी-

तून काढलेल्या कोळंडासारखें तापलें व शुद्ध नाहींशी झाली. बरोबर आलेली सर्व मंडळी व बुधकरबुवा अत्यंत काळजींत पडले. खाणें बंद झाल्यामुळें ऊन पाणी व दूध याखेरीज इतर पदार्थ घेणें अशक्य झालें. गडावरील यात्रेकरू रोज एकवार मला पाहून जात. बुधकरबुवांनीं व बरोबर आलेल्या मंडळींनीं शुश्रूषा फारच चांगली केली. चार दिवसांनीं मीं शुद्धीवर आलों. दरसालप्रमाणें मंडपांत प्रसादास जाणें अगर भजन, पुराण, व्याख्यानादि कार्यक्रमास हजर राहतां येईना. त्यामुळें मनास क्लेश होऊं लागले. चोवीस तास अंथरुणास खिळून राहिलों होतों. अशा उदास व कंटाळवाण्या स्थितींत आठ दिवस संपले. शेवटचा नवमीचा दिवस उगवला. माझी प्रकृति सुधारण्याचें चिन्ह थोडेंसुद्धां दिसेना. उलट पाय जास्तच सुजले. बुधकरबुवा मोठ्या विचारांत पडले. माझ्याबरोबर आलेल्या स्त्रीपुरुष मंडळींना चिंता वाटूं लागली. मला गडावर ठेवणें अशक्य, गडावरून खालीं नेणें अशक्य, असें अवघड होऊन बसलें.

## करुणा भाकली

नवमीचे दिवशीं सकाळीं आठ वाजतां बुधकरबुवांना जवळ बोलविलें व मला तळघरांत असलेल्या समर्थांच्या समाधीपाशीं घेऊन जाण्यास सांगितलें. बुवांनीं लगेच दहा बारा रामदासी बोलाविले व त्यांनीं मला उचलून समाधिपुढें नेऊन ठेविलें. प्रेतासारखी अवस्था झालेली. समाधिसमोर मी आडवा पडलों व बोलण्यास सुरुवात केली.:—

" प्रतिवर्षी मी येथें येत असतों. यंदाही आलों. येण्यापूर्वीच आजारी होतों. तथापि गडावर आल्यानंतर समर्थांच्या कृपेनें बरा होईन अशी खात्री होती म्हणूनच वर येण्याचे श्रम व धाडस केले. परंतु बरें वाटण्याऐवजीं गोष्ट भलत्याच थराला गेली असून सर्व यात्रेकरू काळजींत आहेत, अशा स्थितींत गडावर अंत झाल्यास फारच आनंदाची गोष्ट, नाहीं तर तात्बडतोब बरें वाटून गड उतरण्याची तरी शक्ति समर्थांनीं द्यावी म्हणजे यात्रेकरूंची चिंता दूर होईल. गेले नऊ दिवस गडावर जमलेल्या रामदासी मंडळींना माझ्याकरितां अतिशय त्रास व कष्ट सोसावे लागले व आतां तर पुढें काय करावें या काळजींत ते आहेत. समर्थांच्या इच्छे-

प्रमाणें या गोष्टीचा निकाल होऊन सर्वांची काळजी त्वरित दूर व्हावी अशी समर्थ-चरणीं प्रार्थना आहे. ”

इतकें गाऱ्हाणें समाधिपुढें सांगितल्यानंतर मंडळींनीं मला तेथून माझ्या ठिकाणीं आणून ठेविलें. आठ दिवस झोप नव्हती. समाधिचें दर्शन घेऊन आल्यानंतर नवमींचे दिवशीं सकाळीं अदमासे साडेनऊच्या सुमारास गाढ झोप लागली. सर्व दिवस व रात्र झोपेंत गेली.

नवमी–दिवशींचा गडावरील उत्सवाचा सर्व सोहळा पार पडला, त्याचे कार्यक्रम कसे झाले या गोष्टीची मला दादही नव्हती. यात्रेकरू आपल्या ठिकाणीं केव्हां येऊन झोपले तेंही समजलें नाहीं. दहावे दिवशीं पहाटे ४ वाजतां मी एकदम जागा झालों. सूज आल्यामुळें अतिशय जड झालेले पाय अगदींच हलके वाटूं लागले. सूज उतरलेली दिसली. उठून उभे रहावे असें वाटलें. मी उभा राहिलों. बाहेर जाण्याची उत्सुकता वाटली. बाहेर पडलों व तळ्यावर जाऊन स्नान करून आलों. मंडपांत जाऊन समर्थांचें दर्शन घेतलें व ठिकाणावर येऊन बसलों. सर्व यात्रेकरू गाढ झोपेंत होते. सकाळीं ६ वाजतां मंडळी जागीं होऊं लागली. पाहतात तों मी उठून बसलेला–पायाची सूज उतरून प्रकृति एकाएकीं इतकी बरी झालेली पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें व आनंदही झाला. गड उतरून खालीं आलों. साताऱ्यास चार किंवा पांच दिवस मुक्काम करून पुढें तळे-गांवास समर्थ विद्यालयांत गेलों.

प्रकरण १३ वें

# पुण्यांतील गोळीबार

आतां मी स्वस्थ होतों. गायनकलेची सेवा यथाशक्ति झाली आहे, तिच्या द्वारें समाजाची सेवाहि हातून थोडीफार झाली आहे; त्याशिवाय रेल्वेमंडळ, तान्हाजीचें स्मारक, राष्ट्रीय शिक्षण वगैरे कार्यांना हातभार लागला आहे या समाधानी व शांत वृत्तीनें गायनसमाजाच्या दगदगींतून मी निवृत्त होण्याच्या विचारांत असतांनाच देशांतील क्षुब्ध परिस्थितीनें मला वेढून टाकलें व पुनः खटक्याचे व खळबळीचे प्रसंग निर्माण झाले.

१९४२ साल! चालू महायुद्ध अधिकच पेट घेऊं लागलें. महायुद्धामुळें महागाई फारच झाली. कायद्याचीं बंधनें वाढूं लागलीं. प्रजेला चोंहोंबाजूंनीं जाच होऊं लागला. सरकारचें धोरण पाहून लोक क्षुब्ध होऊं लागले. महात्मा गांधींना अटक झाल्याची वार्ता प्रसिद्ध होतांच तर हिंदुस्थानभर आगीचे डोंब उठले. जिकडे तिकडे निषेधाच्या सभा भरून मिरवणुकी निघूं लागल्या. पुण्यास ता. ९ आगष्ट रोजीं निषेधाची पहिली सभा झाली. त्यांत लोकांवर लाठीहल्ला व गोळीबार होऊन कित्येक लोक जखमी झाले व एक विद्यार्थी तर ठार झाला. तथापि लोक भ्याले नाहींत. दुसऱ्या दिवशीं (१०।८।४२) सर्व शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांची सभा होऊन या अरेरावीचा व निर्दयपणाचा निषेध करण्यांत आला. याच दिवशीं सकाळीं अदमासें आठ ते नऊ हजार विद्यार्थ्यांची मिरवणूक निघाली.

ही मिरवणूक सर्व शहरभर फिरून परशुरामभाऊ कॉलेजजवळ दुपारीं अदमासें १२ च्या सुमारास आली. सरकारी अधिकाऱ्यांनीं या ठिकाणीं या मिरवणुकीस पुढें जाण्यास बंदी केली. डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडन्ट ऑफ पोलिस; कलेक्टर, युरोपिअन अधिकारी, ब्राम्हण अधिकारी व पोलीस यांच्याशीं विद्यार्थ्यांचा बराच वेळ वाद झाला. विद्यार्थी मिरवणूक मागें घेण्यास अगर रहित करण्यास तयार नाहींत असें पाहून सदर अधिकाऱ्यांनीं बरोबर आणलेल्या शिपायांना लाठीहल्ला करण्याचा व बंदुकी झाडण्याचा एकदम हुकूम दिला ! हा लाठीहल्ला व गोळीबार सदर दिवशीं दुपारीं १ वाजण्याच्या सुमारास झाला. नुसत्या लाठीहल्ल्यास लोकांनीं जुमानलें नसतें. बंदूकी झडूं लागल्यामुळें विद्यार्थ्यांनीं माघार घेतली व जिवाच्या भीतीमुळें ते पळूं लागले. या मिरवणुकींत विद्यार्थिनीहि सामील होत्या.

जे पळाले ते बचावले, राहिले त्यांना जखमा होऊन ते रस्त्यावर ठिकठिकाणीं बेशुद्ध पडले. या झटापटींत मी होतोंच. अमानुष लाठीहल्ला व निर्दयपणानें व अन्यायानें होत असलेला गोळीबार पाहून मी दंग्यांत शिरलों. शिपाई व साहेब यांच्याशीं पांचसात मिनिटें मीं बोलत होतों. तोंच मला बंदुकीच्या दस्त्याचा मार लागला, लाठींचे तडाके बसले व अखेर बंदुकीच्या गोळीचाहि निसटता मार लागला. सर्व शरीर व कपडे रक्तानें भरलेल्या स्थितींत बेशुद्ध होऊन पडलों. स्वयंसेवकांनीं ससून रुग्णालयांत मला नेलें. तेथें मी दोन दिवस होतों.

तेवढ्या अवधींत जखमी तरुणांना पाहण्यासाठीं शेकडों लोक ससून रुग्णालयांत आले. पाहण्यास आलेल्या कित्येक देशभक्तांनीं " मिरवणुकींत तुम्ही गेला कसे ? " असा प्रश्न मला विचारला. मीं सांगितलें कीं, " नेहमींप्रमाणें कांहीं कामासाठीं मी पहाटेसच बाहेर पडलों- काम आटोपून मी परत घरीं निघालों तों रस्त्यावरून प्रचंड मिरवणूक चाललेली. दोघांचा रस्ता एकच असल्यामुळें मिरवणुकीच्या बाजूबाजूनें मी येत होतों. मिरवणूक परशुरामभाऊ कॉलेजजवळ येऊन थडकली. या ठिकाणीं लष्करी अधिकारी व सशस्त्र पोलिस उभे होते. त्यांनीं मिरवणुकीस

अडवून धरलें. चोहोंकडून रस्ते बंद केले. त्यामुळें घरीं पोचण्याऐवजीं साहजिकच मी मिरवणुकींत सांपडलों. मिरवणुक कोणत्या पक्षाची आहे याचा विचार करण्याचें कारण नव्हतें. आज आपणावर बंदुका झडणार हें प्रत्यक्ष दिसत असूनसुद्धां मृत्यूस न भितां अन्यायाचा प्रतिकार करण्यास विद्यार्थी तयार झालेले दिसले. सरकारच्या बाजूनें अरेरावी व अधिकारांचा दुरुपयोग होत असलेला पाहून संताप आला. लाठीहल्ला व गोळीबार होऊन निष्पाप लोकांची कत्तल होण्याचा रंग दिसूं लागला. मिरवणुकीखेरीज इकडे तिकडे जाणारे इतर लोक कोंडलें गेले. माझी तीच स्थिति झाली. पोलीस मला कोणीकडेच जाऊं देईनात. एकदोन वेळ पोलिसाशीं तक्रार झाली. ती ऐकून एक युरोपिअन अधिकारी तेथें आले. माझें नांव त्यांना माहीत होतें असें दिसलें. त्यांनीं मला विचारिलें

"Mr. Desai, what are you about ?"

मी:-Nothing.

साहेब:—Then why are you quarreling with the police ?

मी:—No; I am not quarreling with the Police, I want simply to go to my house by this side, but the police would not allow me.

इतकें उत्तर देतां न देतां तोंच लाठीहल्ला सुरू झाला. बंदुकाही झडूं लागल्या. तें समरांगण रंगलेलें पाहून:—

॥ शूर संग्रामको देख भाग नहीं ॥
॥ देख भागे सोही शूर नाहीं ॥

या कबिरोक्तिची आठवण होऊन शेकडो लोकांबरोबर मी मरण्यास तयार झालों. हल्ला करणाऱ्या पोलिसांबरोबर पठाणही होते. विशेषेंकरून प्रथम या पठाणांनींच क्रूरपणानें लोकांना मारण्यास सुरुवात केली. तें पाहून त्या पठाणांना मी मोठ्यानें ओरडून सांगितलें कीं,

" अरे भाईओ हमारेपास न हथिमार या न लाठी, हम बिलकुल निःशस्त्र है. ऐसे निरपराधी और निर्बल लोगोपर आप जैसें सशस्त्र सीपाहीयानें हमला करना ये शौर्य नही! ये निर्दयता है!"

इतक्यांत एक पंधरा किंवा सोळा वर्षांचा मुलगा लाठीचा तडाखा जोरानें बसल्यामुळें घायाळ होऊन जमिनीवर पडला. तें पाहून तर मला फारच दुःख झालें, शिपाई–पठाणांना मी हात जोडले व सांगितलें कीं,

" लढना चाहते है तो मुझको एक लाठी दो और फिर देखो किसके पास ताकद् है और कौं वीर है!

साहेब जवळच होते. मैदानावर हाहाःकार उडालेला. तरीदेखील मी आवेशानें बोलत आहे हें पाहून साहेबानीं आपल्या मोडक्या–तोडक्या हिंदी भाषेंत शिपायास विचारलें कीं, देसाई क्या बोला है. शिपायानें सांगितलें कीं, " लाठी मांगते है. " शिपायाचे हे शब्द ऐकण्याबरोबर साहेब हातांतील दांडकें उगारून माझ्यावर धावून आले. तें पाहून शिपाई अधिक जोरानें पुढें सरकल्यामुळें मिरवणुकींतील लोकांना तो मार सहन होईना. जीव बचावण्याकरितां मिरवणुकीचे लोक जवळच्या घरांत शिरण्याचा प्रयत्न करूं लागले, कित्येक वाट सांपडेल तिकडून पळत सुटले. आजूबाजूची गर्दी कमी होऊन रणमैदान उजाड दिसूं लागलें. मलाही या गर्दीत कोणाच्या तरी घरांत शिरून अगर पळ काढून माझी सुटका करून घेतां आली असती. पण तें पौरुष किंवा पराक्रम नव्हे! हजार दोन हजार माणसें ठार होऊन महाराष्ट्राच्या भावी इतिहासांत हें ठिकाण व ही कत्तल प्रसिद्ध होईल असें वाटलें. परंतु मागें पाहातों तों मिरवणुकींतील हजारों माणसें बंदुकीचे बार ऐकून पक्ष्यासारखी भराभर उडाली. सर्व मैदान मोकळे झालें. तें पाहून व आपला अंदाज चुकल्याचें समजून अत्यंत वाईट वाटलें. आठ हजार तरुण लोकांपैकीं अवघे पंधरा किंवा सतरा इसम या हल्ल्यांत टिकले. जमिनीवर पडेपर्यंत ते झगडत होते. मी त्यापैकींच एक होतों हें सर्व पाहून आमची मृत्यूची भीति नाहींशी होण्यास अजून पन्नास वर्षें तरी पाहिजेत हें लक्षांत आलें. " हें माझें उत्तर ऐकून प्रश्न करणाराचें समाधान झालें.

असून रुग्णालयांतून तिसरे दिवशीं अनंतराव मराठे यांनीं मला " हरि-हर निवासमधें " परत आणलें. सर्व शिष्यमंडळींनीं माझी शुश्रूषा उत्तम केल्यामुळें पंधरा दिवसांत बरा झालों. विशेषेंकरून अशा प्रसंगीं औषधोपचार व खाण्यापिण्याची योग्य तजवीज लक्ष्मण पुणतांबेकर हाच आजवर करीत आला. हा विद्यार्थी १९२० सालीं माझ्याकडे संगीताचा अभ्यास करण्यासाठीं आला. तेव्हांपासून संस्थेबद्दल त्याचा आदर व आपलेपणा जो आहे तो अद्यापपर्यंत कायम आहे. अगदीं थोडक्यांत सांगावयाचें तर

शिष्य पाहिजे निष्ठावंत, शिष्य पाहिजे सुचिष्मंत,
शिष्य पाहिजे नेमस्त सर्वप्रकारीं ॥
शिष्य असावा सद्विद्येचा, शिष्य असावा सद्भावाचा
शिष्य असावा अंतरींचा परमशुद्ध ॥

अशीं सच्छिष्याचीं लक्षणें समर्थांनीं सांगितलीं, त्या सर्व लक्षणांनीं युक्त असा हा शिष्य मिळाला परंतु गुरु मात्र त्या योग्यतेचा नाहीं. असें असूनदेखील

कामिनं कृष्णरूपं हि गुरुं मन्येत मानवः ॥
सत्यव्रतं रामचंद्रं, नृसिंहं क्रोधिनं तथा ।
कपटं वामनं विद्यात् दोषैस्तं न नरं स्मरेत्

अशा रीतीनें हा विद्यार्थी आजवर माझ्याशीं वागत आला. आई मुलाची काळजी घेते त्याचप्रमाणें पुणतांबेकरानें मला आजवर संभाळिलें व आजही तो माझी तशीच काळजी घेत आहे.

हा विद्यार्थी आयुर्विद्या-विशारद असून गोपाल-गायन-समाजाच्या " संगीत मध्यमा " परीक्षेत उत्तीर्ण झाला आहे. हल्ली लक्ष्मणशास्त्री पुणतांबेकर वैद्य या नांवानें तो प्रसिद्ध असून बुधवार चौकानजीक त्यानें दवाखाना काढिला आहे. दवाखाना व संसार संभाळून गायन-समाजाचें पडेल ते काम हे लक्ष्मणशास्त्री आजही करीत आहेत हें वाचून पुणतांबेकरांबद्दल कोणालाही आदरच वाटेल.

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची सेवा

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाशीं आरंभापासून संबंध असल्यामुळें त्या वेळचे विद्यापीठाचे कार्यवाह श्री. सदाशिवराव भावे यांनीं विद्यापीठाच्या कार्यकारी व नियामक मंडळांत मला निवडून देण्याची खटपट केली व त्याप्रमाणें १९३५ सालीं दोन्ही ठिकाणीं एकमतानें माझी निवड झाली. संगीताचा अभ्यासक्रम पुण्यांतील सर्व प्रसिद्ध गायकांच्या संमतीनें विद्यापीठास तयार करून दिला. विद्यापीठातर्फे होणाऱ्या संगीताच्या सर्व परीक्षा गोपाल–गायन–समाजांतच होत असतात.

## रौप्यमहोत्सव

गायन–समाजाच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी व हितचिंतकांनीं गायन–समाजाचा रौप्यमहोत्सव करण्याचें ठरविलें. लगेच रौप्य महोत्सव मंडळ नेमण्यांत येऊन कार्यास आरंभ केला. या कामीं खर्चाचा अंदाज अदमासे ७०० रु. झाला. एवढी रक्कम जमा होईल किंवा नाहीं अशी शंका वाटत होती. परंतु आमच्या संस्थेचे अभिमानी

श्री. श्रीकृष्ण दत्तात्रेय चितळे

यांनीं कार्यारंभींच २०१ रुपयांची रोख देणगी दिल्यामुळें या कार्यास उत्कृष्ट चालना मिळाली. आळीकर मंडळींनीं १४१ रुपये रोख दिल्यामुळें कार्य करण्यास विशेष उत्साह वाटूं लागला. संस्थेचे माजी विद्यार्थी श्री. नारायण वासुदेव कोगेकर एम्. एस्.सी. यांनीं रोख रुपये पंचवीस देणगीदाखल दिल्यामुळें जरूर तो द्रव्यनिधी जमेल असा विश्वास उत्पन्न झाला. कमी पडणारी रक्कम रौप्य महोत्सव मंडळानें जमविण्याचें मनावर घेतल्यामुळें सर्वच काळजी दूर झाली. याप्रसंगीं महत्वाचें पण अधिक खर्चाचें काम म्हणजे गायनसमाज व त्याबरोबर केलेल्या इतर विविध कार्यांचा इतिहास पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणें हें होय. पुस्तकास लागणारा कागद व छापण्याची व्यवस्था या दोन्ही गोष्टी आपलेपणानें व सुलभतेनें जमून आल्यामुळें ग्रंथ छापून घेतां आला.

# भाग २ रा

# लेख व भाषणें

## संगीताची महती

[ ' प्रावीण्य ' मासिकाच्या १९३२ नोव्हेंबर ते १९३३ जून पर्यंतच्या अंकांत पुढील लेखमाला प्रसिद्ध झाली आहे. ]

॥ संगीत गांयनीं विद्या । सर्व सद्या मनोरथा ॥
॥ विदश पाहतां नाहीं । धन्य ते गायनी कळा ॥

—रामदास.

श्री समर्थांनीं संगीत विद्येची जी महती वर्णन केली आहे, ती पाहिली म्हणजे तालस्वराच्या साहाय्यानें मनुष्यप्राणी मोक्ष मिळविण्यास समर्थ होतो असें समर्थांनीं त्या ओव्यांमधून ध्वनित केल्याचें दिसून येतें. आध्यात्मिक दृष्टीनें विचार केल्यास सृष्टीची उत्पत्ति स्वरापासूनच असून स्वर म्हणजे साक्षात परमेश्वर आहे असें दिसून येईल. जगाच्या उत्पत्तीसंबंधीं पार्वतीनें महादेवास प्रश्न केला, त्यावळीं महादेवांनीं सांगितलें कीं,

" स्वरे वेदाश्च शास्त्राणि स्वरे गांधर्वमुत्तमम् । स्वरे च सर्वत्रैलोक्यं स्वरमात्मस्वरूपकम् ॥

ब्रम्हांड–पिंड–खंडाद्याः स्वरेणैव हि निर्मिताः । सृष्टिसंहारकर्ता च स्वरः साक्षान्महेश्वरः ॥

भगवंतांनीं ब्रम्हदेवास सृष्टी निर्माण करण्याची आज्ञा केली. तेव्हां ब्रम्हदेवानें ज्ञान मागितलें. भगवंतांनीं ब्रम्हदेवास वेद सांगितले, आणि त्याच वेदांच्या साहाय्यानें ब्रम्हदेवानें हें सर्व जग निर्माण केलें. वेद म्हणजे अर्थपूर्ण शब्दसमूह, आणि शब्दाचें मूळ स्वर, म्हणजे सृष्टीची उत्पत्ती स्वरापासून आहे हें स्पष्टच झालें. अर्थात स्वर आणि परमेश्वर हे भिन्न नसून एकरूपच आहेत. आपल्या गायनविद्येचा आधारहि हाच स्वर आहे.

मग तो स्वर समजण्यासाठीं केवढी तपश्चर्या केली पाहिजे हें निराळें सांगावयास नको. ज्याला स्वर प्रसन्न झाला त्यानें परमेश्वरास ओळखिलें. इतका या गायनविद्येचा परमेश्वराशीं निकट संबंध आहे. परंतु इतका खोल विचार कोण करतो ?

नरसी मेहता, रामदास, नाथमहाराज, तुकाराम, तुळशीदास, सूरदास वगैरे महान् भगवद्भक्त कीर्तन–भजनामध्यें इतके तल्लीन होऊन जात कीं, त्यांना स्वतःचा विसर पडत असे. नामदेवासंबंधानें म्हटलें आहे कीं,

नामदेव कीर्तन करी । पुढें हा नाचे पांडुरंग ।

यावरून आणि प्रारंभीं दिलेल्या दिलेल्या समर्थांच्या ओवीवरून या सर्व साधुसंतांना गायन–कलेच्या महत्त्वाची पूर्ण जाणीव होती हें सिद्ध होतें. आरंभीं दिलेल्या समर्थांच्या ओवीचा अर्थ असाः—" संगीत–विद्या सर्व मनोरथ पूर्ण करणारी असून जो उत्तम गायक आहे तो पृथ्वीचे पाठीवर कोठेंही गेला तरी आपण परदेशांत आलों अशी त्याची भावना होत नाहीं. कारण त्याचेजवळ असलेल्या संगीत–शक्तीच्या योगानें आजू-बाजूचे लोकांस तो परकी वाटत नाहीं. " समर्थांच्या आणखी ओव्या अशाः-

आवडी सकळै लोका । प्रीतिनें भजती जनीं ॥
इच्छिलें पुर्विती सर्वै ॥ धन्य ॥
वेधिली सर्वहि चित्तें । बोधिली लोक भाविकें ॥
अद्भूत गुण देवाच ॥ धन्य० ॥
येकाकी महंती येते । उदंड कीर्ति वाढते ॥
विख्यात सकळें लोकीं ॥ धन्य० ॥
राहती लोक ते राजी । आवडी उपजे मनीं ॥
वर्णिता कीर्ति देवाची ॥ धन्य० ॥
दुसरी भक्ति देवाची । जगदोद्धाराचि हांउंजे ॥
घमंड गाजते मोठें ॥ धन्य० ॥
बालकें श्वापदें पक्षी । लोधती वेधती मनीं ॥
चित्त निश्चिंत होताहे ॥ धन्य ॥
भक्तीची आवडी मोठी । करुणा कीर्तनें बरी ॥
भक्तांची आवडी भक्तां ॥धन्य०॥

## गायन व समाजसेवा

गायन–कलेचा खरा उपयोग परमेश्वराचे गुणानुवाद गाणें व समाजसेवा किंवा लोकजागृती करणें याकडे करावयाचा आहे. नुसतें करमणुकीचें साधन म्हणून नव्हे हें विशेष लक्षांत घेतलें पाहिजे. परमेश्वराचे गुण गातांना किंवा कीर्तन–भजनद्वारा लोकसेवा करीत असतांना त्याबरोबर स्वतःची व लोकांची करमणूक आपोआपच होते. म्हणजे गायन आणि समाजसेवा अशी सांगड घातली तर सर्व हेतू साधतात, परंतु गाण्याची बैठक म्हटली म्हणजे त्यांत करमणुकीखेरीज दुसरा कोणताच हेतू साध्य होत नाहीं. याचा अर्थ गाण्याची बैठक करूं नये असा मुळींच नाहीं. मैफली अवश्य पाहिजेत. मैफलीखेरीज कला जिवंत राहणार नाहीं. परंतु मैफली करणारांनींसुद्धां स्वार्थाबरोबर परमार्थही थोडा पहावा, आणि असें होईल तरच त्या कलेचा जिवंतपणा दिसून येईल. बेठकींत उत्तम

गाणारा मनुष्य म्हणजे करमणुकीचें एक मोठें साधन यापेक्षां जास्त महत्त्व दिलें जात नाहीं. समर्थांच्या शिकवणीप्रमाणें गायनकलेचा उपयोग होईल तरच गायकाचें व कलेचें खरें महत्व राहील. एरव्हीं आजकाल जो कार्यक्रम चालू आहे तो पाहतां आम्हीं गायक आपण होऊनच त्या कलेचें महत्त्व कमी करीत आहों असें स्पष्ट दिसून येतें. गायकाला कोणी आदरानें व प्रेमानें गाण्यास बोलावील तर त्यानें अवश्य जावें, परंतु आपण होऊन " माझें गाणें करा " अशी याचना करीत हिंडूं नये. असली याचक वृत्ती गायक वर्गामध्यें फार दिसून येते. या भलत्याच याचनेमुळें गायकवर्गाबद्दल लोकांची समजूत काय होऊन बसली आहे, याचा अनुभव ज्याला त्याला येत असतो. परंतु तो उघड बोलून दाखविला जात नाहीं, इतकेंच.

## इंग्रजी शिक्षण

गेल्या वीस वर्षामध्यें संगीताचा प्रसार लोकांमध्यें अतिशय झाला. श्रीमान्, विद्वान व कुलीन स्त्री–पुरुषांमध्यें या विद्येची आवड उत्पन्न झाली. तथापि ही विद्या वेश्या वगैरेकरतां असून उच्च दर्जाच्या लोकांनीं ती शिकण्याच्या भरीस पडूं नये अशी आजमितीससुद्धां कोठें कोठें समजूत आहे. मुलें शाळेंत शिकण्यास नालायक ठरलीं म्हणजे मग गायनसमाजाकडे येतात असा अनुभव केव्हां केव्हां येतो, याचें कारण गायकवर्गामध्यें शेंकडा नव्याण्णव माणसें अशिक्षित असतात. नुसतें लिहितां–वाचतां आलें तर तेवढ्यानें आजकाल मनुष्य लोकादरास पात्र होत नाहीं. तो निदान हायस्कूलच्या सात यत्तांमधून तरी पार झाला पाहिजे. बाकी इंग्रजी सात यत्ताच काय परंतु विश्वविद्यालयाच्या परीक्षांतून मुक्त झालेल्या लोकांचा तरी हल्लीं दर्जा काय आहे हें दिसतेंच आहे. तथापि सर्वसाधारण समजूत अशी कीं, हल्लीचें इंग्रजी शिक्षण ज्याला नाहीं त्याला समाजांत किंमत नाहीं. गायकवर्गास या शिक्षणाचा गंधही नसतो. कांहीं इंग्रजी पदवीधर चांगले गायक आहेत परंतु तें प्रमाण अगदींच कमी, म्हणून गायकवर्गाची अशिक्षित, अनियमित, अव्यवहार्य, व्यसनी व बुद्धीहीन लोकांत गणना केलीं जाते. सुशिक्षित

म्हणाविणाऱ्यामध्येंहि हे दोष असतातच, परंतु गाणाऱ्या लोकांसंबंधानें पूर्वापार ज्या कांहीं वेड्यावाकड्या समजुती आहेत, त्या अजूनही कमी होत नाहींत, आणि याचा बराचसा दोष गायकांकडेच आहे.

## अभ्यासक्रमांत स्थान

गायनविषय चैनी व व्यसनी लोकांचा, असा समज असल्यामुळें शिक्षण–खात्यांत जरूरीचे म्हणून जे विषय समजले जातात त्यांत गायनाची गणना केली जात नाहीं. अशा स्थितींत बहुजनसमाजाला या कलेची थोरवी काय आहे, हें दाखवून देण्याची जबाबदारी गायकवर्गावर पडते. आणि ती जबाबदारी पार पाडण्यासाठीं काय केलें पाहिजे याचा विचार करावयाचा तर प्रथम अनियमितपणा सोडला पाहिजे, पान, तंबाखू, विड्या, वगैरे गोष्टींचा अतिरेक होतो तो न व्हावा. या गोष्टींना अजिबात फाटाच दिल्यास फार चांगलें. उदरनिर्वाहाकरितां लांगूल–चालन करूं नये. सभा व प्रसंग पाहून वागलें पाहिजे. अप्रासंगिक गायन नसावें. म्हणजे श्रीगजाननापुढें गात असतां " दे हाता शरणागता " किंवा " नच सुंदरी करुं कोपा " असल्या पदांची योजना केव्हांहि करूं नये. लग्नकार्यांत अगर उत्सव–प्रसंगीं जेवणाचे पंक्तीस समर्थांचे श्लोक किंवा मोरोपंतांची आर्या अगर वामनपंडिताचा श्लोक म्हणण्याची आजपर्यंतची वहिवाट कमी होऊन त्या ठिकाणीं नाटकांतील पदें म्हणण्याची चाल पडत चालली आहे. त्याला आळा बसला पाहिजे. चार माणसें खूष करण्यापलीकडे आपल्याला कांहीं तरी करावयाचें आहे याची जाणीव गायकाला असणें जरूर आहे.

## कुलीन स्त्रियांची मर्यादा

कुलीन स्त्रियांमध्यें गायनकलेचा प्रसार होत आहे हें अभिनंदनीय खरें, परंतु कुलीन स्त्रियांनीं नाटकगृहामध्यें जलसे करण्याचा जो उपक्रम केला आहे तो फारच वाईट आहे. गायनकलेवर द्रव्य संपादन करण्याची त्यांची इच्छा असेल तर त्यांनीं स्त्रियांकरितां घरींच गायनवादनाचा वर्ग काढल्यास त्यांचा हेतु साध्य होईल. कुलीन स्त्रियांनीं सर्वस्वीं गायन-

विद्येवरच उदरनिर्वाहाची खटपट करणें इष्ट नाहीं. तात्पर्य असें कीं, ह्या व अशा अनेक गोष्टी कीं ज्यांच्या योगानें गायक व गायनविद्या यांना दोष येईल त्या सर्वस्वीं आम्हीं वर्ज्य केल्या, तरच गायकानें गायनकलेची महती व स्वतःचा दर्जा आणि जबाबदारी ओळखिली असें होईल. उलटपक्षीं सुशिक्षित म्हणविणाऱ्यांनीं चांगल्या दृष्टीनें या कलेकडे पाहिलें तर ती वेश्या किंवा इतर हीन धंदेवाईक यांचेकरितां नसून उच्च दर्जाच्या लोकांकरितांच आहे हें सहज ध्यानांत येईल. ब्रम्हपुत्र नारदांच्या खांद्यावर सदोदित वीणा–वाद्य असून या स्वराच्या सहाय्यानेंच नारद त्रैलोक्यांत भ्रमण करीत असत. तेहतीस कोटी देव ज्या सरस्वतीचें ध्यान करितात, त्या सरस्वतीचे हातांतही सदोदित वीणाच असतो. भगवान गोपालकृष्ण सदोदित मुरलीचे नादांत निमग्न असून गांधर्व वेद, म्हणजे गायनकला, ज्या सामवेदापासून निघाली तो " सामवेद मीच "

वेदानां सामवेदोऽस्मि

असें भगवंतांनीं गीतेच्या दहाव्या अध्यायांत सांगितलें आहे. वेदाचा अधिकार उच्च जातीला आणि विशेषेकरून ब्राम्हणांनाच आहे हें विसरतां कामा नये. या सर्व गोष्टी सुशिक्षित वर्गानें ध्यानीं आणून मग गायनकला कोणी शिकावी आणि तिचा दर्जा काय वगैरे गोष्टी ठरवाव्या.

श्रीगणेशोत्सवासारख्या इतर अनेक मोठमोठ्या उत्सवांतून रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणीं कीर्तन, भजन, व्याख्यान, मेळे व पोवाडे वगैरे कार्यक्रम करण्याचा उद्देश हाच कीं, त्या योगानें लोकांमध्यें जागृति व्हावी. समाजामध्यें विस्कळितपणा किंवा भेदाभेद असतील तर ते नाहींसे होऊन सर्वत्र एकवाक्यता व्हावी, व स्वाभिमान वाढावा. परंतु अलीकडे कीर्तनें, पोवाडे, मेळे म्हणजे उदरनिर्वाहाचा धंदाच होऊन बसला आहे. परमार्थाच्या साधनापासून स्वार्थ साधला जात आहे. तें इष्ट नाहीं. स्वार्थ नसावा असें म्हणणें नाहीं. परंतु स्वार्थाचे नादीं लागून परमार्थ अगदींच बुडवावा हें हितावह नाहीं. कीर्तन, पोवाडे, मेळे

यांचा मूळ उद्देश अजिबात बाजूस राहून त्याला आज इतकें हीन स्वरूप प्राप्त झालें आहे कीं, त्यापासून लोकशिक्षण किंवा समाजकार्य व्हावयाचें तें बाजून राहून केवळ स्वार्थ व करमणूक या गोष्टी मात्र भरपूर साधल्या जात आहेत. देशकार्य करणारांनीं स्वार्थापासून अलग राहिल्याखेरीज कार्यांत यश येणार नाहीं. परमार्थाचे ठिकाणीं भांडणास वाव नाहीं. स्वार्थ आला कीं भांडणें आलीं. स्वार्थ व भांडणें मिटवून एकवाक्यता करावयाची आहे. म्हणजे एका स्वरांत आपण सर्व बोलूं अशी खटपट व्हावयास पाहिजे. आपल्या देशांतील लोक व पुढारी निरनिराळ्या स्वरांत बोलत आहेत. ते एका स्वरांत बोलतील तर स्वराज्य मिळण्यास एक क्षणहि लागणार नाहीं.

सप्त स्वरांचा जसा आपआपसांत मेळ असतो त्याचप्रमाणें देशांतील सर्व पुढाऱ्यांचे स्वर एकमेकांस जुळून स्वर–राज्य झालें पाहिजे. स्वरराज्य म्हणजे संगीत. तेव्हां या संगीताचा किंवा स्वर–राज्याचा आधीं आपल्या देशांत उत्कर्ष होईल तर स्वराज्य आपोआप मिळेल. आधीं स्वर–राज्य आणि मग स्वराज्य. यापेक्षां संगीताची महती जास्त काय सांगावी ?

॥ तस्य गीतस्य माहात्म्यं के प्रशंसितुमीशते ॥
॥ धर्मार्थकाममोक्षाणामिदमेवैकसाधनम् ॥

अशी ही चतुर्विध पुरुषार्थाचा लाभ करून देणारी संगीतविद्या उन्नत दशेला पोहोंचेल तो सुदिन.

# श्रोत्यांवर गायनाचा परिणाम कसा करावा?

मराठी, संस्कृत अगर हिंदी भाषेमध्यें पद असलें तरी म्हणणाराची वाणी शुद्ध व स्पष्ट असेल तरच त्या पदाचा किंवा चिजेचा अर्थ श्रोत्यांस समजेल आणि अर्थ नीट लक्षांत येईल तरच गाण्याचा परिणाम चांगला होईल. एरव्ही नुसत्या स्वराच्या कुशलतेनें योग्य परिणाम होणार नाहीं. श्रोते त्या भाषेचे तज्ञ असावेच लागतात, तथापि शब्दोच्चार स्पष्ट आणि त्यास तालास्वराची जोड असा मेळ असेल तेव्हांच गायनाचा योग्य परिणाम होऊं शकतो. नुसते स्वर आळविल्यानें कानाची तृप्ती होईल परंतु मनावर त्याचा परिणाम होणार नाहीं. नुसती कानाची तृप्ति, करमणूक किंवा शृंगार एवढाच गायनाचा हेतु नसून वीर, शांत, भयानक, शोक, करुण इत्यादि भावना व्यक्त करण्याचें सामर्थ्य गायनकलेमध्येंच आहे, तें गातांना व्यक्त होईल, त्या त्या भावना उत्तम तऱ्हेनें व्यक्त होतील तरच तें गायन यथार्थ होईल. या भावना व्यक्त करावयाच्या म्हणजे गातांना कोठें ताना घ्यावयाच्या, आलापाचे काम कोठें करावयाचे, शब्दाचें महत्त्व कोठें दाखवावयाचे वगैरे गोष्टींचा विचार अवश्य ठेवावा लागतो. पदांची शब्दरचना किंवा त्यांतील अर्थाकडे लक्ष न देतां सरसकट प्रत्येक पदामध्यें एकसारखी तानबाजी केली तर तें व्यर्थ होईल. शृंगार किंवा आनंद व्यक्त करावयाचा असेल तर तानबाजी चालेल, परंतु करुण किंवा वीररसाचे ठिकाणीं तानांचा भडिमार केला तर रसहानी होईल. करुणरसाचे ठिकाणीं थोडे आलाप चालतील परंतु वीररसाचे ठिकाणीं तालस्वरामध्यें रसाला पोषक असे शब्दोच्चारच केवळ उपयोगी. तथें तानालापांचें कामच नाहीं.

## तानबाजी व रसहानि

उदाहरणार्थ—" भारत हमारा देश है " हें हिंदी पद घेतलें. ते गातांना श्रोत्यावर त्या पदांतील शब्दाचाच परिणाम व्हावयास पाहिजे अशीच त्या पदांची शब्दरचना आहे. तेथें कोणी ताना घेईल तर गायनाचे वर्म त्याला समजलें नाहीं असेंच म्हणावें लागेल. शिवाय भक्तिरस काय किंवा वीररस काय वठवून द्यावयाचा म्हणजे ते ते विचार अंतःकरणामध्यें असावेच लागतात. एरव्ही नुसत्या वरवरच्या हावभावानें किंवा ओढून ताणून चंद्रबळ आणून भागणार नाहीं, गायकाचे ठिकाणीं शुद्ध अंतःकरण व सद्विचार असावे लागतात ते एवढ्याचसाठीं.

" कृष्णा धावरे लौकरी । संकट पडलें भारी ।
हरि तूं आमुचा कैवारी । आलें विघ्न निवारी ।

हा द्रौपदीचा धांवा अगर सौभद्र नाटकांतील 'वद जाऊं कुणाला शरण।' हीं पदें घेतली तर त्यांत करुणरसच भरलेला आहे. मोठ्या संकटांत सांपडलेली द्रौपदी अत्यंत कष्टी होऊन श्रीकृष्णाचा धांवा करीत असतां शोक किंवा करुणस्वराखेरीज दुसरा स्वरच येणें शक्य नाहीं. मन दुःखी होऊन भगवंताची करुणा भाकीत असतां आनंदाचें निदर्शक जी तानबाजी ती त्या ठिकाणीं संभवतच नाहीं. परंतु हीं पदें हल्लीं गातांना ऐकिलीं तर त्यांत एकसारखा तानांचा वर्षाव ऐकूं येतो. कष्टी झालेल्या सुभद्रेला 'वद जाऊं कुणाला शरण ॥' हें म्हणत असतां काय वाटत असलें पाहिजे याचा विचार करून तें पद कोणी गाईल तर त्यांत तानबाजी खात्रीनें येणार नाहीं. परंतु तसें होत नाहीं. तानांचा सपाटा सुरू होतो, त्यामुळें करमणूक होते इतकेंच, परंतु अंतःकरणावर त्याचा परिणाम मुळींच होत नाहीं. याचें कारण भलत्याच ठिकाणीं तानबाजी !

पद करुणरसाचें परंतु तानबाजीमुळें रसहानी होऊन योग्य परिणाम न होतां केवळ मनाची करमणूक होते इतकेंच. शृंगाररसाखेरीज इतर ठिकाणीं तानांची फारशी जरूरी नसते. परंतु अतिशय तानबाजी म्हणजे खरें गाणें किंवा तेंच गाण्याचे वैशिष्ट्य अशी आज सर्वत्र समजूत होऊन

बसली आहे. तथापि गायनकलेचें खरें तत्व काय, कोणतें पद कसें गाव-याचें वगैरे गोष्टी प्रत्यक्ष गायकांनीं बहुजनसमाजास समजावून व पट-वून दिल्यास गायनकलेसंबंधीं बहुजनसमाजाची आजची ही समजूत दूर होऊन ह्या कलेचें खरें महत्त्व त्यांना समजून आल्यावांचून राहणार नाहीं. शारदा नाटकांतील

मज गमे ऐसा जनक तो मांग साचा ॥

किंवा मानापमान नाटकांतील

धिक्कार मन साहिना ॥

ही पदें गात असतां क्रोध आणि तिरस्कार व्यक्त व्हावयास पाहिजे. येथें ताना उपयोगी नाहींत. केवळ तालस्वरामध्यें रसाला पोषक अशा शब्दोच्चारानेंच योग्य परिणाम होईल. परंतु तें बाजूस राहून त्यांतहि केव्हां केव्हां तानांचा समावेश होतो. याचें कारण सर्वच ठिकाणीं ताना घेण्याची सवय. नुसते डोळे वटारून किंवा हातपाय आपटून कार्यभाग होणार नाहीं. ते ते विकार ताल, स्वर व शब्द यांनींच विशेषेकरून दाखविले पाहिजेत. हावभाव मात्र रागाचे आणि गातांना स्वर दुसऱ्याच प्रकारचा असें बहुधा दृष्टीस पडतें. त्यामुळें आवेश किंवा तिरस्कार पूर्ण-पणें व्यक्त होत नाहीं. सर्वसाधारण प्रेक्षकांना किंवा श्रोत्यांना या गोष्टी सहज समजून येतात आणि अमक्या पात्राचें काम व्हावें तसे झालें नाहीं असे उद्गार त्यांचे तोंडून निघतात. तात्पर्य असें कीं पदाची शब्दरचना असेल तशीच त्याला तालास्वराची जोड असावी आणि शब्द व तालस्वर यांची योजना लक्षांत घेऊन तें पद म्हटलें जावें.

## रम्य कलेसाठीं इतके कष्ट !

बैठकीचे गाण्यामध्यें बोलतान म्हणून एक प्रकार आहे. त्या बोल-तांना घेत असतां शब्दामधील अक्षरांची ओढाताण होऊन अर्थहानी होते. या बाबतींत अवश्य लक्ष ठेविलें पाहिजे. बोलतानेमध्येंसुद्धां शब्दांचा अर्थ स्पष्ट व्यक्त होईल अशीच बोलताना घेण्याची पद्धत पाहिजे. तार सप्तकांतील पंचमापर्यंत सहज आवाज जाईल असा गाणाराचा स्वर

असावा म्हणजे गातांना कष्ट होणार नाहींत. ज्यांना मुद्दाम अंगविक्षेप करण्याची संवय लागली असेल तेथें इलाज नाहीं. मोठमोठें अंगविक्षेप करणें, तोंड वेडेवांकडें व भेसूर करणें हें एक मोठ्या गायकाचें लक्षणच होऊन बसले आहे. कित्येक गायक याहीपेक्षां जास्त चमत्कार करितात, परंतु गायनकलेमध्यें ह्या सर्व गोष्टी अगदीं त्याज्य समजल्या आहेत. गातांना चेहरा प्रसन्न पाहिजे. हावभाव स्वभावतः होतील ते होतील त्यापेक्षां जास्त हालचाल न व्हावी अशी खबरदारी घेतली पाहिजे. नाहीं तर गायकाची ही कुस्ती, आरडाओरडा आणि त्याची घाणेरडी चर्या पाहून सभेमध्यें कित्येक लोक हंसतात व कित्येकांना तिरस्कार वाटतो. नांवाजलेल्या गायकांचें गाणें ऐकल्यानंतर कित्येक लोकांनीं आमचेजवळ असे उद्गार काढले आहेत कीं, गाण्याकरितां तोंड इतकें वाईट व भेसूर करावें लागत असेल तर त्यापेक्षां गाणें न शिकणें बरें; आणि गाणें ऐकावयाचें झाले तर फार मोठ्या गायकाचें गाणें ऐकण्यापेक्षां एकाद्या नांवाजलेल्या संगीत नाटक मंडळीचें नाटक पहावें किंवा ग्रामोफोन ऐकावा. बैठकीचें गाणें गात असतां चेहरा इतका भेसूर करावा लागतो कां?" असा प्रश्न कित्येकवेळ लोकांकडून केला जातो.

उत्तरादाखल सांगतांना असें सांगावे लागतें कीं, कांहीं कठीण ताना आहेत त्या कंठातून निघण्यास कष्ट पडतात, सबब शरीरास कांहीं तरी चलन देऊन कंठ हालविण्याचा प्रयत्न गायक करीत असतात. असे कांहीं तरी सांगून वेळ मारून न्यावी लागते. या बाबतींत खरेंच सांगावयाचें तर आम्हीं असें म्हणूं कीं, हास्यास्पद व तिरस्करणीय असे अंगविक्षेप व चेहरा भयानक केल्याखेरीज सहज रीतीनें व प्रसन्न मुद्रा ठेवून जितकें गाण्याचें कौशल्य दाखवितां येईल तितकें दाखवावें म्हणजे लोकांस नांवें ठेवण्यास व थट्टा करण्यास फारशी जागा राहणार नाहीं.

गायनकलेच्या उन्नतीप्रीत्यर्थ झटणारांनीं वर सुचविल्याप्रमाणें वाणी शुद्ध, शब्दोच्चार स्पष्ट, रसपरिपोष, रसाला अनुकूल असे हावभाव वगैरे बाबतींत सुधारणा करण्याकडे विशेष लक्ष पुरवावें असें आम्हांस वाटतें.

या सर्व सुधारणा घडवून आणण्यास गायकवर्गामध्यें ह्या गोष्टींचा वारंवार विचार व्हावयास पाहिजे. हिंदुस्थानच्या सर्व बाजूचे गायक वारंवार एकत्र जमावें, गायकांमध्यें एकवाक्यता असावी, गायनकलेमध्यें उत्तम सुधारणा व्हावी, अशी खटपट आज बरीच वर्षे चालू आहे, परंतु अजून-पर्यंत इष्ट परिणाम झाल्याचें फारसें दिसून येत नाहीं. उलट अनिष्ट प्रकार मात्र आढळून येत आहेत. निरर्थक वादविवाद बरेच होत आहेत. वाद-विवाद अवश्य करावा, त्याबद्दल कोणाचीच ना नाहीं. परंतु वादाच्या भरांत एकमेकांचे उणे काढणें किंवा शिव्या देणें या गोष्टी न व्हाव्या

महाराष्ट्र–संगीताबद्दल हल्लीं वाग्युद्ध चालू आहे. त्यांत एकमेकांची निंदा व शिव्या हाच प्रकार बराचसा दिसून येत आहे. महाराष्ट्रांत मराठी पद म्हणावी असे हल्लीं सांगण्यांत येत आहे; परंतु यांत नवीन असें फारसें कांहींच नाहीं. महाराष्ट्रांत मराठी पदें म्हणण्याची वहिवाट गेल्या पन्नास वर्षांपासून आहे. बैठकींत म्हटलें जाणारे ख्याल; टप्पे, ठुंबऱ्या वगैरे सर्व मराठींतच म्हणावींत, हिंदींत म्हणूंच नयेत असा महाराष्ट्रीयांमध्यें जो नवीन बाणा उत्पन्न झाला आहे तो चांगलाच आहे. परंतु लगेच वर्ष दोन वर्षांमध्यें ही गोष्ट घडून यावी हें शक्य नाहीं. मराठी प्रबंध जसजसे तयार होत जातील तसतसे हिंदी भाषेचें महत्त्व महाराष्ट्रांत आपोआप कमी होईल, एवढी गोष्ट सर्वांनीं लक्षांत आणली तर वाद माजणार नाहीं.

चार वर्षांपूर्वीं या विषयाची चर्चा 'केसरी' वर्तमानपत्रामध्यें सुरू झाली होती. त्यावेळीं आम्ही हेंच लिहिलें होतें. फक्त "महाराष्ट्र संगीत" या नांवासंबंधानें मात्र आमचा थोडासा मतभेद आहे. हिंदी चिजांचें मराठी-करण करून त्याला महाराष्ट्र संगीत असें नांव देतां येणार नाहीं असे आमचें म्हणणें. या वादांत वेळोवेळीं लिहिण्याचा प्रसंग आला त्यावेळीं आम्ही त्याचा योग्य खुलासा केला आहे. महाराष्ट्रांत मराठी पदें म्हणा-वींत याबद्दल कोठेंहि मतभेद नाहीं. थोडेबहुत एकमेकांच्या विचारांत कांहीं फरक दिसून येतात ते सामोपचारानें सहज मिटवितां येतील. तात्पर्य असें कीं, वादामध्यें गायनकलेला पोषक असें तत्त्व ज्या योगानें निष्पन्न होईल असा प्रयत्न सर्वांनीं करावा. सप्तस्वरांची सेवा करतांना आपसांत

कलह नसावा हाच धडा सात स्वरापासून सर्वांनीं घ्यावयाचा आहे. गायकवर्गांतील वृथा कलह व परोत्कर्ष–असहिष्णुता नाहींशी होईल तर ती कला सर्वत्र शोभूं लागेल. महाराष्ट्रांतील गायकांनीं क्षुल्लक वाद उपस्थित न होऊं देण्याबद्दल खबरदारी घेऊन संगीत–विद्येच्या उन्नतीला पोषक असे विचार लोकांपुढें मांडण्याचा उपक्रम केला पाहिजे. नुसत्या लेखनानें किंवा व्याख्यानानें भागणार नाहीं. ताल, स्वर, श्रुती, रसपरिपोष, शब्दाचें महत्व, श्रुतीचें गणित, काव्य वगैरे विषयासंबंधानें फारसे लिहुन किंवा तोंडी समजावून देऊन भागणार नाहीं. प्रत्यक्ष कृतीनेंच दाखविलें पाहिजे. दुःख, आनंद, तिरस्कार, शृंगार, गांभीर्य, क्रोध, करुण आणि वीररस वगैरे विकार तालस्वराचे साहाय्यानें उत्तम तऱ्हेनें व्यक्त करणें हीच गायनविद्येंतील सर्वांत महत्वाची गोष्ट आहे. या गोष्टीकडे सर्व महाराष्ट्रीय गायकांनीं लक्ष पुरवावें आणि आपल्या संगीताचें महत्त्व सर्व जगाला पटवून देण्याचा प्रयत्न करावा.

# गायन व व्यसन

गायनापासून होणारा व्यायाम शरीरास किती हितावह आहे व कित्येक रोग्यांना गायन ऐकिल्यानें मनास समाधान होऊन रोगापासून कशी मुक्तता होते याचा थोडक्यांत विचार करूं. गायनकलेचा अभ्यास करणारांनीं कोणत्याहि व्यसनाच्या आधीन न होतां स्वतःची शरीरप्रकृति निरोगी ठेवण्याविषयीं फार सावध असलें पाहिजे. विद्यार्थिदशेंत असल्यापासूनच कोणतेंहि व्यसन न लागेल अशी खबरदारी ज्याची त्यानेंच घेतली पाहिजे. दुसऱ्याच्या संगतीनें किंवा स्वतःच्या हौसेनें आपण एकदा एखादें व्यसन लावून घेतलें तर पुढें जन्मभर त्यांतून सुटका होणें कठीण. एवढ्यासाठीं स्वतःस बरेंवाईट समजूं लागल्यापासून शक्य तो या बाबतींत काळजी घेतली पाहिजे. नाहीं तर ही व्यसनें कार्याच्या आड येतात.

उदाहरणार्थ गायकांचीच गोष्ट घेऊं. गायन चालू असतां मधून मधून पानतंमाखूचे हप्ते मिळतील तरच मैफल रंगायची, एरव्हीं गाण्यास रंग नाहीं असें अनेक वेळ दिसून येतें. गाण्याचा रंग पानतंमाखू वगैरे पदार्थांवर केव्हांहि अवलंबून नसावा. मिळाल्यास विडा खावा, परंतु एखादे ठिकाणीं हे पदार्थ मिळाले नाहींत तर त्यामुळें गायकाची मनःस्थिती बिघडता कामा नये. आवाज लागण्याकरितां कोणी चहा पितात तर दुसरे गांजा ओढतात, कोणी अफू खातात तर कोणी याहीपेक्षां त्याज्य व मादक अशा पदार्थांचें सेवन करितात. परंतु खरें पाहिलें तर गायकास गायनाची बैठक रंगविण्याकरितां या पदार्थांचा कांहीं उपयोग तर होत नाहींच. पण उलट या व्यसनानें मनुष्याची आणि त्याबरोबर त्याचेजवळ असलेल्या कलेची सर्व प्रकारें हानी होते. दारूचे पायीं कित्येक उत्कृष्ट गायक अकालीं मृत्युमुखीं पडले. गांजाचें व्यसन

अनावर झाल्यामुळें गायनकलेंत अत्यंत गुणी अशीं माणसें भिकेस लागलेलीं आम्हीं पाहिलीं आहेत. अफूच्या व्यसनामुळें कित्येक गायनाचार्य पराधीन होऊन गुलामी वृत्तीनें राहिल्याचीं उदाहरणें आमच्या आढळांत आहेत.

या गायकांचा दर्जा पाहिला तर फारच मोठा, कंठाची देणगी अलौकिक, ज्यांचें गायन ऐकून आबालवृद्ध सर्व आनंदानें डोलूं लागत, अशा गायकांनीं अफू—गांज्याचे पायीं परावलंबी रहावें यापेक्षां व्यसनाचा दुसरा वाईट परिणाम तो कोणता, आणि कलेची हानी ती कोणती ? व्यसनानें मनुष्य गातीमोल होतो. त्याच्या अंगच्या गुणांचा लोकांस व्हावा तसा फायदा होत नाहीं. व्यसनानें मनुष्याची शारीरिक, मानसिक आणि आत्मिक अवनती होऊन तो मनुष्य आदरास किंवा विश्वासास पात्र होत नाहीं. व्यसनें आमचेकडे येत नाहींत; आम्हीं आपण होऊनच व्यसनांना जवळ करतों. त्यामुळें गायन म्हटलें कीं तेथें व्यसन असावयाचेंच अशी लोकांची ठाम समजूत होऊन बसली आहे. तेव्हां गायन आणि व्यसन ही सांगड तोडून टाकली पाहिजे. शक्य तों करून मादक पदार्थांपासून अलिप्त राहिलें पाहिजे.

या बाबतींत " नारदीय शिक्षा " हा ग्रंथ गायकांनीं अवश्य वाचावा. " नारदीय शिक्षे " मध्यें गायकांनीं निर्व्यसनी राहून शरीराची जोपासना उत्कृष्ट तऱ्हेनें करावी हेंच सांगितलें आहे. कारण शरीर धड असेल तर मन नीट राहील. मनःस्थिति ठीक असेल तरच गायनकलेचा अभ्यास चांगला होईल. गातांना मन प्रसन्न असून स्वतः गायक तालस्वरामध्यें रंगल्याखेरीज गायनाचा प्रभाव पडणार नाहीं. गायक प्रसन्न मनानें गाईल तर गायनाचा योग्य परिणाम चांगल्या प्रकृतीच्या मनुष्यावर तर होतोच, परंतु आजारी किंवा अस्वस्थ मनुष्यावरसुद्धां केव्हां केव्हां औषधापेक्षांहि चांगला परिणाम होतो. एकादेवेळीं रोगाचें निदान बरोबर झालें नाहीं तर रोग एक, औषध दुसरें असें होऊन औषधाचा परिणाम साहजिकच विपरीत होऊं शकेल. परंतु एकाचित्तानें होणारें गायन वाटेल त्या रोग्यास सुखदायक व हितकर असेंच होईल.

येथें रोग कोणता आहे याचें निदान करण्याचें कारण नाहीं. वाटेल त्या रोगावर ह्या संगीत–संजीवनीचा उपयोग होऊं शकतो. आजारी मनुष्याचें मन होतां होईल तो प्रसन्न राहील अशी खटपट आपण करीत असतों. मन प्रसन्न ठेवण्याचे अनेक उपाय आहेत त्यांत "सुस्वर गायन" हा एक एक उत्कृष्ट उपाय आहे. सुस्वर गायन कानीं पडल्याबरोबर मनुष्य कोणत्याहि परिस्थितींत असला तरी घटकाभर तो आपलें शारीरिक अगर मानसिक दुःख विसरून जातो. वेड्याच्या हॉस्पिटलमध्यें वेड्यास ताळ्यावर आणण्यासाठीं एक उपाय म्हणून कित्येक वेळ उत्तम गायकाची योजना करितात. रोग्यावर शस्त्रक्रिया चालू असतां संगीताचा क्लोरोफॉर्मप्रमाणें उपयोग होतो असा तज्ज्ञांचा अनुभव आहे. करमणुकीचे व व्यायामाचे अनेक प्रकार आहेत. परंतु

**मनाची करमणूक व शरीरास हितावह असा व्यायाम या दोन्ही गोष्टी गायनानेंच साधतात.**

पत्ते, बुद्धिबळें, सोंगट्या, वगैरे खेळापासून मनाची करमणूक होते. परंतु मधून मधून राग, उद्वेग, विकार ह्या खेळापासून उत्पन्न हातात; त्यामुळें खरी करमणूक होत नाहीं. कांहीं करमणूक व कांहीं त्रास असा प्रकार होतो, तसेंच आट्यापाट्या, हुतुतु, खोखो, विटीदांडू, क्रिकेट, जोर बैठका, नमस्कार, मल्लखांब, पळणें, पोहणें, कुस्ती, दांडपट्टा, इत्यादि व्यायाम शरीरास अत्यंत हितावह असून हे व्यायाम घेतल्याखेरीज शरीर सुदृढ राहणार नाहीं, परंतु मन प्रसन्न आणि सर्व शरीरास सारख्या प्रमाणांत व्यायाम या दोन्ही गोष्टी इतर कोणत्याहि खेळापेक्षां गायनानेंच जास्त साधतात. आपल्या शरीरांतील फुप्फुसें मजबूत राहण्याकरितां गायनाचा उत्तम उपयोग होतो असें सर्व डॉक्टर व वैद्य तर सांगतातच परंतु ही गोष्ट आपणांससुद्धां सहज समजण्यासारखी आहे. गायन म्हणजे प्राणायाम. शरीरास प्राणायाम जितका आवश्यक व हितावह तितकेंच गायनही शरीरास हितावह आणि फायदेशीर आहे. शरीरिक दृष्ट्या इतकी या **संगीताची मदती** आहे. परंतु गायक आपण होऊनच सदो-

दित कांहीं ना कांहीं तरी एखाद्या दुष्ट व्यसनांत निमग्न होऊन गहतात, त्यामुळें शारीरिक दृष्ट्या संगीताचे किती महत्व आहे हें स्वतः गायकालाच अगोदर समजलेलें नसतें, मग ह्या गोष्टी दुसऱ्यास समजावून देण्यास ता लायक कसा होणार ? गायकांनीं याचा अवश्य विचार करावा अशी आमची त्यांना विनंति आहे. प्रथम गायक ह्या सर्व गोष्टी अमलांत आणील तर गायक व गायनकलेसंबंधीं लोकांमध्यें अजूनही कांहीं गैरसमज आहेत ते तावडतोब दूर झाल्यवांचून राहणार नाहींत. तसेंच या संगीत—महोषधींचा प्रसार हिंदुस्थानच्या तेहतीस कोटी लोकांमध्यें होईल तर आपली शारीरिक, मानासिक व आत्मिक उन्नति होऊन हिंदभूमीला सुखाचे दिवस लाभल्यावांचून राहणार नाहींत.

——:०:——

# गायन व आरोग्य

स्त्रिया व लहान मुलें यांना स्वाभाविकच गायनकला लवकर येण्यासारखी असल्यामुळें त्या कलेचा फायदा त्यांना जितका घेतां येईल तितका घेऊं दिला पाहिजे. गायनानें फुप्फुसें उत्तम राहतात व सर्व शरीरास सारख्या प्रमाणांत चांगला व्यायाम होऊन मनहि प्रसन्न रहातें. स्वदेश, स्वधर्म आणि स्वाभिमान, यांची जाणीव उत्पन्न होईल अशीं अर्थपूर्ण गीतें स्त्रिया व मुलें यांना शिकविलीं जावींत. गायनकला, पळणें, पोहणें, व्यायामशाळेंत जाणें इत्यादि गोष्टींची आवड स्त्रियांमध्यें उत्पन्न झाली आहे ही गोष्ट चांगली आहे, परंतु प्रसंगविशेषीं, दळणें—कांडणें, इत्यादि घरगुती कामाचा कंटाळा स्त्रियांना वाटतां कामा नये. हें सर्व करून शक्य तितका गायनकलेचा अभ्यास स्त्रियांनीं व मुलांनीं अवश्य करावा. गायन प्राणायामाप्रमाणें शरीरास अत्यंत हितावह आहे.

—जननी ( ऑगस्ट १९३२ )

# संगीतांतील नवमतवाद

——:०:——

## राग व त्यांचे प्रहर

संगीतशास्त्राच्या संस्कृत व मराठी ग्रंथावरून एवढाच फक्त उलगडा होऊं शकतो कीं, भैरव राग सकाळीं गावा, सारंगराग दुपारीं बारा वाजतां गाण्याची वहिवाट आहे. मुलतानी, भिमपलास हे राग दिवसा मधल्या वेळीं गातात, भूप, कल्याण, बिहाग हे राग रात्रीच्या पहिल्या प्रहरींच ऐकूं येतात व बागेश्री, वसंत हे राग मध्यरात्रीं गावे. आपल्या गायकांची परंपरा अशीच आहे. परंतु हें वेळेचें बंधन कां घातलें याचें स्पष्टीकरण जुन्या संगीतशास्त्रकारांनीं केलेलें कोठें आढळून आलें नाहीं. राग व त्यांचे प्रहर कोणीं ठरविलें व ही वहिवाट केव्हांपासून सुरू झाली याचाही अद्याप कोणास पत्ता लागलेला दिसत नाहीं. या विषयाची चर्चा गेल्या वीस वर्षांमध्यें अनेक वेळ झाली. मोठमोठ्या संगीताचार्यांनीं त्यावर वादविवाद केलें, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. गेल्या दोन महिन्यांत पुण्यांतील व पुण्याबाहेरील संगीतज्ञांनीं व इतर बऱ्याच मंडळींनीं संगीतांतील कांहीं महत्त्वाच्या विषयांसंबंधीं चर्चा सुरू केली असून, व्याख्याने व लेखन द्वारां तज्ज्ञांचीं मतें जाहीर रीतीनें मांडलीं जात आहेत. राग व त्यांचे प्रहर हा विषय संगीतशास्त्रांत अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे त्यावरही गेल्या महिन्यांत पुण्यामध्यें कडाक्याचें वाद झाले व अजून वर्तमानपत्रांतून त्याची चर्चा चालू आहे. परंतु रागांचा व वेळेचा संबंध कां व कसा जोडला जातो याचें समाधानकारक उत्तर अजून कोणासही देतां आलें नाहीं, १९१६ सालीं बडोद्यास अखिल भारतीय संगीत परिषद भरली होती. त्यावेळीं म्हैसूरचे सुप्रसिद्ध संगीताचार्य श्री. एच. पी. कृष्णराव यांनीं Psychology fo Music हा

निबंध त्या परिषदेंत वाचला. निबंधाच्या शेवटीं राग व प्रहर यासंबधानें लिहितांना ते म्हणतात कीं,

While the object of every Rag is to express an emotion without reference to time where is any sense in confining that emotion to any particular part of the day. This restriction, born of prejudice and sanctified by antiquity, should be removed' though difficult, as soon as possible.

अशा तऱ्हेनें या दाक्षिणी गायनाचार्यांनें आपले विचार बडोद्याच्या परिषदेंत अगदीं स्पष्टपणें मांडले व परिषदेनें ते ऐकून त्यांची प्रशंसा केली. हिंदुस्थानच्या सर्व भागांतून अत्यंत नांवाजलेले कित्येक गायनाचार्य या परिषदेस आले होते. परंतु एकानेंही हा मुद्दा खोडून काढण्याचा प्रयत्न केला नाहीं. उलट हा निबंध सर्वानुमतें उत्कृष्ट ठरून त्याचा प्रचार सर्वत्र होऊं लागला. अलीकडे गेल्या दोन महिन्यापासून हा प्रश्न उपस्थित झाला असून, त्यावर अनुकूल–प्रतिकूल विचार प्रगट होत आहेत. परंतु ही गोष्ट सप्रमाण सिद्ध करून दाखविण्याची कोणाचीच तयारी नाहीं. टिळक स्मारक मंदिरांत श्रीमंत आबासाहेब मुजूमदार यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेंत दोन दिवस काथ्याकूट होऊन अखेर श्री. गोविंदराव टेंबे यांनीं सांगितलें काय ? तर जुन्या परंपरेला धरून चला; आजपर्यंत चालत आलेली वहिवाट मोडूं नका. हा शास्त्रार्थ घोटण्यापलीकडे अधिक कांहीं सांगतां आलें नाहीं.

## प्रत्यक्ष आचार पहा

मानापमान, विद्याहरण, स्वयंवर या नाटकांतील पदें रागरागिणींत बसविलीं असून त्यांत रात्रीचे व दिवसाचे राग आहेत. या नाटकांचे प्रयोग रात्रीं होतात व दिवसाही होतात. म्हणजे रात्रीचे राग दिवसा व दिवसाचे राग रात्रीं गाइले जातात. तें ऐकून श्रोते डोलतात, वाहवा करितात व अखेर टाळ्यांचा गजर करून झालेला आनंद व्यक्त करितात.

या बाबतींत गायकांनीं अगर गायन–शास्त्रांतील शास्त्री–पंडितांनीं कधीं तक्रार केली नाहीं. गाण्याच्या बैठकींतसुद्धां हेंच आढळून येतें. फक्त चर्चा, वादविवाद व व्याख्यान यांतून शास्त्राचे नियम पाळण्याचा उपदेश कळकळीनें केला जातो इतकेंच. एकाद्या मनुष्याच्या नेहमींच्या पोशाखांत एकदम बदल झाला तर तें जसें प्रथम चमत्कारिक वाटतें, त्याचप्रमाणें नेहमीं जे गायनशास्त्र नजरेसमोर आहे त्यांत थोडा बदल झाला तर कांहीं जुन्या गायनशास्त्रज्ञांना तें एकदम बरें वाटत नाहीं. पण त्याबद्दल फारसें वाईट वाटतें असेंही दिसत नाहीं. अर्थात् हा सर्व सवयीचा खेळ आहे.

प्रसन्न मुद्रा, शुद्ध वाणी, लय व सुरेलपणा या गुणांमुळेंच गाण्याचा परिणाम श्रोत्यांवर होत असतो, त्यांत वेळेचा कांहीं संबंध नाहीं.

जुन्या संगीत–शास्त्रामध्यें दुसरी एक चमत्कारिक व सहसा बुद्धीस न पटणारी अशी गोष्ट म्हणजे सात स्वरांच्या उत्पत्तीची. सा, रे, ग, म, प, ध, नी हे सात स्वर अनुक्रमें मोर, गाय, शेळी अगर मेंढी, क्रौंच, कोकिळा, घोडा व हत्ती या पशुपक्षांकडून घेतले आहेत अशा-संबंधीं एक संस्कृत श्लोक " मांडूकी शिक्षा " नांवाच्या ग्रंथांत दिला आहे. मोराचा शब्द अत्यंत कठोर व कर्णकटु, त्यांतून षड्ज स्वराची उत्पत्ति कशी होते अथवा शेळीच्या अगर मेंढीच्या शब्दांतून गंधार स्वराचा बोध कसा होतो हें समजणें अत्यंत कठिण. आमच्यासारख्या साधारण मनुष्याच्या बुद्धीला या गोष्टी समजत नाहींत. म्हणून संगीत-शास्त्रांत मुरलेले व त्या कलेमध्यें अत्यंत निपुण अशा थोर लोकांना हे प्रश्न केवळ समजून घेण्याकरितां सदिच्छेनें विचारलें तर कांहीं तरी उडवाउडवीचीं उत्तरें देऊन " जुन्या संगीतशास्त्राबद्दल तुम्हांस आदर नाहीं, चांगल्या परंपरेंत धोका आणण्याची अगर ती बुडविण्याची तुमची बुद्धि दिसते " असा आरोप केला जातो; परंतु असल्या उत्तरांनीं, भाषणांनीं अगर लेखांनीं हे प्रश्न सुटणार नाहींत. महाराष्ट्रांत संगीतशास्त्राचा खोल अभ्यास केलेलीं जुन्या परंपरेचीं विद्वान् माणसें अजून पुष्कळ आहेत.

श्री. टेंबे हे त्यांपैकींच एक आहेत; परंतु त्यांना या प्रश्नाचें उत्तर व्यवस्थित रीतीनें देतां आलें नाहीं. आयुर्वेदाचार्य देशपांडे यांचा संगीतशास्त्राचा अभ्यास बराच खोल असूनसुद्धां राग व प्रहर या विषयासंबंधानें कांहीं शास्त्राधार ते देतील असें दिसत नाहीं. शास्त्र व कला या दोन्हींमध्यें निष्णात् व कसलेले गायनाचार्य श्री. रामकृष्णबुवा वझे हेच या प्रश्नाचें उत्तर कदाचित् देऊं शकतील असा भरंवसा वाटतो. श्री. रामकृष्णबुवांचें गायनशास्त्र व कला यांसंबंधीं प्रसिद्ध झालेलें आजपर्यंतचें लिखाण पाहिलें तर राग व प्रहर किंवा स्वरांची उत्पत्ति यांसारख्या प्रश्नांचा योग्य खुलासा ते सहज करतील असें वाटतें. आतांपर्यंत वझेबुवांनीं संगीतांतील निरनिराळ्या विषयांवर अनेक लेख लिहिले. त्याचप्रमाणें राग व प्रहर या विषयावर चार शब्द त्यांनीं लिहिल्यास आमच्यासारख्या अजाण व अननुभवी अशा नव्या पिढींतील लोकांवर मोठा अनुग्रह केल्याचें श्रेय त्यांना मिळेल. तात्पर्य असें कीं, महाराष्ट्रांतील संगीतशास्त्रांत निष्णात म्हणविणाऱ्या शास्त्री–पंडितांनीं या मोघम प्रश्नाचा खुलासा करावा एवढीच आमची नम्र सूचना आहे.

# सप्रयोग व्याख्यानाची आवश्यकता

संगीतांतील नवमतवादास सुरवात झाल्यापासून राग व रस या विषयावर तज्ञांनीं अगदीं कसून वादविवाद केला. या विषयावर तज्ञ लोकांच्या वादविवादाची अगदीं झोड उडालेली पाहून, अज्ञ माणसांनासुद्धां या विषयावर बोलण्याची स्फूर्ति झाली, आणि ज्यांना गायनकलेचा गंधही नाहीं त्यांनींदेखील गायनकलेंतील निरनिराळ्या विषयांवर अंदाजानें व थोड्या धोरणानें सभेमध्यें आपलीं मतें प्रगट करण्यास सुरवात केली. असा हा

## तज्ञ व अज्ञ यांच्या मतामतांचा गलबला

चालू झाला. त्यामुळें गायनकलेंतील खरे तज्ञ व त्या विद्येची मनापासून उपासना करून महाराष्ट्राला भूषणभूत झालेले असे कांहीं गायनाचार्य महाराष्ट्रांत आहेत, त्यांनाच फक्त या बाबतींत विधायक कार्य घडवून आणण्याची नम्र सूचना करावी असें वाटल्यावरून हा लेख लिहीत आहें.

राग व रस या संबंधानें बोलतांना कित्येक म्हणतात कीं, केवळ रागावर किंवा निरनिराळ्या स्वररचनेवरच रसोत्पत्ति किंवा भावना अवलंबून नसून कमीजास्ती लयींमध्यें (ठाय, मध्य व जलद लय) चीज किंवा पद म्हटल्यानें भावना अगर रस निर्माण होतो, म्हणजे रसाचा अगर भावनेचा स्वराशीं संबंध नसून लयीशींच खरा संबंध आहे असा अर्थ. दुसऱ्या कित्येकांचें म्हणणें असें कीं, रसोत्पत्ति ही विशेषेंकरून स्वररचनेवरच अवलंबून आहे. तिसरें मत असें कीं, पदांतील शब्दयोजना व तें गाण्याची पद्धति या दोनच गोष्टी रस निर्माण करूं शकतात. चौथें असें कीं, स्वर, लय, शब्दयोजना या सर्वांपेक्षां फक्त गायकाच्या

कौशल्यानेंच रसोत्पत्ति व भावना निर्माण होतात. असें बरेंच मतमतांतर असून, जो तो आपआपल्या मताचें समर्थन करण्याची शिकस्त करीत आहे. रागरसाचा निकट संबंध आहे असें म्हणणारे लोक ती गोष्ट सिद्ध करण्यासाठीं शोकरसाकरितां जोगी राग उदाहरणादाखल केव्हां केव्हां पुढें मांडतात. परंतु एवढ्या एका उदाहरणानें ती गोष्ट व्हावी तशी सिद्ध होऊं शकत नाहीं. नेहमीं गायिले जाणारे राग म्हणजे सारंग, गौड सारंग, गौड मल्हार, मल्हार, भीमपलास, मुलतानी, भूप, खमाज, हमीर, केदार, कामोद, कानडा, बागेश्री, हिंडोल, ललत, मारवा, तोडी, बहार, वसंत-बहार, भैरव बहार, काफी, अडाणा, तिलंग, बिहाग, कल्याण, शंकरा इत्यादि प्रचारांतील जे कांहीं–पन्नास साठ राग आहेत, त्या प्रत्येकापासून कोणती भावना अगर रस निर्माण होतो याचा निर्णय पूर्वींच्या शास्त्रकारांनीं किंवा आजकालच्या पंडितांनीं नीटसा लावलेला दिसत नाहीं. चार चार तास मैफल उत्कृष्ट तऱ्हेनें रंगविणारे महाराष्ट्रांतील विद्यमान संगीताचार्य " रागरसाचा निकट संबंध आहे " एवढें एकच वाक्य बोलतात व लिहितात. जिज्ञासूंचें प्रत्यक्ष कृतीनें समाधान करण्याची वेळ आली म्हणजे हें लोक माघार घेतात असें अनेक वेळां आढळून आलें आहे. संगीतशास्त्र व कला यांचीं दोन दोन, तीन तीन तपे तपश्चर्या केलेल्या लोकांची ही स्थिति, अशा स्थितींत संगीत विषयांत अज्ञ अशीं कांहीं माणसें केव्हां केव्हां सभेमध्यें येऊन या विषयावर बोलण्याचें धाडस करितात 'बोलो जातां' बरळले या तुकारामोक्तिप्रमाणें त्यांची स्थिति झालेली पाहिली, म्हणजे Ritter नांवाच्या एका युरोपियन गृहस्थांनीं काढलेल्या उद्‌गारांची आठवण होते. ते म्हणतात,

About none of the other arts has so much nonsense been said and written as about music. A person scarcely able to distinguish one tone or note from another, one air from another, will not hesitate to judge of and condemn fine musical works in a most imperative manner. Nay, I have seen novels,

criticism, and sketches on musical subjects written by persons who could not sing or play the simplest tune and to whom theory was a terra-in-cognita.

हीं रिट्रसाहेबांचीं वाक्यें संगीतांतील निरनिराळया विषयांवर सध्यां चालू असलेल्या वादविवादाच्या बाबतींत बरीचशी लागू पडतात. असल्या सभा आणि वादविवाद यांनीं जमलेल्या लोकांची फक्त करमणूक होते असें आम्हांस तरी दिसून आलें. सबब सध्यां चालू असलेल्या अनेक विषयांपैकीं राग व प्रहर आणि राग व रस या दोन विषयांचा योग्य निर्णय लागेल अशी खटपट करून नुसत्य करमणुकीपेक्षां लोकांना आपण अधिक कांहीं तरी समजावून दिलें पाहिजे असें वाटतें.

आमची सूचना अशी कीं निदान पुणें शहरातील सर्व संगीतज्ञांनीं (म्हणजे नुसत्या शास्त्राच्या गप्पा मारणारांनीं नव्हे तर प्रत्यक्ष कृति करणारांनीं) आपआपसांतील कांहीं मतभेद असतील तर ते घटकाभर बाजूस ठेवून एकत्र यावे व मोकळया मनानें या विषयाची चर्चा करावी, आणि सारंग राग गाइल्यानें कोणत्या भावना उत्पन्न होतात, हिंडोल रागाचा रस कोणता, ललतरागानें काय भावना निर्माण होते, भैरव रागामध्यें कोणती शक्ति आहे, तोडी राग भक्तिरसप्रधान आहे का दुःखाचा निदर्शक आहे,आणि खमाज रागाची योजना शृंगाररसाकरितां करावी का वीररसाकरितां करावी.या गोष्टी जाहीर रीतीनें बहुजनसमाजापुढें एकवार तरी प्रत्यक्ष गाऊन सिद्ध केल्या पाहिजेत. टिळक-स्मारक-मंदिरांत गेल्या महिन्यांत लागोपाठ दोन सभा झाल्या. त्यांत सभेचे अध्यक्ष श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांनीं लवकरच तिसरी सभा भरवून या सर्व गोष्टी सप्रयोग सिद्ध करून दाखवूं असें सभेच्या शेवटीं जाहीर रीतीनें सांगितल्याचें आम्हांस स्मरतें. ता. २४–६–३९ च्या ज्ञानप्रकाशच्या अंकांत "सप्रयोग व्याख्यानाची श्रीमंत मुजुमदार यांची भरपूर तयारी आहे" असें श्री. गोविंदराव टेंबे यांनीं लिहिलें आहे. त्याप्रमाणें सवडीनुसार श्रीमंतांनीं हा योग जुळवून आणल्यास त्या सभेंत रागांचे प्रहर, रागांचे रस यासंबंधानें प्रत्यक्ष कृति करण्याच्या बाबतींत गोपाल गायन समाज अवश्य भाग घेईल.

अशी सभा भरविण्याचें आश्वासन श्रीमंत मुजुमदार यांनीं दिलें असल्यामुळें सभा भरणार हें निश्चित आहे. या सभेंत श्री. मास्तर कृष्णराव, प्रो. विनायकराव पटवर्धन, श्री. रामकृष्णबुवा वझे, श्री. मिराशीबुवा, श्री. सुरेशबाबू, श्री. नरहरबुवा पाटणकर, व याखेरीज पुण्यांत व पुण्याबाहेर या कलेंत नांवाजलेलीं गुणी माणसें पुष्कळ आहेत त्यांनीं आपल्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा अवश्य दिला पाहिजे, अशी सर्वांना आमची आग्रहाची विनंति आहे.

संगीतविद्येमध्यें असलेले गुण किंवा प्रभाव, लेखनानें किंवा व्याख्यानानें लोकांना समजणार नाहींत, प्रत्यक्ष कृतीनेंच ते पटवून दिले पाहिजेत. या संगीतविद्येचे वर्णन करितांना दाक्षिणेकडील एक ग्रंथकार म्हणतात कीं,

He is the best musician who introduces into his art the most truthful manner of laughing, weeping, and sighing and by such means arouses similar feelings in others.

अशा प्रकारच्या भावना आम्ही आपल्या गायनानें श्रोत्यांच्या अंतःकरणामध्यें थोड्या तरी उत्पन्न करून दिल्या पाहिजेत. तसें आपल्या हातून झालें नाहीं तर आपण या कलेमध्यें अजून बरेच मागें आहों हें तरी आपणांस समजून येईल.

गायनानें नुसती कानाची तृप्ति होऊन भागणार नाहीं, अंतःकरण तृप्त झालें पाहिजे. हिंदुस्थानी संगीत जगांतील सर्व संगीतापेक्षां श्रेष्ठ आहे व ही गोष्ट पाश्चिमात्य संगीताचार्यांनींसुद्धां कबूल केली आहे. परंतु आजच्या परिस्थितींत पुन्हां एकदां ती गोष्ट जगाला पटवून देण्याची जबाबदारी हिंदुस्थानांतील विद्यमान संगीताचार्यांवर आहे हें लक्षांत आणलें पाहिजे एवढेंच संगीत-कलेच्या उपासकांना आज आम्ही सांगू इच्छितों.

---:०:---

# आधुनिक शाहिरांना सूचना

गेल्या दहा वर्षांपासून ऐतिहासिक पोवाड्यांचा प्रचार अखिल महाराष्ट्रांत फारच झपाट्यानें झाला. १९२३ सालापासून ब्राम्हणवर्गांत शाहीर निघूं लागले. पोवाड्याच्या पद्धतीस नवीनच परंतु सुंदर वळण लाविलें गेलें. या नवीन पद्धतीचें अनुकरण सर्वत्र केलें जात असून त्यात आपापल्या बुद्धिनुसार प्रत्येक शाहीर नवीन भर पुनः घालीतच आहे. नवीं नवीं काव्यें एकसारखीं निर्माण होत आहेत. हल्लींचे बरेचसे शाहीर स्वतः काव्यें करून तीं स्वतः म्हणतात ही गोष्ट विशेष आहे. पूर्वी केवळ शिवजयंतीसारख्या उत्सवप्रसंगीं पोवाडे म्हणण्याची वहिवाट असे. परंतु अलीकडे सातआठ वर्षांपासून श्रीगणेशोत्सवांत व इतर मंगल प्रसंगीं देखील शाळा– कॉलेजमधूनसुद्धा ऐतिहासिक पोवाड्यांचे कार्यक्रम होऊं लागले आहेत. महाराष्ट्राचा बराचसा इतिहास आज पद्यमय झाला असून राहिलेला भाग पुढील दहा वर्षांत पद्यरूपाने जनतेपुढे येईल यात शंका नाहीं. पद्यमय इतिहास लोकांपुढे गाइल्याने जनतेची करमणूक होऊन लोकशिक्षणाचें कार्यहि उत्तम प्रकारें होतें ही गोष्ट पोवाड्यांच्या कार्यक्रमामुळे सिद्ध झाली आहे. एकंदरींत महाराष्ट्रांत व बृहन्महाराष्ट्रांतसुद्धां पोवाड्यांचा प्रसार केला जात आहे, याबद्दल आजकालच्या सर्व शाहीरांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

## तालस्वराचें ज्ञान

या बाबतींत एकच सूचना करावीशीं वाटते. ती अशी कीं, पोवाडे गातांना शाहिरांनी ताल व स्वर या गोष्टींकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे. पोवाडे ह्मणतांना ताल–स्वराकरितां वाद्यें साथीस घेतलीं जातात; परंतु ताल एकीकडे, स्वर दुसरीकडे व म्हणणारा तिसरीकडेच असा प्रकार

आज बहुतेक आढळून येत आहे. हल्लींचे शाहीर सुशिक्षित आहेत सबब या गोष्टीचा त्यांनी अवश्य विचार केला पाहिजे अशी त्यांना आमची आग्रहाची विनंति आहे.

ताल–स्वर समजून म्हणणारे शाहीर आहेत, परंतु त्यांची संख्या अगदींच कमी. शेकडा पंचाण्णव शाहीर या बाबतींत अगदींच बेफिकीर राहिलेले दिसतात. आधुनिक शाहिरांनी लय व स्वर याचा अवश्य तेवढा तरी अभ्यास करावा. आवाज उत्तम अगर कनिष्ठ असणें हा व्यक्तीचा गुण अगर दोष नसून हें देणें ईश्वराचें आहे. परंतु ज्या साधनांच्या साहाय्यानें पोवाडे गावयाचे, त्या साधनांचा योग्य उपयोग कसा करावयाचा हें जर शाहीर समजून घेणार नाहींत तर मात्र ते दोषास पात्र होतील यांत शंका नाहीं. गायनकलेंतील निरनिराळ्या प्रकारची लय, ताल अगर स्वर यांसंबंधींचें कौशल्य व अनेक महत्त्वाच्या गोष्टी पोवाड्यांत येऊं शकत नाहींत; तरी पण साधी लय आणि स्वर या दोन गोष्टी पोवाडे–गायनामध्ये महत्वाच्या आहेत हें शाहिरांनीं विसरतां कामा नये. पोवाड्यास लागणारी लय व स्वर हें समजावून घेण्यास फारसा कालावधि अगर कष्ट लागतात असेंहि पण नाहीं. प्रत्येक शाहीर ही गोष्ट मनावर घेईल तर ही उणीव सहज भरून निघेल. शाहिरी कलेंतील हे दोष हल्लींच्या शाहिरांना समजतात, त्यांत सुधारणा व्हावी असें सर्वांस वाटतें; परंतु जो तो जीवनकलहांत गुंतला असल्यामुळें या गोष्टीची वाटाघाट कोणी करीत नाहीं.

## अडाणी शाहीरांना पुढें आणा

> शब्दज्ञान उदंड झालें । कवित्व घरोघरीं केलें ॥
> समाधान निःशेष गेलें । हारपोनिया ॥

ह्या समर्थांच्या ओंवीप्रमाणे हल्लीच्या काव्याची स्थिति झाली आहे किंवा नाहीं याचा आधुनिक शाहिरांनीं आपल्या मनाशींच विचार करावा. मूळच्या चाली सुंदर, परंतु त्या आज विकृत स्वरूपांत ऐकावयास मिळतात. पोवाडे गातांना शब्दांची ओढाताण आणि भलत्याच

ठिकाणीं शब्दांवर जोर देऊन ओरडल्यासारखें म्हणणें इत्यादि गोष्टी त्याज्य आहेत.

गोंधळी अगर ब्राह्मण या खेरीज इतर दुसरे शाहीर अद्याप पुष्कळ आहेत. नाना तऱ्हेचीं सोंगें घेऊन जनतेपुढें कसें यावें हें त्यांना समजत नसल्यामुळें हे ब्राम्हणेतर शाहीर मागें पडले आहेत. शिवजयंतीसारख्या उत्सवांत सर्व जातीच्या शाहिरांनीं येऊन अवश्य भाग घ्यावा असें ठिकठिकाणच्या उत्सवमंडळांच्या चिटणिसांनीं जाहीर करून उत्सव–प्रसंगीं त्यांना आणविण्याची खटपट पुनः एकदा केली पाहिजे. असें केल्यानें पोवाड्यांच्या मूळच्या सुंदर चाली व त्यांतील काव्य हीं कशी आहेत याची कल्पना येऊन ऐतिहासिक पोवाड्यांचा प्रसार याहिपेक्षां जास्त चांगल्या तऱ्हेने होण्यास मदत होईल अशी आमची खात्री आहे.

—**केसरी** ता. ९।४।१९३५

# संगीताचें मराठीकरण

—:०:—

गेल्या आठ वर्षांपासून महाराष्ट्र संगीत अथवा संगीताचें मराठीकरण या विषयावर लेख, व्याख्यानें व वादविवाद सुरू आहेत; ता. २ मार्च १९२६ च्या 'केसरी'मध्यें या विषयावर आमचा पहिला लेख प्रसिद्ध झाला. नंतर पुढें लिहिणार होतों, परंतु कांहीं कारणानें तें अशक्य झालें. तदनंतर १९२८ सालीं पुण्यास संगीत परिषद् भरली. त्यावेळीं हें प्रकरण पुन्हा उपस्थित झालें. पुढें वर्ष दोन वर्षें या विषयाची फारशी चर्चा कोठें ऐकूं येत नव्हती; परंतु १९३१ सालापासून वसंत व्याख्यानमाला, शाळा व कॉलेज यामधून विद्यार्थ्यांना मराठी पदें म्हणण्याचा, शिकण्याचा व ऐकण्याचा उपदेश मोठ्या कळकळीनें केला जाऊं लागला. मराठी पदें अंकनरीतीसह ( नोटेशन पद्धतीसह ) जसजशीं प्रसिद्ध होत आहेत तसतशी तीं शिकविण्याचा उपक्रम मुंबई इलाख्यांतील बहुतेक सर्व संगीतविद्यालयें व गायनसमाज यांमधून आपोआपच सुरू होत आहे. एखादा गायक शाळा अगर कॉलेजमध्यें गावयास गेला असतां त्याला मराठी पदें म्हणण्याचा आग्रह विद्यार्थी करितात व त्याप्रमाणें सर्व गायन मराठींतच होतें, ही गोष्ट गेल्या वीस वर्षांपासून आपण सर्व पहात आहोंत. मग पुन्हा शाळा–कॉलेजमधून विद्यार्थ्यांना महाराष्ट्रांत मराठी पदें म्हणावींत किंवा शिकविलीं जावींत असा उपदेश करणारांनीं नवीन काय सांगितलें व ऐकणारांनीं नवीन काय ऐकलें हेंच आम्हांस कळत नाहीं.

त्रिताल, झपताल, एकताल, दादरा, धुमाळी, रूपक इत्यादि तालांचीं पदें आतांपर्यंत बरींच निर्माण झालीं. तीं गेल्या सात आठ वर्षांपासून च्चोहोंकडे शिकविलीं व म्हटलीं जात आहेत. ध्रुपदें, ख्याल, टप्पे इत्यादि प्रबंध तयार व्हावयाचे आहेत. तयार होऊन प्रसिद्ध झाले कीं, लगेच

त्यांचाही प्रसार आपोआप सुरू होईल. ध्रुपदें, ख्याल, टप्पे मराठींत अवश्य झाले पाहिजे असें श्री. ना. द. तांबेशास्त्री यांचेजवळ चार वर्षांपूर्वी कांहीं प्रसंगानें मी बोललों असल्याचें मला स्मरतें. गेल्या ६० वर्षांपासून महाराष्ट्रांत मराठी पदें म्हणण्याची पद्धत आहे आणि तीच पद्धत पुढें चालू रहावी अशी आजच्या सर्व गायकांची इच्छा आहे.

आठ वर्षांपेक्षां अधिक काळ होऊन गेला, एवढ्या अवधींत ध्रुपदें, ख्याल, टप्पे मराठींत तयार व्हावयास पाहिजे होते. परंतु एकमेकांना शिव्या देण्यांत व निंदा करण्यांतच आतांपर्यंतचा सर्व वेळ गेला; आतां यापुढें या बाबतींत उपदेश करण्याचें कारण राहिलेलें नाहीं. लेख अगर व्याख्यानें यांची बडबड नकोच नको. हिंदुस्थानप्रमाणें मराठींत सर्व प्रकारचे प्रबंध तयार करून ते प्रत्यक्ष गाण्याची वहिवाट आपण पाडूं या म्हणजे खरा कार्यभाग होईल. एकमेकांचे दोष किंवा उणें काढण्यास वाव मिळणार नाहीं. महाराष्ट्रांत मराठी पदें व ख्याल म्हणावेत, असा उपदेश करणारेच अजून हिंदी ख्याल व चिजा जलशांतून व खासगी कार्यक्रमांतून म्हणत आहेत, मग दुसऱ्यास उपदेश करून कसें भागेल?

गेल्या चारशें वर्षांपासून जी वहिवाट चालू आहे ती मोडून त्या ठिकाणीं एकदम सर्व मराठी यावें म्हटलें तर कसें होईल ! महाराष्ट्र संगीताच्या प्रचारकांनीं इतकें उतावीळ होऊं नये, असें आम्हांस वाटतें.

मराठीचे प्रबंध वाढत गेले कीं हिंदीचें बंड आपोआप कमी होईल यांत शंकाच नाहीं; त्याकरितां व्याख्यानाचे दौरे, लेख, शाळा–कॉलेजमधून उपदेश इत्यादि गोष्टींची फारशी जरूरी होती अगर आहे, असें वाटत नाहीं हें महाराष्ट्र–संगीत गेल्या अर्ध्या शतकापासून महाराष्ट्रांत चालूच आहे. त्याचें रक्षण महाराष्ट्रांतील सर्व गायकांनीं निरंतर करून त्यांत नवीन भर घालण्याची खटपट सर्वांनीं करावी. या बाबतींत मतभेद नाहींसे होण्याची तजवीज अवश्य होऊन बोलण्यापेक्षां प्रत्यक्ष कृतींत ही गोष्ट जास्त उतरली पाहिजे.

—ज्ञानप्रकाश ( ता. १९।१।३५ )

——:०:——

# राष्ट्रगीताची चाल

अलीकडे " वंदेमातरम् " या राष्ट्रगीतास निरनिराळया चाली लाविल्या जात आहेत. गाण्याच्या भाषेत बोलावयाचें म्हणजे सदर राष्ट्रगीत निरनिराळ्या रागांत बसवून तें सभेंत पसंती-नापसंतीकरितां येऊं लागलें आहे. राष्ट्रगीत सभेंत म्हटल्यावर श्रोत्यांच्या भावना थोड्या तरी जागृत झाल्या पाहिजेत, तरच तें राष्ट्रगीत! राष्ट्रगीताचे शब्द किती गंभीर व अर्थपूर्ण आहेत हें ध्यानीं आणून त्या शब्दांना साजेल अशी स्वररचना किंवा रागाची निवड झाली पाहिजे. नाहीं तर " अगदीं सोपी चाल " या सदराखालीं राष्ट्रगीताची आणि जात्यावरील गीताची चाल एकच होऊन बसेल. १९१६ सालीं म. गांधींच्या अध्यक्षतेखालीं गोध्र्यास फार मोठी परिषद भरली होती. त्यावेळीं राष्ट्रगीत व तें म्हणण्याची पद्धत या बाबतींत जो फार्स त्या रंगभूमीवर झाला त्याचें स्मरण अजून पुष्कळांना आहे. १९२४ सालीं बेळगांवच्या काँग्रेसमध्यें राष्ट्रगीत म्हणण्याकरितां कोण माणसें पुढें आलीं होतीं व त्याचा लोकांवर कसा परिणाम झाला हें पुण्याची मंडळी तरी निदान विसरली नसतील. हेंच " वंदेमातरम् " राष्ट्रगीत काफी रागांत बसवून बनारस काँग्रेसमध्यें ( १९०५ ) अगदीं प्रथमच म्हटलें गेलें, तें ऐकून श्रोत्यांचीं अंतःकरणें कशीं हालून गेलीं याची पण साक्ष मोठमोठे पुढारी लोक अजूनही देतात. राष्ट्रगीताची चाल सोपी असावी ही गोष्ट कबूल आहे; परंतु ज्या चालीमुळें राष्ट्रगीतांतील शब्दांचा जोर कमी होतो ती चाल सोपी असली तरी राष्ट्रगीतास उपयोगी नाहीं ही महत्वाची गोष्ट सर्वांनीं लक्षांत घेतली पाहिजे. बनारस काँग्रेसपासून आजपावेतों काफी रागांत बसविलेलें " वंदेमातरम् " पद सर्वत्र म्हटलें जात आहे.

हल्लीं नवीन व सोप्या चाली म्हणून ज्या पुढें येत आहेत त्या चाली काफी रागापेक्षां सरस व सोप्या नाहींत ही गोष्ट निश्चित आहे. काफी-

रागापेक्षां सरस राग किंवा चाल त्या गीताकरितां कोणी शोधून काढी-पर्यंत काफी रागच सर्वोत्कृष्ट आहे, असें आम्हांस वाटतें व त्यांत फारसें दुमत होईल असें संभवत नाहीं. ऑक्टोबर १९३७ च्या टाइम्सच्या एका अंकांत मद्रासच्या एका गृहस्थानीं वंदे मातरम् गीतास काफी रागच योग्य आहे, त्यांत बदल होऊं नये असें सुचविलें आहे. याचें कारण असें कीं, काफी रागांत बसविलेल्या वंदे मातरम्चा प्रचार गेल्या तीस वर्षांत इतका झाला आहे कीं, लहान मुलें-मुलीं सर्वत्र सभेमधून आज तेंच म्हणत आहेत. चाल सोपी व सरस म्हणून एवढा प्रचार झाला असून, घरांतील बायका-मुलेंसुद्धां तीं म्हणूं शकतात. असें असतां पुन्हां नवीन चालीचा खटाटोप कां चालू आहे हें समजत नाहीं. मनुष्य नावीन्यप्रिय आहे. त्या दृष्टीनें कदाचित नवीनपणा किंवा सुधारणा असावी असें वाटत असल्यास तसें करावयास कोणी कोणास हरकत करूं शकत नाहीं. परंतु नवीन सुधारणेची पहिल्या गोष्टींशीं तुलना करून कोणतें सरस हें ठरविण्याचा प्रयत्न चालू आहे याचें फार मोठें आश्चर्य वाटतें.

कांहीं माणसें या तुलनेच्या फंदांत पडलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं माणसें आमचेकडे येऊन या बाबतींत वाटाघाट करूं लागलीं व करीत आहेत. कित्येकांचें म्हणणें असें कीं आम्ही आपलें मत काय तें सांगावें. सबब या तुलना करणाऱ्या माणसांना असें सांगतों कीं, ज्या थोर पुरुषानें हें राष्ट्रगीत प्रथम १९१२ सालीं म्हटलें व पुढें सतत राष्ट्रसभेची सेवा करून ‘ वंदे मातरम् ’ राष्ट्रगीताच्या द्वारा लोकांचीं अंत:करणें वेळो-वेळीं हालवून सोडलीं, त्याची कर्तृत्वशक्ति, राष्ट्रभक्ति, त्याची बुद्धिमत्ता, तेज व दहादहा पंधरा पंधरा हजार लोकांच्या समुदायास, ( ध्वनियंत्राच्या सहाय्याशिवाय ) पुरून उरणारा गोड व पहाडी आवाज हे सर्व कोणी-कडे; आणि आम्ही नवीन चाली उत्पन्न करणारे कोणीकडे ! “ इंद्राचा ऐरावत आणि शाभभटाची तट्टाणी ” इतका जेथें फरक तेथें तुलना करणें यासारखा दुसरा मूर्खपणाच नाहीं.

आतांपावेतों बऱ्याच नवीन चाली निघाल्या असून यापुढें आणखी एक नवीन चाल लवकरच रंगभूमीवर येईलसें वाटतें. या नवीन चालीचे जनक कोण असावे याचा थोडा अंदाज आम्हांस लागला आहे. परंतु त्याबद्दल आज आम्ह स कांहींच म्हणावयाचें नाहीं. सिंहगर्जना संपली म्हणजे कोल्हेकुई सुरू होते असें म्हटल्यास वावगें होईलसें वाटत नाहीं. असो; नवीन चाली काढण्यास व त्यांचा प्रचार करण्यास कोणाचीच हरकत नाहीं. परंतु तुलनेच्या फंदांत पडूं नका, थप्पड बसेल. नावीन्य आणतां येत असेल तर आणा, सुधारणा करतां येत असेल तर करा, परंतु चुथडा होत असेल तर तो होऊं न देण्याची काळजी, 'वंदेमातरम्'– बद्दल कळकळ बाळगणारांनीं, घ्यावी एवढीच नम्र विनंति आहे.

—ज्ञानप्रकाश १०।१२।१९३७

# राष्ट्रगीताची नवी चाल

——:०:——

अडीच तपें होऊन गेलीं. एवढ्या काळांत अनेक परिषदा, कित्येक सभा व किती तरी राष्ट्रीय सभेचीं अधिवेशनें झालीं. या प्रत्येक प्रसंगीं 'वंदे मातरम्' हें काफी रागांतच म्हणण्यांत येत होतें. कोणीहि चाल बदलण्याचा प्रश्न काढला नव्हता, इतकी ती चाल सर्वसंमत होऊन जनतेच्या तोंडीं बसली होती व अजूनहि त्याच चालीनें राष्ट्रगीत म्हणण्यांत येत आहे. आतां त्याला कोणी झिंजोटी, भैरवी, सारंग वगैरे रागांतील चाली लावूं पाहात आहेत. राष्ट्रगीताची चाल जुनी बदलून कोणी नवी लावली तरी ती मोठी आक्षेपार्ह गोष्ट झाली असें नाहीं. पण जबाबदारी इतकीच आहे कीं, जी नवी चाल लावाल ती पुनः न बदलेल अशी खबरदारी घेतली गेली पाहिजे आणि शिवाय ती सर्वसंमत झाली पाहिजे. नाहीं तर आज एक चाल, उद्यां दुसरीच चाल अशा दिवसागणिक जर चाली बदलूं लागतील तर राष्ट्रगीताचा चुथडा मात्र होऊन जाईल.

जरा दूरवर विचार केला तर कोणत्याहि राष्ट्रगीताची चाल बदललेली नाहीं असेंच आपल्या नजरेस येईल. आपल्या ‘ वंदेमातरम् ’ राष्ट्रगीताला जी जुनी काफी रागांतली चाल आहे ती म्हणावयाला सोपी आहे, रसपरिपोषक आहे आणि रूढ झालेली आहे. असें असतां नवी चाल लावण्याचा प्रयत्न कां केला जावा हेंच समजत नाहीं.

कांहींनीं अशीहि एक सूचना केली कीं, ‘ वंदे मातरम् ’ हें राष्ट्रगीत शेवटीं म्हणण्यांत येतें, म्हणून तें भैरवी रागांत म्हणावें. याला थोडक्यांत उत्तर एवढेंच कीं राष्ट्रीय सभा, परिषदा व इतर सभा म्हणजे कांहीं गाण्याच्या मैफली नव्हेत कीं त्यांचा शेवट भैरवींतच झाला पाहिजे. भैरवी राग केव्हांहि म्हटला तरी तो ऐकणाराला गोड लागतो खरा; पण त्यानें अवश्य तो वीररस उत्पन्न होतो कीं नाहीं याहि गोष्टीचा विचार व्हावयास नको काय ? राष्ट्रगीताला नवी चाल लावणें आवश्यक आहे असें म्हणण्यानें एक ध्वनि असा निघतो कीं, जुनी चाल कुचकामी आहे म्हणून ती बदलावी. नवी चाल लावावी असें नुसतें म्हणून जबाबदारी संपत नाहीं. तर नवी चाल लावूं पहाणारावर, जुनी चाल रसपरिपोषक नाहीं काय ? त्याची स्वररचना व त्याचा ताल चुकीचा आहे काय ? ती सामुदायिक पद्धतीनें म्हणण्यांत कांहीं दोष उत्पन्न होतो कीं काय वगैरे प्रश्नांचीं उत्तरें देण्याची, नुसती देण्याचीच नव्हे तर तीं जनतेला पटवून देण्याची जबाबदारी येते. नाहीं तर ज्याला जी चाल पसंत पडेल त्यानें ती चाल लावावी असा प्रकार होईल. हे सर्व दोष नाहींसें करण्याचा एकच मार्ग म्हटला म्हणजे कै. पं. विष्णु दिगंबर यांनीं लावलेली व जनतेस संमत केलेली काफी रागांतील चाल न बदलणें हा होय.

—केसरी १९।१।३८

समाप्त



पुस्तकांतील चित्रांची छपाई चित्रशाळा प्रेसनें केली आहे.